सरकारी शाळांतून चालीं

मंजूर झालेला ग्रंथ.

गद्यरत्नसमुच्चय.

सुधारून वाढविलेली नवीन आवृत्ति

भाग पहिला.

आंग्लो-मराठी चौथ्या इयत्तेकरितां.

लक्ष्मण गणेशशास्त्री लेले

यांनीं तयार केला.

नवीन किताबखाना, बुधवार चौक, पुणें.

१९५८

SANCTIONED FOR USE IN GOVT. SCHOOLS.

GEMS OF MARATHI PROSE

REVISED AND ENLARGED EDITION.

PART 1.

For Anglo

गद्यरत्नसमुच्चय.

सुधारून वाढविलेली नवीन आवृत्ति.

भाग पहिला.

१८६६४

अँग्लो–मराठी चौथी व पांचवी ह्या इयत्तांकरितां.

लक्ष्मण गणेशशास्त्री लेले

यांनीं तयार केला.

आवृत्ति अकरावी.

सन १९२

प्रकाशकः—**विद्याधर हरि दामले**, मालक **नवीन किताबखाना**,
मुंबई व संयुक्त प्रांत सरकारचे एजंट, बुधवार पेठ, पुणें.

मुद्रकः—**रा० रा० लक्ष्मण भाऊराव कोकाटे**, मालक हनुमान प्रेस,
सदाशिव पेठ घ. नं० ३००, पुणें.

मराठी गद्यरचनेसंबंधानें चार शब्द.

प्रस्तुत ग्रंथ उत्तम गद्यात्मक वेंच्यांचा संग्रह आहे, हें त्याच्या नांवावरूनच लक्षांत येण्यासारखें आहे. गद्यरचनेसंबंधानें येथें चार शब्द लिहिणें प्रासंगिक वाटल्यावरून ते खालीं लिहिले आहेत. त्यांवरून वाचकांस आपल्या इकडील गद्यरचनेचा इतिहास थोडक्यांत समजेल व तिचें महत्त्वही त्यांच्या लक्षांत येईल.

गद्य हा शब्द गद् म्हणजे बोलणें या धातूपासून साधला आहे. गद्य हें रूप भविष्य कृदन्ताचें असून त्याचा यौगिक अर्थ ' जें बोलावयाचें तें,' असा आहे. छन्द वगैरेंचा निर्बंध ज्यांत नाहीं, म्हणजे अर्थात् साहजिक भाषणाप्रमाणेंच ज्यांत शब्दरचना आहे, अशा वाक्यरचनेला गद्य ही संज्ञा रूढ झाली. शास्त्रीय, व्यावहारिक किंवा इतर मनन करण्यासारखे गंभीर विषय लिहावयाला गद्यरचना अधिक सोईस्कर पडते. मनोरंजक विषयाला छन्दोबद्ध रचना निसर्गतः अधिक अनुकूल असते. वरच्यासारखे विषय छन्दामध्यें रचणें अनवश्यक, किंबहुना अप्रयोजक आहे. तसले विषय व्यावहारिक भाषेंतच लिहिले पाहिजेत. आणि ते तसे लिहिले तरच त्यांचा तसा उपयोग होतो.

आपल्या इकडे गद्यरचनेचा प्रसार प्राचीनकाळापासून विरळ आहे. आपले अति प्राचीन ग्रंथ वेद होत. त्यांत व्यवहार, नीति, इतिहास, सृष्टिसौंदर्य, ललितकला, यज्ञादि क्रिया, धर्म, देवतावर्णनें, उपासना, ब्रह्मज्ञान असे विषय आहेत, तरी त्या ग्रंथांची रचना छन्दोबद्ध आहे. पुढच्या बहुतेक संस्कृत ग्रंथकारांनीं आपल्या कृति प्रायः पद्यात्मकच करून ठेविल्या आहेत. वेदांविषयीं अत्यंत पूज्यबुद्धि असल्यामुळें त्या प्राचीन ग्रंथांच्या बाह्यांगाचें अनुकरण करण्याची इच्छा सदर ग्रंथकारांस झाली असावी असें वाटतें. धर्मशास्त्र, व्याकरण, तर्क, इतिहास, गणित, कोश इत्यादि विषय—कीं, ज्यांचा छंदोबद्ध रचनेशीं स्वभावतः विरोध—ते विषय देखील संस्कृतांत छन्दांत रचिलेले आहेत ! ही छंदांविषयींची प्रीति आश्चर्य करण्यासारखी आहे. आतां छंदोबद्ध रचना पाठ लवकर होते व त्यामुळें तिच्यांतील विषय ध्यानांतही धरण्यास सुलभ होतो

ही गोष्ट नाकबूल करतां येणार नाहीं; तथापि एवढ्या एकाच कारणास्तव सगळे विषय सरसकट पद्यांत ग्रथित करण्याची आवश्यकता आहे असें नाहीं; असो. संस्कृतांत कित्येक निबंध, भाष्यें, काव्यनाटकांवरील टीका व दशकुमार, कादंबरी इत्यादि ग्रंथ गद्यात्मक आहेत. शिवाय चंपू, नाटकें, भाण इत्यादिकांमध्येंही गद्याचें मिश्रण बरेंच आढळतें. तरी पण एकंदरींत संस्कृत वाङ्मय छंदोबद्ध आहे असें म्हणावयाला हरकत नाहीं.

मराठी भाषा परंपरेनें संस्कृतापासून निघाली आहे. तिच्या उत्पत्तिकालाविषयीं मतभेद आहे. तथापि इ० सनाच्या सातव्या शतकापासून ती प्रचलित आहे, याविषयीं आधुनिक विद्वान् शोधक गृहस्थांची एकवाक्यता आहे. सातव्या शतकापासून ज्ञानेश्वरमहाराजांच्या कालपर्यंत जी ग्रंथरचना झाल्याचें प्रसिद्ध आहे, तीही बहुतेक पद्यात्मक आहे ! ‘ बहुतेक ’ असें म्हणण्याचें प्रयोजन असें कीं, लीलाचरित्र या नांवाचा जो महानुभावपंथी महंतांचा ग्रंथ आहे, असें अलीकडे प्रसिद्ध झालें आहे, तो गद्यात्मक आहे. तो अकराव्या शतकाच्या आंतबाहेर झाला असें म्हणतात. शांकरमताची स्थापना आठव्या किंवा नवव्या शतकांत झाली असें अनुमान आहे. तिचा परिणाम अन्यत्र झाला तसा महाराष्ट्रांतही झाला; आणि त्यामुळें अद्वैतवेदांताची छाप मराठी आद्यग्रंथांवर बसली, ही गोष्ट ओघानेंच झाली. परंतु मराठी ग्रंथकारांनीं तरी आपले ग्रंथ पद्यात्मक रचण्याचें प्रयोजन काय ? याचें कारण इतकेंच दिसतें कीं, ज्या संस्कृत वेदान्तादि ग्रंथांशीं वरील ग्रंथकारांचा दृढ परिचय, ते बहुतेक पद्यात्मक असल्यामुळें त्यांच्यासारखाच वेष आपल्या ग्रंथांस असावा असें त्यांस वाटलें असावें.

यापुढें नामदेवापासून तों अनंतफंदीपर्यंत म्हणजे अठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत मराठी ग्रंथरचना बहुतेक पद्यात्मक आहे. आनंदतनय, रघुनाथ पंडित इत्यादिकांच्या काव्यांत गद्यरचना क्वचित् चूर्णिकेच्या रूपानें दृष्टीस पडतेच. कटावाचा प्रकार कोणी गद्यांत गणतात. ही रचना अमृतराय वगैरे कवींनीं केली आहे.

वरील कालांतील मुख्य गद्यग्रंथ म्हटले म्हणजे जुन्या बखरी, पत्रव्यवहार वगैरे होत. यांपैकीं कांहीं मागें ‘ काव्येतिहाससंग्रह ’ या मासिकपुस्तकांत

प्रसिद्ध झाले, आणि कित्येक अलीकडे इतर मासिकपुस्तकांतून व अन्यत्रही प्रसिद्ध होत आहेत. अठरावें शतक उलटून जाईपर्यंत गद्यरचनेसंबंधानें इतकीच माहिती उपलब्ध आहे.

हल्लीं प्रचलित असलेल्या गद्यरचनेचें जनन गेल्या शतकाच्या द्वितीय चरणाच्या आरंभीं झालें. पहिला मराठी गद्य ग्रंथ इ० स० १८२६ त प्रसिद्ध झाला असें समजतें. ही गद्यरचना इंग्रजी अमलाबरोबर इकडे आली; आणि त्याच्याबरोबर तीही प्रसार पावली. इंग्रजी शिकलेल्या पहिल्या पिढींतील कित्येक गृहस्थांनीं कांहीं इंग्रजी गद्यग्रंथ प्रथम मराठी भाषेंत उतरले. हे गद्यग्रंथ त्या वेळच्या मराठी शाळांतून वाचनपुस्तकें म्हणून चालू झाले. तेथूनच गद्यलेखन व गद्यवाचन यांचा प्रसार मराठींत सुरू झाला. बाळशास्त्री जांभेकर, सदाशिव काशिनाथ छत्रे, हरि केशवजी, दादोबा पांडुरंग, महादेवशास्त्री कोल्हटकर इत्यादि गृहस्थांची गद्यरचना सुप्रसिद्ध आहे. त्यांतूनही छत्रे यांची ‘ बाळमित्र ’ व ‘ इसापनीति ’ हीं पुस्तकें तर फारच सरस साधलीं असून त्यांची तारिफ अनेक मार्मिक विद्वानांनीं आजपर्यंत केली आहे. हीं पुस्तकें गद्यरचनेच्या दृष्टीनें केवळ अमोल आहेत. सदर ग्रंथांतील लेखनशैली अत्यंत मनोरम, सरळ व बाळबोध आहे. हीं पुस्तकें आबालवृद्धांस अत्यंत प्रिय झालेलीं आहेत.

यानंतरच्या पिढींत परशुरामपंत गोडबोले, गोपाळराव हरि देशमूख, कृष्णशास्त्री चिपळूणकर इत्यादि बहुश्रुत व विद्वान् गृहस्थांनीं गद्यग्रंथ लिहिलेले आहेत. हे तिन्ही गृहस्थ विशेष लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. त्यांच्याविषयीं थोडेंसें लिहितों: परशुरामपंततात्यांस इंग्रजी येत नव्हतें असें म्हणतात. यांनीं संस्कृताच्या आधारें मराठींत रचना केली आहे. यांचा प्रसिद्ध गद्यग्रंथ ‘ कादंबरीसार ’ हा आहे. बाणाच्या कादंबरीचें हें मराठी सार आहे. हा ग्रंथ फार प्रौढ, सरस व सरळ आहे. वरच्यापैकीं दुसरे गृहस्थ रा० ब० देशमूख होत. हे गृहस्थ मोठे शोधक व बहुश्रुत होते. लेखनाच्या व व्याख्यानांच्या द्वारें त्यांनीं आपल्या माहितीचा लाभ आपल्या देशबांधवांस करून दिला. त्यांची लिहिण्याची पद्धत जुनी गृहस्थी डौलाची आहे; तिच्यांत पाचपेंच नाहींत; साधेपणा आहे. पण माहितीनें तिला सौंदर्य

आलें आहे. प्रस्तुत ग्रंथकाराच्या ' ऐतिहासिक गोष्टी, ' ' पृथ्वीराज चव्हाण " इत्यादि पुस्तकें अवश्य वाचण्यासारखीं आहेत. त्यांचे विविधविषयांवरलि निबंधही प्रसिद्ध आहेत. यावरून त्यांचीं भिन्न भिन्न विषयांवरील मतें कळून येतात. देशमुखांनीं आपली माहिति इंग्रजी ग्रंथ, मराठी बखरी व जुने कागदपत्र यांच्या आधारानें लिहिली आहे. यानंतर कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्याविषयीं दोन शब्द अवश्य लिहिले पाहिजेत. शास्त्रीबोवा अत्यंत बुद्धिमान् असून त्यांचें शास्त्राध्ययन जुन्या पद्धतीप्रमाणें झालें होतें.प्रौढ वयांत त्यांनीं इंग्रजीचा अभ्यास केला. मराठी, संस्कृत व इंग्रजी तिन्ही भाषांत त्यांनीं प्रवीणता संपादन केली. यांच्या बुद्धीमध्यें सूक्ष्मपणा, विशदपणा व व्यापकता हे धर्म विशेष होते. यांची कुशाग्र बुद्धि सर्व विषयांत सारखी चाले व त्यांतील मर्म त्यांस सहज समजे. त्यांचें वाचन फार विस्तृत असून त्यांचा विद्याव्यासंगही जबरदस्त होता. इंग्रजीमध्यें प्रवेश झाल्याबरोबर त्यांनीं आपल्या बुद्धिबलानें त्या प्रगल्भ भाषेतील ज्ञानभांडार आपलेंसें करून घेतलें; त्यामुळें त्यांस जो आनंद व लाभ झाला त्याचा अंश तरी मराठी वाचणारांस प्राप्त व्हावा अशा बुद्धीनें त्यांनीं मराठी ग्रंथरचना आरंभिली. यावरून त्यांच्या ग्रंथरचनेचा हेतु किती उदात्त होता हें दिसून येतें. शास्त्रीबोवांचे ग्रंथ प्राय: भाषांतररूप आहेत. परंतु ते विद्वान् व मार्मिक भाषाभिज्ञ होते, यामुळें त्यांचीं भाषांतरें मूळग्रंथांसारखींच सरस उतरलीं आहेत. इंग्रजी व मराठी या भाषांमध्यें सादृश्य नाहींच असें म्हटलें तरी चालेल. यामुळें पहिलींतून दुसरींत बेमालूम तर्जुमा करणें किती अवघड आहे हें सहज लक्षांत येईल. तरी पण प्रस्तुत पंडिताचा या कामांत फारच मोठा लौकिक आहे. 'साक्रेतिसाचें चरित्र, 'रासेलस, ' 'अरेबियन् नाइट्स्, ' ' अनेक विद्यामूलतत्त्वसंग्रह, ' या त्यांच्या भाषांतररूप कृति आहेत. पण त्या इतक्या सुंदर उतरल्या आहेत कीं, इंग्रजीचा गंधही ज्यास नाहीं त्याला देखील त्यांतील रसाचा आस्वाद सहज घेतां येतो. ' अर्थशास्त्रपरिभाषा, ' ' व्याकरणावरील निबंध, ' व इतर कांहीं शास्त्रीय विषयांवरील शाळापत्रकांत प्रसिद्ध झालेले लेख, हे शास्त्रीबोवांच्या विद्वत्तेची, बुद्धिवैभवाची व विवेचकत्वाची साक्ष देतात. प्रस्तुत ग्रंथकारांत आणखीही एक गोष्ट विशेष होती. लक्ष्मी आणि सरस्वती यांचा स्वभावसिद्धविरोध जसा प्राय: अनुभवास येतो, त्याचप्रमाणें विवेचकता व

सहृदयता हे गुणही एकसमयावच्छेदानें एके ठिकाणीं आढळत नाहींत. परंतु कृष्णशास्त्री यांच्यामध्यें त्यांचा रमणीय संगम झाला होता. यामुळें त्यांच्या विवेचनपद्धतीला अपूर्व सौंदर्य आलें आहे. शास्त्रीबुवांची भाषा शुद्ध, प्रौढ, सरळ, सरस व मनोहर आहे. तिच्यांतील शब्दयोजना अत्यंत मार्मिक आहे. मोठालीं समासघटित पदें त्यांच्या लेखांत प्रायः आढळत नाहींत. यामुळें त्यांच्या लेखांस प्रसाद फार. त्यांची विवेचनपद्धति सुबोध, मुद्देसूद, व्यापक व मनोवेधक आहे. शास्त्रीबुवा शिक्षकही उत्तम होते. कठीण शास्त्रीय विषय देखील ते फार सोप्या व मनोरम भाषेंत समजावून देत, असें त्यांचे विद्यार्थी सांगतात; आणि हा त्यांचा असाधारण गुण त्यांच्या निबंधांतूनही पूर्णपणें दिसून येतो. विद्वत्ता, विद्याव्यासंग, रसिकता, पांडित्य, लेखनचातुर्य इत्यादि लोकोत्तर गुणांमध्यें कृष्णशास्त्री हे प्रसिद्ध आंग्लपंडित डॉक्टर जॉनसन् याच्या तोडीचे होते असें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं.

इ. स. १८७५ पासून १८८७ सालांपर्यंत जे गद्यग्रंथ झाले ते बहुतेक भाषांतररूप आहेत. या कालांत कांहीं वर्तमानपत्रें व मासिकपुस्तकेंही उदयाला आलीं. ‘ शालापत्रक ’, ‘ विविधज्ञानविस्तार ’ व ‘ दंभहारक ’ हीं त्या वेळचीं गणनीय मासिक पुस्तकें होत.

यापुढचा म्हणजे १८७५ पासून आजामितीपर्यंत गद्यरचनेचा ओघ अंमळ वेगळ्या प्रकारचा आहे. नवीन नवीन विषय स्वतंत्र रीतीनें लिहिण्याची या कालांत सुरवात झाली. हिचे आद्यप्रवर्तक विष्णुशास्त्री चिपळूणकर हे होत. सहृदयता, लेखनचातुर्य व मार्मिकपणा हे वडिलांचे गुण विष्णुशास्त्री यांच्यामध्यें पूर्णपणें उतरले होते. यांना भाषाविषय व इतिहास यांची फार अभिरुचि होती. यांवरच यांनीं मोठा व्यासंग केला. तरी पण त्यांनीं इतर विषययांवरही थोडेंबहुत लिहिलें आहे. विष्णुशास्त्री यांचा मोठा ग्रंथ ‘ निबंधमाला ’ होय. प्रस्तुत ग्रंथांत त्यांच्या विचाराची स्वतंत्रता, रचनेची प्रौढी, सरसता, रमणीयता, इत्यादि अनेक गुण व्यक्त झालेले आहेत. ‘ निबंधमाला ’ हा ग्रंथ विष्णुशास्त्री यांचें अक्षय्य स्मारक आहे. यांतील जॉन्सनचें चरित्र, इतिहास, विद्वत्व आणि कवित्त्व, लोकभ्रम, इंग्रजी भाषा, विनोदमहदाख्यायिका, पुस्तकपरीक्षण इत्यादि विषय वाचून मनन करण्यासारखे आहेत. त्यांपासून माहिती, रंजन व बोध होतो. शास्त्रीबुवांची भाषा सर्वत्र प्रसन्न, रमणीय व विलासशालिनी आहे. वडिलांच्या भाषेंत प्रायः

न आढळणारा ओज हा गुण चिरंजीवांच्या रचनेंत विषयानुरोधानें आढळतो. विष्णुशास्त्री गुणग्राही होते. विदेशीय लोकांच्या अनुकरणीय गुणांची जागोजाग त्यांनीं तारीफ केलेली आहे, व स्वकीयांच्या अंगीं खिळलेल्या दुर्गुणांचा त्यांनीं उपहास केला आहे. जेथें जेथें कांहीं चांगलें दिसेल तें घ्यावें व आपली उन्नति करून घ्यावी या मुद्यावर त्यांचा मोठा कटाक्ष आहे. त्यांचे ग्रंथ वाचतांना ही गोष्ट सहज लक्षांत येते.

विष्णुशास्त्री यांच्या पश्चात् आज पंचवीस वर्षांत निरनिराळ्या विषयांवर थोडेबहुत ग्रंथ झाले आहेत. मासिक पुस्तकें व विशेषतः वर्तमानपत्रें यांनीं बरीच मजल मारली आहे. यावरून या कालांत गद्यरचनेचा ओघ अधिक विस्तृत व विचित्र झाला आहे हें दिसून येतें. चिपळूणकरांच्या पाठीमागें गोपाळराव आगरकर, बाळ गंगाधर टिळक, महादेव शिवराम गोळे यांच्यासारखे कांहीं नामांकित विद्वान् लेखक झाले आहेत. तथापि ज्ञानाच्या प्रत्येक शाखेंत स्वतंत्र व मान्य ग्रंथ होऊन गद्यरचनेला परिणतावस्था प्राप्त होण्याचा काल अद्याप बराच दूर आहे असें वाटतें.

आपण मनांत विचार करतों तो शब्दमय असतो, ते शब्द छन्दोबद्ध नसतात; आपण नेहमीं बोलतों तसे असतात. ते शब्द आपण मुखानें किंवा लिपीनें व्यक्त करितों. यावरून मनुष्याचा विचार साहजिकपणें गद्यांत होतो असें म्हणावयाला हरकत नाहीं; आणि अशा दृष्टीनें पाहिलें असतां गद्यरचनेचा प्रारंभ म्हणजे विचारकालाचा प्रारंभ होय. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं असेंच मत ‘ निबन्धमालेंत ’ एके प्रसंगीं व्यक्त केलें आहे, त्यांत पुष्कळ अर्थ आहे. पद्यरचनेचा (सामान्यपणें काव्याला पद्याचा वेष असतो म्हणून असें म्हटलें आहे.) प्रधान हेतु रंजन असतो; गद्यरचनेचा प्रधान हेतु ज्ञान असतो. पद्यांत थोडा तरी कृत्रिमपणा असणार; गद्यांत तो स्वाभाविकपणेंच नसणार. पद्यांत कल्पनांचें साम्राज्य तर गद्यांत विचारांचें प्राबल्य. या गद्यपद्यांतील भेदावरून गद्याचें खरें महत्त्व वाचकांच्या ध्यानांत येईल.

पुणें, मार्च, १९०७. **लक्ष्मण गणेशशास्त्री लेले.**

आवृत्ति दुसरी.

प्रस्तुत पुस्तकाचे दोन्ही भाग मुंबई इलाखा व मध्यप्रांत यांतील शाळाधिकाऱ्यांनीं, हायस्कुलांतील विद्यार्थ्यांकरितां वाचनपुस्तकें म्हणून मंजूर केले, याबद्दल सदर अधिकाऱ्यांचे आम्ही फार आभारी आहों.

या पुस्तकाची पहिली आवृत्ति २ वर्षांपूर्वीं छापिली, तेव्हां कोणता भाग कोणत्या इयत्तांकरितां तयार केला हें त्यांत स्पष्टपणें लिहिलें नव्हतें, त्यामुळें कित्येकांचा साहजिकपणें थोडा गैरसमज झाला. शिवाय सहाव्या व सातव्या इयत्तांचा भाग प्रथम तयार केला, म्हणून त्याला पहिला भाग असें म्हटलें होतें, व पुढील म्हणजे चौथ्या व पांचव्या इयत्तांचा भाग मागाहून निघाला म्हणून त्याला दुसरा भाग असें म्हणावें लागलें; हें थोडेंसें नेहमींच्या वहिवाटीविरुद्ध झालें. या आवृत्तींत यासंबंधानें सुधारणा केली आहे, ती अशी:—

चौथी व पांचवी या इयत्तांकरितां जो पूर्वींचा दुसरा भाग होता त्याला आतां पहिला भाग असें म्हटलें आहे, व ग्राहकांचा गैरसमज होऊं नये म्हणून सदर पुस्तकाच्या मुखपृष्ठावर ‘ आंग्लो—मराठी चौथी व पांचवी या इयत्तांकरितां ’ असें स्पष्ट लिहिलें आहे. तसेंच सहावी व सातवी या इयत्तांकरितां जो पूर्वींचा पहिला भाग होता त्याला आतां दुसरा भाग असें म्हटलें आहे, व ‘ आंग्लो मराठी—सहावी व सातवी या इयत्तांकरितां ’ असे शब्द त्याच्याही मुखपृष्ठावर लिहिले आहेत. किंमती पूर्वींप्रमाणेंच ठेविल्या आहेत. ग्राहकांनीं पुस्तकें घेतांना किंवा मागवितांना या गोष्टीकडे लक्ष पुरवावें अशी त्यांस अगत्याची सूचना आहे.

प्रस्तुत पुस्तकास पुणें येथील नूतन मराठी विद्यालयाच्या चालकांनीं पहिल्यापासून प्रोत्साहन दिलें आहे, याबद्दल त्यांचे आम्ही कृतज्ञतापूर्वक आभार मानतों. मुंबई इलाख्यांत व तसेंच वऱ्हाडांत कित्येक हेडमास्तरांनीं हायस्कुलांतून हीं पुस्तकें चालू केलीं आहेत, या त्यांच्या उत्तेजनाबद्दल त्यांचेही आभार मानणें इष्ट आहे

या आवृत्तींत धड्यांच्या आरंभीं आंतील मजकुरासंबंधानें जरूर तेथें अधिक खुलासा केला आहे. बाकी म्हणण्यासारखा फेरफार कांहीं केला नसून पूर्वीं नजरचुकीनें राहिलेले दोष तेवढे काढून टाकिले आहेत.

पुणें, जुलै, सन १९०९ इ०. | **लक्ष्मण गणेशशास्त्री लेले.**

सुधारून वाढविलेली नवीन आवृत्ति.

—— ———:०:—— ——

या पुस्तकाची पहिली आवृत्ति इ. स. १९०९ सालीं निघाली. त्यानंतर याच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. तथापि त्यांत नवीन फेरफार केले नाहींत. या आवृत्तींत पुस्तकाच्या शेवटीं दहा धडे अधिक जोडले आहेत. पुस्तकाचा आकार बदलून टाईप व कागद अधिक चांगला वापरला आहे. या पुस्तकाचीं पृष्ठें क्राऊन षोडश-पत्री सुमारें दोनशें झालीं आहेत. नवीन उतारे नामांकित विद्वानांच्या ग्रंथांतून घेतले आहेत. त्यांत विषय व भाषा यांचें वैचित्र्य असून माहिती व मनोरंजन यांचाही विद्यार्थ्यांस लाभ होण्यासारखा आहे. पृष्ठसंख्या वाढल्यामुळें मूळच्यापेक्षां किंमत अधिक ठेवणें प्राप्त झालें. तथापि पुस्तक मोठें झाल्यामुळें प्रत्येक वर्षी धडे आलटून पालटून वाचण्याची विद्यार्थ्यांची सोय झाली आहे. ही नवीन सुधारून वाढविलेली आवृत्ति विद्यार्थिवर्गाच्या अधिक उपयोगीं पडेल असा भरंवसा आहे.

विद्याखात्याचे मुख्य अधिकारी मेहेरबान डायरेक्टरसाहेब बहादूर यांनीं प्रस्तुत पुस्तक सरकारी शाळांतून चालू करण्याची परवानगी दिली याद्दल त्यांचे आभार मानणें आवश्यक आहे. येथील नूतन मराठी विद्यालय या संस्थेच्या अधिकाऱ्यांनीं या पुस्तकास पहिल्या-पासून उदार आश्रय देऊन तो अव्याहत कायम ठेविला आहे याब-द्दल त्यांचे उतराई होणें अशक्य आहे. इतर अनेक संस्थांनीं व शाळांच्या हेडमास्तरांनीं उदारपणें या पुस्तकाला आश्रय दिला, तो त्यांनीं कृपा करून पुढें चालू ठेवावा अशी त्यांस विनंती आहे.

पुणें,
सप्टेंबर इ. स. १९२१. } लक्ष्मण गणेशशास्त्री लेले.

अनुक्रमणिका.

गद्यरत्नसमुच्चय.

भाग पहिला.

समुद्र.

हे सागरा! तुझ्या अफाट विस्ताराकडे पाहून जों जों विचार करूं लागावें, तों तों नव्या नव्या कल्पना मनांत येऊं लागून बुद्धीस अधिकाधिक चमत्कार भासतात, आणि आश्चर्यभरांत चित्त अगदीं थक्क होऊन जातें! ज्याप्रमाणें मनुष्यांच्या पिढ्यान पिढ्या एकामागून एक जन्मास येऊन कांहीं काळानें लागलीच विलयास जातात, त्याप्रमाणें तुजवर हजारों लाटा एकावर एक येऊन भराभर बुजून नाहींतशा होतात; आणि त्यांच्याप्रमाणेंच यांच्या वास्तव्याची मागें खूण देखील रहात नाहीं! तुझ्या लाटा सर्व पृथ्वीच्या किनाऱ्यावर आदळत आहेत, आणि ज्यांचें निकट सान्निध्य त्यांच्या अक्षय्य वैरास मात्र कारणीभूत होतें, अशा देशांची तोडातोड करून तूं त्यांचें कलाकौशल्य व संपत्ति हीं परस्परांस देववितोस, व एणेंकरून सर्व जगास तुझ्यामुळें सुखाचा व समृद्धीचा लाभ होत आहे.

तुझे देखावे तरी निरनिराळ्या समयीं किती विचित्र असतात! त्यांची शोभा व भव्यपणा हीं कोठवर वर्णावीं! कधीं वाऱ्याची

हालचाल अगदीं बंद होऊन तुझा सर्व विस्तार अगदीं निश्चल दिसतो; कधीं नुकताच सूर्योदय झाला असल्यामुळें क्षितिजाची कड रुप्यानें जणूं काय मढविलीच आहे अशी भासते; कधीं तोच सूर्य अस्तास जाऊं लागून संध्याकाळचें आकाश त्याच्या सोनेरी किरणांनीं देदीप्यमान झालें असतें, व अशा वेळेस आरशाप्रमाणें स्थिर अशा तुझ्या पाण्यावर जेव्हां आकाशाची कमानची कमान शाबूत उठलेली असते, तेव्हां ती तर काय शोभा सांगावी! पण हीं सर्व सौम्य रूपें टाकून जेव्हां तूं आपलें उग्र स्वरूप धारण करतोस, जेव्हां काळ्या दाट ढगांनीं आकाशांत गाढ अंधार होऊन तुफानाच्या वाऱ्याच्या सोसाट्यांनीं तूं अगदीं खवळून जातोस, व तुझ्या प्रचंड लाटा उसळून मेघमंडळाशीं एकवट होऊं पाहतात, जेव्हां मृत्यु आपलें भयंकर आधिपत्य तुजवर चोहोंकडे चालवीत असतो, जेव्हां अशा तडाक्यांत सांपडलेला बिचारा खलाशी भयानें गर्भगळीत होऊन त्याचे प्रयत्न निष्फल होतात, व त्याचे इष्टमित्र त्याजकरितां जागच्या जागीं हळहळत असतात, अशा भयंकर प्रसंगीं तुजकडे पाहण्याची कोणाची छाती आहे!

हे रत्नाकरा! इतकें झालें तरी हे सर्व खेळ केवळ तुझ्या पृष्ठभागावरचे! तुझे आंत जें विस्तीर्ण राज्य आहे त्यांत तर काय काय चमत्कार असतील याची कल्पना तरी कोणी करावी! तेथें मोठमोठाले खडपे व विशाल दऱ्या असतील, त्यांत जे नानाप्रकारचे हजारों प्राणी व वनस्पति असतील, त्या पाहिलेला कोण मनुष्य आहे? व तसेंच रत्नें वगैरे ज्या कोट्यवधि सुंदर वस्तु तळीं लोळत असतील, त्यांचा तरी कोणाला पत्ता लागेल काय?

याप्रमाणें विचार पुढें चालविले असतां बुद्धि अगदीं कुंठित होऊन जाते. पण जेव्हां तुझ्या भरतीओहोटींविषयीं विचार करावा-कीं ह्या जगाच्या आरंभापासून आजपर्यंत कधींही टळल्या नाहींत-तेव्हां ज्यानें आपल्या अपार सामर्थ्यानें तुला निर्माण केलें व तुझ्या मर्यादा अशा रेखून टाकिल्या कीं, तूं एवढा उच्छृंखळ खरा, परंतु त्यांचें उल्लंघन तुझ्यानें होऊंच नये, त्याच्या अगाध महिम्याकडे लक्ष लागून विचारशक्ति गुंग होऊन जाते व तिची गतिच पुढें होत नाहीं !

विष्णुशास्त्री चिपळूणकर.

---

२. विद्याचल.

मी एके दिवशीं रात्रीं विद्याप्राप्तीच्या उपायांविषयीं, ती प्राप्त झाल्यापासून होणाऱ्या सुखाविषयीं, व ती प्राप्त होण्यास जीं विघ्नें आहेत त्यांविषयीं एकाग्र चित्त करून पडलों असतां मला झोंप लागली, व पुढील चमत्कारिक स्वप्न मीं पाहिलें. तें असें:—

" मी एका अफाट मैदानांत उभा आहें व तेथून दूर अंतरावर उंच व रमणीय पर्वत दिसत आहे. त्यास विद्याचल म्हणत. त्या पर्वतावर जाण्याची उत्कंठा माझ्या मनांत उत्पन्न होऊन मी उभा होतों तेथून तिकडे जाण्यास जवळचा रस्ता कोणता असावा हें मी पाहूं लागलों असतां, कांहीं अंतरावर एक सुंदर उपवन माझ्या दृष्टीस पडलें. तिकडूनच त्या पर्वताकडे जाण्याची वाट असेल असें वाटून मी त्या उपवनाकडे चालता झालों.

“ जवळ जाऊन पाहिलें तों तें उपवन फारच सुंदर होतें. तेथें जिकडे तिकडे झाडांच्या सुंदर व बेतानें लाविलेल्या रांगा असून सर्व झाडें हिरवीं टवटवीत होतीं, व कितीएक चित्रविचित्र रंगांच्या फुलांनीं व कितीएक उत्तम फलांनीं शोभायमान दिसत होतीं. त्या झाडांच्या मधून रमणीय वाटा होत्या व जागजागीं विश्रांति घेण्याकरितां सुंदर कुंज व गुंफा केल्या होत्या. हें अतिमनोहर उपवन पाहून मला पराकाष्ठेचें समाधान वाटलें व कांहीं वेळ स्वस्थपणें त्यांत विहार करावा असा विचार करून मी इकडे तिकडे त्या स्थलाची अपूर्व शोभा पहात फिरत होतों. फिरतां फिरतां एके ठिकाणीं झुळझुळ वाहणाऱ्या सुंदर ओढ्याच्या कांठीं हिरव्यागार व कोंवळ्या गवतावर बसलेल्या तीन मूर्ति माझ्या दृष्टीस पडल्या. मग त्यांकडे वळलों व जवळ जाऊन पाहतों तों त्यांच्या भव्य व गंभीर मुद्रेवरून व अपूर्व तेजावरून त्या त्या ठिकाणच्या देवता असाव्या असें मला वाटलें. त्या तिघींपैकीं मध्य जी देवता बसली होती, तिचें नांव एकांतवास. हिची मुद्रा विचारग्रस्त दिसत होती. तरी तींत खेद किंवा दुःख यांचें चिन्ह अगदीं नव्हतें. तिच्या उजव्या बाजूस जी होती तिचें नांव मौन. ती तोंडावर तर्जनी ठेवून उगीच बसली होती. डाव्या बाजूस जी देवता होती तिचें नांव मनन. तिचे डोळे अर्धे उघडे व अर्धे मिटलेले असे असून तिनें वर दृष्टि लाविली होती. या देवतांच्या भव्य मुद्रा आणि अपूर्व व दिव्य तेज पाहून मीं अगदीं दिपून गेलों. आणि मोठ्या विनयानें व लीनतेनें हात जोडून उभा राहिलों असतां मधली देवता कृपा-

सूचक मुद्रेनें मजकडे अवलोकन करून अतिमधुर स्वरानें मला म्हणाली, 'अरे, तुझ्या मनांतील हेतु मला समजला. विंध्याचलावर जाण्याचें तुझ्या मनांत आहे, नव्हे? बरें चल माझ्यामागून. पुष्कळ लोकांस मीं तिकडे पोंचविलें आहे व तें करणें माझें कामच आहे. त्या पर्वतावर जाण्यास या माझ्या वनांतूनच बहुतेक सर्वांस जावें लागतें. दुसरी चांगली व निश्चित वाट तिकडे जावयास नाहीं.' मग या अनुग्रहाबद्दल त्या उदार देवतेचा मोठा उपकार मानून मी मोठ्या आनंदानें तिच्या आज्ञेनें चालण्यास सिद्ध होतांच ती पुढें चालली व तिच्या धोरणानें मी तिच्या मागें चालता झालों. थोड्याच वेळानें आम्ही विंध्याचलाजवळ पोहोंचलों. त्या उपवनाची व त्या पर्वताची शांतता व शोभा पाहून मीं विचारलें कीं, 'भगवति, या अनुपम व पवित्र स्थलीं कोण वास करितात? येथें केवळ सच्छील व सदाचरणी लोकांचा वास असावा, नाहीं बरें?' मार्गदर्शक देवतेनें उत्तर केलें कीं, 'तूं म्हणतोस तें एका प्रकारें खरें आहे. तूं म्हणतोस असल्याच लोकांकरितां मुळीं हें स्थळ निर्माण केलें होतें व सत्ययुगांत तसल्याच लोकांचा येथें प्रवेश होत असे. त्या वेळेस मननशील व लोकहितपरायण असे महान् महान् मुनि या स्थळीं वास करीत. त्यांचा सर्व काळ तत्त्वविचारांत व जगास सुबोध करण्यांत व सन्मार्गी लावण्यांत जात असे. त्यांच्यासाठीं कवि आणि तत्त्वद्रष्टे या संज्ञा यथार्थ होत्या. याप्रमाणें पूर्वस्थिति होती. परंतु अलीकडे कांहीं काळापासून ही सर्व स्थिति बदलून गेली आहे. हल्लीं या स्थळीं दुर्गुणांनीं सद्गुणांचीं सोंगें घेऊन प्रवेश

केला आहे. याकरितां सज्जन मनुष्यांस या स्थलींही फार जपून वागावें लागतें. [बोटानें दाखवून—] तो पहा प्रतीकार [सूड] स्वाभिमान हें बनावट नांव धारण करून मोठ्या डौलानें कसा फिरत आहे ! तशीच ती त्याच्याजवळ महत्त्वाकांक्षा, कीर्तितृष्णा हें खोटें नांव धारण करून, मोठ्या तोऱ्यानें मिरवीत आहे ! याप्रमाणें कितीएक दुर्गुणांनीं नानाप्रकारचीं रूपें घेऊन येथें आपला फैलाव मांडला आहे.'

"आम्हीं इतक्यांत विंध्याचलाचे अगदीं पायथ्याशीं येऊन पोहोंचलों. या ठिकाणीं कितीएक लबाड वाटाडे होते. ते 'या, इकडे या; आम्ही तुम्हांस चांगली वाट दाखवितों.' असें म्हणून तो पर्वत पहावयास जाणारांच्या पाठीस लागत. त्या सर्वांत 'पोकळ गर्व' या नांवाचा जो वाटाड्या होता तो तर पराकाष्ठेचा आग्रह करी व 'मी तुम्हांस अतित्वरेनें व श्रमावांचून वर घेऊन जातों,' असें सांगे; व पुष्कळ वाटसरू लोक त्याच्या गप्पा खऱ्या मानून त्याच्या अनुरोधानें जात व ते बापडे त्या पर्वताच्या पायथ्याच्या निबिड झाडींतच नेहमीं गोंधळत असत. असो; मी त्या वाटाड्याच्या मोहक भाषणाकडे लक्ष न देतां पूर्वीच्या देवतेच्या मागोमाग चाललों. पुढें पाहतों तों पर्वताच्या माथ्यावर जावयास दोन रस्ते होते व प्रत्येक मार्गाच्या तोंडाशीं एकेक रखवालदार होता. एका रस्त्याच्या नाक्यावर जो रक्षक होता तो एका रस्त्यानें जाऊं इच्छिणाराची चौकशी करी व ज्यास सरस्वती जन्मतः प्रसन्न आहे असें त्यास आढळे त्यास मात्र तो जाऊं देई. दुसऱ्या रस्त्याच्या नाक्या-

वर जो रखवालदार होता त्याचें नांव व्यासंग. पहिल्या रस्त्याच्या नाक्यावर नाकारलेले सर्व व इतर पुष्कळ दुसऱ्या नाकेवाल्याजवळ परवानगी मागण्यास येत व तो प्रायः कोणासही ना म्हणत नसे. परंतु तो परवानगी देण्याविषयीं फारच चेंगटपणा करी; व त्यानें खुला केलेला रस्ता इतका बिकट व भ्रामक असे कीं, जे तो पत-करीत त्यांपैकीं पुष्कळ लौकर किंवा उशिरां कंटाळून परिणामीं पुढें जाण्याविषयीं नाउमेद होऊन मागें फिरत. या रस्त्यानें जाणाऱ्यापैकीं फारच थोडे पर्वताच्या शिखरास जाऊन पोहोंचत. या दोन रस्त्यांहून निराळा एक तिसरा रस्ता होता तो वरील दोन्ही रस्ते अंशतः एकत्र होऊन झाला होता. परंतु हा मार्ग गुप्त असे व ज्या दैववान् मनुष्यांस तो सांपडे ते लौकर इष्ट ठिकाणीं जात. असो; मी आपल्या मार्गदर्शक देवतेस म्हणालों कीं, 'हे देवि! मला विद्याचलाच्या शिखरापर्यंत चढण्याची उमेद वाटत नाहीं, कांहीं उंच चढून तेथून दिसेल तितकाच चमत्कार पाहून आपलें समाधान करून घ्यावें अशी माझी इच्छा आहे.' तिनें उत्तर केलें कीं, 'बाबा; तसें होण्याचा संभव नाहीं. अर्ध्या वाटेवर जाऊन मध्यें थांबलें असतां थांबणारा वरून खालीं एकदम तळाशीं पडतो. तर तुला धैर्य खचूं न देतां शेवटपर्यंत वर चढलें पाहिजे.' मग तिच्या उत्तेजनानें मीं शिखरापर्यंत तिच्या मागून जाण्याचा दृढ निश्चय केला.

"आम्ही मध्यभागापेक्षां कांहीं वर गेल्यावर आम्हांस शिखर दिसूं लागलें. तेथें दोन मूर्ति प्रथम माझ्या दृष्टीस पडल्या. त्यांत

एक तरुण व अत्यंत सुंदर स्त्री होती. ती अत्यंत चपळ होती. तिच्या अंगीं असा कांहीं विलक्षण प्रभाव होता कीं, ती एका निमिषांत अत्यंत दूरच्या प्रदेशांत जाऊन परत येई. ती आपले पोषाख क्षणोक्षणीं बदली. कधीं कधीं ते अत्यंत सुबक, स्वाभाविक व फारच शोभणारे असत व कधीं कधीं फारच वेडेविद्रे व उपहासास्पद असत. तिच्या शेजारीं एक पुरुष असे. त्याचें वय प्रौढ असून मुद्रा फार गंभीर असे. तिनें वेडेविद्रे पोषाख व दागिने घातले असतां, आपल्या हातीं एक आरसा असे तो तिजपुढें करून तो तिची चूक तिला दाखवी; व तो उपहासास्पद पोषाख व भूषणें तिच्या अंगावरून हिसकून घेऊन पर्वताखालीं झुगारून देई व तीं खालीं पडल्याबरोबर तेथें फिरणारे खरोखरी अज्ञान परंतु सज्ञानांचा अभिमान बाळगणारे तीं खराब भूषणें व वस्त्रें लेऊन मोठ्या दिमाखानें मिरवूं लागत ! या तरुण स्त्रीचें नांव कल्पना व पुरुषाचें नांव पक्वविचार. यांची मुलगी तेथें होती. तिच्यासारखी मोहक स्वरूपाची स्त्री त्या पर्वतावर दुसरी नजरेस पडली नाहीं. तिचें नांव कविता. ही मुलगी एका उंच आसनावर बसली होती व तें आसन अनेक उत्तम कवींचीं काव्यें एकत्र करून बनविलें होतें. मग कांहीं वर गेल्यावर पर्वताचा वरील प्रदेश लागला. तेथील शोभा काय वर्णावी ! तेथील हवा शांत व स्वच्छ होती. तेथें सर्वकाळ वसंत वास करितो. आसमंतात् कल्पवृक्षांची बाग लागून गेली होती व जिकडे तिकडे दिव्य परिमल सुटला होता. तेथें दोन टेंकड्यांच्या मध्यें एक सुवर्णाचा विस्तीर्ण

व शोभायमान मंडप होता. त्याच्या मध्यभागीं रत्नजडित सिंहासनावर विद्यानाथ जो गणपति तो विराजत होता व त्याच्या शेजारीं वीणापुस्तकधारिणी शारदा बसली होती. पुढें गंधर्वांचें मधुर गायन व अप्सरांचें सुंदर नृत्य चाललें होतें. त्या दिव्य सभेंत विश्वामित्र, उशना, वाल्मीकि, कृष्णद्वैपायन, गुणाढ्य, कालिदास, भवभूति, बाण, गोवर्धन आदिकरून कवि; आणि जैमिनि, यास्क, कपिल, पतंजलि, गौतम आदिकरून शास्त्रप्रवर्तक बसले होते. पृथ्वीवरील दुसऱ्या देशांतील प्राचीन महा कवि व शास्त्रकर्तेंही येथें दिसत होते. ही अपूर्व सभा पाहून मी अगदीं चकित झालों, व मला अवर्णनीय आनंद झाला. त्या पर्वतावरून खालच्या लोकांचे व्यापार स्पष्ट नजरेस पडत होते. सदाचरणाचा मार्ग सर्वांच्या जवळ असतां लोभ, मत्सर इत्यादि ठकांच्या मोहजालांत गुंतल्यामुळें बहुतेकांस तो जवळ असून दिसत नसे, व ते बापडे उगीच संकटांत व दुःखांत पडत. हें सर्व त्या पर्वतावरून आह्मांस स्पष्ट दिसत असे. त्यांची ती दुःखावस्था पाहून माझ्या मनास मोठा धक्का बसला व त्या धक्क्याबरोबर मी जागा झालों."

कृष्णशास्त्री चिपळूणकर.

सीमोल्लंघन.

(हा शाळेच्या मुलांस ग्रंथकाराचा उपदेश आहे.)

आज दसऱ्याचा सण आहे. या दिवसाचें मुख्य कर्तव्य सीमोल्लंघन हें आहे. पूर्वीं ज्या वेळीं मराठे लोकांत वीरश्रीचा केवळ अवतार झाला होता व स्वपराक्रमानें दिग्विजय संपादण्याची उत्कट आशा त्यांच्या हृदयांत वागत होती, त्या वेळीं नवे नवे मुलुख

काबीज करण्याकरितां ते जेव्हां बाहेर पडत, तेव्हां वर्षाकालाच्या अखेरीस येणारा हा सण स्वराज्याची सीमा ओलांडून पलीकडे जाण्यास सुमुहूर्त गणिला जात असे. केवळ बाहुबलाच्या उत्कर्षाचे ते दिवस आतां गेले, परंतु त्यांबरोबर वीरश्रीचा किंवा पराक्रमाचा काळ गेला असें नाहीं. ती वीरश्री व तो पराक्रम मानसिक विजयाच्या श्रेष्ठतर कर्तव्याकडे आतां योजला पाहिजे. आपल्या अंगीं असणाऱ्या अनेक दोषांमुळें आपल्या उद्योगास, आपल्या संपत्तीस, आपल्या सर्व प्रकारच्या उन्नतीस, किंबहुना आपल्या मनोराज्यास देखील अतिदुस्तर सीमांचें सर्व दिशांनीं आवरण पडलें आहे. या आवरणामुळें, आपणांस आपली बुद्धि, सुविचार व कर्तबगारी प्रकट करून दाखविण्यास इतका आकुंचित प्रदेश उरला आहे कीं, त्यांची पूर्ण वाढ होऊं शकत नाहीं व त्यांच्या ऱ्हासास अकालींच आरंभ होतो. तेव्हां या तारुण्याच्या भरतीच्या काळांत तुम्हांमध्यें जी वीरश्री व जी महत्त्वाकांक्षा वागत असेल तिचा खरा सदुपयोग म्हटला म्हणजे स्वतःचे व कुटुंबस्थितीचे सर्व दोष व न्यूनता दूर करणें, व तेणेंकरून उद्योगादि इष्ट हेतूंस आकुंचित करणाऱ्या दुसऱ्या सीमांचें उल्लंघन करणें हा होय. या प्रकारच्या सीमोल्लंघनास तुम्हीं प्रवृत्त व्हावें व आजच्या या सुमुहूर्तानें आपला निश्चय तडीस नेण्याच्या उपायचिंतनास लागावें.

या प्रकारच्या सीमोल्लंघनापासून जो एक अत्यंत इष्ट परिणाम घडून येईल तो हा कीं, या राष्ट्रांतील लोकांविषयीं जगांत बहुमान उत्पन्न होईल, व आमच्या राज्यकर्त्यांपैकीं अनेक उदार पुरुष व

स्त्रिया आपणांस राष्ट्रोन्नतीच्या कामीं मदत करण्यास तयार होतील.
पूर्वी एका काळीं हा हिंदुस्तान देश कोठें आहे, कसा आहे, इत्यादि गोष्टींविषयीं युरोपांत कोणासही चांगली माहिती नव्हती. त्या वेळीं या देशास सुवर्णभूमि हें नांव प्राप्त झालें होतें, व या देशाच्या अपार संपत्तीविषयीं व विलक्षण रीतीभातींविषयीं युरोपांतील लोक हव्या त्या असंभाव्य कल्पना करीत असत. त्या पूर्वींच्या काळीं परद्वीपस्थ लोक आपणांविषयीं कोणते कुतर्क करितात, याविषयीं आपण बेफिकीर राहिलों असतों, तर त्यामुळें आपलें मुळींच नुकसान होण्याचा संभव नव्हता. परंतु हल्लीं तशी स्थिति नाहीं. या देशाविषयीं व येथील राहणारांविषयीं सर्व सुधारलेल्या राष्ट्रांस चांगली माहिती झाली आहे, व त्यांतील एका बलाढ्य राष्ट्राचा या देशावर अम्मल सुरू झाला आहे, ज्यांस आपणांविषयीं माहिती आहे व ज्यांशीं आपला नित्य संबंध येतो, त्यांचें आपणांविषयीं चांगलें मत असावें याबद्दल आपणांस काळजी घेतली पाहिजे. तसेंच ज्यांच्या हातीं आपलें हित किंवा अहित करण्याचें आहे त्यांस आपली योग्यता व आपले गुण कळावे, त्यांमध्यें कोणत्याही आत्मदोषानें आपणांविषयींचा गैरसमज किंवा तिरस्कार उत्पन्न होऊं नये, अशाविषयीं आपला नित्य प्रयत्न असला पाहिजे. आपण अशक्त, आळशी, निरुद्योगी, अपराक्रमी व केवळ गतानुगतिक आहों, असा आपला दुर्लौकिक सर्व सुधारलेल्या राष्ट्रांमध्यें होत आहे, व जर आपण या दुर्गुणांपासून मुक्त होण्याचा मनापासून प्रयत्न केला नाहीं, तर आपणांस कोण मान देईल ? कोण आपल्या उपयोगीं पडेल ?

आपल्या पूर्वजांच्या संबंधानें युरोपियन लोक जेव्हां स्तुतीचे उद्गार काढितात, तेव्हां ते स्वतःच्या प्राचीन पूर्वजांशीं त्यांची तुलना करितात. जेव्हां हल्लींच्या एतद्देशीयांविषयीं ते कांहीं उद्गार काढितात, तेव्हां ते स्वतःशीं त्यांची तुलना करितात. या तुलनेंत आपण कमी पडलों, तर तो दोष कोणाचा ? पूर्वजांच्या स्तुतीबद्दल जसें आपणांस समाधान वाटतें, तसें स्वतःच्या न्यूनतांबद्दल आपणांस अत्यंत दुःख वाटलें पाहिजे.

आपल्या न्यूनता दूर करण्याकरितां आपण मनापासून झटत आहों; नवीन विद्या, नवीन कौशल्य, नवीन उद्योग व नवीन विचारसरणि ग्रहण करण्यास तयार आहों; व त्यामुळें आपणांस पुनः ऊर्जित काळ येण्याची शक्यता आहे, असें आपल्या राज्यकर्त्यांपैकीं जे विचारी व थोर मनाचे पुरुष आहेत त्यांस दिसून आल्यास ते आपले साहाय्यकर्ते होतील व त्यांच्या साहाय्यानें कित्येक दुःसाध्य गोष्टीहि सुसाध्य होतील, यांत शंका नाहीं.

महादेव शिवराम गोळे.

---

४. दुर्योधनाचा मानी स्वभाव.

भारतीय युद्धामध्यें दुर्योधनाचे सगळे बंधु मरण पावले. भीष्म, द्रोण, कृप, कर्ण इत्यादि कौरवपक्षपाती महावीर नष्ट झाले. तेव्हां धृतराष्ट्र, गांधारी आणि संजय यांनीं दुर्योधनाला युद्ध सोडून देऊन पांडवांशीं साम करण्याविषयीं उपदेश केला. परंतु मानी दुर्योधनाला तो उपदेश मान्य झाला नाहीं. त्यानें वीराला उचित असें समर करण्याचा निश्चय केला. ही हकिकत खालीं संभाषणरूपानें आली आहे.

दुर्यो०—अगे आई, समरापासून निवृत्त होऊन म्यां काय करावें ?

गांधारी—तुझा पिता किंवा विदुरभावोजी सांगतील तें करावें.

संजय—राजा, गांधारी आई ठीक बोलते. असेंच करावें.

दुर्यो०—संजया, अद्यापि मला उपदेश करावयाचा राहिला आहे काय ?

संजय—राजा, जोंवर देहांत प्राण आहे, तोंवर जय मिळविणाऱ्यांस बुद्धिमंतांनीं उपदेश करावा, आणि त्यांनींही तो ऐकावा, हें योग्य आहे.

दुर्यो०—(रागानें) बरें तर, आपण बुद्धिमंत आहांच, आणि मीही जयेच्छु आहें; तर या समयास योग्य असा कोणता आपला उपदेश आहे तो सांगा. मी ऐकावयास सिद्ध आहें.

धृत०—वत्सा, हा संजय चांगली सोईची गोष्ट सांगत असतां त्याजवर उगाच कां बरें रागें भरतोस ? तूं जर स्वस्थचित्त होऊन ऐकशील तर, तो कशाला, मी सांगतों ऐक.

दुर्योधना, तुला फार कांहीं सांगावयाचें नाहीं. त्या युधिष्ठिराचें काय मागणें असेल तें त्याला देऊन त्याच्याशीं संधि करावा, इतकेंच आमचें तुला सांगणें आहे.

दुर्यो०—हे ताता, पुत्रमोहामुळें अंबा आणि असमंजसपणामुळें संजय असें बोलतात. पण तुम्हांलाही हा व्यामोह असावा काय ? अथवा पुत्रशोकानें जो हृदयास संताप झाला तो असें वदवील. परंतु हे ताता, पहा बरें. ज्या वेळेस शंभर बंधु कायम होते त्या वेळेस देखील साम करण्याविषयीं वासुदेव आर्जव करीत असतां मीं त्याचा अव्हेर केला. आतां दुःशासनादि सर्व भ्राते,

भीष्म, द्रोण व इतर मोठमोठे साह्यकर्ते राजे, हे सर्व मरण पावलेले अशा या समयीं ह्या तुच्छ शरीराच्या मात्र लोभाकरितां, थोरांच्या मंडळींत लाज आणणारा आणि परिणामीं दुःख देणारा असा संधि पांडवांशीं मीं कसा करावा बरें? कां, नीतिनिपुणा संजया, मी म्हणतों हें खरें ना? आणखी सांगतों, जरी आम्हीं संधि करूं म्हटलें तरी घडणार नाहीं. कारण,

आर्या.

जे हीनशक्ति झाले रिपु त्यांशीं नृप न संधि करितील;
संप्रति सानुज पांडव, हीनानुज मी; मला न वरितील.

धृत०—वत्सा, असें जरी झालें तरी म्यां सांगितलें असतां आणि मागून घेतलें असतां युधिष्ठिर कोणतीही गोष्ट न ऐकेल असें होणार नाहीं. तुला आणखी एक सांगतों, युधिष्ठिर सर्वदा आपणास अपकृष्ट असें मानतो.

दुर्यो०—असें कां बरें?

धृत०—ऐक, सांगतों. युधिष्ठिराची अशी प्रतिज्ञा आहे कीं, चौघांतून एक जरी भ्राता नष्ट झाला तरी मी प्राण धारण करणार नाहीं. यास्तव संग्रामांत मरणाची पाळी कोणावर येईल आणि कोणावर न येईल याचा नियम नाहीं, म्हणून अनुजांच्या नाशाची शंका त्याच्या मनांत नेहमीं वागत आहे. ह्या कारणामुळें, तुला आवडेल तसा संधि करावयास देखील तो आज सिद्ध होईल असें मला वाटतें.

संजय—खरी गोष्ट, असेंच आहे.

गांधारी—मुला, हें तुझ्या पित्याचें भाषण सयुक्तिक दिसतें; हें खरें मान.

दुर्यो०—अहो तात, अंब, अरे संजया, ऐका; तुमच्याच बोलण्यावरून न्याय झाला. पहा,—

श्लोक.

एका बंधुविनाहि जीवित नसो पार्थ--प्रतिज्ञा अशी,
मेले शंभर, म्यां स्वजीवितधनीं आणा धरावी कशी !
मी दुःशासनशोणिताशनरिपुप्राणा नको संहरूं !
लज्जा मानहि सोडुनी कृपणसा संधीच यांशीं करूं !

गांधारी—(हें ऐकून शोक करिते.) हा बाळा दुःशासना, हा दुर्मर्षणा, हा विकर्णा, अरे मला टाकून तुम्ही कोठें गेलां ? (आपणास म्हणते) अगे वीरशतप्रसविनि गांधारि, तूं दुःखशताला प्रसवलीस, सुतशताला नाहीं !

(सर्व ढळढळां रडतात.)

संजय—(डोळ्यांत अश्रु आणून) अहो तात, अहो अंब, तुम्ही राजा दुर्योधनाचें सांत्वन करून त्यास बोध करावा म्हणून ह्या समरभूमीस आलां, आणि तुम्हीच असें करितां, हें काय ? कांहीं विवेक करा.

धृत०—वत्सा, आमचीं दैवें तर अत्यंत प्रतिकूल झालीं आहेत, आणि तूंही शत्रूविषयीं आपला मानबंध सोडीत नाहींस, तर अशा समयीं एकट्या तुजवर जिव धरणारी आणि निरंतर दुःख भोगणारी ही तुझी आई गांधारी हिनें कोणाचा आश्रय करावा ? आणि म्यां तरी कोणाला शरण जावें, सांग बरें ?

दुर्यो०—ऐकावें तात, सांगतों काय करावें तें.

श्लोक.

पृथ्वी आक्रमिली जिहीं सकळ तें ऐश्वर्यही भोगिलें,
राजांनीं स्वशिरःस्थरत्ननिचयें ज्यांच्या पदा पूजिलें,
गेले ते शतपुत्र शत्रुंसि रणीं मारोनियां स्वःपुरा !
पूर्वीं ज्या धरिलें धुरेस सगरें ती तात वाहो धुरा !

याहून विपरीत केलें असतां क्षात्रधर्माचें उल्लंघन केलें असें होईल !

परशुरामपंत तात्या गोडबोले.

---

५. मयूरासन.

औरंगजेब बादशहाजवळ एकंदर सात सिंहासनें होतीं. त्यांपैकीं एकावर फक्त हिऱ्यांचेंच काम केलेलें असून, बाकीच्या सहांवर हिरे, पाच, माणीक, मोती यांचीं कामें केलेलीं होतीं.

वरील सिंहासनांपैकीं मुख्य सिंहासनास मयूरासन असें म्हणत असत. तें मुख्य दरबारच्या ठिकाणीं ठेवलेलें असे. त्याची लांबी सुमारें सहा फूट व रुंदी सुमारें चार फूट होती. या सिंहासनास वीसपासून पंचवीस इंच उंचीचे भक्कम चार पाय असून त्यांत चार गातें बसविलेलीं होतीं, व यांच्या आधारानें गादीची जागा तयार केलेली होती. वर सांगितलेल्या गातांपैकीं तीन बाजूंच्या म्हणजे उजव्या डाव्या व मागच्या बाजूंच्या अशा तीन गातांवर वरील मेघडंबरीस आधारभूत असे बारा खांब उभे केलेले होते. पुढची किंवा दरबारच्या समोरची बाजू अगदीं खुली होती. पाय

व गातें सोन्यानें मढविलेलीं असून त्यांवर उत्कृष्ट नक्षींचें काम केलेलें होतें. त्यांच्यांत जागजागीं हिरे, माणकें व पाच यांचे हजारों खडे बसविलेले होते. प्रत्येक गाताच्या मध्यभागीं मोठें बदकशाही माणीक बसविलेलें होतें; व त्याच्या चार बाजूंस चार पाच बसविलेले होते; व अशा रीतीनें गाताच्या दोन्ही टोंकांपर्यंत माणकांच्या चौकड्यांमध्यें एक मोठा पाच, व पाचेच्या चौकड्यामध्यें एक मोठें माणीक असें उत्तम जडावाचें काम केलेलें होतें. तसेंच या चौकड्यामध्यें मध्यंतरीं जी जागा खुली होती तिच्यांतून हिरे बसविलेले होते. या प्रत्येक हिऱ्याचें वजन दहापासून बारा कारातांपर्यंत होतें. हे हिरे कांहींसे चापट परंतु तेजःपुंज होते. सिंहासनाचे कांहीं भागांवर सोन्याचे कोंदणांत पाणीदार मोत्यें बसविलेलीं होतीं. या सिंहासनास चार पायऱ्या होत्या. ह्या सिंहासनावर भरजरी गाशा व त्यावर लोड व तिवाशा होत्या. तसेंच त्याच्या एका बाजूस ढाल, तरवार, धनुष्य, बाणांचे भाते वगैरे आयुधें लटकलेलीं होतीं. हीं सर्व हत्यारें, तसेंच गाशे, लोड, तिवाशा व सिंहासनाच्या पायऱ्या हीं वर सांगितलेल्या सर्व प्रकारच्या रत्नांनीं विभूषित केलेलीं होतीं.

या सिंहासनास जडलेल्या माणकांमध्यें १०८ माणकें फारच मूल्यवान् होतीं. त्यांपैकीं अगदीं हलक्या माणकाचें वजन १०० कारात असून कांहीं कांहीं २०० कारातांहून जास्त वजनाचीं होतीं. उत्कृष्ट पाणीदार पाचही पुष्कळ जडलेले होते, परंतु ते फुटलेले होते व त्यांचें वजन ३० पासून ६० कारातांपर्यंत होतें.

सिंहासनास माणकांपेक्षां पाच जास्त बसविले होते. मेघडंबरीच्या आंतल्या बाजूस हिरे, मोत्यें वगैरे बसविलेलीं असून सभोंवार मोत्यांची झालर लाविलेली होती. मेघडंबरीचा घुमट चतुष्कोण असून त्यावर एक मयूराचें चित्र बसाविलेलें होतें. त्याचें शेंपूट उभारलेलें असून त्याच्यावर नीळ व दुसरे निरनिराळ्या रंगांचे उत्कृष्ट खडे बसविलेले होते. त्या मयूराचें सर्वांग सोन्यानें मढविलेलें होतें, व त्यांत उत्कृष्ट रत्नें बसविलेलीं होतीं. त्याच्या छातींत एक मोठें माणीक बसविलेलें होतें, व तेथून एक पिंवळट रंगाचें ५० कारात वजनाचें मोतीं खालीं लटकत ठेविलेलें होतें. मयूराच्या दोन्ही बाजूंस त्याच्या उंचीइतकेच दोन गुच्छ बसविलेले होते, व त्यांत सोन्याचीं फुलें बसविलीं असून त्या फुलांत निरनिराळीं रत्नें बसविलेलीं होतीं. सिंहासनाची जी बाजू दरबारच्या समोर होती, तिच्यांत एक ८०।९० कारात वजनाचा तेजःपुंज हिरा अशा रीतीनें बसविलेला होता कीं, बादशहा सिंहासनावर बसला म्हणजे त्या हिऱ्याचें तेज त्याजवर पडत असे. या हिऱ्याच्या सभोंवार माणकें व पाच बसविले होते. तथापि या सिंहासनाचा अतिशय मूल्यवान् भाग म्हटला म्हणजे मेघडंबरीच्या खालीं जे खांब होते तो होय. या खांबांसभोंवार उत्कृष्ट पाणीदार मोत्यांचे सर सोडलेले होते, व या प्रत्येक मोत्याचें वजन ६।१० कारातांपर्यंत होतें. सिंहासनापासून चार फुटांच्या अंतरावर दोहों बाजूंस दोन छत्र्या उभ्या केलेल्या होत्या. या छत्र्यांच्या दांड्या आठ फूट उंचीच्या असून हिरे, माणकें व मोत्यें यांनीं त्या मढविलेल्या होत्या. छत्र्या

तांबड्या किनखाबाच्या केलेल्या असून सभोंवार मोत्यांच्या झालरी सोडलेल्या होत्या.

हें सिंहासन तयार करण्यास तैमूरलंगानें सुरवात केली होती व तें शहाजहान बादशहानें पुरें केलें. बादशहाच्या जवाहीर-खान्याचा हिशोब ठेवणारे, व या सिंहासनाच्या संबंधानें खर्च करणारे यांनीं या सिंहासनास एक हजार सत्तर कोटी रुपये खर्च झाला असें लिहून ठेविलेलें आहे! ट्रान्हरनिबर नांवाचा फिरस्ता औरंगजेबाचे कारकीर्दींत दिल्ली येथें होता, त्यानें वर लिहिल्याप्रमाणें वर्णन केलेलें आहे. नादीरशहानें इ० स० १७३९ त दिल्ली शहर लुटून नेलें, त्या वेळीं तो हें सिंहासन घेऊन गेला. हल्लीं या सिंहासनाचा अवशिष्ट राहिलेला फारच थोडा भाग इराणचे शहाचे जामदारखान्यांत आहे असें म्हणतात.

चिंतामण गंगाधर गोगटे.

---

६. प्रवास.

कोऽतिभारः समर्थानां ? किं दूरं व्यवसायिनाम् ?
को विदेशः सुविद्यानां ? कः परः प्रियवादिनाम् ?

सांप्रत या पृथ्वीवर मानवजातीस जें एवढें वैभव प्राप्त झालें आहे, तें प्रवासाच्या योगानें झालें आहे असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. जर प्रत्येक राष्ट्र आपआपली सीमा न उल्लंघितां आपल्याच ठायीं स्वस्थ बसतें, व दुसऱ्यास आपल्या मुलखांत येऊं न देतें, तर जगाच्या आद्यस्थितींत आणि सांप्रतच्या स्थितींत फारसा फेर पडता ना. प्रायः सर्व राष्ट्रांची मूळची समजूत अशीच असे

कीं, जें काय आपलें आहे तें आपणासच असावें, त्यांत परका मनुष्य भागीदार नसावा. हाच हेतु मनांत धरून स्पार्टन लोकांचा लैकर्गस म्हणून राज्यव्यवस्थापक होऊन गेला त्यानें तद्देशीय लोकांस परस्थ लोकांशीं व्यापार करण्याची अगदीं बंदी करून टाकिली होती व तोच प्रकार अजूनपर्यंतही पुष्कळ अंशीं चीन, जपान वगैरे राज्यांत दृष्टीस पडतो. पण हे मनुष्यानें केलेले अटकाव कोठपर्यंत चालणार ? अर्वाचीन तत्त्वज्ञानी लोकांनीं असा सिद्धांत केला आहे कीं, जगाच्या रहाटीचा एकंदर रोख सुधारणुकीकडे आहे. रोखाप्रमाणें इतके दिवसपर्यंत सर्व राष्ट्रांत जे जे कोणीं प्रतिबंध करून ठेविले ते ते एकामागून एक सर्व मोडत जाऊन हल्लीं तर त्यांचा प्रायः लयच झाल्यासारखा झाला आहे. असा या प्रतिबंधांचा लय होण्यास अनेक गोष्टी कारणीभूत होतात. त्यांतील मुख्य अशा पाहूं गेलें असतां जिज्ञासा व लोभ या दोन होत. सर्व लोक आपआपल्या मुलखांत ज्या गोष्टी पाहतात तेवढ्यांनीं त्यांची तृप्तता न होऊन इतर राष्ट्रांत काय चाललें आहे, तेथील लोक कसे काय आहेत, वगैरे पाहण्याची साहजिक जिज्ञासा त्यांच्या मनांत उत्पन्न होते. मग जिज्ञासा तृप्त करण्याकरतां ते लोक परराष्ट्रामध्यें जातात. हे एक झालें. दुसरें असें कीं, कोणी प्रतापशाली राजा आपल्या देशावर सार्वभौमत्व पावून इतर देशही आपल्या सत्तेखालीं आणावे अशी महत्त्वाकांक्षा मनांत धरतो व इतर राष्ट्रांशीं बळेंच वैर साधून त्यांजवर स्वाऱ्या करतो. या दोन्ही कारणांच्या— विशेषतः दुसऱ्याच कारणाच्या—योगानें, जे देश एकमेकांपासून

हजारों कोसांच्या अंतरावर असतात व ज्या देशांचें दळणवळण होण्याची कांहीं काळापूर्वी कोणाच्या मनांत कल्पनाही आली नसेल, त्यांचा परस्पर निकट संबंध होऊन राहिला आहे.

प्रवासास आवश्यक गोष्ट म्हटली म्हणजे धारिष्ट होय. ज्या लोकांस धारिष्ट नाहीं, ज्यांचे विचार आपलें कुटुंब व आपला देश यांहून पलीकडे कधीं धजावतच नाहींत, त्यांच्या मनांत इतर देशीं प्रवास करण्याची बुद्धि होईल कोठून ? जगाच्या इतिहासांत पाहिलें असतां असें आढळतें कीं, ज्या लोकांत धारिष्ट विशेष तेच संपत्तिमान् व ज्ञानसंपन्न असे झाले. इसवी सनाच्या पूर्वी सुमारें हजार वर्षांमागें एशियामैनर देशांत फिनिशियन म्हणून मोठे धारिष्टवान् लोक होते. त्या लोकांनीं त्या वेळेस जेवढा जगाचा भाग माहीत होता, तेवढ्याशीं व्यापार ठेविला होता. त्या वेळेस नाविककला फार अपूर्ण दशेंत असतांही, ते लोक, सर्व भूमध्यसमुद्र धुंडाळून ज्या अटलांटिक महासागरास त्या वेळेस लोक पृथ्वीची सीमा समजून त्यांत फार लांबपर्यंत जाण्यास भीत असत, त्या महासागरांत देखील संचार करूं लागले. त्यांनीं ब्रिटिश बेटें—जीं त्या वेळच्या लोकांस फारशीं ठाऊक देखील नव्हतीं—व आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरचीं बेटें, यांशीं बराच व्यापार चालविला होता. सारांश, ते लोक धारिष्टवान् असल्यामुळें त्या वेळीं तें राष्ट्र धनाढ्य व विद्यासंपन्न म्हणून गाजत होतें. त्यांनीं कार्थेज, टायर इत्यादि नामांकित शहरें वसविलीं. त्यांच्या मागें कार्थेजच्या लोकांनींही त्यांचा धारिष्टाचा कित्ता बराच उचलला होता. पण पुढें ते लोक राज्याचे

चुरशीस लागल्यामुळें त्यांचें पहिलें तेज कमी होऊन शेवटीं त्यांचा अगदीं मोड झाला. त्याहीपुढें जीं ग्रीसचीं अनेक संस्थानें एकामागून एक अशीं वैभवास चढलीं व पुढें रोमन लोकांचें सर्व जगावर जें स्वामित्व झालें, त्या सर्वांचें बीज तरी धारिष्ट होय.

साहस, उद्योग, वगैरे गुणांचा जसजसा लोकांत ऱ्हास होऊं लागतो तसतशी त्या लोकांची बुडती कळा आलीशी समजावें; असो. हल्लींही इंग्रज लोकांच्या उत्कर्षास हेंच साहस मुख्य कारण झालें आहे. सन १४९२ या वर्षी कोलंबसानें मोठ्या अडचणी सोसून अमेरिका खंडाचा शोध लावला. तेव्हांपासून युरोपामध्यें साहसाचा आवेश सर्व लोकांचे मनांत भरला. पुढें लौकरच पोर्तुगीज लोकांनीं हिंदुस्थानाशीं व्यापार करण्यास व तेथील मुलूख काबीज करण्यास आरंभ केला. त्याच्या मागोमागच डच, इंग्रज, फ्रेंच वगैरेही लोक आले. पुढें इंग्रज लोकांस एथचें सार्वभौमत्व प्राप्त झालें. याप्रमाणें युरोपांतील लोकांचा उत्कर्ष, त्यांचें प्रवास करण्याचें जें साहस, त्यामुळें झाला व अजूनही किती होईल हें सांगवत नाहीं. कां कीं, त्यांचे नवे नवे शोध प्रतिवर्षी चाललेच आहेत. या वर्षी कोणी जहाजें घेऊन आर्क्टिक महासागरांत ध्रुवाजवळचे प्रदेश पहावयास गेला, पुढच्या वर्षी कोणी मंगोपार्कासारखा धैर्यवान् पुरुष निर्जन व भयाण अशा आफ्रिकेच्या मध्यभागच्या प्रदेशांत गेला, कोणी नवीं बेटें शोधून काढण्याकरितां अफाट अशा पासिफिक महासागरांत गेला, अशा साहसी पुरुषांचें ठिकाण जें युरोपखंड, तें हल्लीं संपत्तीचें व विद्येचें भांडार झालें आहे यांत नवल काय?

वरील गोष्टी, मोठमोठ्या राष्ट्रांची स्थिति एकंदरींत पाहतां झाल्या. पण नुसत्या मनुष्याविषयीं पाहिलें तरी प्रवासापासून केवढे नफे होतात ! सर्वांस अनुभवावरून हें तर ठाऊकच आहे कीं, पुष्कळ फिरलेला मनुष्य प्रवासामुळें मोठा हुशार होतो. त्यानें अनेक प्रकारचे प्रसंग काढलेले असतात, हजारों गोष्टी स्वतः पाहिलेल्या असतात व तशाच पुष्कळ ऐकिल्याही असतात. यामुळें तो मनुष्य हरएक कामांत वाकबगार होतो. हे तर केवळ व्यावहारिक नफे झाले. पण जो तत्त्ववेत्ता आहे किंवा तशा प्रकारची केवळ स्फूर्ति म्हणून ज्याला आहे, सहृदय कवि—कीं ज्यास सृष्टि चमत्कारमय व आनंदमय भासते,—त्यास तर देशाटनापासून मोठे अमूल्य लाभ आहेत. प्राचीन ग्रीक लोकांतील पुष्कळ मोठमोठे विद्वान् पुष्कळ देश हिंडले होते. त्यांचा पहिला जो इतिहासकार हिराडोटस तो एशियामैनर, मिसरदेश वगैरे मोठमोठे देश हिंडला होता; व त्या योगानें त्यानें जें ज्ञान संपादिलें त्याच्यामुळें तो एवढा विख्यात ग्रंथकार झाला. त्याप्रमाणेंच सोलन, लैकर्गस म्हणून जे राज्यव्यवस्थापक झाले, त्यांनीं देखील आपलें ज्ञानाचें कोठार प्रवासांतच सांठविलें. लैकर्गस तर हिंदुस्तानपर्यंत देखील आला होता, असें कितीएक इतिहासकार म्हणतात. त्याचप्रमाणें आमच्या हिंदुलोकांतही जे मोठमोठे विद्वान् होऊन गेले तेही फार प्रवास केलेले असावे यांत संशय नाहीं. सर्व कवींचा मुकुटमणि जो कालिदास तोही मोठा प्रवासी होता असें म्हणतात; व या गोष्टीस हें एक मोठें प्रमाण आहे कीं, ज्या वेळीं आतांप्रमाणें नकाशे वगैरे साधनें

नव्हतीं, त्या वेळेस त्यानें आपल्या मेघदूतनामक अतिसुंदर काव्यांत मेघास जो मार्ग रामगिरीपासून तों थेट अलकापुरी म्हणजे हिमालय पर्वताचें कैलासशिखर तेथपर्यंत सांगितला आहे, तो अगदीं बिनचूक आहे. शिवाय ह्या काव्यामधील पर्वतांचें, नद्यांचें वगैरे जें सर्व वर्णन दिलें आहे. तें तरी, तीं स्थळें कवीनें स्वतः पाहिल्यावांचून इतकें उत्कृष्ट लिहिलें असेल, हें म्हणणें नीट दिसत नाहीं. अर्वाचीन कालांत जर्मन देशांत एक हंबोल्ट म्हणून महापंडित होऊन गेला. हा तर पृथ्वींतील चारी खंडें हिंडला. ज्या हिमालय पर्वताच्या शिखराची आम्हांस एथल्या एथें देखील पुरी माहिती नाहीं, त्यावर स्वतः जाऊन त्यानें तेथील सृष्टिचमत्कार आपल्या "कासमस" नांवाच्या प्रख्यात ग्रंथांत लिहून ठेवले आहेत! यावरून त्या पंडिताची जिज्ञासा व प्रवासाविषयींचें साहस हीं स्पष्ट दिसून येतात.

हे गुण प्राचीन हिंदु लोकांत मुळींच नव्हते असें जरी म्हणतां येत नाहीं, तरी कालांतरीं त्यांचा लोप झाला हें स्पष्ट आहे. भर्तृहरीनें आपल्या एका शतकांत म्हटलें आहें कीं, "किं सुखमप्रवासगमनम्" सुख काय ?—तर प्रवासास न जाणें. आणि हाच अर्वाचीन हिंदु लोकांच्या एकंदर मनाचा रोख दिसतो. यापासून देशाचें किती अहित झालें आहे हें सर्वांस माहीतच आहे. त्यावर विस्तार करावा असें नाहीं. हल्लीं तर प्रवासाचे श्रम म्हटले म्हणजे नाहींतसेच झाल्यासारखे झाले आहेत. तरी प्रवासापासून मनावर होणारे जे सद्विकार ते तरी निदान होण्यास कांहीं प्रतिबंध

नाहीं. सध्यां हिंदुस्तानभर व सर्व पृथ्वीवर हवें तिकडे जाण्यास लोखंडी सडका व आगगाड्या झाल्या आहेत. तर अशी प्रवास करण्याची अत्युत्कृष्ट संधि तरी न गमावतां जे आमचे लोक यापासून आपला नफा करून घेऊं पाहतील त्यांस तो पुष्कळ होण्यासारखा आहे.

विष्णुशास्त्री चिपळूणकर.

---

७. मनुष्याचें आटोकाट ज्ञान.

ह्या पुढील मनोरंजक लेख जेन टेलर नांवाच्या विद्वान् व चतुर ग्रंथकर्त्रीचा आहे. इंग्रज लोकांच्या स्त्रियांत विद्येचा प्रसार कितपत असतो याचा साक्षात् अनुभव आपणांस घडणें अशक्य; यास्तव आमच्या जिज्ञासु व मर्मज्ञ वाचकांस पुढील मासला सादर केला आहे. यांवरून त्यांच्या ज्ञानाची योग्यता त्यांस सहज कळून येईल. तसेंच स्त्रिया ज्ञानसंपन्न झाल्या असतां देशास केवढा उपयोग व केवढें भूषण होण्यासारखें असतें ही महत्त्वाची गोष्टही खालच्यासारख्या लेखांनीं जशी सुज्ञांच्या मनावर ठसेल तशी शुष्क पांडित्याच्या शंभर निबंधांनीं ठसणार नाहीं हें खचीत.

आपलें सर्व वय विद्याभ्यासांत खर्चून जो परमज्ञानी झाला असा कोणी एक अतिवृद्ध महापंडित हळहळून आपणाशीं म्हणतो:—

"अहो, मनुष्याचें ज्ञान झालें तरी किती तें अत्यल्प! मी आपला सारा जन्म ज्ञानसंपादन करण्यांत घालविला ना? पण इतकें करूनही मला समजतें काय? सृष्टीच्या रहस्याचा खुलासा लावण्याची उमेद धरून मी खोल खोल विचारांत जों जों शिरूं लागतों, तों तों माझी बुद्धि अगदींच गुंग होऊन मला कांहींच कळेनासें

होतें. पहिल्या पहिल्यानें माझी मति कांहींशी चालते खरी, पण माझें निश्चित ज्ञान असें तेवढेंच. त्यापुढें नुसत्या कल्पनाच बांधाव्या लागतात. एकूण अज्ञानदशेपेक्षां सज्ञानदशेंत मोठा विशेष म्हटला म्हणजे एवढाच कीं, सृष्टिकर्त्याच्या अपार योजनेचें आकलन होण्यास मनुष्याची बुद्धि किती पंगु आहे याचा तींत बोध असल्यानें पूर्णपणें सिद्धांत होतो!

"आतां सूर्याचें प्रमाण व ग्रहांचीं अंतरें हीं मला काढतां येतात. तसेंच त्यांचे वेध घेऊन त्यांच्या गति वर्तविणें व मनास थक्क करणाऱ्या अशा त्यांच्या प्रदक्षिणांचे नियम सिद्ध करणें या गोष्टीही मला अगदीं सहज आहेत, हें सर्व खरें. परंतु त्यांची रचना कशी काय आहे, त्यांजवर प्राणी वास करितात कीं नाहीं, करित असले तर त्यांची जीवनस्थिति व राहण्याच्या सोयी कोणत्या प्रकारच्या आहेत इत्यादींविषयीं माहिती माझी व अडाणी कुणब्याची सारखीच. पण हें फार दूरच्या अशा अंतरांतील गोलांविषयीं झालें. ज्या पृथ्वीवर मी खुद्द राहतों तिच्या सृष्टिव्यवस्थेविषयीं तरी मला कितपत माहिती आहे! ज्या वायुजलादिकांस मूलद्रव्यें समजून 'पंचमहाभूतें' अशी संज्ञा पूर्वापारपासून लोक देत आले त्यांचेंही पृथक्करण करून त्यांच्या घटकावयवांस मीं नांवें दिलीं हें खरें; पण अग्नीची दहनक्रिया कशी चालते किंवा जलास प्रवाहित्वधर्म कशामुळें आला आहे, इत्यादि गोष्टींचें उपपादन माझ्यानें करवेल काय? अग्नि व उदक हीं वस्तुतः काय आहेत हा विचार सुद्धां कधीं मनांत न आणतां सर्व जग त्यांचें

सेवन करितें, त्यांस वरील गोष्टींचा उलगडा पाडण्यास जशी मोठीच पंचाईत येऊन पडेल त्याप्रमाणें मलाही होतें. माझी कुशाग्र बुद्धि व तत्त्वज्ञता यांची एथें यत्किंचितही गति न होतां, सारी माझ्यापाशींच राहते. पदार्थ निराधार असला कीं, तो जमिनीवर पडायचा हा नियम सर्वत्र मी पाहतों; व शास्त्रकारांच्या उपपत्तीवरून मला असें समजलें आहे कीं, हें गुरुत्वाकर्षणाचें फळ होय. पण हें समजूनही मला नवीन तें काय कळलें! ज्यास पूर्वी मी 'पतन' म्हणत होतों त्यासच आतां, 'आकर्षण' म्हणतों, एवढाच काय तो फरक! अवघ्या पदार्थमात्रांची ज्या अतर्क्य व अदृश्य सूत्राच्या योगानें एका केंद्राकडे गति होत आहे, त्याच्या स्वरूपाचा बोध वरील शब्दानें मला यत्किंचित् तरी होतो काय? सृष्टिविषयक शास्त्रांत निष्णात झाल्यामुळें प्राणिवर्ग, उद्भिज्जवर्ग व खनिजवर्ग असे तीन मुख्य विभाग, तशाच अवांतर जाति व उपजाति, या सर्वांची निवडानिवड मला करितां येते. पण इतके परिश्रम करूनही हिरव्या गवताच्या एका पातेचा पोषणप्रकार माझ्यानें सांगवेल काय? मीं फार फार सूक्ष्म विचार केला तरी सृष्टिकर्त्या चतुर कारागिराचें जें अद्भुत व सुंदर कलमवनपुष्पांस चित्रविचित्र रंगांनीं रंगवितें त्याचा मला शोध लागेल काय? तसेंच माणिकावर व पाचेवर जे रंग झळकतात, व तऱ्हेतऱ्हेच्या शिंपांवर ज्या लकेरी मारतात त्यांचें कारण तरी आजपर्यंत विचार करून मला काय उमगलें आहे? इतर प्राण्यांचें चातुर्य जें माझ्या नजरेस येतें त्यास मी उपजतबुद्धि म्हणतों व मनुष्याच्या विचारशक्तीशीं ती कोणकोणत्या जनावरांच्या ठायीं किती मिळूं पहाते

याविषयींही माझा तर्क चालतो. परंतु एकंदरींत पाहतां पशूंस माझे मनोधर्म जितपत कळतात, तितपतच त्यांचेही मला कळतात, असें म्हणणें भाग येतें. जेव्हां पक्ष्यांचा थवा आकाशांत घिरट्या घालतांना मी पाहतों किंवा एखाद्या दूरच्या प्रदेशाकडे त्यांचे कळप निघालेले असतात, तेव्हांचे त्यांचे संकेत व शब्द, पंडितांच्या भाषा जशा एखाद्या अक्षरशून्य मजुराला, त्याप्रमाणेंच मलाही अत्यंत गूढ होत. धर्मशास्त्रावरील ग्रंथांत जितकी त्यांची गति तितकीच माझीही त्यांच्या वर्तननियमांत व व्यवस्थेंत होय.

" हर हर! एकूण ज्ञानप्राप्तीस्तव सर्व जन्मभर जो मीं एवढा शीण केला, त्यासारखें त्याचें सार्थक तें मला काय झालें? माझी बुद्धि किती पंगु, अज्ञान केवढें थोर, या गोष्टींचा पूर्ण प्रत्यय माझ्या मनास येऊन माझें क्षुद्रत्व मला स्पष्टपणें भासूं लागलें, इतकेंच कीं नव्हे? शिव शिव!! मनुष्याच्या अंगीं पराकाष्ठेची विद्वत्ता आली, तरी आपला ज्ञानगर्व मिरविण्याचा त्यास किती अत्यल्प अवकाश असतो! त्याची बुद्धि वस्तुतः इतकी कोती असून व संपादिलेलें ज्ञानही तसेंच अपुरतें असून, नसत्या भूषणाचा त्यानें गर्व वाहावा व आपली योग्यता मोठी मानावी हा त्याचा केवढा मूर्खपणा!!"

विष्णुशास्त्री चिपळूणकर.

———

८. वजिरातीच्या वस्त्रांचा समारंभ.

(महादजी शिंदे यांनीं पुणें मुक्कामीं श्रीमंत सवाई माधवरावसाहेब पेशवे यांस दिल्लीच्या बादशहापासून संपादन केलेलीं वजिरातीचीं वस्त्रें अर्पण केलीं त्या प्रसंगाचें हें वर्णन आहे.)

दुसरे दिवशीं दरबारचीं बलावणीं सर्वांस झालीं. लहान थोर मुत्सद्दी व कारभारी व मानकरी व पागे व पथके तमाम सरदार दरबारास आले; व महादजी शिंदे वानवडीहून वाड्यांत आले. सकळ दरबार झाला आहे. त्या समयीं महादजी शिंदे यांनीं सर्वांस सांगितलें कीं, " दिल्लीचे बादशहा यांनीं सरकारच्या नावें वजिरातीचीं वस्त्रें वगैरे दिलीं तीं सरकारांत प्रविष्ट करावयाचीं, त्याचा विचार सर्वांनीं करून सुमुहूर्त पाहून निश्चय ठरवावा, म्हणजे त्याप्रमाणें समारंभ करावयाचा बेत ठरवूं. " असें सर्वांनीं ऐकतांच नाना, तात्या व वरकड कारभारी यांनीं रुकार दिला, " चांगलें आहे. " त्या समयीं जोशी बलावून, दिनशुद्धि चांगली पाहून, श्रीमंतांचे राशीस चंद्रबळ उत्तम व आणखी दोन चार ग्रह अति सुंदर, श्रीमंतांस मोठे अनुकूल, असा दिवस पाहून त्या दिवशीं मरातब घेण्याचा निश्चय ठरवून पाटीलबोवा यांस सर्वांनीं रुकार दिला.

मग त्या दिवशीं महादजी शिंदे यांनीं आपले लष्करांत श्रीमंत बसावयाची जागा करून मखमाली डेरे देऊन, मखमाली बिछाईत घालून, कळवंतिणींचे नाच उभे करून, शिंदे श्रीमंतांस न्यावयास पुण्यास येऊन त्यांनीं विनंती केली. तेव्हां स्वारी सरकारची तयार होऊन निघाली.

बरोबर तमाम मानकरी, शिलेदार, सर्व मुत्सद्दी, तात्या, नाना, आप्पा बळवंत, अमृतराव पेठे, रामचंद्र गणेश, विसाजीपंत बिनीवाले, बाजीपंत अण्णा, नारोपंत चक्रदेव, महादजीपंत गुरुजी; ब्राह्मण सरदार—पटवर्धन, विंचूरकर, गणेशपंत बेहेरे, बहिरो अनंत, राजे बहाद्दर; मराठे सरदार—अक्कलकोटवाले भोसले, घोरपडे, निंबाळकर, जाधव, भोइटे, असा सारा फौजेचा जमाव करून, श्रीमंतांची स्वारी पुण्याहून निघाली.

त्या वेळीं खासा स्वारी अयन्याच्या अंबारींत बसून चालली. खवासखान्यांत आप्पा बळवंत व पेठे बसले. श्रीमंतांच्या मागें नाना फडणीसही अंबारींत बसून चालले. तसेंच तात्या व महादजी शिंदे अंबारींत बसून (चालले, व) त्यांच्या मागून झाडून सरदार निघाले. खाशी स्वारी सरकारची चालत असतां खाजगी जिलीब पुढें चालली असे. शिंदे यांजकडील जिलबीपुढें बल्लम* वगैरे चालत. यापुढें भालदार, चोपदार, सरकारचे मिरधे, पुढें हाका मारून सांगतात, त्यांच्यापुढें कोतवालघोडे, अशा थाटानें स्वारी वानवडीस जाण्यासाठीं निघाली.

ती स्वारी शनवारांतून वाडा डावा घालून आदितवारांतून नाकझरी उतरून तहत वानवडी पावेतों आघाडी स्वारीची व रास्ते यांचे पेठेपावेतों एकसारखा स्वारीचा थाट चालला. अशी स्वारी जात असतां लष्करांत दाखल झाली.*

---

*बल्लम = एक प्रकारचा भाला किंवा बर्ची, तो भाला धरणारे.

*या समारंभाकरितां शिंद्यांनीं संगमावर तयारी केली होती.

ग्रांट डफ.

जेथें बसावयाची जागा केली होती, तेथें जाऊन श्रीमंत व सर्व मंडळी, मानकरी, मुख्य कारभारी, लहानथोर सरदार, आपआपल्या इराद्याप्रमाणें × कचेरीच्या डेऱ्यांत जाऊन बसले. नाच होत आहे. असा दोन तीन घटका नाच झाला. नंतर महादजी शिंदे यांनीं दिल्लीहून बादशाही वजिरातीचे मरातब आणिले होते, तीं भूषणें सारीं कचेरीस आणविलीं. नंतर श्रीमंतांपुढें ठेविलीं. नंतर मंदील पठाणी तऱ्हेचा बांधिलेला होता, तो डोकीस घातला. तसाच अंगांत जामानिमा तमामी, पायांत विजार घालून कमरेस पटका बांधून श्रीमंत खालीं बसले. मग मस्तकीं शिरपेंच व तुरा कलगी मंदिलावर बांधिली हातांत मनगटी, पौंच्या, भुजबंद, गळ्यांत मोत्यांचे व नवरत्नांचे हार घातले. कानांत चौकडा घातला. पायांत घालण्याकरितां बादशाही जोडा आणिला होता. तो पाटीलबोवा यांनीं पुढें ठेविला. आणखी मोरचेल शिंदे यांनीं हातांत घेऊन श्रीमंतांवर वारून, पाठीमागें खिसमतगार उभे होते त्यांच्या हातीं दिलें. मग नालकी व कांहीं मरातब आणून पुढें ठेविले. नंतर "दिल्लीस वजिरातीचा कारभार करावयाचा तो श्रीमंतांचे तर्फेनें महादजी शिंदे यांनीं करावा," अशी विनंती शिंदे यांनीं केली असतां सर्वांच्या मनास येऊन "उत्तम आहे" असे सर्वांचे रुकार आले. नंतर हरिपंत तात्या यांनीं विनंती केली कीं, "पाटीलबोवा यांस वजिरातीच्या गुमास्तागिरीचीं वस्त्रें, नालकी वगैरे द्यावयाचीं, तीं सरकारची स्वारी वाड्यांत दाखल झाल्यानंतर तेथें द्यावीं."

× इरादा—इलाखा, हक्क, योग्यता

ही गोष्ट सर्वांचे मनास आली, तेव्हां शिंदे यांनीं सर्वांस पोषाख दिले. शिंदे यांची अंबारी एक खांबाची होती. ती त्यानें सरकारांत नजर केली. मग पानसुपारी, अत्तरगुलाब, हारगजरे वांटिले.

मग सरकारची स्वारी पुण्यास यावयास निघाली. तेव्हां मशाली लावून, हत्तीवर हवया लावून श्रीमंत पालखींत बसून निघाले. त्यासमयीं सरकारचे राजमंडळाचे मानकरी व सरदार होते ते नालकीबरोबर चालले नाहींत. * अघाडी पिछाडीस चालले व सरकार—चाकर होते ते मात्र नालकीसमागमें चालिले. महादजी शिंदे व हरिपंत तात्या हे नालकी धरून दोहींकडे चालले. बादशाही पोषाख अंगावर होता त्या सुद्धां सरकारची स्वारी नालकींत बसली. एकीकडे मोरचेल, एकीकडे चवरी, पुढें जिलीबी बादशाही मरातब चालले. अशी स्वारी शहरांत येईतों चार घटका रात्र झाली. तेव्हां मशाली, हवया लावून, त्या उजेडांत बादशाही पोषाख अंगावर होता तो काढून नवा पोषाख घेतल्यानंतर स्वारी सरकारची जाऊन गादीवर बसली. तेव्हां सारे मानकरी व सरदार पागे व सरकारचे कारभारी व मुत्सद्दी व शिलेदार असे सर्वांचे मुजरे व नजरनजराणे झाले. नंतर महादजी शिंदे यांस वजिरातीच्या गुमास्तगिरीचीं वस्त्रें द्यावयाचीं तीं तेथें वाड्यांत समक्ष दिलीं. आणखी मरातब बादशाही द्यावयाचे ते दिले. सर्वांस पानसुपारी, अत्तर गुलाब देऊन सर्वांस निरोप दिला. महादजी शिंदे यांस निरोप देऊन सर्व

* सातारच्या महाराजांच्या तर्फेनें आलेले सरदार वगैरे शिंद्यांनीं या समारंभाकरितां उभ्या केलेल्या बादशाही तंबूत पेशव्यांबरोबर गेले नाहींत व त्यांनीं त्यांस नजरही केली नाहीं.

ग्रांट डफ.

लोक आपआपले ठिकाणीं गेले व महादजी शिंदेही आज्ञा घेऊन आपले लष्करांत गेले. याप्रमाणें बादशाही वजिरातीचा समारंभ झाला.

कृष्णाजी विनायक सोहोनी.

---

९. समुद्रावरील प्रवास.

मुंबईहून निघाल्यानंतर २७ दिवसांत चारपांच ठिकाणीं मात्र आम्हांला भूमीचें दर्शन झालें. एरवीं खालीं अगाध समुद्र आणि वरतीं अनंत आकाश आमच्या नजरेस पडत होतें. संध्याकाळच्या वेळेस आम्ही जेव्हां डेकावर बसत होतों तेव्हां समुद्राची आणि आकाशाची अपूर्व आणि अनिर्वचनीय शोभा आणि महत्त्व पाहून माझ्या मनांत किती प्रकारचे विचार येत असत हें सांगतां येत नाहीं. एकीकडे सूर्य अस्ताला जात आहे, त्याची सायंकालीन कोमल प्रभा अनंत नीलनभोमंडलांत जिकडे तिकडे—विशेषें-करून पश्चिमेकडे— पसरलेल्या पिंजलेल्या शुभ्र कापसाच्या ढिगा-सारख्या मेघराशींवर प्रतिबिंबित होऊन आमच्या पुराणांतील काल्पनिक सुवर्णगिरि मेरूचीं शिखरें चोहोंकडे समुद्रांत आपलीं डोकीं उचलून आकाशाचें चुंबन घेत आहेत कीं काय, अशी भ्रांति होत असे ! किंवा समुद्रोदरांत कल्पिलेल्या कृष्णाची सुवर्ण*द्वारका

---

* मी लहान होतें तेव्हां आमचे वडील सुमारें १०।११ महिनेपर्यंत कच्छा-जवळ असलेल्या द्वारकेंत समुद्रकिनाऱ्यावर राहिले होते. तेथें कधीं कधीं संध्याकाळच्या वेळेस समुद्रकिनाऱ्यावरील शुभ्र वाळवंटावर आम्ही फिरावयास जात होतों. अहा ! ते किती सुखाचे दिवस होते ! तसे दिवस या जन्मांत पुनः यावयाचे नाहींत ! माझ्या बालस्वभावाला अनुसरून मी त्या वाळवंटा-

अथवा रावणाची लंका माझ्यासमोर आहे की काय असें वाटत असे ! सूर्यास्त झाल्यानंतर बंगाल्यांतील पडदपोशी स्त्रिया जशा हळूच पडदा पलीकडे सारून लोकांस भीत भीत खिडक्यांतून डोकाऊन पाहतात आणि पुनः झटकर घरांत आपलें तोंड लपवितात, त्याप्रमाणें वायुवेगानें परवश होऊन आकाशांतून इकडे तिकडे फिरणाऱ्या मेघरूपी अंतराळांतून एकापाठीमागून एक अशा पुष्कळ तारका गगनसौधावरून आमच्याकडे डोकावीत असत, आणि

वर किती कवड्या, शिंपल्या, दगड, धोंडे गोळा करून ओटींत भरून घरीं नेत असें, आणि मला त्या वेळेस किती आनंद होई म्हणून सांगूं ! त्या वेळेस आतांसारखे माझे डोळे समुद्राची किंवा आकाशाची शोभा पाहण्यास गुंतत नव्हते. माझीं आईबापें, बहीण आणि भाऊ हीं सर्वजण एकीकडे गोष्टी सांगत फिरत असत आणि मी त्यांच्या पुढें आणि मागें घोटाळत दगड, धोंडे, काय हातीं लागेल तें वाळवंटांतून गोळा करीत असें. मला वाटे माझीं आईबापें आणि बहीणभावंडें अरसिक आहेत ! कां तर माझ्यासारखीं तींही शंख, शिंपल्या, दगड, धोंडे गोळा करीत नाहींत म्हणून ! ! !

एक दिवस द्वारकेंतील पंड्यांनीं (तीर्थपुरोहितांनीं) अशी गप्प उठविली कीं, आज कपिलाषष्ठी आहे; या योगास आज संध्याकाळीं कृष्णाची समुद्रांत बुडून राहिलेली सोन्याची द्वारका भक्तजनांस दर्शन देण्याकरितां वर येणार आहे; तेव्हां ज्यांस तिचें दर्शन घ्यावयाचें असेल त्यांनीं समुद्रतीरावर यावें ! त्याचप्रमाणें द्वारकेंत समुद्रकिनाऱ्यावर हजारों भक्तमंडळी जमली. आम्ही द्वारकादर्शनलालसेच्या परवश होऊन तेथें गेलों. थोडक्या वेळानेंच पश्चिम गगनप्रांतीं दिननाथ अस्तास जाऊं लागले. आणि त्यांची स्वर्णप्रभा वर सांगितल्यासारख्या मेघराशींवर पसरून अत्यंत शोभायमान होऊं लागली. पंड्यांनीं तिकडे बोट दाखवून आम्हांला म्हटलें, " ही पहा सोन्याची द्वारका ! " हें ऐकून पुष्कळ भाविक लोकांनीं भक्तिपूर्वक द्वारकेला उद्देशून नमस्कार केले ! त्या पर्वणींत पंड्यांनीं आपल्या पिशव्या चांगल्या भरून घेतल्या ! ! !

पुनः मेघांच्या आड आपलें तोंड लपवीत असत ! एकाद्या वेळेस आकाश निरभ्र असलें म्हणजे असंख्य नक्षत्रें दिसूं लागत. त्या वेळेस यमुनेच्या नलिजलप्रवाहांत भक्तांनीं वाहिलेलीं शुभ्र जाईचीं पुष्पें चोहोंकडे पसरलेलीं आहेत कीं काय, असें वाटत असे ! आणि त्या वेळेस चंद्रोदय झाला असला तर त्या शोभेला पारावारच नसे ! खालून अगाध समुद्राचा विस्तीर्ण वर्तुळाकार एक भाग आणि वर स्वच्छ नभोमंडळाचा वर्तुळाकार दुसरा भाग असे दोन्ही जुळलेले दिसत असून त्यांत त्यांसारख्या चोहोंकडे पसरलेल्या तारका जशा आकाशांत, तशींच त्यांचीं प्रतिबिंबें समुद्रजलांत दिसत असून मला असा भ्रम होई कीं, हा आकाश आणि समुद्र अशा दोन भागांनीं जुळलेला एक अति विस्तीर्ण मोत्यांचा शिंपला आहे, आणि याच्यामध्यें हीं पसरलेलीं मोत्यें आणि शिंपल्याच्या आंतील झळकदार दोन्ही बाजू मला दिसत आहेत ! चंद्रप्रभेंत समुद्रांतील उसळणाऱ्या कल्लोळांकडे पाहिलें म्हणजे समुद्राचें पाणी पातळ झालेल्या चांदीप्रमाणें पांढरें व झळकदार दिसत असे ! खवळलेल्या समुद्रांतील कल्लोळांच्या परस्परसंघर्षणानें उद्भवलेल्या फास्फरस नांवाच्या अग्नीच्या ठिणग्या जेव्हां झळकत, तेव्हां आमच्या पूर्व कवींनीं कल्पिलेल्या वडवाग्नीचें प्रकारान्तरानें दर्शन होत असे ! अशा त्या अगाध समुद्रामध्यें अविश्रांत कल्लोलध्वनि ऐकून मध्यरात्रीं मी झोंपेंतून जागी होऊन खिडकींतून डोकावून समुद्राकडे पहात असें. आगबोटींतील सर्व मनुष्यें निजल्यानें चोहोंकडे सामसूम, खोलींत अंधेर, (रात्रीं दहा वाजल्यावर क्याबिनींत दिवा ठेवण्याची मनाई असते.)

पुढें, मार्गें जिकडे पहावें तिकडे समुद्र, अशा वेळेस मनुष्याच्या मनाची स्थिति जशी असावी तशीच माझी असत होती. त्या वेळेस माझ्या मनांत या अनंत जगाला सृष्ट करणाऱ्या ईश्वराचें महत्त्व, आपल्या नश्वर परमाणुमात्र वैभवाच्या अहंकारांत गुंग असणाऱ्या मनुष्याचें क्षुद्रत्व, माझी हल्लींची स्थिति, माझ्या आयुष्यांत जें जें घडून आलें त्यापैकीं मुख्य मुख्य सुखाच्या आणि दुःखाच्या गोष्टी, मी आतां आपला देश सोडून कशासाठीं इतक्या दूरदेशीं जात आहें, पुढें मी काय करणार, कोणत्या रीतीनें मीं आपल्या मातृभूमीची सेवा करावी, आणि कदाचित् दैवयोगानें हें जहाज समुद्रांत बुडलें तर माझे सर्व मनोरथ एका क्षणांत कसे बुडून जातील, इत्यादि गोष्टींचा एकसारखा विचार चालत असे.

पंडिता रमाबाई.

---

१०. आकाशगंगा.

निरभ्र काळोख्या रात्रीं आकाशाकडे सहज पाहिलें असतां एक अंधूक लांबच लांब पांढुरका पट्टा कमानीसारखा पसरलेला दृष्टीस पडतो. यास आपण आकाशगंगा म्हणतों, आणि युरोपांतील लोक मिल्की वे (milky way) म्हणजे दुग्धमार्ग म्हणतात. या पट्ट्याकडे लोकांचें लक्ष फार प्राचीन काळापासून लागलें असावें ही गोष्ट निर्विवाद आहे. सर्व देशांतील प्राचीन काव्यांत आणि इतर ग्रंथांत या पट्ट्याविषयीं उल्लेख केलेला आढळून येतो. संस्कृत

अर्थांत तर आकाशगंगेवर नानाप्रकारच्या हृदयंगम उपमा व कल्पना बसविलेल्या वाचनांत येतात. याप्रमाणें हा अंतरिक्षस्थ चमत्कार कवींपासून तों सामान्य जनांपर्यंत सर्वांना पूर्वीपासून फार आल्हाददायक होऊन बसला आहे. अलीकडील ज्योतिष-शास्त्रांतील शोधांवरून सुद्धां आकाशगंगेचें महत्त्व कमी न होतां उलट विशेष वाढलें आहे. तें कसें हें पुढील वर्णनावरून कळून येईल.

एरवीं नुसत्या डोळ्यांनीं पाहिलें असतां आकाशगंगा ही प्रका-शाचा एक पट्टा आहे असें वाटतें. पण दुर्बिणीनें पाहिलें असतां कोट्यनुकोटि तारे एकत्र होऊन आकाशगंगा बनली आहे असें समजून येतें. हे तारे आपणांपासून इतके दूर आहेत कीं त्यांचा प्रकाश पृथक् पृथक् दिसत नाहीं. त्या सर्वांचा प्रकाश एकवटून येतो म्हणून आपणांस आकाशगंगेचा पट्टा दिसतो. आकाशगंगें-तील अत्यंत तेजस्वी चकाकणाऱ्या ताऱ्यांपासून तों अगदीं अंधक दिसणाऱ्या ताऱ्यांपर्यंत प्रत्येक तारा आपल्या सूर्याप्रमाणें प्रचंड सूर्य आहे, इतकेंच नव्हे, तर यांपैकीं पुष्कळ तारे आपल्या सूर्यापेक्षां देखील शेंकडोंपट मोठे येतील! तेव्हां असल्या ताऱ्यांचा एवढा मोठा समुदाय म्हणजे अनंत सूर्य मिळून आकाशगंगा झाली आहे, हें समजून आपणांस केवढा चमत्कार वाटतो! त्यांत आणखी आपणांस विस्मयकारक गोष्ट म्हटली म्हणजे ही आहे कीं, एवढा हा आपला प्रचंड सूर्य, पण त्याचीही गणना आकाशगंगेंतील अनंत-कोटि व आपणांस सूक्ष्म दिसणाऱ्या ताऱ्यांतच होत आहे!

आकाशगंगेचें सूक्ष्म निरीक्षण केलें असतां असें आढळून येईल कीं, असंख्यात तारे एकत्र दाटीनें मिसळले आहेत, आणि त्यांची ही एक विचित्र रचना झाली आहे! जसजसें आपण आकाशगंगेकडे पाहूं लागावें, तसतसे तारे अधिकाधिक दाट एकत्र जमले आहेत, असें नजरेस येतें. ह्या पट्याची लांबी इतकी आहे कीं, याचें आपणांभोंवतीं एक वर्तुळ झालें आहे. तेव्हां हा पट्टा किती लांब असावा हें सांगणें दूरापास्त होय. याची रुंदी सर्वत्र सारखी नाहीं, कमीजास्त आहे. या पट्यांत शेंकडों तारागुच्छ, तसेंच सहस्रावधि तारापुंज आणि अगणित तारे आहेत! मग यांत किती ग्रहमाला आणि काय काय चमत्कार असतील याची कल्पनाही करितां येणार नाहीं हें उघड आहे. जों जों मोठ्या शक्तीच्या दुर्बिणींतून या पट्याकडे पहावें तों तों अनंतकोटि सूर्य आकाशगंगेंत अगदीं खचून भरले आहेत असें पाहण्यांत येतें. बरें इतकेंही असून आकाशगंगेचा आणखी भाग पलीकडे विश्वविवरांत दिसत असतो व त्यास सीमा म्हणून नाहींच!

आकाशगंगेंतील तारे आपणांपासून किती दूर आहेत हें सांगतां येणें शक्य नाहीं. तसेंच, त्यांचे आकार केवढाले आहेत याचीही कल्पना करितां येणार नाहीं. कितीही मोठी दुर्बीण घेतली, तरी तींतून सुद्धां या ताऱ्यांचीं बिंबें किंचित् देखिल मोठीं दिसत नाहींत. किंवा त्यांच्या अंतराची कल्पना होत नाहीं. इतकेंच नव्हे तर उलट असें मात्र अनुभवास येतें कीं, जों जों मोठ्या दुर्बिणींतून हे तारे पहावयास जावें तों तों ते दूरवर गेले आहेतसे वाटतात!

ज्या अगणित ताऱ्यांच्या दाटीनें आकाशगंगेचा पट्टा आपणास दिसतो, ते एकमेकांच्या अत्यंत जवळ असावेत असें सहज वाटणार आहे. पण असें मानणें चुकीचें होईल. वास्तविक पाहिलें तर हे तारे एकमेकांपासून कोट्यवधि मैल दूर आहेत. परंतु त्या सर्वांचें अंतर आपणांपासून परमावधीचें असल्यामुळें ते जवळ जवळ अगदीं चिकटलेले आहेत असे आपणास भासतात. एकाद्या निबिड अरण्यांतील झाडें दुरून पाहिलीं असतां, तीं अगदीं एकमेकांजवळ आहेत असें वाटत नाहीं काय? आपला सूर्यही ह्या गंगेंतील अनंतकोटि ताऱ्यांपैकींच एक मध्यमसा तारा आहे; आणि आकाशगंगेच्या दुसऱ्या एका भागावरून जर आपल्यास सूर्याकडे पाहतां आलें, तर तोही अनंत ताऱ्यांच्या गर्दींत मिसळून गेला आहे असें दिसून येईल. पण, आपल्या मालेमध्यें आणि आकाशगंगेच्या दुसऱ्या ताऱ्यांमध्यें केवढें तरी अंतर आहे! तेव्हां निदान इतकेंच अंतर तरी आकाशगंगेंतील प्रत्येक दोन ताऱ्यांमध्यें असलें पाहिजे. मग एकमेकांपासून भयंकर अंतरावर राहिलेल्या अनंतकोटी ताऱ्यांनीं जी आकाशगंगा झाली आहे, तिनें विश्वाची केवढी जागा व्यापून टाकिली आहे हें कोण सांगूं शकणार? किंवा याची कल्पना तरी कोणास होणार?

मल्हार खंडेराव चिटणीस.

---

११. ब्रिटन देशांतील राज्यव्यवस्था.

[भाग पहिला.]

ह्या देशाचा बहुतेक भाग हल्लीं इंग्लिश लोकांच्या ताब्यांत आहे. त्याचा राज्यकारभार ते कसा चालवितात हें नेहमींच्या वहिवाटीवरून व इतिहासावरून समजतच आहे. आतां जेथें आपला मुख्य राजा राहतो, व जेथून ह्या देशाच्या राज्यव्यवस्थेचीं सूत्रें हालतात, त्या इंग्लंड देशाच्या राजसत्तेचें संक्षिप्त वर्णन करितों.

इंग्लंडची राजसत्ता ही राजा, बडे लोकांची सभा व साधारण लोकांच्या मुखत्यारांची सभा, ह्या तिघांच्या हातीं आहे.

राजाः—नार्मन लोकांनीं इंग्लंड काबीज केल्यापूर्वीचा प्रकार कसा असेल तो असो; पण त्यांनीं तें काबीज केल्यावर पुढें त्या देशाचा राज्याधिकार वंशपरंपरेनें चालत आला आहे. तो असाः— राजा मरेल आणि त्याला अनेक मुलगे असतील तर वडिलास गादी मिळावी; जर एक मुलगा आणि एक मुलगी असेल, तर मुलग्याला मिळावी; सगळ्या मुलीच असतील तर थोरलीस मिळावी; एक मुलगी आणि एक बहीण असेल तर मुलीस मिळावी; मुलें मुलींच नसलीं तर भाऊ आणि बहिणी, ह्यांत वयानें आणि नात्यानें ज्याचा विशेष हक्क पोंचेल त्यास मिळावी. ह्याप्रमाणें राजाची गादी देण्याची वहिवाट चालू आहे. तथापि योग्य दिसल्यास, हे नियम सोडून वेगळी व्यवस्था करण्याचा अधिकार, पूर्वी सांगितलेल्या दोन सभांस म्हणजे पार्लमेंटास आहे.—राजकुलांतील मनुष्यानें क्याथोलिक मताच्या माणसाशीं लग्न लावूं नये; राजकुलांत उत्पन्न

झालेल्या कोणाही माणसाचें लग्न राजाच्या अभिप्रायावांचून होऊं नये; ज्याला लग्न कर्तव्य असेल त्यानें आधीं कांहीं दिवस त्याविषयींचा आपला बेत प्रसिद्ध केला पाहिजे. इतकें करूनही तो त्याचा लग्नसंबंध पार्लमेंट सभा नापसंत करील, तर तें लग्न लागावयाचें नाहीं, अशा लग्नाच्या अटी आहेत. राजा लहान असल्यामुळें, अथवा कांहीं कामानिमित्त तो परदेशीं गेल्यामुळें, अथवा दुसऱ्या एखाद्या योग्य कारणामुळें, तो कारभार चालविण्यास असमर्थ असेल तर त्याचें काम करण्यास योग्य मनुष्य नेमण्याचा अधिकार पार्लमेंटसभेस आहे. राजा प्रॉटेस्टंट मताचा असला पाहिजे. राजास राज्याभिषेक होतो त्यावेळीं सर्व लोकांसमक्ष अशी शपथ घ्यावी लागते कीं, "मी सर्व राज्य पार्लमेंटाच्या कायद्यांप्रमाणें व देशरीतीप्रमाणें चालवीन; न्याय आणि कायदे ह्यांच्या अनुरोधानें वागेन; प्राटेस्टंट पंथ आचरीन, आणि ह्या पंथाचे उपदेशकांस भजनालयें वगैरे जें कांहीं दिलेलें आहे तें तसेंच चालवीन". कायदे ठरविणें, ते अमलांत आणणें, न्याय, तह, लढाया वगैरे करणें, पदव्या देणें हीं कामें राजाच्या नांवानें होतात. तथापि, त्यांपैकीं अगदीं स्वतंत्रपणें असें एकही काम करण्याचा त्याला अखत्यार नाहीं; तो नांवानें मात्र मुख्य अधिकारी आहे. राजाज्ञेवरून प्रधानानें किंवा दुसऱ्या एकाद्या मोठ्या अधिकाऱ्यानें कांहीं कृत्य केलें आणि त्याचा परिणाम वाईट झाला, तर त्याचा दोष राजाला लावीत नाहींत, तर त्या प्रधानाला किंवा अधिकाऱ्याला लावितात. "राजाच्या हातून कधीं अपराध घडत नाहीं,"

अशा अर्थाची जी एक म्हण इंग्लिश लोकांत आहे, ती ह्यावरूनच पडली असावी. सरकारी फौजेस व आरमारास जो पैसा लागतो, त्याची सगळी लगाम साधारण लोकांच्या मुखत्यारांच्या सभेच्या हातीं असते. तेणेंकरून राजाला प्रजेच्या अनुमतानें वर्तावें लागतें व हरएक प्रकारच्या जुलुमापासून तिचें संरक्षण करावें लागतें. इंग्लंडच्या राजाच्या अधिकाराविषयीं एका विद्वान् ग्रंथकारानें असें लिहिलें आहे कीं, "इंग्लडच्या राजास फौजेवर व आरमारावर हुकूम चालविण्याचा अधिकार आहे; परंतु पार्लमेंटच्या संमतीवांचून तो त्यांस नोकरीस ठेवण्यास मुखत्यार नाहीं. तो लोकांस पदव्या देण्यास मुखत्यार आहे; परंतु त्या अमलांत आणण्यास पार्लमेंटाचें अनुमत पाहिजे. लढाई करण्याचें ठरविणें हें राजाकडे आहे; परंतु चालविणें हें पार्लमेंटाचे संमतीवांचून व्हावयाचें नाहीं. सारांश, प्रजेवर कर बसविण्याचा व तो वसूल करण्याचा अधिकार राजास स्वतंत्रपणें नसल्यामुळें तो अगडबंब, परंतु स्वतःसिद्ध चलनवलनास असमर्थ, अशा शरीराप्रमाणें आहे. अथवा राजा हें एक मोठें जहाज उत्कृष्ट प्रतीच्या मालानें भरून तयार आहे; त्याला पार्लमेंट सभा हा समुद्र आपणावर येऊं देईल, तरच तें चालेल, नाहीं तर खडकावर पडलें राहील, अशी कल्पना केली तरी शोभेल."— पार्लमेंट सभा भरविण्याचा अधिकार राजाला आहे. ती भरण्याबद्दल अगोदर चाळीस किंवा पन्नास दिवस त्याला जाहिरात प्रसिद्ध करावी लागते. प्रसंग पडल्यास राजाच्या संमतीवांचूनही पार्लमेंट सभा भरते. राजाच्या खुद्द खाजगी खर्चाकडे पूर्वीं भारी पैसा

दिलेला असे. परंतु व्हिक्टोरिया महाराणी सिंहासनावर बसली तेव्हां तिच्या खर्चाकडे दरसाल ३८५०००० रुपये नेमणुकीचा ठराव झाला होता. ह्याखेरीज तिच्या कुटुंबांतील मनुष्यांच्या नेमणुकी वेगळ्या आहेत. ही राणी, हिच्यापूर्वी जो राजा इंग्लंडच्या गादीवर होता, त्याची पुतणी होती. ही इ० स० १८३७ त गादीवर बसली. इ० स० १८४० त हिचें लग्न प्रिन्स आल्बर्ट ह्याशीं झालें होतें. तो इ० स० १८६१ त मरण पावला. ही राणी इ० स० १९०१ या वर्षी मरण पावली, आणि तिच्या गादीवर तिचे चिरंजीव सातवे एडवर्ड हे बसले. ह्यांच्या राणीसाहेबांचें नांव अलेक्झांड्रा आहे. हे इ० स० १९१० या वर्षी मरण पावले व त्यानंतर त्यांचे चिरंजीव पंचम जार्ज हे गादीवर बसले आहेत. हल्लींच्या राणीसाहेबांचें नांव मेरी आहे. इनसाफाचीं सात कोर्टें आहेत. ह्या कोर्टांत सर्वांत वरिष्ठ कोर्ट पार्लमेंट सभा ही होय. हिची जी सध्यांची रचना आहे, ती ख्रिस्ती शकाच्या चौदाव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास स्थापित झाली. ती तेव्हांपासून, मधला प्रजासत्ताक राज्याचा काळ खेरीज करून, आजपर्यंत एकसारखी चालली आहे. तींत दोन भाग आहेत; पहिला भाग बडे लोकांची सभा व दुसरा सामान्य लोकांच्या मुखत्यारांची सभा. बडे लोकांच्या सभेंत ५७६ गृहस्थ आहेत; लोकांच्या मुखत्यारांच्या सभेंत ६७० लोक आहेत. हे दुसऱ्या भागांतले लोक निवडण्याविषयीं मत देण्याचा अधिकार ५१७१३२५ रयत लोकांस आहे.

विनायक कोंडदेव ओक.

१२. ब्रिटन देशांतील राज्यव्यवस्था.

(भाग दुसरा)

बडे लोकांची सभाः—ह्या सभेंत मुख्यत्वें दोन प्रकारचे बडे लोक असतात. ते हे कीं, सरदार अथवा उमराव लोक, आणि धर्माध्यक्ष अथवा पाद्री लोक. ह्या सभेंतील सभासदांच्या जागा वंशपरंपरेनें चालतात. ह्या सभेंत पाद्री लोकांस जागा आहे, ह्याचें कारण ते धर्माध्यक्ष आहेत हें नव्हे; तर त्यांच्या कामाच्या संबंधानें त्यांजकडे जमीन पुष्कळ असते, म्हणून त्यांस सभेंत बोलविण्याचा प्रघात पडून गेला आहे. ह्या सभेंत बसणाऱ्या इंग्लंडच्या उमरावांच्या संख्येची कांहीं इयत्ता नाहीं. परंतु स्काटलंडचे १६ असावे, असा पूर्वापार पाठ चालत आला आहे. सभेच्या दिवशीं स्वतः जाण्यास न बनल्यास कोणी चांगला मनुष्य आपल्या वतीनें पाठविण्यास सभासदास अधिकार आहे. ही सभा सर्वांत मोठी न्यायाची कचेरी आहे, असें सर्व इंग्लिश लोक मानितात. स्काटलंडांतील जस्टिशिअर न्यायसभा खेरीज करून, बाकी सर्व न्यायाधीशांचे निवाड्यांवर अपील घेण्यास व त्यांचा योग्य निकाल करण्यास ह्या सभेला अधिकार आहे. तथापि बडे लोक खुद्द न्याय निवडतात असें नाहीं. अपिलें घ्यावीं, पुरावा पाहावा, पूर्वीं ज्यांनीं त्यांचा फैसला केला असेल, त्या न्यायाधिशांचे अभिप्राय आणावे, सर्व गोष्टींचा विचार करावा, आणि जें बहुमतें ठरेल तें सभासदांपैकीं एका विद्वान् पुरुषानें बोलून दाखवावें अशी वहिवाट आहे.

एकाद्या सभासदावर कांहीं आरोप असल्यास, त्याची चौकशी त्याच्या बरोबरीच्या कांहीं सभासदांनीं करावी, असा पाठ आहे.

साधारण लोकांच्या मुखत्यारांची सभाः—हिजमध्यें सध्यां ६७० लोक आहेत. त्यांपैकीं ४७५ इंग्लंडच्या वतीचे, ७२ स्काटलंडच्या वतीचे व १०३ ऐर्लंडच्या वतीचे आहेत. हे सर्व निरनिराळ्या लोकांनीं पाठविलेले आहेत. तथापि एकंदर सर्व रयतेस सुख होईल, अशा गोष्टी त्यांनीं केल्या पाहिजेत असा समज आहे. ह्या सभासदांच्या नेमणुका कोठें कोठें लोकांच्या हातीं आहेत, व कोठें कोठें सरकारी नोकरांच्या हातीं आहेत. ज्यास दरसाल पांचसात हजार रुपयांचें उत्पन्न असेल, व जो अक्कलेनें मोठा असेल त्यासच या सभेंत जागा प्राप्त होते. कोणत्याही सरकारी कामास पैसा देणें झाल्यास त्याजविषयीं प्रथमतः ह्या सभेची मान्यता घ्यावी लागते; नंतर तें प्रकरण बडे लोकांची सभा व राजा ह्यांचेपुढें जावें अशी वहिवाट आहे.

पार्लमेंट सभाः—राजा व पूर्वीं सांगितलेल्या दोन सभा ह्यांस पार्लमेंट असें एकवट नांव आहे. फक्त त्या दोन सभांसही पार्लमेंट असें म्हणतात. हा दुसरा अर्थच ह्या ठिकाणीं ग्राह्य आहे. एकादा कायदा दोन्ही पक्षांनीं मंजूर केला, परंतु तो जर राजास पसंत नाहीं, तर तो कदापि अमलांत यावयाचा नाहीं. राजा आपली मंजुरी स्वमुखानें सांगतो, अथवा ती लिहून प्रगट करतो. एखादा कायदा पार्लमेंटानें पसार करूनही जर तो राजास आवडला नाहीं तर आपणाला तो न आवडल्याबद्दलचा आपला अभिप्राय तो

"मला हा साफ आवडत नाहीं," अशा उद्धट भाषणानें दर्शवीत नाहीं; तर "ह्याविषयीं मला कांहीं बोलावयाचें आहे," असें म्हणून सौम्य रीतीनें तो दर्शवितो; ह्यावरून पार्लमेंटचा मान व दर्जा हे केवढे आहेत तें पहा! असो.

न्याय करणें, राज्यकारभार चांगले रीतीनें चालविण्यास राजास मदत करणें, हरएक प्रसंगीं त्यास सल्ला व मसलत देणें हें पार्लमेंटचें मुख्य कर्तव्यकर्म आहे.

विनायक कोंडदेव ओक.

---

१३. पारिस शहर.

पारिस शहराची रचना एकंदरीनें पाहतां फारच सुरेख आहे. शहरामधून सेन नदीचा प्रवाह गेला असून तिच्या योगानें शहराचे लहानमोठे दोन विभाग झालेले आहेत. या नदीचा शहरामधून गेलेला भाग सुमारें सहा मैल लांब असून पात्राची रुंदी सरासरी पांचशें फूट आहे. पाणी सुमारें बारा फूट असून निरनिराळ्या भागीं लहानमोठ्या आगबोटी जात येत असतात. नदीच्या पात्रांत एक दोन ठिकाणीं लहान बेटें झालीं आहेत. त्यामुळें त्या स्थलांस विशेष शोभा आली आहे. शहराभोंवतीं एक तट आहे, त्याची लांबी २१ मैल आहे व त्यास ६७ वेशी आहेत. शहराचें क्षेत्रफळ सुमारें ३० चौरस मैल आहे व लोकसंख्या २८ लक्षांवर आहे. म्युनिसिपालिटीचें उत्पन्न सुमारें दहा कोट रुपये आहे.

सेन नदीच्या उत्तरेस जो शहराचा भाग आहे, त्यांत उच्च प्रतीचे पथिकाश्रम, संपन्न व्यापाऱ्यांचीं दुकानें, शिष्टजनांचे प्रासाद, रम्य उद्यानभूमिका, सुंदर नाटकगृहें, व विस्तीर्ण रथ्या आहेत. त्या भागांत सायंकाळच्या समयानंतर सहल करण्याची फारच मौज आहे. अशा प्रकारची मौज दुसऱ्या कोणत्याही शहरांत अनुभविण्यास सांपडावयाची नाहीं. सर्व रथ्या अगदीं रेखीव असून त्यांचे पार्श्वपथ त्यांस शोभण्यासारखेच आहेत. ठिकठिकाणीं वर्तुळाकार व चतुष्कोण जागा असून त्यांच्या मध्यभागीं कोठें कारंजीं, कोठें पुतळे, असे आहेत. अशा ठिकाणीं चार चार, पांच पांच रस्ते मिळालेले असतात व कोणताही रस्ता पाहिला तरी एकसारखा सरळ दिसतो. गृहांची रचना बाहेरून बहुतेक एकसारखीच दिसते. त्यांची आकृति भव्य असून मजले उंच उंच असतात. चार चार, पांच पांच मजल्यांचीं घरें फार आहेत. फ्रेंच कादंबऱ्या वाचणारास "बुलेवार्द" हा शब्द पुष्कळदां लागला असेल. या शब्दाची व्युत्पत्ति अशी आहे:—हल्लीं पारिस शहराचा जो विस्तार आहे तो पूर्वीं नव्हता. पूर्वीं शहर लहान असून त्याचे भोंवतीं तट होता. परंतु जेव्हां विस्ताराची आवश्यकता वाटली तेव्हां हे तट पाडून त्यांच्या जागीं मोठे विस्तीर्ण रस्ते बनविले. या रस्त्यांचें नांव "बुलेवार्द". अर्थातच जेव्हां वस्ती वाढली तेव्हां श्रीमंत लोक गलिच्छ व कोंदट जागेंत न राहतां या नव्या विस्तीर्ण वीथिकांच्या प्रदेशांत राहूं लागले, त्यामुळें या भागांस मोठेंच ऐश्वर्य प्राप्त झालें. सांप्रतकालीं हे बुलेवार्द सर्व प्रकारच्या लोकांचीं विश्रामस्थानें बनून राहिले आहेत.

सायंकालानंतर दीपप्रकाशाची रेलचेल असल्यामुळें आधींच सुंदर असलेलीं भवनें विशेष शोभा पावतात. ठिकठिकाणीं पानगृहें असून त्यांच्या पुढें उघड्या जागेंत तऱ्हेतऱ्हेचीं आसनें टाकून स्वस्थचित्तानें कांहीं मंडळी आराम अनुभवीत असतात. कांहीं लोक पार्श्वपथावरून चैनीनें फिरत असतात. श्रीमंत लोक आपल्या परिवारासमवेत ऐटबाज अशा लव्याजम्यासह आपआपल्या गाड्यांत बसून आसमन्तात् चालू असणाऱ्या उत्सवाच्या दर्शनानेंच सुख पावतात. कांहीं लोक असंख्य दीपसमूहाच्या योगानें चित्तास आकर्षण करणाऱ्या नाटकगृहांकडे वळून आगामी उत्सवाची सोत्कंठमनानें मार्गप्रतीक्षा करीत बसतात. लोकांची चळवळ, गाड्यांची गर्दी, सर्वांना चैन करण्याविषयीं उत्सुकता, अशा सर्व प्रकारांनीं तो समय मोठा आल्हादजनक भासतो, व चित्ताची उद्विग्नता जाऊन वृत्ति उल्लसित होतात.

पारिस शहरांत सुमारें बारा हजार लहान मोठे पथिकाश्रम आहेत. यांशिवाय भोजनाचीच व्यवस्था ज्यांत आहे अशीं अनेक ठिकाणें आहेत. पानगृहें (काफेज) सुमारें दीड हजार आहेत. या गृहांमध्यें केवळ काफी पिण्याचीच सोय असते असें नाहीं. तर दुसऱ्या पेय वस्तु व कांहीं प्रकारच्या खाद्य वस्तुही मिळतात. वाचावयास वर्तमानपत्रें व खेळण्याची सर्व प्रकारची सामग्रीहि एथें असते. वर्षांतून कांहीं नेमलेल्या महिन्यांत पुष्कळ ठिकाणीं स्त्री-पुरुषांचे नाच (बॉल्स) सुरू असतात. कांहीं नाच निरनिराळ्या नाटकगृहांतही होतात. एका प्रसिद्ध नाटकगृहांत नाटकप्रयोग आपल्या

नंतर मग नाचाची तयारी होते, व त्यास सुरवात बारा वाजल्या-नंतर होते. एकंदर शहरांत २०० वर स्नानगृहें आहेत. आम्निब-सांच्या ३३ शाखा व ट्रामवेच्या ४१ शाखा आहेत. आम्निब-सांच्या संबंधानें एवढें सांगितलें पाहिजे कीं, वाटेल त्या रस्त्यावर उभें राहून त्यांत जागा मिळण्याचा संभव नाहीं. चालत्या गाडीस थांबविण्याकरितां खूण केली असतां गाडीवाला उभी करीलच असा नेम नाहीं. यासाठीं ठिकठिकाणीं गाडीचीं स्टेशनें आहेत, तेथें गेलें असतां बसण्यास चांगली सवड मिळते. आगगाडीचा रस्ता सर्व शहराच्या सभोंवतीं व शहरामध्यें कांहीं ठिकाणीं आहे. एकंदर सात कंपन्या असून त्यांचीं नऊ स्टेशनें आहेत. पारिस शहरांत सोन्याचें, रुप्याचें व तांब्याचें नाणें चालू आहे. सोन्याचीं पांच प्रकारचीं नाणीं आहेत. त्यांची किंमत दोनपासून चाळीस रुपयेपर्यंत आहे. साधारण वापरण्यांत असणारीं नाणीं 'नेपोलियन्' व 'अर्धा नेपोलियन्' हीं आहेत. त्यांची किंमत आठ रुपये व चार रुपये असते. रुप्याच्या नाण्यांत 'फ्रांक' विशेष वापरण्यांत येतो. याची किंमत सुमारें सहापासून आठ आणे आहे. सर्वांत लहान तांब्याचें नाणें 'सेंटीम'; याची किंमत सुमारें पैएवढी असते, व पांच सेंटीमांचा एक 'सू' असतो.

शहरांत फिरून घरीं आल्यावर रात्रीं 'हिपोड्रोम' मध्यें घोड्यांची वगैरे कसरत पाहण्यास गेलों. ही इमारत फारच विस्तीर्ण असून हिचा आकार लांबोडा आहे. मध्यभागीं एक वर्तुळ असून त्याच्या भोंवतीं सुमारें दहा हात रुंदीची मोकळी जागा आहे. या मोकळ्या

जागेच्या पलीकडे प्रेक्षकांस बसावयाची जागा आहे. आठ हजारांवर माणसें बसण्याची सोय येथें आहे. घोड्यांच्या व माणसांच्या कसरतीचा प्रकार कांहीं विलक्षण नव्हता; परंतु या ठिकाणीं घोड्यांच्या व गाड्यांच्या शर्यती मात्र दृष्टीस पडल्या. प्राचीन ग्रीसच्या इतिहासांत जें वर्णन केलें आहे, तशाच तऱ्हेच्या गाड्या व तशाच तऱ्हेचे लोकांचे पोशाख होते. गाड्या फारच हलक्या असून त्यांस दोनदोन चारचार घोडे जोडलेले होते, व प्रत्येक शर्यतींत चार चार गाड्या धांवत असत; व ज्याचा जय होईल त्यास मागाहून एका सहा घोड्यांच्या गाडींत मिरवीत असत. जागा इतकी विस्तीर्ण होती कीं, एका बाजूकडून दुसऱ्या बाजूचीं माणसें दिसत नसत. विजेच्या दिव्यांचा प्रकाश असल्यामुळें त्या दृग्विषयास अवर्णनीय शोभा आली होती. मात्र प्रकाशाच्या चांचल्यामुळें एकंदर मजेंत थोडा कमीपणा येत होता.

रावजी भवानराव पावगी.

---

१४. महावीरचरित्राचें संविधानक.

विश्वामित्र दशरथाकडे जाऊन यज्ञविघ्ननिवारणार्थ राम व लक्ष्मण ह्यांस आपल्या आश्रमास घेऊन आला. त्यानें जनक राजासही यज्ञसमारंभ पाहण्यासाठीं निमंत्रण केलें होतें; पण त्यास स्वतः येण्यास न फावल्यामुळें त्यानें आपला भाऊ कुशध्वज व कन्या सीता आणि उर्मिला अशा तिघांस पाठवून दिलें. याप्रमाणें प्रथमतः विश्वामित्राच्या आश्रमांत या दोन राजपुत्रांची व राजकन्यांची

गांठ पडली. इतक्यांत रावणाकडून एक राक्षस कुशध्वज व विश्वामित्र यांकडे सीतेविषयीं मागणी घालण्याकरितां आला. त्याचें स्वागत करून त्यांनीं त्यास तेथें बसविलें; तों ताटकेचा भयंकर शब्द ऐकूं आला. तेव्हां विश्वामित्राच्या आज्ञेवरून रामानें तत्क्षणीं तिचा वध केला. पुढें कुशध्वजानें शिवधनुष्यही तेथें आणविलें. तेंही रामानें मोडल्यावरून त्या दोन्ही कन्या राम व लक्ष्मण यांस द्याव्या असा संकेत ठरला. इतकें झाल्यावर रावणाकडील राक्षस भयचकित व निराश होत्साता चालता झाला, व लंकेंत पोंचल्यावर त्यानें झालेला वृत्तांत राजाचा अमात्य जो माल्यवान् त्यास सांगितला. तो ऐकतांच माल्यवानास मोठी चिंता लागली, व तेव्हांपासून रामाचा घात करण्याविषयीं तो नाना उपाय योजूं लागला. प्रथमतः महेंद्रद्वीपास जाऊन त्यानें परशुरामास शिवधनुष्याचा वृत्तांत सांगितला, व त्याबद्दल रामाचा सूड उगविण्याविषयीं उत्तेजन दिलें. परशुरामही परम क्रुद्ध होऊन मिथिला नगरीस आला. तेव्हां रामाशीं युद्ध न करण्याविषयीं विश्वामित्र व वसिष्ठ त्याची विनंती करूं लागले, पण तो कांहीं केल्या आपला आग्रह सोडीना. तें पाहून जनकाचा पुरोहित शतानंद फार संतापला व दोघांची बोलाचाली होऊन शतानंद परशुरामास शापोदकानें भस्म करणार इतक्यांत दशरथ राजानें त्याचें निवारण केलें. पुढें रामानेंच स्वतः येऊन परशुरामास युद्धास बोलाविलें, व दोघांचा समरप्रसंग होऊन परशुराम पराभव पावला. याप्रमाणें माल्यवानाची पहिली मसलत फसल्यावर त्यानें पुन्हां बेत मांडिला. तो असा कीं, शूर्पणखेस मंथरेच्या शरी-

रांत संचार करावयास सांगून तिजकडून रामास वनांत घालविण्याविषयीं कैकयीची बुद्धि फिरविली; व विराध, खर इत्यादिकांस रामाचा नाश करण्याविषयीं ताकीद देऊन वानरांचा राजा जो वाली त्यासही अनुकूल करून घेऊन तेंच सांगितलें. इकडे परशुरामानें शस्त्रसंन्यास करून दंडकारण्यांतील मुनिजनांचें राक्षसांपासून रक्षण करण्याचा अधिकार रामाकडे सोंपविला व आपण तपश्चर्येस निघाला. रामानेंही तो मोठ्या आनंदानें पतकरिला, व त्यामुळेंच कैकयीनें दिलेल्या वनवासाचें त्यास यत्किंचितही दुःख वाटलें नाहीं. दंडकारण्यांतील खरदूषणवधादि वृत्तांत, तसेंच सीतेचें हरण हें सर्व जटायु व संपाति यांच्या भाषणांत सुचविलें आहे. पुढें राम व लक्ष्मण हे दोघे अरण्यांतून सीतेचा शोध करीत फिरत असतां बिभीषणाकडून श्रमणा नांवाची एक स्त्री त्याचा लेख घेऊन आली. त्यांत त्यानें रामाचा आश्रय मागितला होता. रामानें तो लेख मान्य केला व सीतेविषयीं तुला कांहीं बातमी आहे काय असें तीस विचारलें. तिनें इतकेंच सांगितलें कीं, सीतेनें एक वस्त्र खालीं टाकिलें तें सुग्रीव, बिभीषण, हनुमान् इत्यादिकांनीं तुमच्या स्नेहास्तव आपणापाशीं ठेविलें आहे. हें समजतांच दोघे किष्किंधानगरीस चालले. पुढें रामाचें व वालीचें युद्ध होऊन वालीनें मरणसमयीं सुग्रीव व अंगद यांस राज्याधिकार देऊन रामाचें व सुग्रीवाचें अग्निसाक्षिक सख्य करविलें. यानंतर झालेल्या लंकादहनादि गोष्टी नाटकसंप्रदायाप्रमाणें कोठें पडद्यामागील भाषणांत वगैरे सुचविल्या आहेत व

थोरल्या युद्धप्रसंगाचें इंद्र व चित्ररथ यांच्या भाषणाच्या रूपानें वर्णन केलें आहे. शेवटल्या म्हणजे सातव्या अंकांत आरंभीं लंका शोकाकुल होत्साती आली आहे; व नंतर अलका म्हणजे कुबेराच्या नबरीची देवता येऊन तिचें सांत्वन करिते. शेवटीं पुष्पक विमानांत राम, सीता, लक्ष्मण व सुग्रीव-बिभीषणादि बसून अयोध्येकडे निघाले आहेत, व वाटेनें राम निरनिराळ्या प्रसंगींचा पूर्वीं घडलेला वृत्तांत सीतेस निवेदन करीत आहे. नंतर अयोध्येस पोंचल्यावर भरताची भेट होऊन रामास राज्याभिषेक झाला.

विष्णुशास्त्री चिपळूणकर.

---

१५. तीन प्रकारचीं माणसें.

जगांत तीन प्रकारचीं माणसें आढळतात. त्यांपैकीं एक प्रकार म्हटला म्हणजे केवळ स्वार्थावर नजर देणाऱ्या कोत्या समजुतीच्या लोकांचा; दुसरा परोपकारी व दूरदृष्टीच्या लोकांचा व तिसरा मध्यम प्रतीच्या लोकांचा, म्हणजे जे केवळ स्वार्थपरायण नाहींत परंतु फारसे परोपकारीही नाहींत, ज्यांची दृष्टि फार दूरवर पोहोंचत नाहीं, परंतु ती अगदींच आकुंचितही नाहीं. पहिल्या वर्गांतील माणसांची संख्या बरीच मोठी आहे. असण्याचीं कारणें अज्ञान, अविचार, दारिद्र, दुःसंगति वगैरे आहेत. कोणीही मनुष्य स्वभावतःच निव्वळ आपलपोट्या असेल असें मला वाटत नाहीं. परंतु हा दुर्गुण जडण्यास व त्याचा मनुष्यावर पगडा बसण्यास अल्प कारणही पुरतें. कोत्या समजुतीच्या

मनुष्यास पैसा कसा मिळवावा हें कळतें, परंतु त्याचा सत्कारणीं व्यय कसा करावा हें समजत नाहीं. आपल्या दाराशीं कोणी आंधळा, पांगळा, दुबळा व भिकारी येईल या भीतीनें तो आपलीं दारें कड्या लावून बंद ठेवील. ऐषआरामाच्या किंवा कलाकौशल्याच्या कामाचा त्यास अत्यंत तिटकारा असावयाचा. "हें घेऊन यानें काय पोट भरावयाचें आहे?" असें तो म्हणेल. व्यवहारज्ञानाबद्दल या प्रकारच्या मनुष्यास जितकी घमेंड असते, तितकी थोड्याच दुसऱ्या लोकांस असेल. खर्चाच्या भीतीनें तो चांगल्या घरांत राहणार नाहीं; खर्चाच्या भीतीनें तो चांगलें अन्न खाणार नाहीं; खर्चाच्या भीतीनें धर्माचें किंवा परोपकाराचें काम त्याच्या हातून कदापि होणार नाहीं; परंतु जी गोष्ट आपण करीत नाहीं ती करण्यास उचितच नव्हे असें दाखविण्याचा त्याचा सदोदित प्रयत्न असेल, व चांगल्याही कामाचे त्यास दोष मात्र दिसतील. दोघां माणसांतील तंटा सोडविण्यास कोणी गेल्यास, "या चोंबडेपणावांचून यास काय गरज होती? त्यांनीं एकमेकांचे गळे कापले असते तर याचें काय जात होतें!" कोणी देवालय बांधावयास निघाला तर, "कोण छांदिष्टपणा हा! आजपर्यंत देवालयें नव्हतीं म्हणून का कोणाचें अडलें होतें?" कोणी मोठें सुंदर घर बांधूं लागल्यास, "आजपर्यंत असलीं घरें नव्हतीं म्हणून कोणी मेला होता काय?" याप्रमाणें प्रत्येक चांगल्या कामावर या व्यवहारज्ञांची टीका आहेच. कोणतीही नवीन गोष्ट कोणी करूं लागल्यास त्यांस जो राग व तिटकारा येतो व ज्या कुत्सित कल्पना त्यांच्या मनांत भरतात त्या सांगतां पुरवणार नाहींत. लोकांस ठकविणें,

बुडविणें, भलत्या नादास लावणें, धर्महानि करणें इत्यादि अनेक दुष्ट हेतूंचा नवीन कृत्य आरंभणारावर ते आरोप करतील; व तेवढ्यानें त्यानें आपलें काम सोडून न दिल्यास त्याचा पाडाव व फजिती करण्याकरितां ते खोट्याच वाईट गोष्टी रचून त्या प्रसिद्धीस आणतील. "पहारे बुवांनो, आज असें झालें, उद्यां अमुक होणार म्हणून ऐकतों, कोणावर काय प्रसंग येईल याचा नेम नाहीं, तर या माणसाच्या नादीं लागून नाहक बुडाल!" याप्रमाणें जे कोणी आपल्यासारखे नाहींत त्या सर्वांवर वाईट टीका करण्याचें त्यांस एवढेंच कारण असतें कीं, आपल्या व्यवहारज्ञानाबद्दल आपली प्रतिष्ठा व्हावी, आपण जी गोष्ट करीत नाहीं ती करणें योग्यच नव्हे, असें लोकांस भासावें व विशेषतः आपल्या आळसावर व आपलपोटेपणावर पांघरूण पडावें. ज्यास स्वतः कोणतीही चांगली गोष्ट करावयास नको असते, त्यास जे दुसरे ती करीत असतील त्यांस विघ्न करण्यास पुष्कळ वेळ सांपडतो. अशा लोकांपासून शेजाऱ्यापाजाऱ्यांस, गांवच्या लोकांस, किंबहुना सर्व राष्ट्रास प्रसंगविशेषीं मोठी भीति असते. आपल्या कवडीच्या फायद्यासाठीं दुसऱ्याचें हजारों रुपयांचें नुकसान झालें तरी ते फिकीर करीत नसतात. आपलें कोणीं थोडें नुकसान केल्यास त्याचा सूड उगविण्याकरितां त्याचें ते कितीही नुकसान झालें तरी मागेंपुढें पहायचे नाहींत, व आपल्या स्वतःच्या प्राप्तीकरितां देश बुडाला तरी बेहेतर आहे

असा त्यांचा निश्चय असतो. चहाडी करणें, शत्रूस फितूर होणें, कोणावर अकस्मात् घाला घालणें, हीं नीच कृत्यें या प्रकारच्या लोकांकडून होतात. या लोकांच्या प्रती लावणें झाल्यास नीचपणा, विघ्नसंतोषीपणा, कवडीचुंबकपणा, निर्दयता, विश्वासघात इत्यादि दुर्गुणांचें कमी अधिक प्राबल्य पाहूनच लाविल्या पाहिजेत. मनुष्य आपलपोटेपणाच्या आधीन झाल्यावर कोणकोणत्या दुष्ट गोष्टी करण्यास तयार होईल हें सांगणें कठीण आहे!

या प्रकारचे लोक जगांत आरंभापासून आहेतच. परंतु जर वच लोक पहिल्यापासून असे असते तर आज जगाची कशी स्थिति आपणांस दिसली असती या गोष्टीची कल्पना करा. आजपावेतों माणसें शुद्ध रानटी स्थितींत राहिलीं असतीं; झोंपड्या बांधूनच त्यांनीं निर्वाह केला असता; त्यांमध्यें कलाकौशल्याचा व ज्ञानाचा पूर्ण अभाव राहिला असता; परस्परांमध्यें नित्य भांडणतंटे सुरू असते, व क्रूरतेचीं आणि विश्वासघाताचीं कृत्यें प्रत्यहीं घडलीं असतीं. कोणाचाही उत्कर्ष दुसऱ्यांस सहन झाला नसता, व कोणाचेंही पुढें पाऊल पडलेलें इतरांस पाहवलें नसतें.

ही स्थिति जगास न येण्याचें कारण दुसऱ्या प्रकारचे लोक दर पिढीस थोडे थोडे उत्पन्न होत गेले हें होय. लोकांच्या हिताकरितां झटणें; कांहीं मोठी गोष्ट आपल्या हातून घडण्यासारखी असल्यास तिच्या सिद्धीकरितां आपलें पाहिजे तें नुकसान करून घेणें; मानसिक परिश्रमानें विशेष ज्ञान संपादन करण; सत्कार्यास निरं-

तर मदत व उत्तेजन देणें; वृथा लोकापवादास न भिणें, हे व असेच दुसरे गुण या दुसऱ्या वर्गांतील माणसांमध्यें दिसतात. या वर्गांतील लोकांनीं जे सतत श्रम केले, त्यांनीं जो स्वार्थत्यागाचा कित्ता घालून दिला, इतरांच्या दुराग्रहामुळें त्यांस जीं संकटें भोगावीं लागलीं, त्या सर्वांमुळेंच केवळ हल्लींची सुस्थिति आपणांस प्राप्त झाली आहे.

ईश्वराच्या आराधनेसाठीं जीं सुंदर देवालयें जागोजाग बांधलेलीं दिसतात तीं कोणीं बांधिलीं? मोठमोठ्या नद्यांस जे ठिकठिकाणीं घाट बांधलेले आहेत ते कोणीं बांधिले? मोठ्या विशाल वृक्षांचें बीजारोपण कोणीं केलें व त्याच्या छायेखालीं थकल्या भागलेल्यास सुखानें बसतां यावें म्हणून त्यांस पार कोणीं बांधिले? प्रवाशांच्या सोईकरतां धर्मशाळा कोणीं बांधिल्या? विहीर व तलाव कोणी खणले? अन्नसत्रें कोणीं स्थापिलीं? ज्ञान व सदाचार यांच्या वृद्धीकरितां सर्वस्वत्याग कोणीं केला! धर्मस्थापना व स्वराज्य-स्थापना यांसाठीं कोणीं भगीरथ प्रयत्न केले? स्वातंत्र्याच्या प्राप्ती-साठीं कोणी आपले देह बळी दिले?

या सर्व गोष्टी आत्मनिरपेक्ष, दूरदर्शी व परोपकारी अशा पुरु-षांनीं केल्या. अशा पुरुषांस अज्ञान, उन्मत्त, अविचारी, दुराग्रही आपलपोटे अशा लोकांकडून किती अडथळा झाला, त्यांस किती संकटें व यातना सोसाव्या लागल्या, या गोष्टींची कल्पना एकट्या हिंदुस्थानांतील थोर पुरुषांचीं चरित्रें वाचूनही येण्यास रखी आहे. परंतु ही कल्पना पूर्णपणें मनावर बिंबण्यास युरोपांतील थोर

पुरुषांचीं चरित्रें वाचलीं पाहिजेत. कारण तेथें सत्पुरुष आणि दुष्ट पुरुष यांमधील युद्ध कित्येक शतकें पावेतों मोठ्या कडाक्यानें सुरू होतें. दुष्ट पुरुषांस धर्मबळ, राजसत्ता व संपत्ति हीं सर्व अनुकूल होतीं. सत्पुरुषांस सत्यनिष्ठेचें, परोपकारबुद्धीचें व सुविचाराचें मात्र पाठबळ होतें; व त्यांचा सर्व हवाला केवळ ईश्वरावर होता. तेथें अशी स्थिति असतां अखेरीस सत्पुरुषांचाच जय होत गेला, सत्याचें व सुविचाराचें प्राबल्य होत गेलें, व दुष्ट पुरुषांसही सौम्यरूप धारण करून सत्पुरुषांचें बाह्यात्कारीं तरी अनुकरण करणें भाग पडलें. ईश्वरी संकेताप्रमाणें मनुष्याच्या उन्नत स्थितीची व कर्तव्याची दिशा कोणती हें याप्रमाणें युरोपाच्या इतिहासावरून विशेष लक्षांत येतें.

आतां वर सांगितलेलीं परोपकारकृत्यें करणाऱ्या सत्पुरुषांच्या हेतूंची पहिल्या वर्गांतील व्यवहारज्ञांच्या रीतीनें परीक्षा करूं लागल्यास ते सर्व पुरुष मूर्ख व छांदिष्ट ठरतील! कारण हीं कृत्यें करतांना त्यांनीं आपणां स्वतःस काय फायदा होणार याचा मुळींच विचार केला नाहीं. परंतु ज्याचे विचार अद्यापि इतके कोते व कुत्सित झाले नाहींत त्यास ह्या माहात्म्यांच्या औदार्याविषयीं निदान आश्चर्य तरी वाटेल, त्यांविषयीं थोडी तरी कृतज्ञता त्याच्या हृदयांत उत्पन्न होईल. पहा कीं, ज्यांनीं स्वदेशाच्या स्वातंत्र्यासाठीं आपले जीव अर्पण केले, त्यांना स्वतःला त्या देशापासून किंवा स्वातंत्र्यापासून कांहीं तरी उपयोग होणार होता काय? ज्यांनीं पराकाष्ठेचे श्रम करून गहन विषयांचें ज्ञान संपादन

केलें त्यांस तें लिहून ठेवण्यांत स्वतःचा कांहीं फायदा वाटला असेल काय? ज्यांनीं अन्नसत्रें घातलीं, ते पुरुष उपाशीं मरत होते काय! ज्यांनीं विहिरी, तलाव व घाट बांधिले ते निरंतर तहानेनें व्याकुळ झाले होते काय? ज्यांनीं देवालयें बांधिलीं, त्यांच्या हातून निरंतर नरकवास होईल अशीं कांहीं भयंकर पातकें घडलीं होतीं काय? छेः छेः! असा प्रकार असण्याचा बिलकुल संभव नाहीं. अशीं कृत्यें कारणारांचें त्यांजपासून स्वतःचें फारच थोडें हित होणार होतें; त्यांचा उपयोग दुसऱ्यांसच व्हावयाचा, व म्हणूनच अशा कृत्यांस परोपकाराचीं कृत्यें असें आपण म्हणतों.

याप्रमाणें मनुष्याचे मुख्य जे दोन प्रकार त्यांमधील भेद सांगितला. बाकी राहिलेल्या तिसऱ्या प्रकारचे लोक उभयतांचेही गुणावगुण कमी अधिक प्रमाणानें घेऊन आपला चरितार्थ चालवितात. तेव्हां त्यांविषयीं कांहीं विशेष सांगावयास नको.

महादेव शिवराम गोळे.

---

१६. अशोकाची योग्यता.

भरतखंडांतील ज्या कीर्तिमान् राजांचीं नांवें इतिहासांत चिरस्मरणीय होऊन राहिलीं आहेत, त्या सर्वांत बौद्धधर्मप्रचारक चक्रवर्ती राजा अशोक याचें नांव अग्रगण्य आहे. द्वापारयुगांत युधिष्ठिर आणि कलियुगांत विक्रमादित्य, हर्षवर्धन (शालिवाहन) आणि अकबर एवढेच काय ते सार्वभौम राजे, ह्याच्याशीं तुलना करण्याजोगे होऊन गेले. यांपैकीं युधिष्ठिराविषयीं पौराणिक कथांपलीकडे

दुसरी कांहीं ऐतिहासिक माहिती उपलब्ध नसल्यामुळें तो वगळून बाकीच्या राजांशीं अशोकाची तुलना करूं लागलें, तर अशोक त्यांच्यापेक्षां अनेक पटींनीं श्रेष्ठ होता हें कबूल करावें लागेल. अशोकाचा पराक्रम अवर्णनीय होता, आणि त्याच्या राज्याचा विस्तारही फार मोठा होता. पूर्वेकडे वंग (बंगाल) आणि कामरूप (आसाम), दक्षिणेकडे गोदावरीचें तीर, पश्चिमेकडे सौराष्ट्र (काठेवाड) आणि सिंधूतट व उत्तरेकडे काश्मीर आणि हिमालय पर्वत, अशा त्याच्या राज्यमर्यादा होत्या. येवढ्या प्रांतावर तर त्याचें पूर्ण स्वामित्व होतें. परंतु त्याच्याही पलीकडे जीं चोल, पांड्य, यान, कांबोज, पितिनिक, गांधार, आंध्र, वज्रि, भोज, पुलिंद, ताम्रपर्णी वगैरे राज्यें होतीं, तीं सुद्धां त्याच्याशीं मांडलिकाच्या नात्यानें रहात होतीं; म्हणजे हिंदुस्तानचा जवळ जवळ तीनचतुर्थांश भाग त्याचे ताब्यांत होता. एवढा मुलूख त्याचे पूर्वीं दुसऱ्या कोणत्याही राजानें पादाक्रांत केलेला नव्हता. याच कारणासाठीं अशोकाला हिंदुस्थानचा पहिला चक्रवर्ती राजा म्हणतात. परंतु अशोकाचें नांव इतिहासांत सुवर्णांकित होऊन राहिलें आहे, तें त्याच्या पराक्रमासाठीं किंवा राज्यविस्तारासाठीं नव्हे. तर अज्ञानांत गढून गेल्यामुळें धर्माच्या खऱ्या तत्त्वास विसरून गेलेल्या आपल्या प्रजेस एका नवीन पण शुद्ध धर्ममार्गास लावून तद्द्वारा तिची उन्नति करण्यासाठीं त्यानें केलेले परिश्रम, त्याची स्वतःची सत्यनिष्ठा आणि धर्मश्रद्धा, अनेक धर्मकृत्यें आणि स्वतः घालून दिलेलें स्वार्थत्यागाचें उत्कृष्ट उदाहरण, या व अशा इतर सोज्वल कृत्यांमुळ त्याचा

कीर्तिनाद आज दोन हजार वर्षें त्रिखंडांत दुमदुमत राहिला आहे. एका जर्मन ग्रंथकारानें म्हटलें आहे—" एखाद्याचें नांव त्याच्या पश्चात् जितक्या जास्त लोकांत जास्त कालपर्यंत वंद्य होऊन राहील, तितकी त्याची योग्यता थोर समजावी. " हें जर खरें असेल तर शार्लेमेन व सीझर या पाश्चात्य प्राचीन इतिहासप्रसिद्ध नृपतींपेक्षां अशोक फार श्रेष्ठ होता, हें कबूल करावें लागेल. सारांश, भरतखंडाच्या इतिहासरूपी नभोमंडळांत अशोकराजा सूर्याप्रमाणें प्रकाशत होता. परंतु आमच्या लोकांच्या दृष्टीवर अज्ञानाचें पटल आल्यामुळें, आणि पौराणिक दंतकथेचें धुकें ऐतिहासिक वातावरणांत दाट पडल्यामुळें, त्या सूर्याची प्रभा आणि प्रखरता, त्याचे गुण व दोष सगळेच सारखे आम्हांस दिसेनासे झाले आहेत. अशोकाविषयीं आतां कोणी माहिती मिळविण्याचा प्रयत्न करील तर त्यास बौद्धधर्मीय पौराणिक ग्रंथ व परदेशीय प्रवाशांनीं व ग्रंथकारांनीं लिहून ठेविलेल्या सत्यासत्यमिश्रित गोष्टी यांपलीकडे खरोखर विश्वसनीय अशी माहिती क्वचितच मिळेल. नाहीं म्हणावयाला खुद्द अशोकानें कांहीं शिलालेख कोरून ठेविलेले अद्यापि कायम आहेत, तेवढे मात्र पुढील इतिहासलेखकांच्या चांगले उपयोगीं पडतील. एवढ्या चक्रवर्ती राजाच्या कारकीर्दीचा सुद्धां विश्वसनीय इतिहास उपलब्ध नसावा, ही गोष्ट इतिहासदृष्ट्या अत्यंत शोचनीय आहे.

वासुदेव गोविंद आपटे.

१७. गतगोष्टींच्या ज्ञानाची आवश्यकता.

कोणत्याही वस्तूचें वास्तविक स्वरूप जाणणें म्हणजे तिचे परिणाम जाणले पाहिजेत. तेव्हां मनुष्यांचें पूर्ण ज्ञान होण्यास त्यांचीं कृत्यें जाणणें आवश्यक आहे. कोणत्या हेतूनें तीं प्रवृत्त झालीं, व कोणत्या मनोवृत्तींनीं त्यांस उत्तेजन दिलें हें कळलें म्हणजे, मनुष्याच्या मनास उत्तेजन देऊन प्रवृत्त करणारीं अत्यंत प्रबळ कारणें कोणतीं, हीं आपणांस माहीत होतात. विद्यमान स्थितीचें वास्तविक ज्ञान होण्याकरितां ती भूतकाळच्या स्थितीशीं ताडून पाहिली पाहिजे. कारण कोणत्याही वस्तूस बरें वाईट म्हणावयाचें तें तुलनेनेंच म्हणावयाचें असतें. तेव्हां वर्तमानस्थितीस बरें वाईट ह्मणतांना भूतस्थितीशींच तिला ताडिलें पाहिजे; कारण, भविष्यास्थितीचें आपणांस मुळींच ज्ञान नसल्यामुळें तिशीं तुलना करण्याचा संभवच नाहीं. खरोखरी पाहिलें असतां विद्यमान स्थितीविषयीं आपलें मन फार थोडा विचार करितें; तें बहुतकरून भावी स्थितीच्या विचारांत किंवा भूतस्थितीच्या आठवणींतच प्रायः गुंतलेलें असतें. मनुष्याच्या मनाच्या मुख्य वृत्ति ह्मटल्या ह्मणजे आनंद, दुःख, प्रीति, द्वेष, आशा आणि भय ह्या होत. यांपैकीं आनंद व दुःख, हीं भूतगोष्टींविषयीं असतात व आशा आणि भय हीं भावी स्थितीविषयीं असतात; ह्मणजे पहिल्यांचा विषय भूतस्थिति व दुसऱ्यांचा विषय भविष्यास्थिति होय. आतां प्रीति, द्वेष यांचाही विषय भूतस्थिति होय. कारण ज्या विषयांविषयीं त्या मनोवृत्ति होतात ते विषय त्या मनोवृत्तींच्या पूर्वींच असलेच पाहिजेत; कां कीं, ते विषय त्या मनोवृत्तींचें

कारण होत; व कारण कार्यापूर्वी असलें पाहिजे, असा सर्वसामान्य नियम आहे.

तसेंच विद्यमान जी स्थिति आहे ती पूर्वस्थितीपासून झाली आहे. तेव्हां विद्यमानकाळीं आपली स्थिति चांगली असून आपण सुखी असल्यास त्या सुखाचें कारण काय, किंवा हल्लीं आपली स्थिति वाईट असून आपण दुःख भोगीत असल्यास त्या दुःखाचें कारण काय, हें समजण्यास आपणांस भूतस्थितीचें यथास्थित ज्ञान आवश्यक आहे. आपण केवळ स्वार्थबुद्धीनें वागत असलों, तरी इतिहासाचें म्हणजे भूतस्थितीचें ज्ञान आपल्या फायद्याचें आहे. आतां दुसऱ्यांच्या बऱ्याचीं कामें करण्याचें ओझें ज्यांनीं माथ्यावर घेतलें आहे तसें जे राजे व राजकीय पुरुष वगैरे यांस तर इतिहासाची माहिती करून घेणें फारच जरूर आहे. ती त्यांनीं करून न घेतल्यास त्यांचा अन्याय आहे. ज्ञान होण्याचीं साधनें असतां जो जाणूनबुजून अज्ञान राहतो तो केवळ मूर्खच नव्हे, पण गुन्हेगार होय; व त्याच्या अज्ञानापासून होणाऱ्या पीडेचा दोष त्याच्या माथ्यावर येतो.

इतिहासांत विषय बहुत असतात; परंतु त्या सर्वांत मनुष्यांचीं मनें कसकशीं विकास पावत व अधिकाधिक ज्ञानसंपन्न होत गेलीं, त्यांमध्यें विद्या कशी उत्पन्न झाली व तिची वृद्धि कशी होत गेली, कलाकौशल्यें कशीं उद्भवलीं व कशीं सुधारत गेलीं, विद्येस व कलांस कधीं कधीं उत्कर्षकाळ कसे आले, इत्यादि गोष्टींची हकिकत फारच उपयोगी व चमत्कारिक आहे. मोठमोठ्या लढाया

व राज्यक्रांति यांची माहिती राजे लोकांस विशेषेंकरून अवश्य आहे. तरी त्यांसही विद्या व कलाकौशल्यें यांच्या उदयाचीं व वृद्धीचीं कारणें समजणें कमी आवश्यक आहे, असें समजूं नये. कारण राज्यें योग्य रीतीनें चालविणें जसें त्यांचें काम आहे, तसें आपली बुद्धि व मन सुधारणें व सज्ञान करणें हेंही त्यांचें कमी काम आहे, असें नाहीं.

तसेंच असा एक सर्वमान्य नियम आहे कीं, कोणतीही गोष्ट उदाहरणानें जशी मनांत भरते तशी केवळ उपदेशानें भरत नाहीं. शिपाई जो तयार होतो, तो रणांगणांत युद्ध करूनच होतो, केवळ लढाईच्या गोष्टी ऐकून होत नाहीं; तसेंच उत्तम चितारी होण्यास मनुष्यास हातांत कलम घेऊन वारंवार चित्रेंच काढिलीं पाहिजेत; त्या कलेविषयीं केवळ नियम समजून घेऊन उपयोग नाहीं. शौर्याच्या कृत्यापेक्षां कलेच्या कृत्यांत हा एक विशेष गुण आहे कीं, शौर्याचे अद्भूत चमत्कार पाहण्याची ज्यास इच्छा होईल त्यास ते सहज पाहण्यास सांपडतात.

कलेचीं चमत्कारिक कृत्यें पाहिलीं असतां प्रथमदर्शनीं मन आश्चर्यानें थक्क होतें; परंतु त्यास उत्साहशक्ति म्हणजे हिंमत असल्यास आश्चर्याचा झटका संपल्याबरोबर, हें अद्भुत कृत्य कोणत्या उपायांनीं सिद्ध झालें असेल अशी आकांक्षा घेऊन त्या उपायांच्या शोधाकडे तें वळतें; असें झालें म्हणजे कलेचीं अद्भुत कृत्यें पाहण्यापासून होणाऱ्या खऱ्या उपयोगास आरंभ झाला. वर सांगितलेल्या शोधाकडे आपलें मन लागलें म्हणजे त्या शोधापासून आपलें

ज्ञान व कल्पना या वाढतात. कधीं कधीं उच्छिन्न झालेली कला पुनः उदयास येते; किंवा आपल्या मुलुखांत ती अपूर्ण दशेंत असल्यास ती सुधारून पूर्णावस्थेस चढते. आपण आपल्या वेळची स्थिति पूर्वस्थितीशीं ताडून पाहिली असतां आपल्या वेळची स्थिति उत्तम ठरल्यास आपणांस आनंद वाटतो, व आपल्या वेळच्या स्थितींत प्राचीन स्थितीपेक्षां न्यूनता आढळल्यास ती पूर्ण करण्याविषयीं आपण यत्न करण्याची इच्छा करतों. कोणत्याही दृष्टीनें पाहिलें तरी प्राचीन स्थिति समजण्यापासून फायदाच आहे.

कृष्णशास्त्री चिपळूणकर.

---

१८. खरा शाहाणा कोण ?

हल्लीं हिंदु लोकांत जशीं पंढरपूर, जेजुरी, जगन्नाथ वगैरे जागृत देवस्थानें मानितात, तसें प्राचीनकाळीं ग्रीस देशांस दालफाय नामें एक मोठें विख्यात जागृत देवस्थान मानीत असत. तेथील देवाचें नांव अपालो असें होतें. त्या देवावर ग्रीस देशांतल्या सर्व लोकांची पराकाष्ठेची श्रद्धा असे; आणि त्यांस कोणतीही गोष्ट समजून घ्यावयाची झाली तर, ते त्या स्थळीं जाऊन तेथें देवाची एक पुजारीणबाई असे, तीस विचारीत; म्हणजे ती त्यांचे प्रश्न कितीही कठीण असले तरी त्यांचीं उत्तरें देई. तीं उत्तरें साक्षात् देवाच्या तोंडून आलेल्या उत्तराप्रमाणें ते खरीं मानीत असत; असो. आपल्या गुरूचा ज्यास मोठा अभिमान, असा साक्रेतीस ह्याचा चिरीफन नामें एक विद्यार्थी होता. तो एकदां सहज देलफाय एथें गेला असतां त्यानें ‘ साक्रेतिसापेक्षां शाहाणा असा कोणी मनुष्य आहे

काय ?' म्हणून तेथील पुजारणीस प्रश्न केला; तेव्हां तिनें सांगितलें कीं, 'कोणी नाहीं !' साक्रेतिसास हें उत्तर कळल्यावर तो पराकाष्ठेच्या घोंटाळ्यांत पडला. त्यास ह्याचा कांहींच अर्थ समजेना. तो आपल्या मनांत विचार करूं लागला कीं, अहो, ह्या उत्तराचा अर्थ काय असावा बरें ? मजविषयीं तर मला पक्की खातरी आहे कीं, माझ्या ठायीं थोडें किंवा बहुत कांहींच शहाणपण नाहीं. बरें, कौल खोटा असेल, असाही अंदेशा घेववत नाहीं; कां कीं, देवता कधींही खोटें बोलत नाहींत. अशी दोहोंकडून अडचण आल्यावर त्यानें ह्याविषयीं एकाग्र चित्त करून फार विचार केला; व ह्या उत्तराचा अर्थ काढण्यासाठीं मनस्वी श्रमही घेतला. तो असा कीं, अथेन्स शहरांत एक गृहस्थ असे. तो मोठा अंमलदार असून राज्यप्रकरणांत मोठा प्रवीण, व मोठा मुत्सद्दी होता. त्या शहरांत जे जे मोठमोठे नामांकित शाहाणे असत त्यांमध्यें तो मोडत असे; व दुसरे लोक त्याच्या आंगीं जितकी योग्यता समजत, तिजपेक्षां आपल्या आंगीं अधिक योग्यता आहे, अशी त्याची खात्री असे. त्यास साक्रेतिसानें प्रथमतः कांहीं प्रश्न करून पाहिले.

त्याशीं संभाषण केल्यावरून साक्रेतिसास दिसून आलें कीं, यास कांहीं समजत नाहीं. मग त्यानें हें त्याचें अज्ञान चांगलें समजण्याजोग्या शब्दांनीं त्यास व्यंग्योक्तीनें सुचविलें. तेणेंकरून तो गृहस्थ, व दुसरे जे लोक तेथें होते ते साक्रेतिसाचा द्वेष करूं लागले. नंतर राज्यप्रकरणांत बाणा बाळगणारे जे आणखी दुसरे लोक होते, त्यांच्याकडे जाऊन त्यांशीं संभाषण करून त्यांसही कांहीं येत नाहीं

असें त्यानें ठरविलें. ह्या त्याच्या शोधापासून त्यास इतकेंच फळ प्राप्त झालें कीं, त्यानें आपणास शत्रु मात्र पुष्कळ करून घेतले. राज्यप्रकरणी लोक संपल्यावर तो कवींशीं संवाद करूं लागला; आणि पाहतो तों त्यांच्या ठायीं तर राज्यप्रकरणी लोकांच्यापेक्षां फारच अहंता भरली आहे, आणि विद्या व ज्ञातेपणा हे गुण खरोखरी म्हटलें असतां फारच कमी आहेत, असें त्याच्या नजरेस आलें. पुढें त्यानें ज्ञात्याचा शोध कारागीर लोकांमध्यें चालविला. त्या लोकांत त्याच्या दृष्टीस असें पडलें कीं एकाद्या कामांत एकादा वाकबगार असला म्हणजे तेवढ्या वाकबगारीमुळें तो कारागीर आपणांस इतरही सर्व कामें येतात असें समजे. सारांश, पुष्कळ बढाई करावी हा दोष अथेन्सांतील सर्व लोकांमध्यें होताच, व ते लोक मोठे डौली असत, ह्यामुळें ते आपण सर्वज्ञ आहों असा आव घालीत, व कोणताही विषय निघाला असतां त्यावर पांडित्य करण्यास मागें पुढें पहात नसत; आणि ते स्वभावतः धूर्त असत; ह्यास्तव कोणताही प्रसंग पडला असतां आपलें अज्ञान बाहेर पडूं न देतां ते धैर्यानें तो मारून नेत. ह्याप्रमाणेंच त्यानें परदेशच्या लोकांतही शोध केला; पण त्यास कोणी ज्ञाता सांपडला नाहीं.

नंतर साक्रेतिसानें आपणांविषयीं विचार केला, व ज्यांशीं त्यानें आजपर्यंत वादविवाद केले त्यांशीं आपली तुलना केली. त्या वेळेस त्याच्या नजरेस असें आलें कीं, मजमध्यें भेद हाच कीं, ज्या गोष्टी त्यांस वस्तुतः समजत नाहींत, त्या मलाही समजत नाहींत. पण मी आपलें अज्ञान प्रांजलपणें पत्करतों, आणि ते तसें करीत

नाहींत. ह्या सर्व विचारावरून त्यानें असा सिद्धांत केला कीं, वास्तविक ज्ञाता म्हटला असतां एक ईश्वर मात्र आहे. आतां अपालोच्या पुजारणीनें मला ज्ञाता म्हटलें, याचा अर्थ इतकाच कीं, मनुष्यांत वास्तविक ज्ञाता तर कोणीच नाहीं. तेव्हां जो मनुष्य साक्रेतिसाप्रमाणें आपलें अज्ञान समजतो तोच मनुष्यांत ज्ञाता होय.

कृष्णशास्त्री चिपळूणकर.

---

१९. झोंप.

प्राणिमात्राचे श्रम-परिहार करणारी, दुःखांस व यातनांस विसर पाडणारी, क्षणमात्र चिंता दूर करणारी, व मनास आणि शरीरास आराम देणारी अशी अजब चीज कोणती आहे बरें ? अर्थात् निद्रा. ज्यांना ही निद्रा सहज प्राप्त होते, त्यांना तिचें कांहींच महत्त्व वाटत नाहीं; पण ज्यांना ती हवी असते, त्यांना ती न मिळाल्यास अतिशय त्रास भोगावा लागतो. या कुंभकर्णप्रियेचा साराच क्रम अगदीं विचित्र आहे ! भव्य मंदिरें, दिव्य शरीरलावण्य, अनंत लक्ष्मी इत्यादि जिनसांस सामान्य कामिनी लुब्ध होतात; गरीबगुरीबांकडे त्यांना ढुंकूनसुद्धां पहावेंसें वाटत नाहीं ! निद्रेची तशी गोष्ट नाहीं. राजवाड्यांतील पुष्पखचित शय्या तिचें आवडतें विलासस्थान असत नाहीं ! दुपारपर्यंत ओरओरडून पांखरें हांकतां हांकतां थकून गेलेल्या कुणब्याचा माळा, किंवा मासे पागतां पागतां शिणून जाऊन आंग टाकण्याविषयीं उत्कंठित झालेल्या धीवराचा नदीच्या कांठचा तापलेला काळा ठिक्कर खडक किंवा चारही दिशांनीं वाहणाऱ्या वाऱ्यास ज्यांत आंत बाहेर हव्या तितक्या वेगानें

जाण्यायेण्याची पूर्ण परवानगी असते असें एकाद्या भिकार धनगराचें मोडकळीस आलेलें खोपट, हीं या निद्रेस जितकीं आवडतात, तितके रुप्याचे छपरपलंग आणि त्यांवरील किनखापाच्या गाद्या आवडत नाहींत ! सारांश, ही सांपडूं नये तेथें सांपडते व ज्यांना भाळूं नये त्यांना भाळते !

असें जरी आहे तरी हिची थोडीबहुत कृपा असल्याशिवाय मनुष्यास फार दिवस जिवंत राहतां येणार नाहीं. आपल्या वाणीनें श्रोतृसमुदायाच्या मनोवृत्तींत कधीं भरती व कधीं ओहटी आणणाऱ्या महान् वक्त्यास, तोफांच्या व बंदुकांच्या गोळ्यांच्या वर्षावास तोंड देऊन जिवाची पर्वा न करतां हातावर शीर घेऊन शत्रूंवर चालून जाणाऱ्या वीरास, शांत व एकांतस्थानीं बसून अनेक तास शास्त्रचिंतन करणाऱ्या अथवा ग्रंथ लिहिणाऱ्या तत्त्वज्ञान्यास, द्रव्यार्जनासाठीं कृष्णपक्षांतील मध्यरात्रीच्या सुमारास वेषांतर करून व सशस्त्र होऊन धनाढ्यांचीं घरें फोडण्यास निघणाऱ्या चोरास, सारांश, या पृथ्वीतलावरील प्रत्येक स्थितींतील व वर्गांतील मनुष्यास निद्रेवांचून फार दिवस कंठितां येत नाहींत. ज्यावर तिची पूर्ण अवकृपा झाली त्याचें दुर्दैव पुरें ओढवलें म्हणून समजावें ! ज्याला ही बराच काल प्राप्त झाली नाहीं तो ती प्राप्त होण्याकरितां काय पाहिजे तें बोलण्यास व करण्यास तयार होईल !

यावरून झोंप ही मनुष्याच्या अनामयास किती आवश्यक आहे हें वाचकांच्या लक्षांत आल्याखेरीज राहणार नाहीं. झोंप लागली म्हणजे थकलेल्या गात्रांस विश्रांति सांपडून तीं ताजींतवानीं होतात;

आणि तीं तशीं झालीं म्हणजे आपणांस पुनः उद्योगास लागावेंसें वाटतें. झोंपेशिवाय शरीराची वाढ चांगल्या प्रकारची व्हावयाची नाहीं; झोंपेशिवाय प्रकृति निरोगी रहावयाची नाहीं; झोंपेशिवाय मनाचे व शरीराचे व्यापार चालावयाचे नाहींत. निश्चित प्रमाणापेक्षां ही अधिक व कमी घेण्यानें नुकसान होतें. अगदीं लहान मुलास बारांपासून पंधरा तास झोंप पाहिजे. तरुण पुरुषास सात पासून आठ, व तरुण स्त्रीस आठपासून नऊ तास झोंप पाहिजे वृद्ध पुरुषांस व स्त्रियांस चार किंवा पांच तास झोंप बस्स होते. नुकतींच उपजलेलीं मुलें अठरा किंवा वीस तासपर्यंत निजतात. तात्पर्य, वयाच्या व उद्योगाच्या मानानें हवी तितकी झोंप मिळाली तरच प्रकृति नीट राहण्याचा संभव असतो. झोंप न येणें व फार येणें दोन्हीही प्रकृति नीट नसल्याचीं किंवा तींत कांहीं तरी बिघाड होऊं लागल्याचीं चिन्हें होत; असो. आतां या कुंभकर्णप्रियेच्या विशेष कृपेचीं कांहीं उदाहरणें देऊन तिचा निरोप घेतों.

सन १७५६ त इंग्लंडांतील कांहीं वैद्यांपुढें इलिझाबेथ चारावेन नांवाच्या एका बाईच्या रोगाची चिकित्सा झाली. तींत असें निष्पन्न झालें कीं, ही बाई दहा वर्षेंपर्यंत प्रत्येक दिवशीं चोवीस तासांपैकीं सतरा तास निजत असे, व १७३८ सालीं ही चार चार दिवस एकसारखी निजली होती ! डॉक्टर बॉडी असें म्हणतो कीं, या बाईस जागें करण्यासाठीं नानातऱ्हेचे उपाय केले. तिच्या पाठीला मध चोपडून ती मधमाशांकडून चावविली, टांचण्या टोंचल्या, चाबूक ओढून पाहिले, पण ती म्हणून कांहीं केलें तरी

जागी झाली नाहीं! पुढें जेव्हां ती आपोआप जागी झाली तेव्हां तीं जणूं काय पुरेशी झोंप न मिळाल्यामुळें खिन्न झाल्यासारखी व संतापून गेल्यासारखी दिसली! याच वैद्याच्या पहाण्यांत दुसरी एक बाई आली होती. तिची हकीकत फारच विलक्षण आहे. या बाईचें वय सुमारें तेवीस वर्षांचें असून ती अगदीं निरोगी होती. एकदां हिच्या एका मैत्रिणीच्या शरीरावर शस्त्रवैद्यांनीं विशेष अवघड असा शस्त्रप्रयोग करण्याचा विचार ठरविला. तो हिच्या मनांत पाहण्याची इच्छा उत्पन्न झाल्यामुळें तो करतांना हिला जवळ उभें राहूं द्यावें असें ठरलें. पुढें उद्यां तो प्रयोग होणार तर आज ही बाई त्याचें चिंतन करीत अंथरुणावर जी पडली ती त्या प्रयोगाच्या यातनांच्या कल्पनेनें अगदीं भांबावून गेली, व अखेरीस सकाळ होण्यापूर्वींच तिला अपस्माराचा झटका येऊन जी झोंप लागली ती त्रेसष्ट तासपर्यंत राहिली! मोठमोठे डॉक्टर आले व त्यांनीं परीक्षा करून असें ठरविलें कीं, हिला जागी करण्यास तुंबडी लाविली पाहिजे. त्याचप्रमाणें तुंबडी लावून तिला जागी केल्याबरोबर पुनः अपस्माराचा झटका आला; व त्यासरशी तिला जी कांहीं गाढ झोंप लागली ती एक सगळा पंधरवडा टिकली! पुढें सुमारें एक वर्षभर ती नेहमींप्रमाणें सात आठ तास निजत असे. पण त्यानंतर कांहीं कारण नसतां एकाएकीं तिची प्रकृति बिघडली, व पुनः लांब झोंपेचा प्रकार सुरू झाला, तो असा कीं, बारा वर्षांत ती सारखी तीसपासून चाळीस तास निजत असे! यानंतर ती पुनः पूर्वस्थितीवर आली, व त्या स्थितींत सद्धा महिन्े

गेल्यावर फिरून अठ्ठेचाळीस तास निजूं लागली ! हा शेवटचा विकार होण्यापूर्वी तिला दोन तीन महिने मुळींच झोंप आली नाहीं. हिच्या लांब झोंपेचा आरंभ सुमारें मध्यरात्रीच्या सुमारास होई, व तींतून ती उठली म्हणजे तिला जागें राहण्याची मोठी भीति वाटे.

याच बाईसारखी नॉरफॉक नांवाच्या कौंटींतील इलिझाबेथ परकिन्स नांवाच्या बाईची गोष्ट सांगतात. ही बाई आठवड्यापैकीं एकच दिवस जागी असे ! एकदां ती झोंपेतून उठली म्हणजे तिला जागी ठेवण्यास, व एकदां निजली म्हणजे तिला पुनः जागी करण्यास फार प्रयास पडत. पुढें एका ‘ नाडीपरीक्षदरसशेंदूरमात्रा-वैद्या ’ नें तिची परीक्षा करून तिच्या आप्तांची अशी खात्री केली कीं, ‘ ही झोंपेचें थोतांड करीत आहे, हिची झोंप खरी नाहीं, परवानगी मिळेल तर हिचा रोग काढून टाकण्यासारखा आहे.’ वैद्यबुवांनीं अशा प्रकारची खात्री दिल्यामुळें आप्तांनीं प्रयत्न करून पहाण्यास रुकार दिला. तेव्हां या राजश्रीस उपाय करणें भाग पडलें. टाणाटोण्यांनीं ती जागी होत नाहीं असें पाहून, त्या मूर्खानें तीव्र विषारी वनस्पतीच्या मुळ्यांचा रस काढून तिच्या कानांत घातला. या रसानें ती जागी तर झालीच नाहीं; पण बिचारीच्या नाकाला, ओंठाला आणि चेहऱ्याला मोठमोठे फोड येऊन चामड्याचे कळपे निघाले !

ब्रिटिश संग्रहालयांत एक पुस्तक ठेवलें आहे, त्यांत निकोलास हार्ट नांवाच्या एका डचमन्विषयीं अशी गोष्ट सांगितली आहे

कीं, याचा जन्म होण्यापूर्वी याची आई पांच दिवस अहोरात्र निजली होती, व त्याचा जन्म झाल्याबरोबर बाळबाळंतिणीस पुनः पांच दिवस गाढ झोंप लागली ! पुढें प्रतिवर्षी आगष्ट महिन्यांत वाढदिवसाचे रात्रीं या मुलास झोंप लागे ती पांच दिवस टिके !

दीर्घनिद्रेच्या गोष्टी अगदीं अलीकडच्या आहेत असें नाहीं. ग्रीक व रोमन लोकांतील जिज्ञासु गृहस्थांनीं आपल्या पाहण्यांत आलेल्या व लिहून ठेवलेल्या गोष्टींपैकीं कित्येक अद्यापि प्रसिद्ध आहेत. प्लॉटिरासच्या वेळेस एक गृहस्थ तीन दिवस एकसारखा निजून होता. ॲरिस्टॉटलानें एका बाईविषयीं असें लिहून ठेविलें आहे कीं, ती घरांतील माणसांचा डोळा चुकवून कोठें तरी जाऊन निजे, ती दोन किंवा तीन महिने ! अकराव्या ग्रेगरी नांवाच्या पोपच्या कारकीर्दींत एक गृहस्थ भिंतीमागें लपविलेल्या एका पेटींत सात वर्षें निजून राहिला ! घरच्या माणसांस तो कोठें तरी निघून गेला असावा असें वाटलें होतें ! पण जेव्हां तो जागा झाला तेव्हां असें म्हणूं लागला कीं, मी फार निजलों असें काय म्हणतां ? माझ्या समजुतीप्रमाणें फार तर मी एक रात्र आणि अर्धा दिवस इतका काय तो निजलों असेन ! जर्मनींतील एक कुणबी उन्हाळ्यांतील एके दिवशीं गवताच्या एका खोलींत जाऊन जो निजला तो पुढला एक पावसाळा व हिंवाळा उलटून गेला तरी उठला नाहीं ! प्लिनी असें म्हणतो कीं, एपिमिनिडीस नांवाचा कोणी ग्रीक तत्त्ववेत्ता एका प्रसंगीं रागावून व थकून गेल्यामुळें एका

गुहेंत जाऊन जो निद्रित झाला तो सत्तेचाळीस वर्षें या अंगचा त्या अंगावर झाला नाहीं !

वाशिंग्टन् इर्व्हिंग म्हणून अमेरिकेंत जो प्रसिद्ध निबंधकार होऊन गेला त्यानें आपल्या पुस्तकांत रिफ व्हॅन विंकल नांवाच्या एका मानवी कुंभकर्णाची जी मनोरंजक गोष्ट लिहिली आहे, तिला बहुशः या एपिमिनिडीसच्या गोष्टीचा आधार घेतला असावा.

गोपाळ गणेश आगरकर.

---

२०. फ्रान्स देशाचा संक्षिप्त इतिहास.

ज्या प्राचीन केल्ट लोकांस रोमन लोक गॉल असें म्हणत ते लोक या देशचे मूळचे राहणारे होत. रोमचा बादशहा जुलियस सीझर ह्यानें ख्रिस्ती सनापूर्वीं सुमारें ६० वर्षें ह्या देशावर स्वारी करून तो जिंकला. तेव्हांपासून फ्रांकांचा राजा क्लोव्हिस हा तो देश जिंकून घेईपर्यंत त्याजवर रोमन लोकच राज्य करीत होते. क्लोव्हिस हा प्रथमतः ख्रिस्ती नव्हता; परंतु त्याची बायको क्लोटिला ही त्या धर्माची होती. एकदां संकटसमयीं त्यानें ख्रिस्ती लोकांचे देवास नवस केला व त्याप्रमाणें दैववशात् तो त्या संकटांतून पार पडला. तेव्हां त्याला वाटलें कीं, तो देव (ख्रिस्त) पावला. त्यावरून त्यानें स्वतः व त्याचे अनुयायी ३००० लोक ह्यांनीं ख्रिस्ती धर्म स्वीकारिला. हाच फ्रान्सचा पहिला ख्रिस्ती राजा होय. तेथील लोक आपणांस फ्रांक म्हणवीत. त्यावरून ह्या देशास फ्रान्स हें नांव पडलें. हा राजा इ० स० ५११ ह्या वर्षी मरण पावला. त्यानेंच पारीस हें राजधानीचें शहर स्थापिलें. इ०

स० ८०० ह्या वर्षीं शार्लमेन म्हणजे मोठा पराक्रमी चार्लस हा सिंहासनारूढ झाला. त्यानें स्पेन, जर्मनी व इतालीचा बराच भाग हे जिंकून आपल्या राज्यांत सामील केले होते. परंतु तो मेल्यानंतर जर्मनीचें राज्य फ्रान्सपासून तुटून राहिलें. पुढें नार्वे देशांतील लोक नॉर्थमेन हे इ० स० ९१२ त फ्रान्सावर स्वारीचा झेंडा उभारून आले. त्यांनीं त्यांतील न्यूस्त्रीया प्रांत जिंकून घेऊन तेथें आपली वसाहत केली. त्याच प्रदेशाला कांहीं कालानंतर नॉर्मंडी हें नांव प्राप्त झालें. इ० स० १०६६ त नॉर्मन लोकांनीं इंग्लंड देश जिंकिला, असें इतिहासांत आढळतें. तेथील लोक ह्याच लोकांचे वंशज होत. हायुक्यापेत म्हणून कोणी एक मनुष्य पारीस येथें मोठ्या अधिकारावर होता, त्यानें गादीवरच्या राजकुळाचा समूळ नाश करून राजपद बळकाविलें. ही गोष्ट इ० स० ९८७ त घडली. फ्रान्सच्या इतिहासांतील प्रख्यात गोष्ट येणेंप्रमाणें:—ह्या देशास इंग्लंडचा राजा तिसरा एडवर्ड व पांचवा हेनरी, ह्या दोन राजांशीं लढाया कराव्या लागल्या; व त्यांपासून त्याचें फार नुकसान झालें. एडवर्डाबरोबरच्या एका लढाईत तर फ्रेंच राजा जॉन ह्यास इंग्लिशांनीं कैद केलें; आणि हेन्रीबरोबरच्या युद्धाचा शेवट असा झाला कीं, फ्रान्स देशाच्या राजपदावर त्याचा वारसा आहे असें ठरलें. ही गोष्ट इ० स० १४२० त घडली; आणि त्याचे मागून सहावा हेन्री आपणांस फ्रान्सचा बादशहा म्हणवूं लागला. सातवा चार्लस राजा ह्यास जोन ऑफ आर्क नामें फ्रेंच स्त्री हिनें सांगितलें कीं, मला स्वदेशहित करण्याविषयीं ईश्वरी प्रेरणा झाली आहे, ह्यास्तव

मला सेंतपालच्या देवळांतली पवित्र तरवार व तुमची सेना द्यावी. मी इंग्लिश सैन्याचा मोड करून टाकून जय मिळवितें. त्याप्रमाणें तिची सिद्धता करून दिल्यावर तिनें उत्साहजनक संभाषणांनीं व आंगच्या विजातीय शौर्याच्या योगानें आपल्या लोकांत वीरश्री उत्पन्न करून त्यांच्या हातून ओर्लीयन्सचे वेढ्यांत इंग्लिशांचा सर्वथा पराजय करून टाकिला; व दुसरे कितीएक प्रसंगीं तिनें त्यांजवर जय मिळविले. तेणेंकरून त्यांस तो देश सोडून स्वदेशीं परत जाणें भाग पडलें. हें इ० स० १४४० त घडलें. बुर्बोन घराण्यांतला पहिला राजा व नव्हारीचा अधिपति चौथा चार्लस इ० स० १५८९ त फ्रान्सच्या गादीवर बसला. हा राजा चांगला होता. तो प्रॉटेस्टंट पंथाचा अधिकारी व अभिमानी असल्यामुळें, क्याथोलिक मताभिमानी लोकांकडून त्यास बरेच धक्के सोसावे लागले व त्याचा शेवटही त्यांतच झाला. एके दिवशीं पारीस शहरांतून तो गाडींत बसून जात असतां राव्हेलाकनामक एका मनुष्यानें त्याला ठार मारिलें. हें इ० स० १६१० घडलें. तेव्हां त्याच्या वयास ५९ वें व कारकीर्दीस २२ वें वर्ष होतें. चौदावा लुई राजा इ०स० १६४३ त पांच वर्षांचा असतां गादीवर बसला. तो इ० स० १७१५ त ७७ वर्षांचा होऊन मरण पावला. त्याच्या कारकीर्दींत फ्रान्स देशांत कलाकौशल्याची व ज्ञानाची वृद्धि झाली व तो देश युरोपखंडांत त्या काळीं मोठ्या योग्यतेस चढला. सोळावा लुई हा राजा गादीवर असतां अमेरिकनांचा पक्ष फ्रेंचांनीं धरिल्यामुळें त्यांचें व इंग्लिश लोकांचें युद्ध लागलें, त्याकडे पुष्कळ पैसा खर्चून लुई-

राजाचें भांडार रिकामें पडण्याचा प्रसंग आला. तेव्हां पैसा जमविण्यासाठीं त्यानें प्रजेवर नवा कर बसविला. तो त्याचे पार्लमेंटास मान्य नव्हता. आणखी, दरबारच्या बडे लोकांचें माहात्म्य मनस्वी वाढलें होतें. तसेंच गारिबागुरिबांचे हाल होत होते, त्यास लोक त्रासले होते. ते इतके कीं, त्यांस जुनें सर्व कांहीं नकोसें झालें होतें. ह्यामुळें बंड उत्पन्न होऊन इ० स० १७९३ त तो राजा प्राणास मुकला. नंतर फ्रान्सांत प्रजासत्ताक राज्य स्थापित झालें. तेंही थोड्याच काळांत मोडून प्रख्यात युद्धधुरंधर नेपोलियन बोनापार्ट हा फर्स्ट कॉन्सल ही पदवी घेऊन इ० स० १८०४ त सर्व देशाचा राजा झाला, तथापि इ० स० १८१५ त वॉटर्लू येथें तो पूर्ण पराभव पावून इंग्लिशांच्या पूर्ण हातीं लागला. त्याला त्यांनीं कैद करून सेंट हेलिना बेटांत ठेविलें, आणि फ्रान्सच्या मूळच्या राजकुळांतल्या पुरुषास त्याचें पद प्राप्त झालें. ह्यानंतर कितीएक भानगडी होऊन थोरल्या बोनापार्टाचा पुतण्या गादीवर असतां बंड झालें. तेव्हां तो राज्य सोडून पळून गेला; आणि तेथें पुनः इ० स० १८४८ त प्रजासत्ताक राज्य स्थापित झालें तें इ० स० १८५१ पर्यंत चाललें. पुढें तिसरा नेपोलियन गादीवर असतां, अनेक कारणांवरून प्रशिया आणि फ्रान्स यांचें वैमनस्य येऊन युद्ध माजलें. त्यांत फ्रेंचांचा अगदीं पराजय होऊन तिसरा नेपोलियन बादशहा पळून गेला आणि इ० स० १८७० त पुनः फ्रान्सांत प्रजासत्ताक राज्य स्थापित झालें, तें अद्यापपर्यंत सुरळीत चाललें आहे. त्याचा सगळा अधिकार तिघांच्या हातीं

आहे; चेंबर आफ् डेप्युटीज यांची सभा, सिनेट सभा आणि अध्यक्ष. हे सगळे प्रजेच्या बहुमतानें निवडलेले असतात. आणखी कोणतीही गोष्ट चेंबर आफ् डेप्युटीज आणि सिनेट यांनीं पसंत केल्यावांचून ती अध्यक्षास करितां येत नाहीं. सध्यां चेंबर आफ् डेप्युटीज ह्यांतल्या सभासदांची संख्या ५८४ आहे; आणि सिनेट ह्यांतल्या सभासदांची संख्या ३०० आहे. ह्या सभांत पूर्वींच्या राजकुलांत उत्पन्न झालेल्या लोकांस घेऊं नये, अशी सक्ती आहे. आणखी ह्या सभांतील मंडळी जरी लोकांनीं निवडलेली असते, आणि जरी त्यांस एक विशेष मान आहे, तरी त्या सभासदांस पगार देण्याची वहिवाट आहे. राज्यरचनेच्या कायद्यांत वारंवार कमजास्त फेरबदल होत असतात; तरी एकंदरीनें पुन्हां राजसत्ता स्थापित न होई अशी तजवीज ठेवण्याविषयीं मोठा कटाक्ष आहे.

विनायक कोंडदेव ओक.

---

२१. दैव आणि उद्योग.

सर्व लोक दैव आहे असें मानितात. दैव म्हणून कांहीं भावनारूपी वस्तु आहे किंवा नाहीं हें सिद्ध करण्याचें कठीण आहे. तथापि त्याच्या अस्तित्वाची कोणास शंका येत नाहीं. कार्यावरून कारणाचें अनुमान करण्याचा मनुष्याचा स्वभाव आहे. मनुष्य आपल्या सत्कर्मानें व उद्योगानें सुखी होतो, दुष्कर्मानें व आळसानें दुःखी होतो, हें आपण नेहमीं पाहतों. परंतु एकाद्या ठिकाणीं उलट दृष्टीस पडलें म्हणजे आपण तेथें दैव असें म्हणतों. आपण असें मानितों कीं, पूर्वजन्मीं मनुष्य जें पापपुण्य करितो, त्याचें फळ

त्या जन्मीं भोगिलें नसल्यास या जन्मीं भोगावें लागतें. याकरितां जगांत कित्येकांस आचरणाविरुद्ध फलप्राप्ति होते. कित्येक साधूंच्या हातून दुष्कृत्य झालेलें नसतें, तथापि त्यांस दुःख होतें. तसेंच कित्येक दुष्टांच्या हातून सत्कृत्य कधींही घडत नाहीं, पण ते सुखी असतात. याचें कारण त्यांचें जन्मांतरीय पापपुण्य होय, असें शास्त्राचें मत आहे. यावरून आपण पूर्वजन्मींच्या संचित पापपुण्यासच दैव असें म्हणतों. कित्येक धर्मांतील लोक मनुष्यास पुनर्जन्म असतो असें मानीत नाहींत. जगांत आचरणाविरुद्ध सुखदुःखें प्राप्त होतात याचें कारण असें सांगतात कीं, मनुष्याच्या अंतःकरणाची परीक्षा पाहण्याकरितां, देव एकाएकीं त्याजवर असे प्रसंग आणितो. खरें काय असेल तें असो, पण या मतानें ईश्वराकडे कमीपणा येतो असें दिसतें.

अकस्मात् एखाद्या श्रीमान् मनुष्याची गरिबावर कृपा झाली, अथवा एखाद्या मोठ्या मनुष्याच्या मरणानें त्याची संपत्ति कोणास प्राप्त झाली, वगैरे गोष्टि पाहिल्या म्हणजे आपण त्या मनुष्यास दैववान् म्हणतों. परंतु वास्तविक पाहिलें तर दैव चांगलें किंवा वाईट करणें बहुशः उद्योगाच्या हातीं आहे असें दिसतें. जसा उद्योग करावा तसें फळ प्राप्त होतें. दैव केवळ पंगु आहे. तें उद्योगाशिवाय उदयास येत नाहीं. उद्योग न करितां दैवावर भरंवसा ठेवणें मूर्खपणाचें काम होय. कधीं कधीं एकाचें मूर्खपण अथवा आळस हें दुसऱ्याचें सुदैव होतें. कारण, एखाद्यास एकाएकीं विपुल संपत्ति मिळते ती एकदम आकाशांतून धार पडून मिळत नाहीं; परंतु

भोंवतालच्या मनुष्यांपेक्षां अंगीं उद्योग व शहाणपण हीं जास्त असल्यामुळें इतरांपेक्षां याची भरभराट होते. लोकांशीं गोडीगुलाबीनें वागलें म्हणजे ते स्तुति करितात; पण भरभराट होण्याचे गुण वेगळेच आहेत. नीति न सोडतां प्रसंग पडेल तसें वागण्याचें चातुर्य, नम्रता, आर्जव, सतत उद्योग इत्यादि सुखप्राप्तीचीं साधनें अनेक आहेत. ज्यास आपली स्थिति चांगली करून दैववान् म्हणवून घ्यावयाचें असेल, त्यास आपल्या बोलण्याचालण्यांत वगैरे सर्व लहानसहान गोष्टींत दक्षता ठेविली पाहिजे. उद्योग दैवाचा उत्पादक व रक्षक आहे. अगदीं नीच स्थितींत असून उद्योगानें महत्त्वास आलेल्या पुरुषांचीं पुष्कळ उदाहरणें दाखवितां येतील. बाळाजी विश्वनाथ पेशवा यःकश्चित् कोंकणचा ब्राह्मण होता; पण उद्योगानें त्यानें आपल्या वंशास पेशवाई मिळाविली. बेंजामिन फ्रांक्लिन एका गरीब मनुष्याचा मुलगा होता; परंतु उद्योगानें वाढत वाढत मोठा श्रीमान् व कीर्तिमान् झाला.

एकाएकीं पैसा मिळून एकाद्याची भरभराट झाली तरी तो आळशी असला तर पूर्वस्थितीवर येतो. यास उदाहरणें श्रीमंतांच्या घराण्यांत पुष्कळ सांपडतील.

उद्योगानें महत्त्वास आलेले दूरदर्शी लोक, दैवानें आम्हांस ही स्थिति प्राप्त झाली, असें म्हणतात, हें त्यांचें शहाणपण होय. परंतु ते दैवावर भरंवसा ठेवून चालतात, असें लोकांनीं समजूं नये. कित्येक कृत्यें आरंभिते वेळेस जयच मिळेल अशी खात्री नसते, तेथें दैवावर भरंवसा ठेवून उद्योग करावा. कार्यसिद्धि नच झाली तर

दैवास बोल लावून चित्त समाधानयुक्त ठेवावें. अशा प्रसंगींच दैव मानण्याचा थोडाबहुत उपयोग आहे म्हटलें तर चालेल. बाकी सतत उद्योग करणें हेंच मनुष्याचें कर्तव्य होय. मनुष्याच्या प्रयत्नाशिवाय प्राप्त होणारीं सुखसाधनें ईश्वरानें फारच थोडीं ठेविलीं आहेत. त्यानें पंचमहाभूतें मनुष्यांस दिलीं आहेत; त्यांपासून मनुष्यांनीं आपलें हित करून घ्यावें असा त्याचा उद्देश दिसतो. केवळ दैवावर भरंवसा ठेवून चालल्यानें हित झाल्याचें जगांत उदाहरण सांपडत नाहीं. परंतु तारायंत्र, आगगाडी, सुताचीं वगैरे यंत्रें, अमेरिकाखंडाचा शोध, सुएज-संयोगी-भूमीचा कालवा, हिंदुस्थानांत इंग्रजांचें साम्राज्य, इत्यादि अनेक अतर्क्य कृत्यें उद्योगानें झाल्याचीं उदाहरणें आहेत.

गोविंदशास्त्री बापट.

---

२२. एक उदात्त देखावा.

नेपल्समध्यें प्रवेश केला तो, राजा व ग्यारीबाल्डी यांनीं एकाच गाडींत बसून केला. राजा एका उघड्या गाडींत बसला असून ग्यारीबाल्डी त्याचेच बाजूस डाव्या हाताला बसला होता व समोर सिसिली व नेपल्सचे भावी गव्हर्नर बसले होते. त्या दिवशीं पाऊस एकसारखा झिमझिम पडत होता; तथापि रस्त्यांतून लोकांची अतोनात गर्दी झालेली होती व त्यांच्या जयजयकाराच्या ध्वनीनें त्या वेळीं आभाळांत होणारी मेघगर्जनाही मधून मधून क्षणैक लोपून जात असे! जितके तिकडे गुढ्या, तोरणें, निशाणें उभारलेलीं

होतीं, व ठिकाठिकाणीं राजाचे गाडीवर लोक फुलें उधळीत होते. अशा थाटानें व्हिक्टर ए-मॅन्युअल यानें शहरांतील मुख्य देवळांत प्रवेश केला, व तेथें सर्वांनीं मिळून ईश्वरोपासना केली. हा विधि झाल्यावर ग्यारीबाल्डीनें आपले सर्व अधिकार राजाचे स्वाधीन केले. त्यानें जाहीरनामा काढून आपल्या विश्वासू शिपायांचा आणि सिसिलींतील सर्व लोकांचा व देशबांधवांचा नम्रपणें निरोप घेतला; परंतु त्यांस विनंती केली कीं, लढाईचा वक्त पुन्हां लवकरच येणार व त्या वेळीं फिरून सर्व देशभक्तांशीं खांद्यास खांद्या लावून लढण्याकरितां मला यावयाचें आहे, यास्तव सर्वांनीं हल्लीं आहे अशीच प्रीति व देशभक्ति जागृत ठेवावी. या सर्व गोष्टींमुळें लोकांची ग्यारीबाल्डीवरील भक्ति अधिकच वाढली. वास्तविक त्या वेळीं ग्यारीबाल्डीची शक्ति अशी होती कीं, त्यानें नुसता ब्र काढण्याची फुरसत, कीं खुद्द त्याचें पंचवीस तीस हजार सैन्य व नेपल्सचे सर्व लोक त्याच्या हुकुमाप्रमाणें वागण्यास, फार तर काय प्राण देण्यासही तयार होते, व यामुळें त्याचे मनांत यत्किंचितही जरी अहंभाव किंवा महत्त्वाकांक्षा यांचा अंकुर उमटला असता, तरी त्याचे सर्व मनोरथ पूर्ण होण्यास मुळींच पंचाईत पडली नसती. असें असतांही दुसऱ्याची ठेव निमूटपणें परत करावी त्याप्रमाणें आपले सर्व अधिकार राजाचे चरणावर अर्पण करून, एखाद्या यःकश्चित् मनुष्याप्रमाणें फिरून ग्यारीबाल्डी हा प्रजाजनांच्या समाजांत मिसळला ! हा त्याचा निस्पृहपणा पाहून त्याचे अंगीं खरोखर कांहीं विशेष दैविक अंश आहे, असें लोकांस वाटूं लागलें. ग्यारीबाल्डीनें

गादीची एवढी मोठी कामगिरी बजाविलेली पाहून आतां याचें कसें उतराई व्हावें, अशी खुद्द राजासही पंचाईत पडली असेल यांत कांहीं शंका नाहीं. त्यानें त्यास सर्वांत श्रेष्ठ अशी लष्करी मानाची पदवी व पांच लाख फ्रँक देऊं केले; परंतु ग्यारीबाल्डीनें आपण यांतील एका पैशासही शिवणार नाहीं, व बहुमानाची पदवीही घेणार नाहीं असें राजास स्पष्ट कळविलें. वरील समारंभ झाल्यानंतर लागलीच ग्यारीबाल्डीनें कॅपरा बेटावरील आपल्या निवासाश्रमास जाण्याचा निश्चय केला. या वेळीं त्याजपाशीं फक्त पंधरा शिलिंग काय ते त्याचे असे होते. यास्तव जाण्यापूर्वीं त्यानें वीस पौंड लोकांपासून उसने घेऊन आपलें खासगी देणें होतें तें वारलें; व घरून निघाल्यापेक्षां रतीभर अधिकच दरिद्री अशा स्थितींत हा विजयी व शूर देशभक्त आपल्या घरीं परत निघाला! मात्र जाण्यापूर्वीं त्यानें एक वेळ राजाची गांठ घेतली व दोन मागण्या केल्या. पैकीं पहिली अशी होती कीं, राजानें आपणांस रोमवर स्वारी करण्याची परवानगी द्यावी; व दुसरी अशी कीं, आजपर्यंत पगार न घेतां केवळ स्वदेशभक्तीनें प्रेरित होऊन व जिवाला जीव देऊन ज्यांनीं आपल्या हाताखालीं लढाया केल्या त्या शिपायांस व सरदारांस सरकारी सैन्यांत सामील करून त्यांच्या योग्यतेप्रमाणें त्यांस जागा द्याव्या. ह्या दोन्ही मागण्यांस राजास रुकार देतां आला नाहीं, व त्याचीं कारणेंही विशेष होतीं. परंतु त्यांचा विचार पुढें करण्यांत येईल. एथें एवढेंच सांगावयाचें कीं, ज्यानें सिसिलीचें सबंध राज्य आपल्या धन्यास मिळवून दिलें,

त्यानें वाटखर्चाकरितां लोकांचे पैसे उसनवार काढले व इतमा-माशिवाय जसा एकटा सिसिलीवर स्वारी करण्याचे पूर्वी तो घरांतून बाहेर पडला तसाच स्वारींत यश येऊन सर्व सिसिलीचें राज्य काबीज केल्यावरही एकांतवासांतील गृहसौख्याचा उपभोग घेण्यास तो एकटाच परत गेला !

नरसिंह चिंतामण केळकर.

---

२३. नद्या.

अत्यंत सखल प्रदेश जिकडे सांपडेल तिकडे वहात जावें, असा पाण्याचा धर्म आहे. ह्यास्तव आकाशांतून जितका पाऊस जमिनी-वर पडतो, त्यापैकीं जितकें पाणी तींत जिरत नाहीं, तितक्याचे लहान लहान प्रवाह होऊन पृथ्वीच्या पृष्ठभागावर वाहूं लागतात. ते प्रवाह कितीएक एकत्र जमून त्यांच्या नद्या होतात. त्या नद्या थेट किंवा दुसऱ्या नद्यांशीं संयोग पावून शेवटीं समुद्रास मिळतात. नदीच्या पाण्याचा वेग तिच्या पात्राच्या उतरतेपणावर आहे. नदी डोंगराळ प्रदेशीं उत्पन्न झाली असते, ह्यास्तव तिचें पाणी आरंभीं मोठ्या जोरानें वाहात असतें. पाऊस पडला असतां, किंवा डोंग-रावरचें बर्फ वितळलें असतां, ती फुगून तिचा लोंढा मोठ्या वेगानें शब्द करीत व फेंसाळत उंच उंच खडकांतून खालीं येतो; आणि शेवटीं ती ह्या उंच उखीरवाखीर तुरुंगांतून सपाट व उघड्या प्रदे-शांत आली म्हणजे तिचें पाणी रुंद पसरून तिच्या अंगीं शांत-पणा येतो. रोमन लोकांमध्यें प्लिनीनामक मोठा विख्यात व सुरस कवि झाला होता. त्यानें नदीस मनुष्याची उपमा देऊन तिचा

आरंभ व गति ह्यांची मनुष्याच्या सामान्य आचरणक्रमाशीं चमत्कारिक तुलना केली आहे. तो म्हणतो कीं, मनुष्याप्रमाणें नदी आरंभीं फार लहान व क्षुल्लक असते. बाल्यावस्थेंतही त्यासारखी पोरकट दिसते. ती कधीं कधीं कुरणांत व फुलझाडांत फिरत असते, व कधीं कधीं लहानशा बागेस पाणी पुरविते, किंवा लहानशी पाणचक्की फिरविते. नंतर जसजशी ती मोठी होते, तसतसा तिला जोर अधिक येऊन ती उच्छृंखल व उद्दाम होत जाते. डोंगराळ प्रदेशीं तीस जीं वरचेवर विघ्नें व अडचणी येतात, त्या कधीं नाहींतशा होतील असें तिला होऊन ती त्रासून इकडे फीर तिकडे फीर असें करीत असते. मग ती मोठ्या आवेशानें व मस्तीनें मोठा शब्द करीत व वाटेंत जें जें आडवें येईल तें तें उलथून त्याचे तुकडे तुकडे करीत डोंगरावरून उडी टाकिते. मग पहावें तों ती डोंगराच्या पायाशीं खळींत पडून अगदीं दमलेली व कलुष झालेली दिसते. नंतर कांहीं दम खाऊन अंमळ स्वस्थ व प्रसन्न झाली म्हणजे पुनः मस्तीनें अडचणींच्या वाटेनें पुढें चालती होते आणि शेवटीं उपद्रव करण्याचा व दंगा करण्याचा तीस कंटाळा येऊन आपल्याबरोबर आणिलेलें सर्व गदळ मागें टाकून पुढें दरींतून उघड्या प्रदेशांत शिरते. ह्याप्रमाणें अप्रसिद्ध ठिकाण सोडून प्रसिद्ध ठिकाणीं आल्यावर सुधारलेल्या प्रदेशांतून ती विशेष जपून पुढें चालते, व पहिल्यासारखी मस्ती व उपद्रव करीत नाहीं. जसा प्रसंग येईल तशी चालते. मध्यें जर कांहीं आडवें आलें आणि तें दूर करण्यास जर श्रम पडतो आहे तर तें दूर करण्याच्या खट-

पर्टीत न पडतां तें टाळून पुढें चालती होते. जीं मोठमोठीं शहरें व गांवें लागतात, त्यांमधून जातांना त्या सर्वांस उपयोगी पडते आणि तेणेंकरून ती देशास मोठा आश्रय व भूषण अशी होते. पुढें तिचा पुष्कळ नद्यांशीं संबंध होऊन तिचें महत्त्व वाढलें म्हणजे तिची गति फार गंभीर व डौलाची अशी होते. ह्या अवस्थेंत ती स्थिर, शांत, व खोल असते; व प्रौढपणें व मौनानें पुढें चालती होते. अशी जातां जातां शेवटीं जेथून पुनरावृत्ति नाहीं, अशा स्थळीं (समुद्रांत) तिचा लय होतो.

ज्या नद्या डोंगराळ देशांत उत्पन्न होऊन सखल व सपाट देशांत उतरतात, त्या नद्यांचे धबधबे होतात. भागीरथी, नील वगैरे मोठाल्या नद्यांचे धबधबे वर सांगितलेल्या रीतीनें झाले आहेत. ज्या नद्यांस वेग पुष्कळ असतो व ज्यांच्या दोहों तीरीं वृक्ष व उंच उंच खडक असतात; त्यांचे धबधबे दिसावयास फारच मौजेचे असतात. कधीं कधीं पाण्याचा झोत वरून सुटतो तो खालीं पोंचण्यापूर्वीं मध्यें फुटून त्याचे बिंदु बिंदु होऊन पावसासारखे खालीं पडतात. कांहीं ठिकाणीं ज्या खडकावरून धबधबा पडतो तो खडक बाहेर काढलेल्या जिभेसारखा पुढें गेलेला असतो, व त्यावरून पाण्याचा झोत कमानीसारखा बाक घेऊन खालीं पडतो, व खालीं त्या झोताच्या व खडकाच्या मधून मनुष्य पाय भिजल्यावांचून जातें. कधीं कधीं जमीन कठीण फत्तराची असली म्हणजे तीवरून पाण्याचा प्रवाह खडकांतून आदळत आदळत खालीं चालला असतां चमत्कारिक दिसतो; व कधीं कधीं जमीन चुनखडीची

असली म्हणजे तिला एकावर एक असे पायऱ्यांसारखे वरवंडे असतात आणि त्यांवरून नदीचा प्रवाह खालीं येऊं लागला असतां तो पाण्याची एकदां आडवी पसरलेली चादर व एकदां उभी भिंत असा चमत्कारिक दिसतो. कांहीं धबधबे, सगळे नसले तरी, मनुष्याचे कृतीनें झाले आहेत. असें सांगतात कीं, स्वतः समुद्रास मिळणाऱ्या नद्या प्राचीन महाद्वीपांत एकंदर ४३० आहेत; व नवीन महाद्वीपांत असल्या नद्या १४५ तरी निदान आहेत. एशिया खंडांत अत्यंत मोठी नदी क्यांगकू नामक होय. ही नदी चीन देशांत आहे, व हिची लांबी ३२९० मैल आहे. युरोपखंडांत अत्यंत मोठी नदी वोल्गा होय. ही कास्पियन समुद्रांत पडते. तिची लांबी २५२० मैल आहे. आफ्रिकाखंडांत नील नदी अत्यंत मोठी होय. हिची लांबी ४००० मैल आहे, असें म्हणतात. अमेरिकाखंडांत सर्वांत मोठी नदी अमेझान होय. ही नदी उगमापासून सुमारें ३५०० मैल लांब जाऊन अतलांतिक समुद्रास मिळते. मुखाशीं या नदीची रुंदी १८० मैल आहे. असा हिशेब केला आहे कीं, पृथ्वींतल्या सगळ्या नद्यांतून समुद्रांत दर वर्षीं एकंदर १३६३० घनमैल पाणी निदान जात असावें, आणि समुद्रांतलें विद्यमान पाणी सारें उपसून टाकिलें, तर तो नद्यांनीं पुनः पहिल्याप्रमाणें भरावयास २१००० वर्षें लागतील!

कृष्णशास्त्री चिपळूणकर.

२४. राक्षसभुवनची लढाई.

हैदराबादचा नबाब पुण्याहून निघून औरंगाबादेकडे चालला हें मागें लिहिलेंच आहे. तो गोदावरीच्या कांठीं राक्षसभुवन ह्या गांवानजीक येऊन पोंचतांच तेथें तळ देऊन बसला. जानोजी भोसले यांस दादासाहेबांनीं पूर्वींच वश करून घेतलें होतें, म्हणून त्यांनीं 'आपल्या फौजेस वेळेवर खर्चास मिळत नाहीं,' असा बाहाणा करून नबाबाच्या फौजेपासून बऱ्याच अंतरावर तळ दिला. ही बातमी दादासाहेबांस समजतांच, ते जरी लांब होते तरी मोमोठ्या मजला मारून ताबडतोब राक्षसभुवनास येऊन पोहोंचले. हें नबाबास समजतांच तोही आपल्या फौजेनिशीं युद्धास सिद्ध झाला. ह्या वेळीं त्याच्या जवळ नव्वद हजार फौज होती. तिचे त्यानें दोन भाग करून एक खुद्द आपल्या हाताखालीं घेतला व दुसरा आपले दिवाण विठ्ठल सुंदर यांच्या हाताखालीं दिला.

इकडे दादासाहेब नबाबाच्या तळापासून कोस दीड कोस अलीकडे होते. तेथें त्यांनीं माधवरावसाहेबांच्या रक्षणार्थ पंधराशें शूर स्वार ठेवून आपण मल्हारराव होळकरासह नबाबावर चालून गेले. तिकडे तोही तयारच होता. उभय दळें एकमेकांस दिसूं लागतांच लढाईस सुरवात झाली! दादासाहेब दारू पाजून मस्त केलेल्या हत्तीवर बसून तिरंदाजी करीत होते, व तिकडे विठ्ठल सुंदर सेनापति होते. उभयतांची लढाई मोठ्या शर्थीची होऊं लागली. थोड्या वेळानंतर नबाबाच्या घोडेस्वारांनीं लगट करून मराठ्यांवर मोठ्या आवेशानें हल्ला केला. तो मराठ्यांच्या लहानशा फौजेस सोसवेनासा

झाल्यामुळें तिनें थोडा वेळपर्यंत दम धरून पुढें पळ काढण्यास आरंभ केला. दादासाहेब हत्तीवर बसले असल्यामुळें त्यांस आपल्या फौजेबरोबर निघून जातां आलें नाहीं, म्हणून ते शत्रूंच्या हातीं सांपडले. शत्रूंनीं त्यांच्या हत्तीस वळवून छावणींत नेलें! या हत्तीप्रमाणेंच शत्रूंनीं जरीपटक्याच्या हत्तीस आपल्या छावणींत नेण्याकरितां त्यास वेढा घातला; परंतु तो आपणास घेरणाऱ्या स्वारांस लाथाडून व जरीपटका तोंडांत धरून जो पळत सुटला तो मागें श्रीमंत माधवरावसाहेब होते त्यांच्या तंबूपाशीं येऊन थांबला.

त्या हत्तीस पाहतांच आपला पराजय होऊन फौजेची वाताहत झाली असावी असें लागलीच माधवरावांच्या लक्षांत आलें. त्यांच्या वयाचा म्हणजे केवळ अठरा वर्षांचा जर दुसरा एकादा मनुष्य असता, तर त्यानें घाबरून जाऊन तेथूनच तडक पळ काढिला असता, परंतु माधवराव हे शूरांचे बच्चे असल्यामुळें त्यांचें धैर्य अगदीं न खचतां उलट त्यांस दुप्पट आवेश आला! नंतर त्यांनीं आपल्या सभोंवतीं असलेल्या स्वारांस विचारिलें कीं, 'अजूनही तुह्मी मला कैदेंतच ठेवणार काय?' तेव्हां त्यांनीं उत्तर दिलें 'सरकार, आतां आपणांस कैदेंत कोण ठेवणार? आपण सरकार, आह्मी चाकर.' तेव्हां श्रीमंत म्हणाले, 'तुह्मी इतकेजण माझ्या जिवाचे सोबती आहां ना!' तेव्हां ते म्हणाले, "सरकार हें काय विचारतां? आजपर्यंत आह्मी आपल्या पदरीं वाढलों ते कशाकरितां?" हें ऐकून श्रीमंतांनीं, 'उचला तर घोड्यांच्या अनीना.' असा हुकूम

करितांच एकदम पंधराशें, * पण दहा हजारांना भारी, स्वारांची मांड भरधांव उठली !

मागें लिहिल्याप्रमाणें दादासाहेबांचा मोड झाल्यामुळें जी फौज परत येत होती त्यांत मल्हारराव होळकरही होते. त्यांस माधवरावसाहेब मोठ्या त्वेषानें चाल करून येतांना दिसले. त्यांचा लढाईचा हाच पहिला प्रसंग असल्यामुळें त्यांचें शौर्य व धैर्य आजपर्यंत दृष्टोत्पत्तीस आलें नव्हतें. म्हणून सुभेदारांस वाटलें कीं, नबाबाचें सैन्य फार असल्यामुळें, जेथें आपला व दादासाहेबांचा टिकाव लागला नाहीं तेथें हें मूल जाऊन काय करणार ? म्हणून उभयतांची गांठ पडतांच ते त्यांस म्हणाले, 'रावसाहेब, माघारीं चलावें; आपण पुण्याचें राज्य करूं !' परंतु चवताळलेल्या सिंहाप्रमाणें त्वेषानें चालून जाणाऱ्या माधवरावांस ही मसलत कशी रुचावी ? ते लागलींच सुभेदारांस म्हणाले, 'काकासाहेब, आपण मागें पानिपतावर भाऊसाहेबांस बुडविल्याचें× ऐकतों, पण आज तें प्रत्यक्ष खरें झालें !' सुभेदार मल्हाररावांसारख्या सर्व आयुष्य मराठी राज्याकरितां खर्चीं घातलेल्या शूर सरदारास असें उणें उत्तर कसें सहन व्हावें ? त्यांनीं लागलींच मनांत विचार केला कीं, हा आपणास विनाकारण लागलेला कलंक धुऊन टाकण्याची जर ही वेळ आपण

---

* परंतु विंचूरकर घराण्याचा इतिहास, पान ६७ वें यामध्यें 'पांच हजार स्वार होते' असें लिहिलें आहे.

× पानिपतच्या लढाईंत मल्हाररावांनीं युद्ध करण्यांत कुचराई केली असा आरोप त्यांजवर आला होता; आणि अद्यापही कित्येक इतिहासकारांचें मत असेंच आहे.

दवडली तर आपण आपल्या हातानें त्यावर रोगण चढविल्या-सारखें होईल. तेव्हां प्राण गेला तरी बेहत्तर आहे, परंतु ही संधि दवडूं नये, म्हणून ते श्रीमंतांस 'रावसाहेब चलावें; माझीही तर-वार पहावी-' असें म्हणाले आणि त्यांनीं आपल्या टोळीचा मोहरा रणभूमीवर फिरविला.

हे दोघेजण शत्रूच्या सैन्याजवळ जाऊन पोंचतांच त्यांनीं उभ्या दवडीनें त्याजवर मोठ्या आवेशानें हल्ला केला. हे दोघे योद्धे जरी वृद्धतरुण होते तरी दोघांचाही आवेश सारखाच होता. कारण एकास आपण मिळविलेल्या सुधाधवल कीर्तीस विनाकारण लागलेला डाग धुऊन ती पूर्ववत् तेजस्वी करावयाची होती व दुसऱ्यास तशी उज्वल कीर्ति मिळविण्याची उत्कट इच्छा व जरूरीही होती. त्यामुळें ते दोघेही आपल्या जिवाकडे न पाहतां मोठ्या त्वेषानें शत्रूवर मारा करीत चालले. नबाबाचें सैन्य आधींच थकलें होतें. जय मिळाल्यामुळें कांहींसें बेसावधही होतें, तोंच या 'अर्जुन-वृषकेतांचा' हल्ला आल्यामुळें तें अगदीं गांगरून गेलें. थोडा वेळ-पर्यंत त्या लोकांनीं तशाही स्थितींत टिकाव धरला; पण पुढें त्यांचें धैर्य सुटून ते पळावयास लागले! इकडे सुभेदार व श्रीमंत खणा-खणी करीत, तेथें* नबाबाच्या हत्तीपर्शी जाऊन पोंचले. तेव्हां श्रीमंतांनीं आपल्या बरोबरच्या स्वारांस लागलीच नबाबाच्या

---

* परंतु विंचूरकरघराण्याचा इतिहास. पान ६८ वें यामध्यें लिहिलें आहे कीं, नबाब गोदावरीच्या पलीकडे होता व म्हणून त्यास आपल्या दिवाणाच्या मदतीस येतां आलें नाहीं. ह्या लढाईची हकिकत आम्हीं पेशव्यांच्या बखरीच्या आधारानें लिहिली आहे.

अंबारीचे भारकस (दोर) कापावयास हुकूम केला, व महातास हत्ती खालीं बसविण्यास सांगितलें ! या वेळेस नबाब साहेबांची खूप गाळण उडून गेली होती ! त्यांस खास वाटलें कीं, आतां माधवराव आपला शिरच्छेद केल्याशिवाय राहणार नाहीं ! म्हणून तो भयानें अंबारीच्या मागें खवासखान्यांत (खिसमतगार बसतात तेथें) शिरला होता ! पण तेथेंही धीर निघेना, तेव्हां त्यानें रुमाल फिरवून 'आम्ही स्वाधीन होतों, हल्ला पुरे करावा,' असें दर्शविलें ! याप्रमाणें नबाब शरण येतांच श्रीमंतांच्या फौजेंत शहाजणें वाजूं लागलीं. त्यामुळें पूर्वीं कच खाऊन पळालेली मराठ्यांची फौज एकत्र जमा होऊन पुन्हां लढाईस सुरवात झाली. माधवरावसाहेब तसेच चाल करून दादासाहेबांच्या हत्तीपाशीं गेले आणि तेथें असलेल्या फौजेशीं दोन हात करून त्यांनीं तो हत्ती सोडवून आणिला. इतक्यांत विठ्ठल सुंदर गोळी लागून पडले, त्यामुळें नबाबाची फौज तमाम पळून श्रीमंतास यशःश्रीनें माळ घातली ! खुद्द नबाब तर पूर्वींच शरण आल्यामुळें त्यांशीं तह करून श्रीमंतांनीं पूर्ववत् सलोखा केला !

मुरलीधर मल्हार अत्रे.

---

२५. राष्ट्रीय न्यायसभा.

अमेरिकेंतील संयुक्त राज्याला स्थैर्य आणि बळकटी आणणारें एक थोरलें अत्युत्कृष्ट साधन आहे. तें युनायटेड स्टेट्सची वरिष्ठ न्यायसभा (The Supreme Court of United States)

ही होय. संस्थानिक आणि राष्ट्रीय ह्या दोन सरकारांमध्यें कोणते अधिकार आहेत आणि ते कोणीं कोठवर चालवावे ह्याविषयीं व दुसऱ्या राष्ट्रीय गोष्टींबद्दल वाद उपस्थित झाल्यास, राष्ट्रीय न्यायसभा तिचा निवाडा करते. सर्व संस्थानांचें मत घेऊन राष्ट्रीय सरकार एकादा नवीन कायदा करीतोंपर्यंत, संस्थानिक आणि राष्ट्रीय अशा दोन्ही सरकारांनीं ह्या वरिष्ठ न्यायसभेनें केलेल्या निवाड्याप्रमाणें वागलेंच पाहिजे. हें लोकसत्ताक राज्य स्थापन होतांच जी राष्ट्रीय नीति सर्व संस्थानांच्या अनुमतानें मंजूर करून घेण्यांत आली, तिच्याविरुद्ध जर एखादा नवा कायदा करून युनायटेड स्टेट्सची राष्ट्रीयसभा अमलांत आणूं पाहील, तर सदरील वरिष्ठ न्यायसभा त्या कायद्याच्या युक्तायुक्ततेबद्दल विचार करून तो रद्द करण्याचा हुकूम देते. ह्यावरून राष्ट्रीय न्यायसभेची शक्ति अपरिमित आहे असें कोणीं समजूं नये. कांग्रेस, प्रेसिडेंट इत्यादि युनायटेड स्टेट्सची शासक मंडळीसुद्धां ह्या सभेची आज्ञा शिरसामान्य करून घेते खरी, पण ह्या सभेला राष्ट्रीय नीतीला अनुसरून खटल्यांचा निवाडा करणें ह्यावांचून इतर कोणत्याही गोष्टी आपल्या मर्जीस वाटतील तशा करण्याचा अधिकार नाहीं. नवे कायदे करणें किंवा चालू असलेले कायदे अमलांत आणणें हेंही तिच्या हातीं नाहीं. जेव्हां एकादी गोष्ट रीतिप्रमाणें तिच्यापुढें आणली जाईल, तेव्हां ती राष्ट्रीय नीतीस अनुकूल आहे कीं नाहीं याचा विचार करून, वरिष्ठ न्यायसभा त्या गोष्टीस अनुकूल किंवा प्रतिकूल असें आपलें मत देते. ह्याप्रमाणें रीतीप्रमाणें एखादी गोष्ट

आपल्यापुढें येण्याच्या अगोदर संस्थानिक व स्थानिक सरकार किंवा प्रेसिडेंट यांच्या कारभारांत हात घालून ढवळाढवळ करण्याचा हक्क सदरील सभेला नाहीं; आणि आपण केलेले निवाडे कोणते व तसे करण्याचीं कारणें काय हेंही तिनें सर्व लोकांस कळविलें पाहिजे. अशा रीतीनें राष्ट्रीय न्यायसभेची शक्ति समर्याद केलेली आहे. अशा नियमांत राहून आपल्या राष्ट्रानें आपणांस दिलेल्या अधिकारांच्या बळानें राष्ट्रीय नीतीला अनुसरून ही सभा कोणत्याही गोष्टीचे युक्तायुक्ततेविषयीं जें मत देईल तें अन्यथा करण्याची शक्ति (कायदेशीर रीतीनें) ह्या राष्ट्रांत कोणासच नाहीं.

निरनिराळ्या संस्थानांतील कायदे करणाऱ्या सभा आपआपल्या ठिकाणीं हवे तसे कायदे करण्यास स्वतंत्र आहेत; तरी ते कायदे कोणत्या तरी गोष्टींत राष्ट्रीय नीतीच्या विरुद्ध असतील, तर ते रद्द करण्याचा अधिकार राष्ट्रीय न्यायसभेस आहे, असें सर्वांस ठाऊक असल्यानें, त्या सभा नवे कायदे करण्याचे वेळीं ते राष्ट्रीय नीतीस विरोधी होणार नाहींत ह्याविषयीं फार काळजी घेतात. राष्ट्रीय नीतीच्या विरुद्ध कायदे करण्याचे मुळीं कारणच नाहीं; कारण सगळ्या संस्थानांनीं आपल्या संरक्षणाकरितां म्हणून स्वसंतोषानें जे कांहीं हक्क देऊन संयुक्त राष्ट्राला आपल्या शासकाच्या जागीं नेमिलें आहे, त्याच्या नीतीस प्रतिकूल असे कायदे करण्यास आधीं संस्थानांतील रहिवासीच आपलें मत देणार नाहींत; परंतु कदाचित् असा प्रसंग आलाच आणि एकाद्या संस्थानानें राष्ट्रीय

नीतीच्या बाहेर कांहीं कार्य केलेंच, तर त्याचें करणें बरोबर नाहीं म्हणून सांगण्याचा अधिकार कोणास तरी असावा; तो राष्ट्रीय न्यायसभेला आहे, हें ठीकच आहे. युनायटेड स्टेटसची स्थापना झाल्यापासून आजपर्यंत काय तो एकदांच अशा प्रकाचा खटला ह्या सभेपुढें आला होता. सुमारें पंचवीस वर्षांपूर्वीं कांहीं दाक्षिणात्य संस्थानांनीं हबशी लोकांस गुलामगिरींत ठेवून आपलीं तुंबडी भरण्याच्या उद्देशानें, आपण युनायटेड स्टेट्सच्या राष्ट्रांतून वेगळीं होणार व तसें करण्याचा अधिकार आपल्यास आहे, म्हणून ह्या संयुक्त राष्ट्रांतून विभक्त होण्याचा प्रयत्न केला होता. त्या वेळीं ती गोष्ट राष्ट्रीय नीतीच्या बाहेर आहे, संस्थानांस राष्ट्रांतून विभक्त होण्याचा अधिकार नाहीं, असें राष्ट्रीय न्यायसभेनें आपलें मत दिलें. दाक्षिणात्य संस्थानांनीं तिचा हुकूम न मानून बंड केलें. पण उत्तरेच्या व राष्ट्रीय ऐक्य इच्छिणाऱ्या संस्थानांनीं मिळून तें बंड मोडलें.

संस्थानांच्या अधिकारांच्या मर्यादेविषयींचे खटले फारच थोडे असतात. त्यांवर आपलें मत देण्याचे प्रसंग ह्या सभेस फारसे येत नाहींत. तरी निरनिराळ्या संस्थानांच्या राहिवाशांचे मोठ्या रकमे-बद्दल किंवा फार महत्त्वाच्या गोष्टींविषयीं आपसांत तंटे झाल्यास ते निवाड्याकरितां ह्या राष्ट्रीय न्यायसभेपुढें नेतां येतात. म्हणून ह्या सभेला हातपाय जोडून स्वस्थ बसण्यास सवड सांपडत नाहीं.

ह्या सभेस नऊ न्यायाधीश असतात. इतर सरकारी (प्रेसिडेंट व त्याचे प्रधान इत्यादि) कामदारांप्रमाणें थोड्या थोड्या वर्षांनीं

ह्यांच्या ठिकाणीं दुसऱ्या सभासदांची नेमणूक होत नाहीं. एकदां ह्या सभेंत त्यांची नेमणूक झाली, म्हणजे एकतर आपलें काम बजावण्यास ते समर्थ नाहींत असें दिसून आल्यास, किंवा राष्ट्रीय सभेनें त्यांवर कांहीं ठपका आणून तो शाबीत झाल्यास मात्र त्यांस राष्ट्रीय सरकार कामावरून काढतें. एरवीं त्यांस आपआपलें कर्तव्य करण्याची शक्ति असे तोंपर्यंत आपल्या हुद्यावर राहण्याची व्यवस्था केलेली आहे. त्यांपैकीं एकादा इसम मरून वगैरे त्याची जागा रिकामी झाल्यास प्रेसिडेंट योग्य मनुष्यास पसंत करून त्याची त्या ठिकाणीं योजना करितो; परंतु योजना करण्यापूर्वीं प्रेसिडेंटानें सिनेट सभेला ह्या गोष्टीस रुकार देण्याची विनंती केली पाहिजे. सिनेट सभेचा विचार घेतल्यावांचून किंवा तिच्या मर्जी-विरुद्ध राष्ट्रीय न्यायसभेंत नव्या सभासदांची नेमणूक करण्याचा अधिकार प्रेसिडेंटला नाहीं. ह्या सभेच्या सभासदांस (प्रत्येकीं) दरवर्षीं दहा हजार डालर पगार मिळतो, आणि त्यांपैकीं मुख्य न्यायाधीशास पांचशें डालर अधिक ह्मणजे साडेदहा हजार डालर मिळतात. त्यांपैकीं ज्याचें वय सत्तर वर्षांचें झालें असेल त्यानें आपल्या कामाचा राजीनामा देऊन घरीं बसावें. त्यानंतर तो जिवंत असेतोंपर्यंत त्याला आपल्या हुद्यावर असतांना मिळत होता तितका पगार दर वर्षास मिळत जातो.

युनायटेड स्टेट्समध्यें दुसऱ्या पुष्कळ कामदारांस आणि वकि-लांस ह्यापेक्षां दहापट अधिक पैसा मिळत असेल. धनलाभाच्या मानानें पाहिलें असतां राष्ट्रीय न्यायसभेच्या सभासदांची पदवी

मोठी स्पृहणीय आहे असें नाहीं. एकाद्या वकिलाला किंवा शिक्षकाला देखील त्यांच्या तिप्पट चौपट पगार मिळतो. परंतु त्यांच्या पदाची योग्यता पैशाच्या योगानें मिळणारी नव्हे, त्यांची थोर पदवी हीच त्यांच्या अनन्यसाधारण योग्यतेस कारण आहे. ह्या राष्ट्रांतील सर्व जानपद त्यांस बहुमान देतात. संस्थानांचे आणि राष्ट्राचे अध्यक्ष व राष्ट्रीय सभेखालील थोरलाली प्रकरणें त्यांची आज्ञा शिरसा मान्य करितात. ते न्यायदेवतेचे प्रतिनिधि असून राष्ट्रीय न्यायासनासारख्या अत्युत्तम पदावर आहेत. त्या पदाच्या बरोबरीचें पद ह्या जगांत दुसरें कोठें नसेल. असल्या पदावर चढण्याला पैशाची लालूच जर कारण होईल, तर मग न्यायदेवतेचा मान कसा राहील? म्हणून त्या पदावर चढण्याची इच्छा करण्यास धनासारखें जबरदस्त प्रलोभन नाहीं, हें चांगलें आहे. राष्ट्रीय न्यायसभेचे सभासद बहुतकरून सुशील, वजनदार, विद्वान्, व्यवहारशास्त्रवेत्ते आणि अनुभवी गृहस्थ असतात. त्यांची राहण्याची आणि पोषाख वगैरे करण्याची रीति अगदीं साधी असते, यामुळें त्यांच्या योग्यतेस अधिकच इभ्रत येते.

या राष्ट्रीय वरिष्ठ न्यायसभेचें मुख्य ठिकाण वाशिंगट्न शहरांत आहे. तेथें नेहमीं तिचें काम चालतें. परंतु तिच्या सभासदांपैकीं प्रत्येक असामी पाळीपाळीनें दरवर्षीं नेमलेल्या वेळीं ह्या राष्ट्रांतील सर्व प्रांतांत जाऊन तेथील खटल्यांचा वगैरे तपास करण्यांत त्या त्या ठिकाणच्या न्यायाधिशांस मदत देतो. न्याय करण्याच्या कामीं सोईचें पडावें म्हणून राष्ट्रीय सरकारानें राष्ट्राचे नऊ भाग

केलेले आहेत; आणि त्या भागांचे विभाग करून निरनिराळे महाल केलेले आहेत. ह्या सगळ्या महालांतून न्यायगृहें आणि न्यायाधीश आहेत. हीं न्यायगृहें राष्ट्रीय असल्याकारणानें त्यांतून न्यायाधीशांच्या नेमणुका व्हावयाच्या त्या प्रेसिडेंटाच्या सूचनेवरून सिनेट सभेच्या अनुमतानेंच होत असतात. ह्या पदावर नेमिलेल्या न्यायाधीशांची चाकरी (त्या कामास त्यांच्या नालायकीबद्दल किंवा गैरवर्तणुकीबद्दल पुरावा मिळून, दोष शाबीत झाला नाहीं तर) जन्मभर कायम असते.

पंडिता रमाबाई.

---

२६. कुंभेरीचा वेढा.

रघुनाथराव दादासाहेब इ० स० १७५४ त मोठ्या सैन्यासह-वर्तमान हिंदुस्थानावर स्वारी करून गेले. त्यांच्या बरोबर मल्हार-राव होळकर, जयाजी शिंदे, विठ्ठल शिवदेव, अंताजी माणकेश्वर, गोविंदपंत बुंदेले, यशवंतराव पवार इत्यादि अनेक सरदार फौज-बंद होते. हे सगळे नर्मदा उतरले आणि दिग्विजय करीत एकसारखे धूम पुढें चालले. त्यांस आड येण्यास कोणाची छाती झाली नाहीं. जावें तेथें फत्ते असा घडाका चालला. सोंदेवाडा, खेचीवाडा, बुंदी, कोटा, राजगड, पाटण, उदेपूर, जेननगर, नरवा, झांशी, काल्पी इत्यादिकांपासून खंडण्या घेत घेत हें सगळें सैन्य सुरजमल जाटाच्या प्रांतांत कुंभेरी किल्ल्यापाशीं येऊन थडकलें. हा किल्ला भरतपूरच्या वायव्येस आहे. हा फार बळकट असून, जाट लोकांस हें एक उत्तम आश्रयस्थान वाटतें. हे जाट चांगले शूर

होते. तरी एवढ्या मोठ्या सैन्यापुढें आपलें कांहीं चालावयाचें नाहीं असें जाणून, तहाचें बोलणें लावण्याकरितां त्यांनीं आपला वकील रूपराम चौधरी यास रघुनाथराव दादासाहेब यांजकडे पाठविलें. ते दादासाहेबांस खंडणीदाखल चाळीस लाख रुपये देण्यास कबूल झाले होते. परंतु रघुनाथराव दादासाहेब एक कोटी रुपये घेऊन बसले. ते कांहीं केल्या ऐकेनात. थोडे हट्टास पेटल्यासारखे झाले. तें सगळें वर्तमान वकिलानें सुरजमलास कळविलें; तेव्हां त्यासही त्वेष आला, आणि त्यांनीं पेशव्यांच्या सैन्याशीं सामना करण्याचा निश्चय केला. त्यांच्या राज्यांतले मुख्य किल्ले म्हटले म्हणजे भरतपूर, दीग, रामगड आणि केवळदुर्ग हे चांगले भक्कम होते. त्यांच्या संरक्षणाचा नीट बंदोबस्त करून, सुरजमल हे स्वतः सैन्यासहवर्तमान कुंभेरीच्या किल्ल्यांत येऊन राहिले; आणि तेथून त्यांनीं रघुनाथरावदादांस सांगून पाठविलें कीं, "चाळीस लक्ष रुपये देतों ते घेण्यास यावें; नाहीं तर युद्धास उभें राहावें. आमची तयारी आहे." आणखी त्याच जासुदाबरोबर पांच गोळे आणि थोडीशी दारू पाठवून दिली.

हा निरोप ऐकून आणि तो दारूगोळा पाहून रघुनाथरावदादांच्या पायांची आग मस्तकास गेली. त्यांनीं लागलीच आपल्या सैन्याचे मोर्चे कुंभेरी- किल्ल्याकडे फिरविले. मराठ्यांच्या सैन्यानें कुंभेरीच्या किल्ल्यास वेढा घातला आणि उभयतांनीं एकमेकांवर मारा चालू केला. वेढ्यांतल्या सैनिकांनीं किल्ल्यांतल्या लोकांवर सुरुंग उडविण्याची प्रथम युक्ति योजिली, ती निष्फळ झाली.

म्हणून तोफा चालू केल्या. त्यांत तोफा नीच धरल्या म्हणजे गोळे खालीं रेतींत घुसून गडप होत. आणि त्या उंच धरल्या म्हणजे गोळे किल्ल्यावरून उडून पार जाऊन वेढा घालणारांच्या सैन्यांत पडत, आणि त्यांच्या योगानें त्यांचा फार नाश होई. असें दीड महिना एकसारखें चालले. तरी आंतून कोणी तहाच्या बोलण्यास येईना.

ह्या स्थितीमध्यें एके दिवशीं असें झालें कीं, मल्हारराव होळकर यांचा एकुलता एक मुलगा खंडेराव हा, भोजनोत्तर मोर्चामध्यें निशाणापाशीं उभा असतां त्यास अकस्मात् जेजालची एक गोळी लागून त्याचा प्राण गेला. तेव्हां मल्हारराव होळकर यांस अतिशयित दुःख झालें; आणि त्यांस शत्रूंविषयीं अतिशय संताप येऊन, सगळ्या मंडळीसमक्ष दांत खाऊन त्यांनीं अशी प्रतिज्ञा केली कीं, " सुरजमल याचा शिरच्छेद करीन व कुंभेरीची माती यमुनेंत टाकीन, तरीच जन्मास आल्याचें सार्थक, नाहीं तर प्राणत्याग करीन. " हीं वर्तमानें जाट सुरजमल यांच्या कानीं जातांच त्यांचें धाबें अगदीं दणाणून गेलें; कां कीं, मल्हारराव होळकर हे मोठे मानी आणि रागीट स्वभावाचे आहेत आणि ते बोलल्याप्रमाणें करण्यास कधीं चुकावयाचे नाहींत, अशी त्यांची पक्की खात्री होती.

सुरजमलांनीं आपलीं सगळीं जिवाचीं माणसें एकत्र करून पुढें काय करावें असें त्यांस विचारलें. त्या माणसांमध्यें हणसया म्हणून राणीवंशांतली एक शहाणी स्त्री होती. ती मोठी चतुर

आणि माहितगार होती. तिनें सुरजमलांस सांगितलें कीं, "जयाजी शिंदे यांचा आणि तुमचा स्नेह आहे. तेही सत्क्रियावान् आणि एकवचनी आहेत. त्यांस साह्य केलियास तुमचा तरणोपाय आहे." ह्यांत मतलब एवढाच होता कीं, पुत्रशोकाच्या जोरामुळें होळकरांचें मस्तक फिरून जी कमान चढली आहे, ती शिंद्यांस त्यांतून फोडून कमी करावी.

त्याप्रमाणें सुरजमलांनीं तेजराम कटारी या माणसाबरोबर एक विनंतीपत्र जयाजीराव शिंद्याकडे पाठविलें. त्यांत लिहिलें होतें कीं, "आजचे समयीं तुम्ही वडील बंधु आणि मी धाकटा बंधु आहें. कळेल त्या रीतीनें बचाव करावा." त्या पत्रासोबत सुरजमलाची पगडी आणली होती, ती तेजराम कटारीनें जयाजीरावांच्या डोक्यास घातली, आणि त्यांची पगडी आपणाजवळ घेतली. याचा अर्थ असा कीं, ते पगडीभाऊ झाले, असें दर्शविलें. तेव्हां जयाजीराव शिंदे यास मोठें संकट पडलें; कां कीं, सुरजमलास अनुकूल न व्हावें तर शरण आलियास मरण चिंतिल्याचें पाप पदरीं येणार आणि त्यांस अनुकूल व्हावें तर स्वामिद्रोहाचें पाप लागणार, अशी आडविहीर झाली. तरी, शेवटीं थोडा विचार करून सुरजमलांस अभयवचन देऊन त्यांनीं त्याप्रमाणें त्यांस निरोप पाठविला.

हें वर्तमान मल्हाररावांस कळलें, तेव्हां त्यांस अतिशयित संताप येऊन ते मोठ्या लगबगीनें रघुनाथरावदादासाहेबांच्या डेऱ्यांत गेले, आणि सगळी हकिकत त्यांस विदित करून म्हणाले, "आमचे अस्तनींतच अग्न, आणि जाट हस्तगत कसा होतो? जाट व शिंदे

पगडीभाई झाले, आतां जाट साध्य कसा होतो ?" हें ऐकून रघुनाथरावदादा फार चकित झाले, अतिशयित खेदही पावले; परंतु घाबरले नाहींत. कां कीं, कांहीं झालें तरी जयाजीराव शिंद्यांच्या हातून पेशव्यांचें अहित व्हावयाचें नाहीं, अशी त्यांची पक्की खातरी होती.

इकडे इतकें झालें होतें, तरी तिकडे सुरजमलांस दम पुरेनासा झाला. त्यांनीं जयाजीरावांस सांगून पाठविलें कीं, "सल्ला करा किंवा हल्ला करून मारून तरी टाका." तेव्हां त्या प्रकरणाचा काय तो निर्णय करण्याकरितां, जयाजीराव शिंदे एकदम उठून राघोबादादाकडे गेले, आणि त्यांस म्हणाले, "दादासाहेब, आम्ही ह्या घन्यांचे बारगीर, निमकहराम नहों. असें असतां आम्ही जो जाबसाल सांगतों तो खावंदांचे मर्जीस येत नाहीं. आजचे समयीं जाटापासून खंडणी घेऊन पुढें मसलत फत्ते करावी. सामनेवाल्यांच्या पदरीं फौज भारी; निभावणी होणें कठीण." ही मसलत रघुनाथरावदादांस पसंतशी वाटली नाहीं, तरी, ती नाकबूलही त्यांच्यानें करवेना. म्हणून त्या वेळीं ते कांहींच बोलले नाहींत.

इतक्यांत मारवाडच्या गादीच्या संबंधानें रामसिंग आणि विजेसिंग यांचा कलह लागून, विजेसिंगानें रामसिंगास अजमीरच्या किल्ल्यांत अडकवून टाकून आपण सगळें राज्य बळकाविलें. ह्या विजेसिंगास होळकरांचा आश्रय होता. तेव्हां अर्थात् रामसिंगानें आपला वकील जयाजीराव शिंद्याकडे पाठवून, आणि त्याजबरोबर आपली पगडी देऊन संरक्षणाविषयीं विनंती केली. त्यांत असें

म्हटलें कीं, "आम्ही राजे दुर्बळ, म्हणून तुम्हांस शरण आलों. आतां मानापमानाचे धणी तुम्ही आहां." ही विनंती त्यांस अमान्य करवेना. त्यांनीं ती मान्य केली, आणि रामासिंगास अभयवचन दिलें; आणि लगेच रघुनाथरावदादा ह्यांच्या कचेरीस जाऊन त्यांस सांगितलें कीं, "आपण थोर खाविंद आहां. आपण ह्या स्थळीं राहून जाटाचें पारिपत्य करावें. आम्हांस आज्ञा द्यावी. आम्हीं मारवाडांत जाऊन मसलत फत्ते करून येतों. सर्वांनीं एक जागीं राहून मसलत बुडवावी, हें ठीक नाहीं. पदरीं फौज भारी. त्यांस काय द्यावें? धणी यांनीं खुषीरजावंतीनें निरोप दिला तर उत्तम आहे. नाहीं तर आपणास साफ राहातां पुरवत नाहीं."

ह्या भाषणाचा सगळा आशय मनांत आणून, रघुनाथरावदादांनीं मल्हारराव होळकर ह्यांस बोलावून आणून सांगितलें कीं, "शिंदे तर कूच करून चालले. तुम्ही वडील आहां, आम्हांस मनसबा कोणता देतां?" हें ऐकून होळकरांस मोठें संकट वाटलें. तरी दुराग्रहास पेटणें कोणासही हितावह होणार नाहीं, सें मनांत आणून, ते तेथून उठून जयाजी शिंदे ह्यांच्या डेऱ्यांत आले, आणि त्यांचें समाधान करून त्यांस विनंती केली कीं, "साठ लाख रुपये खंडणी पतकरून जाटाशीं तह करवा." तें म्हणणें त्यांनीं मान्य केलें. त्याप्रमाणें जाटाशीं तह करून जयाजीराव शिंदे मारवाडांत गेले; मल्हारराव होळकर माळवाप्रांतीं इंदुरास येऊन राहिले आणि रघुनाथरावदादा महाराष्ट्रांत परत आले. याप्रमाणें कुंभेरीचा वेढा उठला.

विनायक कोंडदेव ओक.

---

२७. वाक्चातुर्य.

मोठ्या सभेंत उभें राहून व सयुक्तिक भाषण करून ऐकणाराचें मन वश करून घेणें, ही मोठी उपयोगी व फार कठीण कला आहे. ही कला पुरी साधण्यास अनेक गोष्टींचें आनुकूल्य असावें लागतें. वाणी गोड असली पाहिजे; तसेंच ज्या विषयावर बोलावयाचें, तो चांगला अवगत असून तो सुबोध करण्याची शक्ति पाहिजे; तसेंच ज्या लोकांत भाषण करावयाचें,त्यांची अक्कल किती आहे, त्यांच्या समजुती कशा आहेत, व त्यांचे रागद्वेष कोणकोणत्या गोष्टींविषयीं आहेत हें सर्व बोलणाऱ्यास समजलें पाहिजे; तसेंच त्याची मुद्रा व शरीर हींही भव्य असलीं पाहिजेत, व बोलतांना भाषणांतील रस त्यास मुखचर्येनें व अंगविक्षेपानें लोकांस दाखवितां आले पाहिजेत.

आतां ह्या गुणांपैकीं कितीएक गुण स्वाभाविक आहेत, व कितीएक अभ्यासानें यावयाजोगे आहेत, हें वाचणाऱ्याचे लक्षांत सहज आलें असेल. पण जे स्वाभाविक आहेत, त्यांतले सुद्धां कितीएक मूळचे कमी दिसत असतां, अभ्यासानें ते वाढतात. ही वक्तृत्वकला प्राचीनकाळीं ग्रीक लोकांत व रोमन लोकांत फारच वाढली होती. ती वाढण्याचें एक मुख्य कारण असें होतें कीं, त्या दोन्ही लोकांत कित्येक वर्षें प्रजासत्ताक राज्य होतें; कोणास मोठा अधिकार मिळावयाचा तो प्रजेच्या बहुमतानें मिळे; व कोणास कांहीं नवा फेरफार करणें झाला, तर पुष्कळ लोकांचा रुकार पडल्यावांचून तो घडत नसे. सारांश, राजसत्ताक राज्यांत अब्रू, संपात्ति व अंमल हीं प्राप्त होण्यास जशी राजाची कृपा लागते, तशी त्या गोष्टी

प्राप्त होण्यास बहुलोकसमाजाची कृपा व अनुकूलता ही लागत असत; आणि ज्यांस चांगलें, सुरस व स्पष्ट भाषण करून आपला पक्ष सबळ व चांगला भासवून देतां येई, त्यांचा पक्ष लोकांस मान्य होई; ह्या कारणानें वक्तृत्वाची कला पुष्कळ शिकत. तेणेंकरून ती फारच वाढली. ह्याप्रमाणें हल्लीं इंग्लंड, फ्रान्स इत्यादि देशांत लोकांच्या सभा आहेत, त्या सभांत राजकीय कामांचा विचार होतो व ज्यास आपल्या पक्षाचें चांगलें उपपादन करितां येतें, त्याचा पक्ष बहुतकरून लोकांस रुचून तो सिद्धीस जातो; ह्यामुळें त्या लोकांतही सुरस, सयुक्तिक व स्पष्ट अशा रीतीनें बोलण्याच्या कलेचा पुष्कळ लोक अभ्यास करितात. प्राचीन काळीं ग्रीस देशांत डिमास्थेनीस म्हणून मोठा प्रसिद्ध वक्ता झाला. त्याचे भाषणांत आवेश फार असे. असें सांगतात कीं, तो बोलावयाचा असला ह्मणजे हजारों लोक त्याचें भाषण ऐकण्याकरितां दुरून दुरून येत असत. तसाच रोमन लोकांत सिसरो ह्मणून एक महानामांकित वक्ता होऊन गेला; त्याच्या भाषणांत माधुर्य गुण अप्रतिम असे. तसाच प्राचीनकाळीं इंग्लंडांत विलियम पिट म्हणून एक वक्ता होऊन गेला. त्याची वक्तृत्वगुणाविषयीं फारच प्रशंसा करितात.

वक्तृत्वाचा गुण असणें फार उपयोगी व मोठें भूषण आहे. मनुष्यास पुष्कळ ज्ञान आहे, अनेक गोष्टींची माहिती आहे, पण आपल्या मनांतला सर्व भाव दुसऱ्याच्या मनांत आणून देतां येत नाहीं, तर त्या ज्ञानाचें व त्या माहितीचें स्वरूप होऊन आपल्या

गुणानुरूप प्रतिष्ठा कदापि प्राप्त व्हावयाची नाहीं. एका मोठ्या करंड्यांत हजारों रुपयांची उंची कस्तूरी झांकून ठेविली आहे, पण तिचा वास्तविक मनोरम गंध बाहेर पडत नाहीं, तर त्या करंड्यास मोठ्या मोलाचा करंडा असें कोण म्हणेल ? कोणी म्हणणार नाहीं. लोकांस जी एकमेकांची अक्कल व हुशारी हीं कळतात, तीं एकमेकांच्या लिहिण्यावरून व मुख्यत्वें बोलण्यावरून कळतात. ह्यास्तव, ज्यांची विद्वत्ता व बुद्धि ही कमी, परंतु वक्तृत्व ज्यांचें चांगलें त्यांस वास्तविक विशेष बुद्धिमान् व विशेष विद्वान्—पण वक्तृत्वगुणांत कमी—अशा पुरुषांपेक्षां लोक विशेष समजतील व विशेष मान देतील, आणि असें करण्यांत त्यांजकडे तादृश दोषही नाहीं. कारण लोक जे कोणास कमी जास्ती मानितात, ते त्याच्या अंगीं वास्तविक जे गुण असतात त्यांवरून मानीत नाहींत; तर त्याचे जे गुण दिसतात, त्यांवरून मानितात. तेव्हां ज्याच्या अंगीं वास्तविक गुण फार पण दिसणारे गुण थोडे, तो आपल्या गुणांच्या मानानें योग्यता पावणार नाहीं हें स्पष्टच आहे.

आणखी दुसरी लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे, ती ही कीं, मनुष्यें दुसऱ्याचे अंगचें ज्ञान समजण्याविषयीं मोठासा प्रयत्न करीत नाहींत. ह्या गोष्टीचीं अनेक कारणें आहेत. साधारण मनुष्यांस स्वतःच्या अज्ञानामुळें ज्ञानाची फारशी गोडी नसते, व त्याची वास्तविक योग्यताही कळत नसते. तेव्हां जी वस्तु त्यांस तादृश सुख देत नाहीं व जी फारशी हितकारक वाटत नाहीं, ती प्राप्त होण्या-

विषयीं अर्थात् तीं फारशी मेहनत घेत नाहींत. तसेंच दुसऱ्याचा गुण कबूल करून त्याची चहा करण्याची लोकांस मोठी हौस आहे असें नाहीं; कितीएकांचे ठायीं उलटा मत्सर असतो. तेव्हां दुसऱ्यांचें वास्तविक स्वरूप समजण्याचे ते काय म्हणून श्रम करतील? तर ह्यावरून असें स्पष्ट सर्वांच्या ध्यानांत येईल कीं, आपण गुणी व विद्वान् असलों म्हणजे झालें, ते गुण व विद्वत्ता दाखविण्याविषयीं श्रम करण्याची आपणांस काय गरज आहे, हा अभिमान व्यर्थ आहे. लोकांत आपली मान्यता व्हावी, अशी जर इच्छा आहे, तर आपल्या मनांतल्या उत्तम कल्पना सुरस, स्पष्ट व सुगम करून लोकांच्या अंतःकरणांत भरवून देतां येण्याची कला आपणांस शिकणें अवश्य आहे.

आतां कोणी परमार्थपर असतील, व ज्यांस लौकिकाची पर्वा नसेल तर त्या पुरुषांस सुद्धां परोपकार करितां येण्यास वाक्चातुर्य संपादिलें पाहिजे. आपणांस ज्या चांगल्या गोष्टी समजतात, त्या बहुतांस कळवून द्याव्या, व तेणेंकरून आपल्या हातून होईल तितक्यांस कल्याणाच्या पंथास लावावें, हा सर्वांचा धर्म होय. कोणी आडवाटेनें काट्यांत किंवा वाघाच्या जाळीकडे जात आहे किंवा जवळ सुंदर पाण्याचा तलाव असून तो माहीत नसल्यामुळें कोणी तहानेनें मरत आहे, असें पाहून दयाळू व ज्ञाता पुरुष त्या अज्ञान मनुष्यास नीट वाटेस लाविल्यावांचून किंवा पाण्याचा रस्ता दाखविल्यांवाचून राहील? कधीं राहणार नाहीं. पण त्याच्या हातून परोपकार होण्यास त्यास त्या अज्ञान मनुष्यास आपला अर्थ सम-

जावून दिला पाहिजे, व त्याच्या मनांत आपल्या सांगण्याचा खरे-पणा बिंबविला पाहिजे. ज्ञात्यांस ज्या बहुत गोष्टी ठाऊक असतात, त्या अज्ञानांस समजून त्या खऱ्या वाटल्या असतां त्यापासून त्यांचें अनेक प्रकारें कल्याण व्हावयासारखें असतें, परंतु अज्ञानांस ज्ञान प्राप्त होऊन त्यांची खात्री होण्यास, ज्ञात्यांस त्यांस स्पष्ट समजेल, त्यांस रुचेल, त्यांच्या अंतःकरणांत ठसेल असा उपदेश करितां आला पाहिजे. ह्याकरितां धर्मोपदेशक, शिक्षक इत्यादिकांचे ठायीं वाक्चातुर्य हा गुण असणें अत्यंत आवश्यक आहे.

ह्या देशांत विशेषेंकरून प्रस्तुतकाळीं या कलेची फारच गरज आहे. ज्या देशांत लिहिण्यावाचण्याची कला फारच वाढली आहे, जेथें दरवर्षीं हजारों नवीन ग्रंथ होतात व लक्षावधि लोक ते वाचतात, त्या तसल्या देशांत वक्त्याचें काम पुस्तकें पुष्कळ अंशीं करितात. पण ज्यांना वाचतां येतें असे लोक आपल्या देशांत सर-सकट शेंकडा दोन चार कदाचित् निघतील, व वाचण्याचा ज्यास नाद, असा हजारांत एकसुद्धां नियमानें सांपडणें विरळा. अशा हल्लींच्या स्थितींत सर्वांस समजेल व आवडेल असें भाषण करणारे उत्तम प्रकारचे वक्ते फारच आवश्यक आहेत. अशा वक्त्यांनीं जितकें काम होईल तितकें पुस्तकांनीं व्हावयाचें नाहीं.

कृष्णशास्त्री चिपळूणकर.

---

२८. खंडाळ्याच्या घाटांतील देखावा.

शहरांत राहणारे आपण, आपल्या कामधंद्याच्या थोडाबहुत आड येण्याइतका पाऊस पडला कीं लागलेच त्या बिचाऱ्याला

किती शिव्याशाप देऊं लागतों ! त्या बिचाऱ्याच्या हातून जीव-सृष्टीला व जडसृष्टीला किती फायदा होतो ही गोष्ट त्यावेळीं आपल्या स्मरणापासून किती तरी दूर असते ! परंतु त्याच पावसानें वनांस व पर्वतांस आणलेली अत्यंत उदात्त, रमणीय व धीर गंभीर शोभा दृष्टीस पडली, म्हणजे त्यानें आपली चित्तवृत्ति किती विलक्षण होते ! सर्व जीवसृष्टीचा व जडसृष्टीचा आधार जल व तेज; परंतु या जलाची व तेजाची खरी योग्यता काय हें कूपमंडूकाप्रमाणें केवळ शहरांतच आपलें आयुष्य घालविणाऱ्या आपस्वार्थी आपणांस खऱ्या तऱ्हेनें कधींही समजण्याचा संभव नसतो. ती समजण्याला एक वेळ तरी या दिवसांत वनश्री आणि पर्वतश्री पाहण्याची संधि आणावी. आपल्या या पुणें–प्रांतीं खंडाळ्याच्या घाटांत ही वनाची व पर्वताची शोभा जितक्या उदात्त रूपानें दृष्टीस पडते, तितकी इतरत्र फारच क्वचित् दृष्टीस पडत असेल. खंडाळ्याचें स्टेशन सोडून, आतां आपल्याला भव्य अशा वनश्रीमधून जायाला सांपडणार म्हणून अत्यंत आनंदित होऊनच कीं काय अग्निरथ उड्या मारीत जाऊं लागतो व त्याच्याबरोबर आपला अंतरात्माहि भावी दृष्टिसुखानें उचंबळूं लागतो. पुणें सोडल्यापासून बराच वेळ लोणावळें सोडीपर्यंत म्हटलें तरी चालेल, मी एक मजेचें पुस्तकच वाचीत होतों. तोंपर्यंत दुतर्फा पाणी व हिरवीं चार शेतें यांखेरीज कांहींच दिसत नाहीं. परंतु लोणावळें सोडल्यानंतर, "आतां काय ती खरी वनश्री व पर्वतश्री दिसणार !", असें मनांत येऊन पुस्तक आपोआप हातावेगळें झालें आणि दृष्टि चंचल झाली. त्या भव्य

देखाव्याच्या प्रत्यक्ष दर्शनानें सुख घेण्यासाठीं, अंतर्बाह्य नेत्रांनीं पूर्णपणें तयारी केली, इतक्यांत पहिल्या बोगद्यांत शिरण्यापूर्वीं आम्हांस जणूंकाय इशारत म्हणून आमच्या अग्निरथानें मोठ्यानें कंठघोष केला. तो ऐकून मला तर असें वाटलें कीं, जणूंकाय त्या बिचाऱ्यास अंधकारांत शिरण्याचें फार भयच वाटत आहे! परंतु कोणचेंही सुख घेण्यापूर्वीं थोडेंबहुत दुःख भोगणें, हें पुढील सुखाच्या उपभोगास फार उपयोगी असतें. थंडगार पाण्यानें खरा आनंद होण्यास पूर्वीं तहानेनें कंठशोष झालेला असला तरच मौज; वृक्षाच्या शीतल छायेचें सुख भोगण्यास पूर्वीं उन्हातान्हांतून हिंडल्यामुळें घामाच्या धारा चालल्या असल्या तरच उपयोग. बोगद्यांत शिरल्याबरोबर आंतल्या अंधारानें, धुरानें व एकंदर कोंडमाऱ्यानें थोडेंबहुत त्रासल्यानंतर बाहेर पडतांच एकदम आमच्या उजव्या बाजूला पर्वतकंदराची शोभा दिसली, ती किती भव्य! ती पाहातांच डोळे एकदम चकित होऊन स्थिरावले. वर ढगांनीं अगदीं व्याप्त झालेल्या शिखरांपासून तों तहत खालीं सपाटीपर्यंत पैशाएवढी जागासुद्धां वनस्पतिविरहित दिसेना. जिकडे पहावें तिकडे हिरवेंचार. त्यांत आणखी डोंगरावरून ठिकठिकाणीं एकसारखे फेंसमय दुधाप्रमाणें अत्यंत पांढरे असे दिसणारे पाण्याचे लोट वरच्या दगडीवरून खालच्या, खालचीवरून तिच्या खालच्या, अशा तऱ्हेनें अत्यंत वेगानें पडत होते, ती तर नुसती बहारच दिसत होती! एके ठिकाणीं पाण्याचा लोट इतक्या जोरानें खालच्या एका विस्तीर्ण खडकावर पडत होता कीं, त्यावर तो

येऊन आदळतांच त्याचे अणुपरमाणु भिन्न भिन्न होऊन, पुन्हां त्यांचे मेघ बनून वर चालले आहेत असें वाटल्याखेरीज राहतच नसे. मी किती वेळ तरी त्या एकाच लोंढ्याकडे पाहात होतों! त्याच्या पडण्याच्या जागेपासून पुढें तो तसाच चाललेला जर न दिसता, तर मला असेंच वाटलें असतें कीं, केवळ इतक्या उंचावरून पडल्यामुळें होणाऱ्या जबरदस्त आघाताच्या उष्णतेनें त्या लोंढ्याची पुनः वाफ होऊन, तो मेघरूपानें पुनः आकाशांत जातो आहे. तेवढ्या त्या ओघाच्या स्थानांत खालवर सर्व प्रांत अगदीं मेघांनींच पूर्णपणें व्यापिल्याप्रमाणें दिसत होता. परंतु जेथें तो ओघ पडत होता, तेथून सुमारें पांच सात हातांवर तोच ओघ नागमोडीप्रमाणें वाहात चालला होता. तिकडे दृष्टि गेली म्हणजे ती एक शोभा कांहीं निराळीच दिसे. सुमारें पन्नास हातांवर त्याचा तो दुधाच्या फेसासारखा पांढरा रंग कोणीकडच्या कोणीकडे गेल्याप्रमाणें झालें. त्याच्या अंगीं लालीची झांक दिसूं लागली, आणि खालच्या दरींत जाऊन सपाटीच्या भागावर गेल्यावर तर तो चांगलाच लाल दिसूं लागला. जणूं काय त्याच्या मनांत नसलेली गोष्ट करावी लागेल म्हणून त्याला अत्यंत संतापच आला होता. त्या संतापानें संतप्त होऊन तो पुढें चालला होता. त्यास आपण कोठें जातों वगैरे कांहीं घडपणें दिसत नसून केवळ पुढें जायचें, मग वाटेंत काय अडचणी येतील, काय संकटें येतील, आपल्या उद्धत गतीनें कोणाचें काय नुकसान होईल, याचा विचार त्याच्या स्वप्नांतसुद्धां येत नव्हतासें दिसलें. ‘पुढें! पुढें!’ हाच

काय तो त्याचा सततचा जप दिसला. यावेळीं झिमझिम पाऊस पडत असल्याकारणानें कोठेंही पक्षी म्हणून दिसत नव्हते. बिचारे सारे कुठें तरी वृक्षच्छायेला बसून वेळ काढीत असावे. मुख्यतः जी काय शोभा दिसत होती, ती हिरव्या रंगाची. आकाशाकडे पाहिलें असतां काळसर असून पांढुरके असे ढग आणि दुसऱ्या कोणीकडे पाहिलें तर हिरवेंहिरवें चार किंवा त्याच हिरव्या रंगाच्या कमीअधिक मानाच्या छाया; मोह, चार, वड, साग हे वृक्ष नुसते पर्णमय झालेले आणि त्यांच्या भिन्न भिन्न शाखांतील अंतरसुद्धां दिसूं नये म्हणूनच काय, त्यांपैकीं कित्येकां-वर कांहीं रानवेली पसरून त्यांनीं त्यांचे सर्व देह गुरफटून टाक-लेले होते. रानझाडांवर कांहीं बारीक फुलांखेरीज आणि कांहीं मोठ्या झाडांवरही दिसणाऱ्या फुलोऱ्याखेरीज फुलांचें दर्शनही होत नव्हतें. सगळी बहार काय ती पानांची ! हीं पानें एकसारखीं पावसानें भिजून आपल्या आंगावरील बिंदु खालच्या पानांवर व खालचीं पानें आपल्या खालच्या पानांवर याप्रमाणें फेंकून देत होतीं. आणि शेवटीं सपाटीच्या जवळ उगवलेल्या गवतास मात्र त्या सगळ्या पाण्याचा मार खावा लागत होता. काय करील गरीब बिचारें! मुकाट्यानें आपलें डोकें खालीं लववून अगदीं भुईला लावून अश्रू गाळीत होतें असें दिसे. अग्निरथाचा वेग आम्हांला एकच शोभा एकसारखी थोडीच पाहूं देत होता ! पुनः पुन्हां बोगद्यांत शिरून त्या भव्योदार शोभेस आमच्या दृष्टीआड करी व पुनः त्या शोभेचें दर्शन देई. सुमारें पांच सहा बोगदे गेल्यानंतर मी खालीं दूरवर

पाहिलें, तों मघाशीं सांगितलेला तो डोंगरावरून पडून सपाटीला लागलेला जळाचा ओघ आतां फारच प्रचंड दिसूं लागून एखाद्या राक्षसी अजगराप्रमाणें लांबवर पसरत चाललेला दिसला. बाजू-बाजूच्या डोंगरांवरून धडधडत येणारे आणखी कित्येक जलौघ त्याला येऊन मिळालेले दिसत होते. ज्याप्रमाणें एखादा मूळचा दरिद्री-परंतु एकाएकीं द्रव्यवान् झालेला पुरुष, त्याला अधिकाधिक द्रव्य मिळत चाललें म्हणजे केवळ उन्मत्त—मदांध—होतो, त्याप्रमाणें त्या जलौघाची स्थिति झालेली दिसत होती. आपल्या स्वैरगतीमुळें कोणाचें काय नुकसान होईल, कोणाला किती दुःख सोसावें लागेल, याचा त्यास अणुमात्र विचार दिसला नाहीं. जें त्याच्या तावडींत सांपडेल, तें त्यानें होतां होईल तों आपल्या पुढें लाथा-डीत नेलेंच म्हणून समजावें. मद्यपानानें धुंद झालेल्याच्या नेत्रां-प्रमाणेंच तो तांबडा लाल दिसत होता. इतकी जलसंपत्ति नव्हती तेव्हांचा त्याचा तो दुधाच्या फेंसासारखा शुद्धपणा आतां कोणी-कडच्या कोणीकडेच गेलासा दिसला. गरिबींतला शुद्धपणा त्याला टक्केटोणपे खाऊन मिळाला होता. बिचाऱ्याला असें समजेना कीं, आपल्या या उद्धटपणामुळेंच आपल्यास आकाश सोडावें लागलें. आकाश सोडल्याबरोबर पहिला दणका बसला तो डोंगराच्या शिखरावर! बरें, तें तरी उच्चस्थान नीटपणें राखावें! पण छेः! तेथून जणूं काय जीव घेऊनच पळत सुटला, तो तडातड आणखी टक्केटोणपे खात त्यानें चांगला शुद्धपणा प्राप्त करून घेतला. पण त्याची आठवण राहते कोठली! थोडेंसें ऐश्वर्य येऊन तें चार

दिशांनीं इतरांच्या साहाय्यानें वाढतांच पूर्वींच्या त्या शुद्धपणाची सर्व विस्मृति झाली, आणि मी त्यावेळीं पहात होतों, ती स्थिति त्यानें धारण केली. त्या उद्भटानें किती शेतांचें, किती खेड्यांचें नुकसान केलें असेल याचा कांहींच नेम नाहीं. किती गरीब लोकांना आपलीं घरेंदारें टाकून पळविण्याला लाविलें असेल ! किती गरिबांचा बळीही घेतला असेल ! द्रव्यैश्वर्यमदानें अंध झालेल्या नरपशूंचें आणि त्या औटघटकेचें राज्य इतक्या उद्दामपणानें-क्रूरपणानें उपभोगणाऱ्या ओढ्याचें किती तरी साम्य आहे ! तो सर्व चमत्कार पाहून माझें चित्त उद्विग्न झालें व मीं आपल्या मनांत एकदम त्या ओढ्याला संबोधून म्हटलें, " अरे ओढ्या, या तुझ्या औटघटकेच्या दिमाखाची तुला लाज कशी वाटत नाहीं ? महिन्यापूर्वीं तूं कोठें होतास ? आणखी चार सहा महिन्यांनीं कोठें जाशील, याचा कांहीं विचार कर ! " परंतु माझा तो बोध त्याला काय उपयोगी ? इतर द्रविणमदांधांप्रमाणें त्याचेंही कान बधिरच झालेले ! मी म्हणत होतों त्याचा पक्का खरेपणा माझा मलाच भासावा म्हणूनच काय, याच वेळीं आमची आगगाडी एका बोगद्यापाशीं आली व तेथें त्या बोगद्याच्या तोंडाशीं पावसानें चिंब भिजून कुडकुडत उभा राहून आपल्या क्षीण हातांनीं हलकेच निशाण दाखविणारा एक माणूस नजरेस पडला. मीं त्याच्याकडे पाहिलें आणि एकदम माझ्या तोंडांतून एक लांबसा उसासा निघाला. हा मनुष्य कां बरें अशा स्थितींत उभा आहे ? काय याला पावसाची भीति वाटत नाहीं ? थंडीवाऱ्यापासून याला दुःख होत नाहीं ? एक वेळां

त्याच्या तोंडाकडे पाहिलें पुरे, कीं या सर्वांपासून तो अलिप्त नाहीं, त्याला हीं सर्व जाचतात, परंतु एका वितीच्या कधींही न भरणाऱ्या खळग्यांत रोजरोज काहीं तरी घालावयाला पाहिजे, आणि तें द्रव्यवान् लोकांच्या सुखासाठीं असले भयंकर ताप सोसल्याखेरीज आपल्याला मिळावयाचें नाहीं, ही पक्की खात्री असल्यामुळेंच तो बिचारा कुडकुडत तडफडत तेथें उभा आहे! मनांत मात्र खास शिव्या देत असेल. इतका विचार माझ्या मनांत येऊन जातो न जातो, तोंच आमची गाडी बोगद्याच्या दुसऱ्या तोंडांतून बाहेर पडली आणि थोड्या अंतरावर माझ्या दृष्टीस एक लहानसें झोंपडें पडलें. त्या झोंपड्यांत, तेथल्या तेथेंच तयार केलेल्या दोन ओबडधोबड खाटा टाकलेल्या दिसल्या. एका खाटेवर एक स्त्री व तिच्या मांडीवर दोन वर्षांचें बालक! तें बालक अगदीं उघडें होतें, परंतु आपल्या आईच्या मांडीची ऊब मिळाल्याकारणानें सुखांत असून आमच्या झपाट्यानें चालणाऱ्या गाडीकडे पाहून हंसत होतें, आणि त्या हंसण्यानें ती त्याची आईही हंसत होतीसें दिसलें. हा देखावा पाहून माझ्या मनाची काय बरें स्थिति झाली असेल? क्षणार्धापूर्वीं ज्यांना मी अत्यंत दुःखी म्हणून समजत होतों, त्यांनाही मनापासून हंसतांना पाहून, "एकूण याही स्थितींत समाधान मानून या माणसांस खऱ्या सुखाचा अनुभव मिळतो अं?" असें मनांत आलें आणि बरें वाटलें. त्यावरून पुढें, सुखदुःखांचा परस्परसंबंध काय बरें असावा? हा विचार मनांत येऊन डोकें त्या तंद्रीस लागण्याच्या बेतांत आलें. परंतु दूरवर दिसणारें तें सृष्टिसौंदर्य इतकें

भव्य, मोहक व चित्ताकर्षक होतें कीं, थोड्याच वेळांत त्यानें पुन्हां माझ्या अंतर्बाह्य नेत्रांना आपलेकडे ओढून घेतलें.

आतां जो देखावा दृष्टीस पडला, तो इतक्या वेळच्या सर्व देखाव्यांपेक्षांही फारच भव्य होता. वर पाहिलें म्हणजे डोंगरांवर मेघांची गर्दी झाली असल्यामुळें त्यांचीं टोकें पार आकाशास भिडून गेलीं आहेत असें वाटे. समोर सपाटीवर दूर दृष्टि दिली म्हणजे आकाश खालीं येऊन पृथ्वीला मिळाल्यासारखें दिसे, आणि खालीं खोल पाहिलें म्हणजे आपणही आपल्या जागेवरून उडी मारून खालच्या त्या एकंदर मिलाफांत मिळून जावें अशी चमत्कारिक इच्छा होई. तो प्रचंड देखावा पाहून, आपली एकंदर मानवजातीची क्षुद्रता किती आहे, हें सहज माझ्या मनांत उभें राहून, या एकंदर प्रचंड सृष्टीचा हेतु तरी काय ? असें मनांत येऊन, माझें चित्त त्या अनादिकालापासून गूढांत गढलेल्या प्रश्नांत तल्लीन झालें. हा सर्व खटाटोप, हा सर्व अट्टाहास कां ? कोठून ? कसा उत्पन्न झाला ? अत्यंत सूक्ष्म वस्तूपासून तों तहत अत्यंत प्रचंड वस्तूपर्यंत सर्वांस उत्पत्ति, स्थिति आणि लय हीं आपलीं कायमचीं लागलींच आहेत. पदार्थमात्र उत्पन्न होतो, कांहीं वेळ असतो, आणि एकदां नाहींसा होतो, व त्याच्यावर दुसरे उत्पन्न होतात, हें कां असें ? आस्तिक म्हणतो, " हें सर्व परमेश्वराच्या इच्छामात्रें होतें. " परंतु याच्यापलीकडे त्यास प्रश्न विचारले, तर आग्रहापलीकडे त्याच्याजवळ उत्तर नाहीं. नास्तिक उत्तर करतो, " हें असेंच असायाचें आणि असेंच व्हायचें. त्याला कांहीं सर्व-

शक्तिमान् असें आदिकारण नाहीं." ज्यास हा किंवा तो, कोणचाच पक्ष नाहीं—अर्थात् ज्यास आपल्या ज्ञानाची घमेंड नाहीं, उलट आपलें अज्ञान कबूल करण्याइतका विनय आहे, तो केवळ, "हें सर्व अत्यंत अगाध आहे, अज्ञेय आहे, मनुष्याच्या परिमित बुद्धीला त्याचें मान कधींच होणार नाहीं, असें आहे," असें म्हणून आपल्याशींच कष्टी होऊन बसतो!

हरि नारायण आपटे.

---

२९. नम्रपणा.

ज्या मनुष्यास गर्व असतो, त्यास बहुतकरून आपण मोठे बुद्धिमान् आहों, अशी खातरी असते; पण वास्तविक पाहिलें असतां ही खातरी मूर्खपणाचें चिन्ह आहे असें समजावें. आपणांत व्यंगें किती आहेत व आपलें ज्ञान व बुद्धि हीं किती अल्प आहेत, हें त्याचें त्यास समजावयास लागलें, म्हणजे त्या मनुष्यास शहाणपण येत चाललें, असें जाणावें. पूर्ण बुद्धि व तन्मूलक सर्वज्ञता हीं परमेश्वराच्या ठायीं मात्र आहेत. हे गुण मनुष्यास कदापि प्राप्त व्हावयाचे नाहींत. मनुष्याच्या बुद्धीचा व ज्ञानाचा मोठेपणा सापेक्ष आहे; म्हणजे अमका मोठा बुद्धिमान् आहे, किंवा मोठा ज्ञाता आहे, असें म्हटलें असतां त्याची बुद्धि किंवा ज्ञान दुसऱ्याच्यापेक्षां मोठीं आहेत, असा अर्थ होतो; परंतु वास्तविक तीं मोठीं आहेत, असा अर्थ होत नाहीं. खरोखरी पाहतां तीं दोन्ही फारच अल्प आहेत आणि ती अल्पता ज्यास कळूं लागली तोच मनुष्य अत्यंत बुद्धिमान् व ज्ञाता होय. ज्या पुरुषाची बुद्धि अत्यंत

विशद होते, व ज्यास अनेक विषयांची माहिती होते, त्यास कळूं लागतें कीं, ह्या सृष्टींत जाणण्याचे जे विषय आहेत, त्यांपुढें जे विषय मला ठाऊक आहेत, ते जसे मोठ्या अफाट वाळवंटापुढें राळ्याएवढा वाळूचा कण, किंवा अमर्याद सागरापुढें जलाचा तुषार तसे आहेत. तसेंच हजारों गोष्टी त्यास घडतांना दिसतात, पण त्या कशा घडतात, हें त्यास बिलकूल समजत नाहीं, तेव्हां तेणें-करून, मनुष्याची बुद्धि किती दुर्बळ व मंद आहे, त्याचें ज्ञान किती अल्प व अपूर्ण आहे,असें त्याच्या मनांत बिंबून गेल्यावांचून राहात नाहीं. यास्तव महाबुद्धिमान् व महाज्ञाते जे असतात, ते बहुतकरून नम्र व लीन असतात. गर्व हें अल्पज्ञान व मूर्खत्व ह्यांचें फळ आहे. ह्याच अर्थ मनांत आणून भर्तृहरि म्हणून कवि होता, त्यानें असें लिहिलें कीं, "ज्या वेळेस मला यत्किंचित् समजूं लागलें, तेव्हां मी गर्वानें अगदीं अंध होऊन गेलों, व मला सर्व जग तुच्छ वाटावयास लागलें; पण वास्तविक ज्ञात्यांचा सहवास होऊन त्यांपासून वास्तविक ज्ञान प्राप्त झालें तेव्हां माझा सर्व गर्व जाऊन मी अगदीं अज्ञान आहें, असें मला वाटूं लागलें." पोप म्हणून इंग्लिश कवि आहे, तो असें म्हणतो कीं, "विद्या शिकणें असल्यास पुरी शिकावी, अर्धीबोबडी शिकूं नये; कारण अल्पज्ञानापासून वाईट परिणाम होतात." ज्ञानास मद्याची उपमा देऊन तोच कवि आणखी असें लिहितो कीं, "ज्ञान हें एक चमत्कारिक मद्य आहे; हें थोडें प्यालें असतां मनुष्यास फार धुंदी येते, पण ह्याचें पुष्कळ सेवन केल्यानें ती धुंदी उतरते!"

मनुष्याचें भूषण विद्या होय आणि विद्येचें भूषण विनय होय. फूल स्वतः शोभायमान पदार्थ खरा; पण त्यास सुगंधानें जशी योग्यता अधिक येते तसा विद्येस विनयानें अधिक थोरपणा येतो. नम्रता अनेक व्यंगें झांकिते व तिच्या योगानें लोकांचें लक्ष आपल्या उण्याकडे न जातां गुणाकडे मात्र वळतें. जो मनुष्य आपले गुण डौलानें पुढें पुढें आणीत नाहीं, प्रसंगच आल्यास ते संकोचवृत्तीनें पुढें प्रकट करितो, त्याचे गुण त्या संकोचानें विशेष शोभतात. कमलादि फुलें कांहीं संकुचित व कांहीं विकसित असतांना जशीं खुलतात, तशीं पूर्ण फुललीं असतां खुलत नाहींत. ह्याप्रमाणें मनुष्याच्या गुणांची गोष्ट आहे.

बुद्धि व ज्ञान ह्यांच्या योगानें आपण आपणांस मोठे गणितों; पण हा थोरपणा आपणांस शेवटपर्यंत उपयोगीं पडत नाहीं. उत्तम रीतीनें वागून जो मोठेपणा मिळवावा, तोच परिणामीं उरतो. आजपर्यंत ह्या जगांत आपणांस बुद्धिमान् व ज्ञाते म्हणविणारे किती लोक होऊन गेले, व सर्व लोक आपलीं मतें अनन्यभावें मानितात व पराकाष्ठेचीं चाहातात, हें पाहून त्यांस केवढा आनंद होत होता व हीं आपलीं मतें अक्षय्य अशींच राहतील असा केवढा भरंवसा वाटत होता, हें विद्येचा इतिहास पाहिला असतां आपल्या लक्षांत येईल. तसेंच त्याच इतिहासावरून त्या मतांपैकीं हजारों मतें खोटीं ठरून पृथ्वीवर अगदीं नाहींत अशीं झालीं व त्या मतांच्या कर्त्यांचीं नांवें सुद्धां लोक विसरून गेले, हेंही आपणांस समजेल. कांहीं मतें कांहीं काळीं लोकांस इतकीं प्रबळ वाटत असतात कीं, तीं उत्पन्न

करणारा मोठा अलौकिक बुद्धीचा पुरुष आहे, असें त्यांस वाटतें असतें, व त्याचें वाक्य सर्व शिरसा-मान्य करीत असतात. त्याच्या म्हणण्यास जें जें अनुकूल तें तें खरें व त्यास जें विरुद्ध तें खोटें. ह्याप्रमाणें मनुष्याच्या मनावर जो पुरुष अंमल करीत असतो, त्याच पुरुषाचीं मतें कांहीं काळानें खोटीं ठरून तीं आपलीं म्हणण्यास साधारण लोक देखील लाजतात, असें हजारों उदाहरणांत झालें आहे. राजकीय अंमल जसा अशाश्वत आहे तसा विद्वत्तेचा अंमलही अशाश्वत आहे. तेव्हां अशा विनाशी गोष्टीविषयीं डौल मिरविणें हें उपहासास्पद नव्हे काय ? तसेंच धन व अंमल हीं जशीं अंतकाळीं उपयोगीं पडत नाहींत, तशी विद्याही त्या प्रसंगीं उपयोगीं पडत नाहीं. आपण जीं बरीं वाईट कृत्यें केलीं असतील व बरेपणानें लोकांशीं वागलों असूं, तें मात्र आपल्या कामास पडेल. विद्या वगैरे सर्व शाळूसोबती होत. निर्वाणीचें म्हटलें म्हणजे एक सुकृत मात्र होय. अंगांतल्या शक्ति वगैरे राहिल्या, इंद्रियें विगलित झालीं आणि परलोकची हद्द दिसूं लागली, म्हणजे इहलोकचे सर्व विषय तुच्छ व क्षुल्लक दिसूं लागतात. ह्या समयीं केलेल्या सत्कृत्याच्या आठवणीनें मात्र काय तें जिवास समाधान वाटत असतें, व तीं कृत्येंच आपणाबरोबर परलोकीं येऊन तेथें आपल्या उपयोगीं पडतात; व त्याच्या योगानें आपलें ह्या जगांत आपणामागें नांव चांगल्या रीतीनें राहतें. तर इतकें उपयोगी जें सुकृत तें जोडण्यास विनय हें एक मोठें कारण आहे. त्याचें अवलंबन शहाण्यानें करावें.

कृष्णशास्त्री चिपळूणकर.

३० शिंद्यांची संपत्ति व त्यांच्या फौजेची कवाईत.

हिंदुस्थानांतून अंतर्वेदीसुद्धां दिल्लीच्या कारभाराचा बंदोबस्त करून, जिवबादादा बक्षी यांचे स्वाधीन पाठीमागें सर्व कारभार करून, पाटीलबोवा देशीं यावयास निघाले. ते कूच दरकूच हिंदुस्थानांतून उज्जनीवर येऊन, मुक्काम करून, तेथून कूच करून बऱ्हाणपुरास येऊन दाखल झाले. बऱ्हाणपुरास आठ पंधरा दिवस मुक्काम करून खानदेशांत कांसार–बारीचा घांट चढून, रांगा उतरून जांबगांवास येऊन दाखल झाले. जांबगांवास मुक्काम आठ पंधरा दिवस करून, तेथून कूच करून निघाले, ते पुण्यास येऊन दाखल झाले. त्या वेळेस श्रीमंत सामोरे जाऊन नाना फडणीस व हरिपंत तात्या वगैरे मंडळी समागमें जाऊन, सर्वांच्या भेटी झाल्या. भेटी होऊन सरकार–स्वारी माघारी फिरावयाच्या वेळीं शिंदे आपल्या मुक्कामावर जावयाचे, त्या वेळीं महादजी शिंदे यांनीं सर्व बोलणीं श्रीमंतांस समजाविलीं. नंतर श्रीमंतांस विनंती केली कीं, "मी हिंदुस्थानांतून पुण्यास आलों, माझे समागमें लाख फौज आहे, हिला सरकारचें दर्शन कधीं व्हावें? व फौजेचा सलाम सरकारांस कोणते वेळीं व्हावा? ह्यासाठीं सरकारांनीं आतां अंबारींत स्वार होऊन उभें असावें, म्हणजे सर्वांचा मुजरा सरकारांस होईल, व सरकारची नजर सर्व फौजेवर होईल." असें पाटीलबोवांचें बोलणें ऐकून श्रीमंत हंसून "बरें आहे" म्हणून बोलले.

त्या समयीं सरकारची स्वारी हत्तीवर बसावयाची म्हणून विना-

यकगज हत्ती आणून रुप्याचे अंबारींत खासा स्वारी बसली. पुढें बाबा महात हातीं अंकुश धरून बसला. तो हत्ती बिनतोल चालत असतां माणसांला वर डोलावें लागत नसे. यासाठीं खासा स्वारीस तो हत्ती नेमिला होता. × जरीबादली मस्तकीं सारी, पाठीवर मखमाली गाशा, सभोंवतीं झालर कलाबतूची, गाशावर वेलबुट्टी कलाबतूची काढलेली, गळ्यांत घुंगरमाळा रुप्याच्या व घंटा रुप्याच्या व दांत सोन्याचे मढविलेले, मस्तकीं * सडका व सोन्याचीं पिंपळपानें, पायांत रुप्याचे तोडे, सोंड रंगविलेली; अशा हत्तीवर सरकारची स्वारी बसली. खवासखान्यांत अप्पा बळवंत व अमृतराव पेठे हातीं चवरी घेऊन श्रीमंतांवर उडावितात, व हातीं रुमाल घेऊन आप्पा बळवंत श्रीमंतांवर वारीत बसले आहेत. सरकारची स्वारी हत्तीवर बसून उभी राहिली. त्या समयीं सरकारचे मुत्सद्दी व कारभारी आपले वाहनारूढ होऊन उभे राहिले. जरीपटक्याचे हत्तीखेरीज, जिलेबचा हत्ती असे चौघे सजाविलेले, शिवाय कोतवाल—घोडे चारशें सोन्याचे गंडेपट्टे घातलेले, गळ्यांत मोहनमाळा, पायीं पैंजण, पाठीवर भरगच्ची झुला, त्यावर कलग्या असा कोतवाल घोड्यांचा समाज उभा; त्यापुढें खास जिलबेचे लोक, बोथाटी बार-दार, विटे-बारदार व खासबदार व बाणदार लगी अशी खाशी जिलीब उभी, व जरीपटक्याचा हत्ती उभा; श्रीमंतांच्या मागें झाडून सरंजामी उभे; पटवर्धन, विंचूरकर, दरेकर, पाटणकर,

+ जरीबादली सुवर्णतंतुमय वस्त्र.

* सडका = सखलाद वगैरेच्या पट्या; गोंडे.

घोरपडे, निंबाळकर, जाधव व पुरंदरे, अक्कलकोटवाले असा समुदाय सरकारचे स्वारीचा उभा राहिला आहे. चौघडे वाजतात. असा सरकारचे स्वारीचा थाट उभा राहिला आहे व चोपदार, छडीदार व नकीब* असे ललकारत आहेत.

त्या समयीं महादजी शिंदे यांनीं आपली फौज दुरस्त फऱ्यानें× उभी सरकारचे मुजऱ्यासाठीं केली. एक तर्फेनें घोडेदळ उभें राहिलें. त्यांत पागे व शिलेदार व पठाण हुजरात शिंदे यांची उभी राहिली. दुसऱ्या तर्फेनें चार कंपू उभे केले. त्यांमध्यें तोफा उभ्या राहिल्या. बैल तोफेस जुंपलेले. असा सरंजाम सरकारचे सलामासाठीं उभा केला. त्यावेळेस शिंदे-दौलतीची वर्णना काय करावी ! कीं रावणासारखी दौलत अशी ज्यास उपमा ! ! घोडेस्वार घोड्यावर स्वार झालेले. त्यांचे डोकीस मंदील, अंगांत झगा, अंगावर शालजोड्या, हातांत शालनाम्याचा रुमाल, पायांत किनखापी विजार, असे साज बंदुका बांधून मुजऱ्यासाठीं उभे राहिले. हातांत सोन्याचीं कडीं, गळ्यांत कंठी, कानांत चौकडे असे स्वार, भालेकरी व आड-हत्यारी व करोल+उभे राहिले. तसेच हत्ती उभे, वरती अंबाऱ्या ठेविलेल्या. याप्रमाणें कोतवाल घोड्यांचा सरकारचे मुजऱ्यासाठीं फरा उभा राहिला आहे. ÷दुसरे तर्फेनें कंपू साहा दोन कोसपर्यंत तोफा

---

* नकीब=चोपदार भाट.

× फरा=रांग; ओळ.

+ करोल=घोड्यावरचे बंदुकवाले.

÷ " दुसरे तर्फेनें कंपूवाले एकसहा दोन कोसांपर्यंत तोफांसुद्धां उभ्या केल्या आहेत. " इंदूरप्रतीचा पाठ.

सुद्धां उभे केले आहेत. तेव्हां सरकारची स्वारी मुजरा घेत चालली. दुतर्फा मुजरे होऊं लागले. भालदार नांवें घेऊन बोलतात. याप्रमाणें दोन कोसपर्यंत स्वारी सरकारची मुजरे घेत आली. शेवट झाला, तेथें स्वारी उभी राहिली आणि तोफा सोडावयाची व कवाईत करण्याची आज्ञा सरकारची झाली. त्या वेळेस कंपूची कवाईत व तोफेचे आवाज एकदम होऊं लागले. तेव्हां तोफांच्या धुराची दाटी झाली. माणसाला माणूस दिसेनासें झालें. बाराशें तोफांचा आवाज सुटला. त्या समयीं श्रीमंतांची मर्जी प्रसन्न होऊन स्वारी वाड्यास जावयास फिरली. शिंदे आपली फौज घेऊन आपले तळावर जावयास निघाले. याप्रमाणें होऊन शिंदे मोठे जोरावर, दौलत मोठी व म्हणून त्यांस अभिमानही मोठा. त्यामुळें सरकारचे दौलतीचा व राज्याचा कारभार आपण करावा असा मजकूर मनांत आणून पाटीलबोवा यांनीं सरकारांत बोलणें लाविलें होतें. इतक्यांत दिल्लीहून वजिरातीचे मरातब बादशाही आणिले होते ते सरकारांत दाखल करावे, असा मनसोबा मनांत आणून सरकारांत विनंती करावयास महादजी शिंदे वाड्यांत आले. श्रीमंतांस विनंती केली कीं, “सरकारच्या नांवें दिल्लीचे बादशहा यांनीं वजिरातीचीं वस्त्रें वगैरे दिली आहेत, तीं सरकारांत प्रविष्ट व्हावयाची आज्ञा काय ती सांगावी.” तेव्हां श्रीमंत बोलले, “सर्व कारभारी जमा करून सुमुहूर्त पाहून निश्चय ठरवावा.” असें श्रीमंतांचें बोलणें होतांच दुसरे दिवशीं दरबार करावयाचा बेत ठरवून शिंदे आपल्या डेन्यास येऊन दाखल झाले.

कृष्णाजी विनायक सोहोनी.

३१. प्राचीन इतिहास.

जगाच्या इतिहासाचा विचार करूं लागलों म्हणजे असे प्रश्न उत्पन्न होतात कीं, त्यांचा उलगडा होणेंच कठीण. ज्या देशांत सुधारणा नाहीं, तेथील लोक बहुशः जग वर्तमानकाळीं आहे तसेंच अनादिकालापासून आहे व पुढेंही असेंच राहणार असें मानीत असतात. पण लोक विद्या शिकून शहाणे झाले, आणि सृष्टीचा विचार करूं लागले म्हणजे, मनुष्याच्या जन्मास आल्यापासून जशा दररोज स्थिति बदलतात, तशी जग ही ईश्वराची सतत बदलणारी वस्तु आहे, असें त्यांस स्पष्ट दिसतें. अलीकडे सुधारणा होऊन इतिहासाकडे लोकांचें मन लागल्यापासून, जगाचा सुधारणेच्या कामांत नेहमीं पुढें पाय आहे, हें आबालवृद्धांस कळत चाललें आहे. याकरितां पृथ्वी कधीं उत्पन्न झाली, तिची पूर्वस्थिति कशी असावी, याचा शोध करण्याकडे हल्लीं पुष्कळ विद्वानांचें मन लागलें आहे. पृथ्वीचा आकार नारिंगासारखा असावा असें हल्लीं सर्व पृथ्वींतील लोकांचें मत आहे. नारिंगासारखा दोहों ध्रुवांकडे पृथ्वीचा आकार चपटा असण्याचें कारण विद्वान् लोक असें सांगतात कीं, पृथ्वी उत्पन्न झाली तेव्हां हल्लींप्रमाणें नसून लबलबीत असल्यामुळें तिला गति प्राप्त झाल्याबरोबर ती मध्यें मोठी होऊन दोहों बाजूस चापट झाली. प्राचीन काळीं सुधारलेल्या देशांतील ज्योतिषी पृथ्वी स्थिर व सपाट आहे, असें मानीत होते; परंतु सांप्रत सर्व पृथ्वींतील ज्योतिषशास्त्रवेत्त्यांचा वर सांगितल्याप्रमाणें निश्चय झाला आहे.

अशा गोष्टींचें पृथ्वीवरील मनुष्यांस प्रत्यक्ष ज्ञान होणें नाहीं, हें तर सिद्धच आहे; तथापि पूर्वींपेक्षां नूतन अनुमानें पुष्कळ अंशीं खरीं म्हणावयास बहुत आधार आहेत. पृथ्वीचा वर्तुलाकार कायम आहे; तरी तिच्या बाह्यस्वरूपांत नेहमीं अंतर पडतें; तें भूगोल-शास्त्रवेत्त्यांच्या अनुभवास आलें आहे. जेथें पूर्वीं मोठमोठीं नगरें होतीं तेथें हल्लीं जंगलें वाढून नद्या, ओढे व अरण्यें झालीं आहेत; व जेथें मनुष्यांची गति देखील नसे व सिंहव्याघ्रादि हिंसक पशु संचार करीत, तेथें हल्लीं मोठमोठीं शहरें झालीं आहेत. अशी अदलाबदल आजपर्यंत किती वेळ, किती ठिकाणीं झाली असेल हें कोण सांगेल?

मनुष्याच्या उत्पत्तीचा विचार केला तरी, त्याचा कांहींच ठिकाण लागत नाहीं अशी अवस्था होते. प्रत्येक धर्माच्या पुस्तकांत वेगवेगळी उत्पत्तीची रीति सांगितली आहे. यामुळें सर्वांची एकवाक्यता होत नाहीं. कोणी म्हणतात पंचमहाभूतांपासून पृथ्वी उत्पन्न झाली, कोणी म्हणतात स्त्रीपुरुषांचा जोडा ईश्वरानें केला. या सर्वांची एकवाक्यता न होतां उत्पत्तीच्या रीतीचा निश्चय करण्यास कठीण पडतें. तथापि प्राचीनकाळापासून आजपर्यंत अनेक देशांतील अनेक विद्वानांनीं उत्पत्तीच्या रीतीचें अनुमान करण्यास पुष्कळ यत्न केले आहेत, त्यांपैकीं कित्येकांचे विचार फार सूक्ष्म व मनोरम आहेत.

उत्पत्तीचा प्रकार कांहीं असो, ईश्वरानें जगांत मनुष्यें उत्पन्न केलीं असें मानून चाललों तरी अनेक प्रश्न उत्पन्न होतात.

कारण, पृथ्वींतील सर्व मनुष्यें पाहिलीं तर एकसारखीं दिसत नाहींत. परस्परांच्या शरीररचनेंत थोडाबहुत भेद दृष्टीस पडतो. तसेंच बुद्धीविषयीं विचार केला तरी वेगळाल्या जातींत अतिशय भेद आहे. पहिल्यानें मनुष्यें सारखीं असून पश्चात् हवेच्या वगैरे बाह्य-कारणांनीं त्यांच्या बांध्यांत व बुद्धींत अंतर पडलें कीं काय, याचा निश्चय करितां येत नाहीं. हिंदु, युरोपियन वगैरे जाती पाहिल्या तर बुद्धी-विषयीं फारच श्रेष्ठ आहेत. परंतु अमेरिकेंतील मूळचे लोक अगदीं पशुतुल्य दिसतात. कोणी तत्त्ववेत्ते म्हणतात कीं, प्रथम मनुष्यें सर्व चांगलीं होतीं; पण कांहीं बाह्ययोगानें त्यांस अशी पशुतुल्यावस्था प्राप्त झाली असावी. कांहींचें म्हणणें असें आहे कीं, सर्व मनुष्यें अमेरिकेंतील मूळच्या लोकांसारखींच होतीं. पण कित्येक सुधारून बुद्धिमान् झालीं. दोन्ही अनुमानें संभाव्य दिसतात. पण अमुकच खरें असा निश्चय होणें नाहीं.

अर्वाचीन तत्त्ववेत्त्यांनीं पृथ्वींतील सर्व मनुष्यांचे तीन वर्ग केले आहेत. पहिला काकेशिअन, दुसरा मांगोल आणि तिसरा निग्रो. आशिया खंडांतील काकेशस पर्वतापासून गंगानदीपर्यंत जो प्रदेश आहे, त्या प्रदेशांतील लोक युरोपांतील लोक, आफ्रिकाखंडाच्या उत्तरेकडील लोक इतके पहिल्या वर्गांत आहेत असें मानतात. आशियाखंडाच्या पूर्वेकडील लोक व अमेरिकेंतील लोक दुसऱ्या वर्गांत गणिले जातात. आफ्रिकेंतील काळ्या व राठ केसांचे लोकांचा तिसरा वर्ग समजतात. कित्येक जाति अशा आढळतात कीं, वर सांगितलेल्या तीन वर्गांपैकीं कोणत्याच वर्गांत त्यांची

गणना करितां येत नाहीं. प्राणी व वनस्पति यांप्रमाणें मनुष्यांमध्येंही अनेक तऱ्हा आढळतात.

मनुष्याचे उत्पत्तीचा जसा थांग लागणें नाहीं, तसा मनुष्यें पूर्वीं पृथ्वीच्या कोणत्या प्रदेशांत रहात होतीं याचाही शोध लागणें कठीण पडतें. प्रत्येक धर्मशास्त्रांत वेगळालीं स्थानें सांगितलीं आहेत. आपल्या पुराणप्रसिद्ध ऋषींचे आश्रम व पुरातन राजांचीं राज्यें आर्यावर्तांत म्हणजे हिमालय आणि विंध्य या पर्वतांच्या मधल्या प्रदेशांत होतीं; म्हणूनच या प्रदेशास आर्यावर्त हें नांव प्राप्त झालें आहे. तथापि मूलस्थान अमुकच असें निश्चयात्मक ठरवितां येत नाहीं. इतर धर्मपुस्तकांतही, तीं जेथें प्रवृत्त झालीं तेथील आसपासच्या प्रदेशांत मनुष्यांचीं मूलस्थानें सांगितलीं आहेत.

अलीकडील विद्वानांनीं मनुष्यांचीं मूलस्थानें तीन मानिलीं आहेत. काकेशन वर्गांतलीं मनुष्यें, काळ्या समुद्रापासून हिंदुस्थानच्या पूर्व बाजूपर्यंत जो प्रदेश आहे, त्यांत होतीं असें म्हणतात. दुसऱ्या वर्गांतील लोकांचे पूर्वज पूर्वेकडे तिबेटच्या पलीकडे गोबी नांवाच्या मैदानाच्या जवळच्या पर्वतांत होते; आणि आफ्रिकेंतील चंद्रपर्वताजवळ प्राचीन निग्रो लोक रहात होते, असें अनुमान करितात. अमेरिकाखंड फार दिवस ओसाडच असाव असें मानिलें आहे.

हे सर्व विद्वानांच्या कल्पनेचे तरंग आहेत. तूर्त आपणांस अनेक ठिकाणीं राहून तेथें जुने झालेले लोक दिसतात; याकरितां ते तेथें कोणीकडून आले याचा विचार निश्चित होत नाहीं.

इतर गोष्टींप्रमाणें मनुष्यांची फार प्राचीन काळीं काय स्थिति असावी याचा निश्चय करितां येत नाहीं. मनुष्यांच्या वेगळाल्या स्थिति दृष्टीस पडतात, त्यांवरून अर्वाचीन सृष्टितत्त्ववेत्ते, चार स्थितींत मनुष्यें असावीं असें अनुमान करितात. १ फलमूलाशी (फळें, मुळें खाऊन राहणारे), २ व्याध (पारधीवर उपजीविका करणारे), ३ धनगर आणि ४ कृषीवल म्हणजे शेतकी करणारे. प्रत्येक देशांतील लोक, पहिल्या स्थितींत असून क्रमाक्रमानें सुधारत एकेक स्थिति टाकून सांप्रतच्या अवस्थेस आले आहेत असें विद्वान् लोक अनुमान करितात. पण याला ऐतिहासिक प्रमाण कांहींच सांपडत नाहीं. आपल्या आपण सुधारलेल्या लोकांचीं उदाहरणें बहुशः आढळत नाहींत. प्रत्येक देशांतील सुधारणा बहुशः बाहेरून येते, व कित्येक रानटी लोक पूर्वीं सुधारलेले असून निकृष्टावस्थेंत आले असावे असाही अनुभव आहे. कितीही प्राचीन पुस्तकें पाहिलीं तरी त्या वेळच्या मनुष्यांस नांगर, खोरें, कुदळ, कोयता वगैरे आवश्यक आउतें माहीत होतीं असें दिसतें. मनुष्यें पशुस्थितींत होतीं अशी कोणी कल्पना करोत; पण कितीहि मागें विचार करीत गेलें, तरी मनुष्यें समुदायानें राहणारीं, मालमत्ता बाळगणारीं व लहानसहान कायदे अथवा नियम व सरकार यांच्या अमलांत वागणारींच आढळतात. त्यांच्याही पूर्वीं कधीं मनुष्यें कंदमूलांवर उपजीविका करून स्वतःचें रक्षण करून राहात असतील असेंही अनुमान करितां येईल; तथापि फार प्राचीन काळापासून सुधारणा होऊन मनुष्यें शेतकी करूं लागलीं, आणि देशांत मोठमोठीं राज्यें उत्पन्न झालीं. एकंदर इतिहासावरूनच दिसून येईल कीं,

विद्या, चांगले कायदे व न्यायी सरकार असल्याशिवाय देशांतील लोकांस सुख होत नाहीं.

आजपर्यंत सुधारणेसंबंधीं चांगल्या ज्या गोष्टी आपण ऐकतों त्या सर्व काकेशन वर्गांतल्या लोकांत झालेल्या आहेत. सर्व प्रकारच्या विषयांवर उत्तमोत्तम ग्रंथ त्यांतच आढळतात. तत्त्वज्ञान, राजनीति, धर्म यांचे अनेक प्रकार त्या वर्गांत सांपडतात.

गोविंद शंकरशास्त्री बापट.

३२. धावडशीकर स्वामीमहाराजांचा मठ.

नित्यनियमाप्रमाणें वैशाखमासीं एके दिवशीं प्रातःकाळीं समाधि विसर्जन करून स्वामी आपल्या शिष्यवर्गास मठांत पाठ सांगत बसले होते. अहाहा! काय त्या स्थळाचें, त्या वेळचें वर्णन करावें! मठांतील भूमिका झाडसारव करून स्वच्छ केल्या आहेत. मठाच्या आंत व बाहेर अशुचि किंवा अमंगळ पदार्थाचें नांव नाहीं. त्याच्या समोंवतीं दर्भ, दूर्वा, तुळशी व फुलझाडें फुललीं आहेत. त्यांजवर वसंतऋतु स्वेच्छ क्रीडत आहे. मठाच्या समोर एक लहानसा ओढा असून स्वच्छ आणि निर्मळ पाणी झुळझूळ वहात आहे. बालार्काचे आरक्त किरण मठद्वारांतून स्वामींच्या पायांपर्यंत पसरले आहेत. व्याघ्रांबरावर हे सुवर्णकांति महापुरुष पद्मासन घालून अधिष्ठित झाले आहेत. त्यांनीं अंगास चर्चिलेल्या भस्माचा आणि दोहों बाजूंस केळीच्या पानांवर ठेविलेल्या तुळशीफुलांचा घमघम सुवास सुटला आहे. गळ्यांत, हातांत व दंडांत रुद्राक्षाच्या माळा

रुळत आहेत. हातांत स्मरणी हालत आहे. कटीस कौपीन आणि अंगावर काषायवस्त्रें परिधान केलीं आहेत. स्नानसंध्येचीं काष्ठमय पात्रें पुढें मांडलेलीं आहेत. लाक्षारसानें रंगविलेला लाल कमंडलु स्फटिकवत् स्वच्छोदकानें ओतप्रोत भरलेला आहे. स्वामींच्या सन्मुख दर्भासनें घालून ठेविलीं आहेत. त्यांजवर स्नानसंध्यादि ब्रह्मकर्म आटपून शिष्यवर्ग पुढें पोथ्या सोडून बसला आहे. इतर ब्रह्मवृंद भक्तजन व श्रोतृमंडळ यांचीहि दाटी झाली आहे. स्त्रियांनीं आंत प्रवेश करूं नये अशी मठाची मर्यादा असे, म्हणून त्या मठद्वारांतूनच पायांचें दर्शन घेत आहेत. दोन्ही अंगांस वेद, शास्त्रें, पुराणें, भाष्यें यांच्या पोथ्या भगव्या वेष्टनांत गुंडाळून पाटावर एकावर एक रचून ठेविल्या आहेत. स्वामींच्या अग्रभागीं सामवेदांतर्गत छान्दोग्योपनिषदाची पोथी होती. तींतून ' एकमेवाद्वितीयम् ' या महावाक्यावर त्यांचें व्याख्यान चाललें आहे. त्यांची भाषण करण्याची आणि उपपादन करण्याची सर्वोत्कृष्ट शैली पाहून श्रोते चित्रासारखे तटस्थ बसले आहेत. स्वामींची मधुर वाणी उपदेशामृत स्रवत आहे, आणि उत्कंठित श्रोत्यांचे तृषित कान त्याचें पान करण्यास्तव आ पसरून बसले आहेत. त्या समयीं त्यांस असें वाटे कीं, सेवकजनांवर अनुग्रह करण्यासाठीं स्वामींच्या जिव्हाग्रीं शारदा देवी, पार्श्वभागीं ऋद्धिसिद्धि आणि अग्रभागीं वेदश्रुति ह्या साक्षात् आपले वरदहस्त पुढें करून बसल्या आहेत ! वाः ! काय या मठाची योग्यता ! हें रम्य स्थल केवळ प्रति–बदरिकाश्रमच होय. संसारदुःखानें गांजलेले, नानाविपत्तींनीं रंजीस आलेले आणि मह-

दपराध करून संतप्त झालेले पापात्मे यांस या मठांत येण्याबरोबर स्वस्थितीचा व स्वकृत कर्माचा खेद व पश्चात्ताप होऊन ते म्हणत, " जळो तो संसार ! पुरे ती यातायात ! आग लागो त्या धनाला ! आतां सर्वसंगाचा परित्याग करून या वैराग्यनिधिमठांतच निरंतर वास करूं ! "

नागेश विनायक बापट.

---

३३. ' गलिव्हर्स ट्रॅव्हल्स ' या ग्रंथाची हकिकत.

इ० स० १७२७ मध्यें स्विफ्ट यानें 'गलिव्हर्स ट्रॅव्हल्स' हा आपला नामांकित ग्रंथ प्रसिद्ध केला. स्विफ्ट याचे दुसरे आणखीही लहान मोठे ग्रंथ आहेत; पण त्याचा वरील ग्रंथ हाच हल्लीं विशेष प्रसिद्ध असून त्याच्याच योगानें त्याचें नांव जगांत अमर राहणार आहे. युरोपखंडांतील बहुतेक भाषांत या ग्रंथाचीं भाषांतरें झालीं आहेत असें म्हणतात; व इतर ठिकाणींही जेथें जेथें इंग्लिश भाषेचा फैलाव झाला आहे; त्या बहुतेक ठिकाणच्या भाषांत याचीं भाषांतरें झालीं आहेत, किंवा होत आहेत. हा ग्रंथ प्रथम ज्या वेळेस प्रसिद्ध झाला त्या वेळीं त्याची चोहोंकडे इतकी चहा झाली कीं, तशी फारच थोड्या ग्रंथांची झाली असेल. सर्वांस तो वाचून पराकाष्ठेचा आनंद झाला व ग्रंथकाराच्या अचाट कल्पनाशक्तीचें अत्यंत आश्चर्य वाटलें. या ग्रंथाचा खप इतका अतिशय झाला कीं, त्याची दुसरी आवृत्ति निघण्यापूर्वीं पहिलीची किंमत वाढवावी लागली. विद्वान् असो, राजकारणी पुरुष असो, अविद्वान् असो अथवा खेडेगांवीं

एकांतांत स्वस्थ बसून कालक्रमणा करणारा मनुष्य असो, कोणीही तो ग्रंथ वाचल्यावांचून ठेविला नाहीं. व्हॉल्टेर या नांवाचा महाप्रख्यात फ्रेंच ग्रंथकार हा त्या वेळीं इंग्लंडांत होता. त्यानेंही त्याची मोठी वाहवा करून लागलीच त्याचें फ्रेंच भाषेंत भाषांतर करण्याविषयीं शिफारस केली.

या ग्रंथासंबंधानें लोक इतके आश्चर्यसागरांत निमग्न झाले कीं, त्यावर टीका करण्याचें कांहीं वेळ कोणाच्या मनांत देखील आलें नाहीं ! या ग्रंथांत स्विफ्ट यानें आपल्याला जन्मापासून अनेक बऱ्या वाईट लोकांशीं घडलेल्या सहवासावरून एकंदर मानवी प्राण्याविषयीं आपलें झालेलें मत प्रदर्शित केलें आहे. अशा प्रकारचा ग्रंथ अर्थातच एकाद्या शास्त्रीय ग्रंथाप्रमाणें लिहिला असता तर तो कदापि मनोरंजक झाला नसता. वास्तव स्विफ्ट यानें मोठ्या चातुर्यानें, त्या वेळचे विद्वान् म्हणविणारे लोक, राजे व राजकारणी पुरुष आणि दुसरे हलकेसलके लोक, यांचा संबंध आणून त्यांच्या कृत्यांवर उपरोधोक्तीनें भरपूर टीका केली आहे. यापूर्वीं त्याच्या लेखांत असा प्रकार चोहोंकडे थोडा बहुत दृष्टीस पडतो; परंतु या ग्रंथांत त्यानें त्याचा केवळ कळस करून सोडिला आहे—जणूं काय आजपर्यंत गडबडीमुळें त्याला या आपल्या आवडत्या विषयावर मनाप्रमाणें लिहिण्यास हवा तितका अवकाश न सांपडल्याकारणानें त्यानें पूर्वींच्या सर्व गोष्टी यथाक्रम लक्षांत आणून व त्यांचा पूर्ण विचार करून, ज्यांच्याविषयीं त्याच्या मनांत डांचत होतें त्या सर्व लोकांचा यथेच्छ समाचार घेण्या-

करितांच शेवटीं हा अप्रतिम ग्रंथ उत्पन्न केला असें वाटतें! असो; या वर सांगितलेल्या लोकांचा संबंध ज्या कारणांकरितां स्विफ्ट यानें या ग्रंथांत आणला आहे, त्या कारणांचा बोध होण्यास त्या काळाला आज पुष्कळ वर्षें लोटून गेल्यामुळें, फारसें साधन नाहीं व तो करून घेण्याच्या खटपटीपासून फायदाही होण्यासारखा नाहीं. शिवाय स्विफ्ट याचा लिहिण्याचा रोंख कशावर आहे हें बिलकूल जरी न समजलें तरी त्याचा ग्रंथ वाचण्याची अभिरुचि कमी होत नाहीं, असा विलक्षण गुण त्यांत आहे. त्यांतील तत्त्वें इतकीं खरीं आहेत कीं, सामान्य वाचकांस म्हटलें म्हणजे हा संबंध कशाकडे आहे हें समजण्याची मुळींच गरज पडत नाहीं. ह्या ग्रंथांत स्विफ्ट यानें त्या काळच्या एकंदर स्थितीचा उपहास मोठ्या गमतीनें केला आहे. तथापि त्याच मानानें त्याचें लिहिणें इतकें गंभीर आहे कीं, कित्येक लोक तर ह्यानें लिहिलेल्या गोष्टी खऱ्याच आहेत असें समजून फसून गेले! एकाची तर अशी गंमत उडाली कीं तो गलिव्हर्स ट्रॅव्हल्स सर्व वाचून झाल्यावर लिलिपट् वगैरे देश नकाशांत कोठें आहेत म्हणून शोधावयास लागला!!

हरि कृष्ण दामले.

---

३४. बालोद्यानपद्धतीचीं मूलतत्त्वें.

बालोद्यान—शिक्षणपद्धतीची योग्यता व महत्त्व ज्या मुख्य मुख्य तत्त्वांवर विशेषतः अवलंबून आहेत, तीं तत्त्व थोडक्यांत पुढें दिलीं आहेत, तीं बालोद्यानपद्धतीचा जीवच होत.

(१) ही सर्व सृष्टि सर्वव्यापी अशा अंतर्गत ऐक्यानें संबद्ध झालेली आहे, व सर्वशक्तिमान् परमेश्वर हा त्या ऐक्याचें आदिकारण आहे. अर्थात् चराचर सर्व वस्तूंत जर ईश्वरांश आहे, तर तो बालकामध्यें आहेच आहे. बालकामध्यें गुप्तरूपानें असलेला ईश्वरांश प्रकट करणें हा शिक्षणाचा मुख्य हेतु होय.

" मनुष्य आणि सृष्टि ह्यांची उत्पत्ति जर एकीपासूनच झाली आहे, तर त्यांचें नियमनही एकाच तत्त्वावर झालें पाहिजे. "

" जों जों मूल लहान असतें तों तों त्यामध्यें सृष्टीचे स्वाभाविक गुण अधिकाधिक असतात, असा फ्रोबेलच्या अनुयायांचा पूर्ण सिद्धांत आहे. "

[लिचिन्स्का.]

(२) **बालकाचें शिक्षण सृष्टिनियमानुसार असावें.** बालकाला शिक्षण देण्याची पद्धति त्याच्या नैसर्गिक स्थितीला अनुसरून असली पाहिजे. मुलांची वाढ हळू हळू होत असते. आणि ती वाढ होत असतां बाल्यापासून वृद्धत्वापर्यंत प्रत्येक अवस्थेचें स्वरूप भिन्न असतें. अर्थात् शिक्षण द्यावयाचें तें त्या त्या अवस्थेचें स्वरूप लक्षांत आणून योग्य साधनांनीं दिलें पाहिजे. बालकाचें सर्व शिक्षण हें बालस्वभावज्ञानाच्या पायावर उभारलेलें असावें.

" मनुष्य हा एकसमयावच्छेदें सृष्टि, मानवी स्वभाव आणि ईश्वर ह्या तिहींचेंही बालक आहे. यास्तव ह्या तिहींचे गुणधर्म मनुष्यामध्यें एकमिलाफानें एकवटतील, अशा प्रकारचें शिक्षण त्याला बाल्यावस्थेंत देणें अवश्य आहे. "

[फ्रोबेल.]

" मुलाची नैसर्गिक वाढ उत्तम रीतीनें होईल अशा प्रकारची परिस्थिति त्याला प्राप्त करून देणें हें शिक्षकाचें मुख्य कर्तव्य होय. माळी झाडांच्या किंवा रोपांच्या वाढीसंबंधानें प्रत्यक्ष असें कांहीं-एक करूं शकत नाहीं; त्यांची वाढ आपोआप व व्हावयाची तशीच होत असते. माळी त्यांच्या वाढीस प्रतिकूल अशा गोष्टी नाहींतशा करून वाढीस साह्य करणारी परिस्थिति मात्र उत्पन्न करितो. हीच गोष्ट शिक्षकासही लागू आहे. मुलांमध्यें जन्मतःच असलेल्या बीजरूप शक्तीची वाढ कसकशी होत आहे; तिच्या मार्गांत कांहीं अडचणी आहेत कीं काय, हें केवळ साक्षीभूत होऊन पहात राहणें व कांहीं अडचणी असल्यास त्या दूर करून त्या वाढीस अनुकूल परिस्थिति उत्पन्न करणें हें शिक्षकाचें काम होय."

[क्विक.]

(३) **मनुष्याचें सर्व आयुष्य—त्याच्या अनेक अवस्था असल्या तरी—एकच पूर्ण वस्तु आहे. ह्यास्तव त्याच्या सर्व अवस्थांतल्या आणि सर्व प्रकारच्या शिक्षणांत ऐक्य व परस्पर मेळ असला पाहिजे.** बालकाच्या शिक्षणास आरंभ अगदीं बाल्यावस्थेंत झाला पाहिजे व त्याच्या शारीरिक, नैतिक आणि बुद्धिविषयक वाढीकडे एकसारखेंच लक्ष पुरविलें पाहिजे.

नुसतें ज्ञान एकवट करून उपयोगीं नाहीं. तर इंद्रियें व त्यांची शक्ति ह्यांची वाढही झाली पाहिजे. तसेंच शिक्षण व ज्ञान यांमधील बारीक भेद लक्षांत ठेविला पाहिजे. एक अथवा अनेक विषयांच्या नुसत्या भाराभर ज्ञानास शिक्षण समजणें म्हणजे जाणून बुजून भयंकर चूक करणें होय.

(४) मुलाच्या अंगच्या स्वयंकर्तृत्वेच्छेच्या द्वारें व तिच्याच साह्यानें मुलाच्या ज्ञानग्रहणशक्ति वृद्धिंगत केल्या पाहिजेत. मुलाच्या शिक्षणांत त्याच्या स्वतांच्या स्वतंत्र प्रयत्नांचें विशेष महत्त्व आहे. नुसतें ऐकणें व मर्यादित ज्ञान म्हणजे शिक्षण नव्हे. खेळ हा मुलांच्या स्वाभाविक चळवळीचा किंवा स्वयंकर्तृत्वेच्छेचाच परिणाम होय. यास्तव लहान मुलांचें शिक्षण शिक्षकानें सुचविलेल्या परंतु स्वाभाविक अशा खेळांच्या रूपानें असावें आणि त्या खेळांचें पर्यवसान कामांत व्हावें.

हें तत्त्व म्हणजे फ्रोबेलच्या शिक्षणसुधारणेचें मूळ होय. मुलें जेव्हां स्वेच्छेनें व स्वतंत्रपणानें कांहीं चळवळ करतात, तेव्हांच त्यांची स्वभावतः पूर्ण वाढ होते. मुलांच्या या स्वयंकर्तृत्वाला योग्य दिशा लावण्यास कांहीं हरकत नाहीं. मात्र त्यांना केवळ हुकमतींत ठेवतां कामा नये. "मुलांच्या स्वयंकर्तृत्वाला कोणत्याही रीतीनें आळा नसावा, किंवा त्यांच्या अधिकारांत ढवळाढवळ करूं नये. तसेच आपल्या इच्छेप्रमाणें त्यांच्या स्वयंकर्तृत्वाच्या आड येऊं नये. मानवी स्वभावाच्या ढोबळ व सामान्य नियमांस अनुसरून ममतेनें व काळजीनें दिशा दाखविण्यापलीकडे शिक्षकानें किंवा आईबापांनीं कांहींएक करूं नये." (Fletcher's Cyc. of Education) "स्वातंत्र्य आणि नियमन—कायद्याप्रमाणें वागणें-हीं मोठ्या मनुष्यासंबंधानें जर एकमेकांविरुद्ध नाहींत तर तीं मुलांसंबंधानेंही विरुद्ध असूं शकणार नाहींत."

[शिरेफ.]

(५) मुलाचें शील किंवा दानत योग्य बनण्यास त्याला दुसऱ्याच्या संगतीची आवश्यकता असते; तें नुसत्या क्रिया-स्वातंत्र्यानें बनत नाहीं. मूल स्वभावतः संगतिप्रिय असतें, व दुसऱ्यांविषयीं कळकळ बाळगणें त्याला आवडतें. तथापि मुलाच्या ह्या स्वाभाविक आवडीप्रमाणें त्याचा इतर मुलांशीं सहवास झाल्या-वांचून, दुसऱ्याचे हक्क व मनोवृत्ति यांना मान देणें आणि कर्तव्य, स्वार्थत्याग म्हणजे काय ह्याची ओळख करून घेणें, ह्या गोष्टी त्याला कधींही शिकतां येणार नाहींत. घरांतल्या घरांत कुटुंबांतील मनुष्यांच्या सहवासाचा जो अनुभव मुलास येतो तेवढ्यानें इतरांच्या सहवासाची पूर्णता होत नाहीं. अवश्य तितका इतरांच्या सहवा-साचा अनुभव मिळण्यास मुलाचें आपल्या संवगड्यांशीं मोकळ्या मनानें दळणवळण असणें जरूर असतें. आपल्या संवगड्यांशीं अप्रतिबंध दळणवळण ठेविल्यानें मुलाला आपोआप मिळणारे नीतीचे व सदाचरणाचे धडे, आणि रोजचे साधे खेळ व व्यवसाय ह्या गोष्टी लहान मुलाच्या शिक्षणांत अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

(६) मुलाची सर्व प्रकारें योग्य वाढ होण्यास तें सदोदित आनंदांत असलें पाहिजे. अर्थात् त्याची एकंदर चळवळ अशी असावी कीं, त्यापासून त्याला आनंदच होईल. मुलाची चळवळ स्वयंभू असली, स्वतःच्या प्रेरणेनें तें कांहीं करीत असलें, आणि त्यांत कांहीं तरी सिद्धीस गेलें, म्हणजे मुलाला विलक्षण आनंद वाटतो.

मुलाच्या मनांत जें कांहीं करावयाचें असतें, त्याविषयीं त्याला

दिशा दाखवून व सूचना करून मदत करणें, इतकेंच शिक्षकाचें वास्तविक काम आहे. शिक्षकानें मुलाकरितां एकादी गोष्ट करूं नये; तर ती त्याच्याकडून करविण्यास योग्य ती मदत मात्र त्याला करावी. मूल जेव्हां एकादी गोष्ट स्वतांच करतें तेव्हां मात्र त्याला खरा खरा आनंद होतो. त्यानें केलेली गोष्ट कितीही लहान किंवा अर्धवट असली, तरी आपण केलेलें कृत्य दृष्टीस पडतांच किंवा त्याचें स्मरण होतांच मुलाच्या चित्तवृत्तींस आनंदाचें भरतें येतें.

(७) मुलाचा सृष्टीशीं प्रत्यक्ष परिचय झाला पाहिजे. सृष्टींतील सजीव पदार्थांचा परिचय, सृष्टिसौंदर्याचें निरीक्षण आणि सृष्टींतील पदार्थांच्या गुणधर्मांचा इंद्रियद्वारा अनुभव ह्या मुलाच्या शिक्षणांतील अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी होत.

" सजीव आणि सचेतन वस्तूंच्या सहवासाचें आयुष्याच्या कोणत्याही स्थितींत अतिशय महत्त्व आहे. पशु, पक्षी आणि फुलें ह्यांविषयींची सहानुभूति वाढवून तिला योग्य दिशा लावणें ही गोष्ट बालपणांतच झाली पाहिजे. "

[लिचिन्स्का.]

(८) मुलामध्यें विशेषतः दोन प्रकारची उपजतबुद्धि असते; कांहीं तरी बनविण्याची किंवा कांहीं तरी नवीन युक्ति काढण्याची आवड ही एक, आणि प्रत्येक वस्तूविषयीं सर्व कांहीं समजण्याची आवड ही दुसरी.

ह्यावरून निरनिराळ्या रचना व आकार इत्यादि बनविणें आणि पदार्थांचें निरीक्षण या गोष्टी मुलाच्या शिक्षणांत किती महत्त्वाच्या व किती जरूरीच्या आहेत हें दिसून येईल.

" आपण मुलास जें कांहीं शिकवितों, त्यांत वस्तुतः आपण नवीन असें कांहींच करीत नाहीं. मूल हें मनुष्यजातींपैकींच एक असल्यामुळें, एकंदर मनुष्यजातीच्या अंगचें ज्ञान हें त्यास जन्मतःच असतें. कोणी मनुष्य स्वतःच एकादी गोष्ट प्रथम करितो, तेव्हां त्यापासून मात्र कांहीं तरी नवीन उत्पन्न होतें. "

[फ्रोबेल]

नारायण विठ्ठल आपटे.

---

३५. योग्य अभिमान.

कामक्रोधादि बहुतेक अंतःकरणवृत्तींविषयीं असें आहे कीं, त्या वृत्ति आपल्या आधीन ठेवून त्यांची यथायोग्य योजना केली असतां त्या मनुष्याचें सुख वाढवितात, व त्यास शोभा आणितात. पण त्याच वृत्ति उच्छृंखल होऊन त्यांच्या स्वाधीन मनुष्य झाला असतां त्या त्याच्या दुःखास व अप्रतिष्ठेस कारण होतात. याप्रमाणेंच एकच अंतःकरणवृत्ति अवस्थाभेदेंकरून गुण होते किंवा दोष होते. अभिमानाची गोष्ट वर सांगितल्याप्रमाणेंच आहे. अभिमान म्हणजे थोरपणाची बुद्धि. हिचे विषय अनेक असतात. आपल्या देशाच्या थोरपणाविषयीं जी बुद्धि तीस स्वदेशाभिमान म्हणतात. तसाच जात्यभिमान, कुलाभिमान, धर्माभिमान, असे अभिमानाचे पुष्कळ प्रकार आहेत. मनुष्याच्या ठायीं देशादिकाविषयीं अभिमान असावा हें योग्य आहे, व हा अभिमान अंगीं असणें मोठा गुण आहे. या अभिमानाच्या योगानें मनुष्याची,

आपल्या देशांत विद्या, कलाकौशल्य, संपत्ति, सौख्य वगैरे वाढविण्याविषयीं प्रवृत्ति होते, व ती वाढविण्याचे कामांत अनेक प्रकारचे कष्ट पडले तरी तो सुखानें सोसतो, व अनेक प्रकारचीं संकटें आड आलीं तरी तो तीं जुमानीत नाहीं. दुसऱ्यांनीं आपल्या देशाचा नाश करण्याचा किंवा अपमान करण्याचा प्रसंग आणिला असतां त्याचें निवारण करण्याकरितां स्वदेशाभिमानी पुरुष मोठ्या संतोषानें आपलें सर्वस्व खर्चावयास राजी होतो. इतकेंच नाहीं, तर त्या कामाकरितां प्राणत्याग देखील तो मोठ्या संतोषानें करितो. देशाभिमान हा परिसासारखा आहे. त्याचा संबंध ज्या गोष्टीस होतो, ती ती गोष्ट त्याच्यासंबंधानें उत्तम व सुखावह होते. त्याच्या संबंधानें हालांचा हालपणा जातो. संकटांचें प्रतिबंधकत्व नाहींसें होतें. धननाश, प्राणनाश हे हितावह व सुकृतानें प्राप्त होणारे पदार्थ असें वाटूं लागतें. असे प्रसंग येऊन आपल्या हातून देशाची चाकरी घडावी, असा स्वदेशाभिमानी मनुष्यांचा नवस असतो.

हा स्वदेशाभिमान नुसता असून उपयोगी नाहीं. त्याची योग्य योजना करावयास मनुष्याच्या अंगीं युक्तायुक्तविचार पाहिजे. आपल्या देशांतल्या वास्तविक दोषांचा अभिमान मनुष्यास असूं नये, व आपल्या देशाचें बरें करण्याकरितां, किंवा त्यास थोरपणा आणण्याकरितां किंवा तो वाढविण्याकरितां त्यानें अयोग्य व नीच उपायांचें अवलंबन कदापि करूं नये; व आपणास आपला देश जसा प्रिय, व त्याचा उत्कर्ष व्हावा असें आपणास वाटतें, तसा

दुसऱ्यास त्याचा देश प्रिय असतो, त्यास त्याच्या देशाची बढती होण्याची इच्छा असते, असें सर्वांनीं मनांत आणून दुसऱ्याचा उपमर्द करण्यास प्रवृत्त होऊं नये. अन्यायकर्म स्वभावतः वाईट होय. मग तें मनुष्यानें स्वहितार्थ केलें तरी त्यास चांगलेपण नाहीं. स्वदेशाचा अभिमान हा गुण आहे, म्हणून त्यावरून परदेशाचा द्वेष करणें गुण होत नाहीं. आपल्या देशांतलें वास्तविक सुख व त्याची वास्तविक योग्यता वाढण्यास दुसऱ्या देशांत त्या गोष्टी कमी होण्याची अगदीं गरज नाहीं. खरा आनंद व खरी योग्यता हे पदार्थ सापेक्ष नाहींत. साखरेची गोडी, गुलाबाच्या फुलाचें सौन्दर्य, मोतियाच्या फुलाचा सुवास, इत्यादि गुणांनीं मनुष्यास सुख होण्यास व त्या पदार्थांस योग्यता येण्यास दुसऱ्या पदार्थांची अपेक्षा नाहीं. ह्याचप्रमाणें एका देशांत विशेष धन होण्यास व त्या देशांतलें चातुर्य व ज्ञान वाढण्यास दुसऱ्या देशांत त्या गोष्टी कमी असण्याची काय गरज आहे ? योग्य देशाभिमान वाहणारा पुरुष आपल्या देशाचा वास्तविक उत्कर्ष इच्छितो. दुसऱ्याचा अपकर्ष तो इच्छीत नाहीं.

देशाभिमान वाहणाऱ्या व स्वदेशाच्या हिताकरितां प्राणत्याग करण्यास उदार झालेल्या पुरुषांचीं मोठमोठीं उदाहरणें युरोपखंडाच्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासांत फार आढळतात. प्राचीन काळचे ग्रीक लोक, व रोमन लोक आणि अर्वाचीन काळचे स्वित्सर्लंडांतले वगैरे लोक, ह्यांमध्यें देशाभिमान बाळगणें मोठा गुण लेखीत असत. ह्या लोकांत आपल्या देशाच्या कल्याणाकरितां त्यांनीं बहुत

दुःखें सोशिलीं आहेत, मोठमोठ्या सुखांस व ऐश्वर्यास लाथ मारिली आहे व प्रसंगीं हर्षानें प्राण खर्चिले आहेत, असे पुष्कळ पुरुष आढळतात. अशा पुरुषांचा त्या लोकांत पराकाष्ठेचा मान असे. जिवंतपणीं त्यांस पुष्कळ चहात व मेल्यावर त्यांच्या कृत्यांचीं गीतें होत, व तीं लहानमोठ्या सर्वांच्या तोंडीं असत. देशाभिमान वागवेणारा पुरुष अति थोर व तो अभिमान ज्याचे अंगीं नाहीं तो नीच, अशा प्रकारच्या गोष्टी, मुलांस समजावयास लागल्यापासून त्यांच्या कानीं पडत व त्यांस त्या गोष्टी नेहमीं शिकवीत व देशाभिमानी पुरुषांची प्रतिष्ठा त्यांच्या नजरेस पडे. इत्यादि अनेक कारणांनीं ती अंतःकरणवृत्ति त्यांचे ठायीं दृढ होत असे. आपल्या ह्या देशाच्या इतिहासांत देशाभिमानाचीं उदाहरणें सांपडत नाहींत असें नाहीं. ती वृत्ति रूपांतरानें पुष्कळ ठिकाणीं दृष्टीस पडते. ज्यांस आपल्या गांवाचा विशेष अभिमान आहे, व त्या गांवाचा उत्कर्ष होण्यास झटणारे, असे लोक ह्या देशांत पुष्कळ होते, व अद्यापि आहेत. पुरंदऱ्यांस सासवडचा, रास्त्यांस वाईचा, पटवर्धनांस सांगली, मिरज वगैरे आपआपले गांवांचा मोठा अभिमान असे. इतकें तर काय, हल्लीं बहुतेक गांवच्या कुळंब्यांस त्या त्या गांवाचा मोठा अभिमान असतो. ह्या लोकांची ही वृत्ति अशी संकुचित होण्यास अनेक कारणें झालीं आहेत. हा देश पराकाष्ठेचा मोठा पडला; त्यांत तो फार दिवस परकीय लोकांच्या हाताखालीं होता व ह्या देशाच्या लोकांस राज्यकारभाराकडे लक्ष देण्याचा प्रसंग प्रायः नसे. ह्या सर्व गोष्टींमुळें आपल्या गांवच्या पलीकडच्या

गोष्टी त्यांस परकीय वाटून ते त्यांविषयीं उदासीन असत. हल्लीं सर्व एका सत्तेखालीं येऊन सर्व कारभार वगैरे एका रीतीनें चालूं लागला आहे; लोखंडी रस्ते वगैरे होऊन निरनिराळ्या लोकांचें विशेष दळणवळण होऊन विशेष संबंध होण्याचा रंग आला आहे. तसेंच बहुतकरून सर्वांस एकाच प्रकारची विद्या व शिक्षा प्राप्त होत आहेत; व इंग्रजी ग्रंथांच्या अभ्यासानें देशाभिमान असणें मोठें भूषण आहे, असें वाटावयास लागलें आहे. ह्या सर्व कारणांवरून आपल्या सर्व हिंदुस्थानच्या लोकांस एकत्व प्राप्त होऊन देशाभिमान उत्पन्न होईल अशी आशा आहे.

कृष्णशास्त्री चिपळूणकर.

---

३६. वीज.

ज्या महाशक्तीच्या योगानें आकाशांत चकचकाट होऊन सिंहध्वनीसारखा मोठा नाद होतो, मोठमोठे वृक्ष समूळ उपटून पडतात, व मोठमोठीं घरें मधोमध कुऱ्हाड घातल्याप्रमाणें दुभंगून जमीनदोस्त होतात, त्या महाशक्तीचें नांव 'विद्युत्' किंवा 'वीज' हें होय.

वीज उत्पन्न करण्याचीं साधनें अनेक आहेत. त्यांमध्यें घर्षण म्हणजे घांसणें हें एक आहे. अंधेरांत रेशमी कपड्यावर जोरानें हात घांसला कीं लक्लक् होतें. वेगानें वाहणाऱ्या वाऱ्यांचें आणि मेघांचें घर्षण झालें म्हणजे आकाशांत चकचकाट होतो. चकचकाट होणें हा एवढाच धर्म विजेच्या अंगीं आहे असें नाहीं. तर तिचें

ठायीं दुसरे अनेक धर्म असून, त्यांचें ज्ञान मनुष्यास झाल्याच्या योगानें ही महाशक्ति त्याच्या हातीं आली आहे.

भरींव बोरूतल्या भेंडाच्या एका लहानशा तुकड्यास रेशमी दोरा बांधून तो तुकडा लोंबत ठेवावा, आणि एक कांचेची बाटली किंवा नळी हातांत धरून, ती रेशमी कपड्यानें जोरानें घांसून तिचा घांसलेला भाग ह्या भेंडाजवळ आणावा म्हणजे तो तुकडा त्या बाटलीकडे ओढ घेऊन तिला चिकटतो, आणि कांहीं वेळ चिकटून राहिल्यावर तिजपासून दूर दूर पळूं लागतो. परंतु पळत असतां त्या भेंडाच्या तुकड्याजवळ रेशमानें घांसलेली लाखेची कांडी आणली म्हणजे तो न पळतां तिजकडे येऊन आपण होऊन तिला चिकटतो, आणि मग पुनः तिजपासून दूर पळूं लागतो. ह्या घांसलेल्या लाखेपासून तो भेंड पळत असतां, घांसलेली कांच त्याच्या जवळ आणिली म्हणजे, तो भेंड तिजकडे ओढ घेऊन येऊन तिला चिकटतो, ह्यावरून दोन गोष्टी सिद्ध होतात. त्यांतली पहिली ही कीं, विजेनें भारलेले पदार्थ भेंडासारख्या हलक्या पदार्थांस ओढून घेतात, आणि दुसरी ही कीं, रेशमाच्या घर्षणानें लाखेंत उत्पन्न झालेली वीज (ऋणविद्युत्) आणि कांचेंत उत्पन्न झालेली वीज (धनविद्युत्) ह्या दोन्ही एकच नाहींत. ऋणविद्युतेनें भारलेले पदार्थ, धनविद्युतेनें भारलेल्या पदार्थांस ओढितात; परंतु एकाच प्रकारच्या विद्युतेनें भारलेले पदार्थ एकमेकांस दूर लोटितात. हें प्रतिसारण पहाण्याचा एक सोपा प्रयोग आहे; तो असाः— एका लोखंडाच्या सळईच्या एका टोंकास लहान दोऱ्यांचा किंवा बारीक

कागदांच्या लांबोड्या तुकड्यांचा एक झुपका बांधून ती सळई एका स्वच्छ ग्लासावर आडवी ठेवावी; आणि हातानें सपाट्यानें घांसलेला रेशमी कपडा किंवा आधीं ऊन करून मग घांसलेला ब्रौनपेपरचा तुकडा त्या सळईच्या दुसऱ्या टोंकाजवळ आणावा. म्हणजे सळईतून वीज झुपक्यांत जाते, आणि तो झुपका फुगतो. झुपका न बांधतां सोनेरी वर्खाचे दोन लहान लांबोडे तुकडे तेथें बांधिले, आणि हें सगळें एखाद्या निर्वात जागीं ठेविलें म्हणजे विजेचें दिग्दर्शन होण्यासारखें एक नाजूक यंत्र सिद्ध होतें.

वर सांगितलेली सळई ग्लासावर ठेविली पाहिजे; ती हातांत धरिली, तर वीज सळईतून झुपक्यांत न जातां आपल्या शरिरांतून पृथ्वींत जाईल आणि झुपका फुगणार नाहीं. असें झालें कीं, ज्याप्रमाणें कांहीं पदार्थ उष्णताप्रवाहक असतात, आणि उष्णता-अप्रवाहक असतात, त्याचप्रमाणें कांहीं पदार्थ विद्युत्प्रवाहक असतात, व कांहीं विद्युद्प्रवाहक असतात. सगळे धातु, पाणी, प्राण्यांचें शरीर, कोळसा आणि कापूस हे पदार्थ विद्युत्प्रवाहक होत; आणि, बर्फ, रबर, हवा, रेशिम, कांच लाख आणि गंधक हे पदार्थ विद्युदप्रवाहक होत. म्हणजे जे पदार्थ उष्णतावाहक ते सर्व विद्युद्वाहक असतात. परंतु जे पदार्थ उष्णता-अवाहक असतात त्यांतले बहुतेक सर्व विद्युदप्रवाहक असतात. म्हणूनच कांच किंवा लाख हातांत धरून घांसली असतां वीज तिच्यावर राहते; परंतु एकादी पितळेची नळी रेशमानें घांसली तर तींत उत्पन्न झालेली वीज लागलीच हातांतून निघून जाते. त्या नळीस जर मागें लाखेची कांडी लावून ती हातांत धरली तर वीज निघून जात नाहीं.

सर्व लोकांच्या लक्षांत सहज येण्याजोगता विजेचा धर्म म्हटला म्हणजे उजेड पाडणें हा होय. अंधेरांत रेशमावरून हात फिरविल्यानें ज्या ठिणग्या उडतात, त्या ऋणविद्युत् व धनविद्युत् यांचा संयोग झाल्यानें उडतात. स्वभावतः प्रत्येक पदार्थामध्यें विजेचे हे दोनही प्रकार संयुक्त झालेले असतात. पदार्थ घांसले म्हणजे ते दोन वेगळे होऊन, एक प्रकारची वीज घासलेल्या पदार्थावर राहते; आणि दुसरे प्रकारची वीज ज्या पदार्थानें घांसावें त्या पदार्थावर येते. रेशमावर धनविद्युत् राहते व हातावर ऋणविद्युत् येते; आणि रेशीम व हात हीं जवळ जवळ असल्यामुळें त्या दोन्ही संयोग पावून उजेड पडतो; आणि रेशीम व हात पूर्वस्थितीवर येतात. लाखेवर ऋणाविद्युत् राहते व ज्या रेशमानें घांसावें त्या रेशमावर धनाविद्युत् येते.

वर सांगितल्याप्रमाणें हातावर किंवा डोक्याच्या केसांवर घांसलेला रेशमी कपडा ह्यांच्यामध्यें मोठाल्या ठिणग्या उडतात; परंतु रेशमांतील धनविद्युत् हिशीं संयोग पावणारी जी सळईतली ऋणविद्युत्, ती विरुद्ध प्रकारच्या विजा एकमेकींकडे ओढ घेत असल्यामुळें सळईत उत्पन्न झालेली असते. कारण, ऋणविद्युत् आणि धनविद्युत् ह्या एकमेकींस आकर्षितात, हें मागें सांगितलेंच आहे. आकर्षणामुळेंच रेशमांतील धनविद्युत् सळईतल्या विजेचें पृथक्करण करून तींतील ऋणाविद्युतेला आपल्या बाजूस ओढून घेते, आणि धनाविद्युत् व सळईतली ऋणविद्युत् ह्यांचें आकर्षण फारच वाढलें म्हणजे, त्यांचा संयोग होऊन उजेड पडतो; आणि सळईतली बाकी

राहिलेली घनविद्युत् तशीच सळईंत राहून झुपक्यांत शिरते, आणि धनविद्युतेला झुपक्याचे बाजूस ढकलून देते, आणि रेशमांतली त्याच्या निरनिराळ्या भागांत एकाच प्रकारची वीज शिरल्यामुळें प्रतिसारण होतें; आणि तो फुगतो. म्हणजे रेशमांतील वीज सळईंत जात नाहीं, परंतु सळईंतल्या विजेचें पृथक्करण होऊन त्यांतली एक प्रकारची वीज रेशमी कपड्यांतील विजेशीं संयोग पावते, आणि बाकीच्या विजेनें सळई भारलेली राहते.

ह्या वर सांगितलेल्या गोष्टी विद्युच्छास्त्राच्या मूळाक्षरासारख्या होत. ह्या मूळाक्षरांच्या अनुरोधानें विद्वानांनीं अनेक प्रयोग केले आहेत, आणि विद्युच्छास्त्र रचिलें आहे. विजेच्या साह्यानें हजारों कोसांवरची बातमी हं हं म्हणतां येते; विजेच्या योगानें अत्यंत तेजःपुंज असा दिवा लावितां येतो, रोगी बरे करितां येतात, गाड्या चालवितां येतात, मुलामा देतां येतो आणि मातींतून अनेक मोठे मोलाचे धातू काढितां येतात. घर्षणजन्य विजेनें हीं कामें होत नाहींत. कारण तिचा प्रवाह वहात नाहीं. हीं कामें करण्याजोगता विजेचा प्रवाह उत्पन्न करण्यास दुसरीं साधनें लागतात. त्यांतलीं कांहीं येथें सांगतों.

जस्ताचा तुकडा जिभेवर ठेविला तर कांहींच चव लागत नाहीं. तोच प्रकार तांब्याच्या तुकड्याचा आहे. परंतु एका तांब्याच्या तुकड्यावर जस्ताचा तुकडा ठेवून त्यांच्या सांध्याच्या ठिकाणीं जीभ लावली म्हणजे चमत्कारिक चव लागते. असें होण्याचें कारण जिभेच्या रसाचा जितका परिणाम जस्तावर होतो, तितका

तांब्यावर होत नसल्यामुळें विजेचा प्रवाह जस्तांतून तांब्यांत वाहूं लागतो, हें होय. ह्या प्रवाहाचा विशेष गुण हा आहे कीं, लोखंडाभोंवतीं रेशमानें वेष्टिलेल्या तारेचे वेढे घेऊन त्यांतून जर तो सोडला तर तो वाहीतोंपर्यंत तें लोखंड लोहचुंबक होऊन इतर लोखंडास ओढूं लागतें. तारेनें बातमी पाठविण्याचें यंत्र याच धोरणावर रचिलेलें असतें. मात्र विद्युत्प्रवाह उत्पन्न करण्यास विशेष चांगल्या प्रकारची योजना असते.

लोहचुंबक लोखंडास ओढितो, परंतु जर रेशमानें वेष्टिलेल्या लोखंडाच्या तारेचें वेटोळें लोहचुंबकाजवळ नेऊन त्यास स्पर्श न करितां मोठ्या जोरानें गरगर फिरविलें तर त्या वेटोळ्यांत विद्युत्प्रवाह उत्पन्न होतात. विजेच्या दिव्याकरितां केलेल्या यंत्रांत हाच प्रकार असतो.

वर घर्षणजन्य विजेच्या संबंधाचे जे प्रयोग सांगितले, ते थंडीच्या दिवसांत केले तर बरें. कारण, अशा प्रयोगांस रूक्ष हवा लागते. नाहीं तर पदार्थांवर ओलाव्याचा थोडाही अंश असला तरी वीज निघून जाऊन प्रयोग चांगले वठत नाहींत.

विनायक कोंडदेव ओक.

---

३७. सर विल्यम जोन्स.

इंग्लिशांचें राज्य हिंदुस्थानांत झाल्यापासून जे जे कीर्तिमान् पुरुष इंग्लंडांतून आले, त्यांपैकींच वर लिहिलेला पुरुष समजला पाहिजे. हिंदुस्थानच्या राजांशीं तह करणें, लढाई करणें वगैरे साक्षात् राज्यप्रकरणांशीं संबंध नसल्यामुळें इतिहासांत यांचें नांव

फार गाजलें नाहीं. तथापि अशा पुरुषाचें चरित्र मोठें उपदेशपर असतें. याकरितां त्याचा वृत्तांत संक्षेपानें लिहिला आहे.

हा लंडन शहरांत सन १७४६ त जन्मला. त्याचा बाप गणितशास्त्रामध्यें हुषार असून, गणितशास्त्रज्ञशिरोमणि सर ऐझाक न्यूटन् याचा मित्र होता. जोन्स हा मुलगा तीन वर्षांचा होण्यापूर्वींच त्याचा बाप मृत्यु पावला. त्याची आई ही मोठी सद्गुणी असून, गणितशास्त्र, नकाशे वगैरे काढणें, यांत हुषार होती. तिनें मुलास बाळपणापासून विद्येची अभिरुचि लाविली. स्वतः ती त्यास शिकवीत असे.

जोन्स याची पाठ करण्याची शक्ति मोठी होती. तो शाळेंत असतां, शेक्स्पीयर या कवीचीं नाटकें पाठ म्हणे. शाळेंत असतांच तो लाटीन, ग्रीक, अरबी व हिब्रू या भाषा शिकला. त्यानें आपल्या एकविसाव्या वर्षीं एशियाखंडांतील कवितांवर टीका लिहिल्या. इंग्लंडांत अशी चाल आहे कीं; युरोपखंडांतील प्राचीन काळीं व सांप्रतकाळीं सुधारलेल्या देशांत प्रवास करून आल्याशिवाय विद्या पुरी झाली असें समजत नाहींत. अध्ययन संपल्यावर बहुशः सर्व विद्वान् लोक युरोपखंडांतले देश पाहून येतात. कित्येक बुद्धिमान् असतात ते त्या देशांचीं वर्णनें लिहितात, व तेथें असतां त्या देशांतल्या भाषा शिकतात. या चालीप्रमाणें जोन्ससाहेब सन १७६७ त युरोपखंडांतले देश पाहण्यास गेला; तेव्हां त्यानें जर्मन भाषेचा अभ्यास केला. पुढल्या वर्षीं तो इंग्लंडांत परत आला. त्या वेळेस इंग्लंडांत डेन्मार्कचा राजा आला होता. त्याच्या

जवळ फारसी भाषेंत हातानें लिहिलेलें नादीरशहाचें चरित्र होतें. त्याचा त्यास फ्रेंच भाषेंत तर्जुमा करावयाचा होता. तें काम जोन्स यानें पत्करिलें. त्यांत मोठासा नफा नव्हता, व फ्रेंच भाषेंत राजाला पसंत पडण्यासारखें भाषांतर करण्याचें कामही मोठें कठीण होतें. परंतु हें काम करण्यास योग्य मनुष्य इंग्लंडांत नाहीं म्हणून तें काम राजानें फ्रान्स देशांत पाठविलें, अशी अप्रतिष्ठा होऊं नये म्हणून त्यानें काम स्वीकारून मोठ्या श्रमानें एका वर्षांत सर्व पुस्तकाचें भाषांतर तयार केलें. तें राजास मान्य होऊन त्यानें जोन्स यास डेन्मार्कची राजधानी कोपेनहेगेन येथल्या 'रॉयल सोसायटी' नामक सभेचा सभासद नेमिलें.

पुनः १७७० त यानें युरोपखंडांत प्रवास केला. या वेळेस त्यानें पुष्कळ भाषा शिकून गणित वगैरे विषयांचाही चांगला अभ्यास केला, पुढें इंग्लंडास परत आल्यावर यानें कायद्याचा अभ्यास केला. सन १७८६ या वर्षीं याची कलकत्ता येथील सदर कोर्टाच्या मुख्य न्यायाधिशाच्या जाग्यावर नेमणूक झाली. एशियाखंडांतील देश पाहून तिकडील जुन्या भाषा शिकण्याची ह्यास फार हौस होती. ती पूर्ण होण्याची सहज संधि आल्यामुळें तो मोठ्या आनंदानें कलकत्यास आला. त्या वेळेस वॉरन हेस्टिंग्स हा गव्हर्नर जनरल होता. त्याच्या मदतीनें सन १७८४ या सालांत बंगाल प्रांतांत एशियाटिक सोसायटी म्हणून एक मंडळी स्थापित झाली होती. जोन्स ह्याची विद्वत्ता पाहून या मंडळीनें त्यास अध्यक्ष नेमिलें. या मंडळीपासून हिंदुस्थानचें पुष्कळ हित झालें आहे. जुने

लेख, प्राचीन इतिहास, प्राचीन ग्रंथ, यांचा जो शोध लागला आहे, त्यास मुख्यत्वेंकरून या मंडळीचे श्रम कारण होत. याच वर्षी जोन्ससाहेब, ब्राह्मणांच्या विद्येचें जें आदिपीठ काशीक्षेत्र तें पाहण्यास मोठ्या उत्सुकतेनें गेला. नंतर त्यानें दोन वर्षे अभ्यास करून संस्कृत भाषेचें चांगलें ज्ञान संपादिलें. सन १७८५ या वर्षी 'एशियाटिक मिसालिनी' या नांवाचें दुसरें एक मासिक पुस्तक कलकत्ता येथें निघूं लागलें होतें; त्यांत जोन्ससाहेब पुष्कळ मजकूर लिहीत असे. या पुस्तकांत फारसी भाषेंतील कितीएक कवितांचीं इंग्रजी भाषांतरें यानें छापिलीं. सन १७९१ त कालि-दासकृत शाकुंतल—नाटकाचें इंग्रजींत भाषांतर यानें केलें. याचा विद्याभ्यास नेहमीं सुरू होता. परंतु १७९४ त याच्या पोटांत रोग झाला. त्यापासून तो तारीख १७ एप्रिल रोजीं याच वर्षी मरण पावला.

सर विल्यम जोन्स याच्या वयाचा व विद्येचा विचार करूं लागलें म्हणजे मोठा अचंबा वाटतो. असे विद्येविषयीं तत्पर पुरुष जगांत फारच विरळा सांपडतात. यानें स्वभाषेंत बऱ्याच कविता केलेल्या आहेत, त्यांपैकीं कांहीं फारच मनोवेधक आहेत. तो जसा मोठा विद्वान् होता, तसा मोठा नीतिमानही होता. 'राज्य म्हणजे काय ? या नांवाची एक त्यानें लहानशी कविता केली आहे. तींत त्यानें असें म्हटलें आहे कीं, "मोठाले कोट, किल्ले, खंदक असल्यानें राज्य चांगलें होत नाहीं. तसेंच मोठालीं शहरें, बंदरें, आरमारें, राजवाडे असले म्हणजे राज्य चांगलें झालें असें नाहीं. फार काय,

पण केवळ बुद्धिमान् मनुष्यांनीं सुद्धां राज्य चांगलें होत नाहीं; तर आपलें कर्तव्य व हक्क जाणून त्याप्रमाणें वागणारे मनुष्य ज्या राज्यांत असतात तेंच चांगलें राज्य होय."

जोन्ससाहेब नेहमीं निःपक्षपातानें न्याय करी. ज्या लोकांचा आपण न्याय करितों, त्यांचे जुने कायदेकानू, रीतीभाती वगैरे यांची पूर्ण माहिती न्याय बरोबर होण्यास अत्यंत अवश्यक आहे, असें जाणून मनुस्मृति वगैरे पुष्कळ जुन्या ग्रंथांचें इंग्रजीमध्यें त्यानें भाषांतर केलें. पूर्वीं हिंदुस्तानांत साहेब लोक येत त्यांचा बहुशः पैसा मिळविण्याशिवाय दुसरा कोणताही उद्देश नसे. लढाईच्या कामांत जसे हिंदू लोक निर्जीव तसे ते सर्व कामांत आहेत असें त्यांस वाटे. हिंदू लोकांत विद्येचा प्रसार नाहीं, असें ते युरोपांत प्रसिद्ध करीत; ग्रीक, लाटिन या जुन्या भाषाप्रमाणें संस्कृत भाषा सुधारलेली आहे असें पूर्वीं युरोपांतील लोकांस माहीत नव्हतें. जोन्स साहेबानें शाकुंतल नाटकाचें भाषांतर केल्यामुळें संस्कृत ग्रंथांकडे युरोपियन लोकांचें लक्ष लागलें. शाकुंतल नाटकाचें भाषांतर हल्लीं युरोपांतील सर्व भाषांत झालें आहे. हिंदू व ग्रीक ह्यांच्या पौराणिक व ऐतिहासिक कथांत सादृश्य आहे असें प्रथम जोन्ससाहेबास समजलें. ग्रीक इतिहासकर्त्यांनीं 'सांद्रकोट्स' म्हणून हिंदुस्तानांत राजा होता असें लिहिलेलें आहे. तो हिंदुस्थानांतला चंद्रगुप्त होय, असें यानें ठरविलें. ही गोष्ट हल्लीं सर्वानुमतें अशीच ठरली आहे. संस्कृत भाषेस हल्लीं जो एवढा मान युरोपखंडांत मिळाला आहे त्यास सर विल्यम जोन्स कारण आहे, असें म्हणण्यास हरकत

नाहीं. सांप्रत युरोपांतील विद्वान् लोक दहा दहा, वीस वीस वर्षें संस्कृत भाषेच्या अभ्यासांत घालवितात.

सर विल्यम् जोन्स यास एकंदर २८ भाषा येत होत्या असें म्हणतात ! त्या भाषा येणेंप्रमाणें:—

१ इंग्रजी, २ लाटिन, ३ ग्रीक, ४ फ्रेंच, ५ इटालियन ६ आरबी, ७ फारशी, ८ संस्कृत, ९ स्पानिश, १० पोर्तुगीज, ११ जर्मन, १२ रुनिक, १३ हिब्रू, १४ बंगाली, १५ हिंदी, १६ तुर्की, १७ तिबेटी, १८ पाली, १९ पेल्हवी, २० देरी, २१ रशिअन, २२ सिरिआक, २३ इथिओपिक, २४ कापतिक, २५ वेल्श, २६ स्विडिश, २७ डच व २८ चिनी.

यांपैकीं पहिल्या ८ त्यास उत्तम विद्वानाप्रमाणें येत असत. दुसऱ्या ८ मध्यम येत असत. बाकीच्या बारांत त्याचा थोडाबहुत प्रवेश मात्र होता.

इंग्रजी लिपि आपल्या बालबोध लिपीप्रमाणें सुलभ नाहीं. तिच्यां-तील कित्येक अक्षरांचे तीन चार उच्चार होतात, व कित्येक उच्चा-रांत एकापेक्षां अधिक अक्षरें आहेत असा घोंटाळा असल्यामुळें प्रत्येक साहेब मनास मानेल त्या रीतीनें इकडले शब्द लिही; त्यांव-रून वाचणाराही आपणास वाटेल त्याप्रमाणें उच्चार करी. असा गोंधळ होऊं नये म्हणून संस्कृत लिपीच्या अमुक वर्णाबद्दल इंग्लजी लिपींतला अमुकच वर्ण लिहावा, असें जोन्ससाहेबानें ठरविलें. ती रीत सर्वांस मान्य होऊन तिच्याप्रमाणें मोठाले संस्कृत ग्रंथ हल्लीं

इंग्रजी लिपींत छापतात. ते बिनचूक वाचितां येतात. या रीतीस 'जानेसियन सिस्टिम्' म्हणजे जोन्ससाहेबाची रीत असें म्हणतात.

गोविंद शास्त्री बापट.

---

३८. पाऊस.

पदार्थवेत्त्यांचा असा एक साधारण सिद्धांत झाला आहे कीं, ह्या जगांतील बहुतेक गोष्टींचें आदिकारण सूर्यनारायणाचे प्रखर किरण होत. पाऊस, वारा, दिनमान, झाडें किंबहुना आपलें अस्तित्व हें सर्व ह्याच तेजाचें पर्यवसान आहे. पावसाचें प्रधान अंग जी वाफ, तिचा आणि सूर्यकिरणांचा किती निकट संबंध असतो हें वाचकांस ठाऊक असेलच. आपल्याला उन्हाळ्यामध्यें ज्या प्रखर किरणांपासून इतका त्रास होतो, तेच किरण आपल्याकरितां समुद्रावरील वातावरणांत तेथील पाण्याच्या वाफेचा संचय करितात. पण इतक्यानेंच तरी ते कांहीं उगीच बसत नाहींत. मागें सांगितलेंच आहे कीं, हा बाष्पसंचय वाऱ्याचे बरोबर समुद्रावरून जमिनीवर येतो. पण हे वारे येतात कोठून याचा विचार केला असतां सहस्रकिरणाचा आपल्याशीं किती संबंध आहे हें लक्षांत येईल. आतां ही गोष्ट प्रत्येकाचे अनुभवास येण्याजोगी आहे कीं, कोणताही पदार्थ कांहीं कारणावांचून हालत नाहीं. या जगामध्यें असा एकही पदार्थ सांपडणार नाहीं कीं, जो आतां आपल्यापुढें होता व कांहीं कारण नसतां एकाएकीं येथून दोन कोसांवर जाऊन पडला. हीच गोष्ट खरी आहे, तर असा प्रश्न सहजच उत्पन्न होतो कीं, वातावरणामध्यें एवढा मोठा तीव्र वेग उत्पन्न होऊन जीं मोठीं वादळें

उत्पन्न होतात, व यामुळें हजारों रुपयांचें नुकसान होतें तें कांहीं इसापनीतींतील काल्पनिक वायुदेवतेच्या श्वासोच्छ्वासानें नव्हे. दुसरी अशी शंका येते कीं, ही आपली पृथ्वी जर वातावरणानें चोहोंकडून सारखी वेष्टिलेली आहे, तर हा इतका वारा जातो तरी कोठें, कित्येकांस हे प्रश्न अगदीं पोरकट वाटणार आहेत. "वारा कां वाहतो व कुठें वाहतो ?" चांगले प्रश्न ! हे का प्रश्न झाले ? अहो ! "वारा हा आपला सुरूच आहे. तो का आजचा कालचा आहे वाटतें, ते लागले चौकशी करण्यास ! तो आज हजारों वर्षे वाहतो आहे व असाच वाहणार ! आपल्याला भूक कां लागते, विस्तवानें अंग कां भाजतें, दिवा कां जळतो, याचें काय उत्तर, तेंच त्याचें; ह्या गोष्टी घडायच्याच. त्या काय आतां चौकशी करून फिरणार आहेत वाटतें ? ह्या गोष्टी ईश्वरानेंच त्यांच्या नशिबीं लिहून ठेवल्या आहेत. सूर्यानें आपलें फिरावेंच; वाऱ्यानें वहावेंच. त्याला काय, कारण पाहिजे वाटतें ? अशा तऱ्हेचा अर्थवाद करणारे म्हणजे आपल्या इकडे नाहींत असें नाहीं. अशांस आम्ही इतकेंच सुचवितों कीं, अशा अर्थवादापासून कांहीं वरील प्रश्नांचा उलगडा होत नाहीं. वरील गोष्टी जरी ईश्वरप्रणीत मानिल्या, तरी वारा वाहतो म्हणजे होतें काय हा प्रश्न जशाचा तसाच राहतो. ह्या गोष्टी आपल्या डोळ्यांपुढें नेहमीं घडत असल्या कारणानें आपल्याला क्षुल्लकशा वाटतात; म्हणून खरोखरीच त्या तशा आहेत, असें मानणें म्हणजे निव्वळ मूर्खपणा होय. आतां यांचीं कारणें आपल्याला कदाचित् कळत नसतील; म्हणून तीं

नाहींत कीं काय? पदार्थ वर फेंकला असतां खालीं पडतो हें प्रत्येकास माहीत आहे, पण याचें कारण जें गुरुत्वाकर्षण त्याचा पुरा थांग न्यूटनासच लागला. यावरून एवढें सिद्ध होतें कीं, वरील प्रश्नांत हंसण्याजोगें कांहींएक नाहीं, तर वारा म्हणजे काय व तो कशामुळें उत्पन्न होतो याचा विचार करूं.

हवा म्हणजे एक प्रकारचा वायु आहे; व जेव्हां ही हवा इकडून तिकडे जाऊं लागते, तेव्हां आपण तिला वारा असें म्हणतों. तेव्हां वाऱ्याचें कारण शोधून काढणें म्हणजे हवा एकीकडून दुसरीकडे कां जाते याचें कारण शोधून काढणें हें होय. आतां चोहोंकडे जर हवा सारखीच असती तर ती एकीकडून दुसरीकडे जाण्याचें कारणच राहिलें नसतें. पण ज्या अर्थी ही गोष्ट नेहमीं प्रत्यास येते, त्यावरून असें अनुमान करितां येतें कीं, हवेची कोठेंतरी एके ठिकाणीं कमताई असते, व ती भरण्याकरितां दुसरीकडची हवा त्या ठिकाणीं जाते. या गोष्टीचा अनुभव पाहण्यास फार दूर जावयास नको. प्रत्येकास माहीतच आहे कीं, आपण जर विहिरींतून घागर भरून वर काढिली, तर विहिरीच्या पाण्यास कधींही खळगी पडत नाहीं. तर चोहोंकडलें पाणी त्या ठिकाणीं जाऊन पुनः पाण्याचा पृष्ठभाग सपाटचा सपाट होतो. त्याचप्रमाणें इकडे हवेची कोठें कमताई पडली तर लागलीच सभोंवारची हवा तेथें जाऊं लागते; व असें होऊं लागलें म्हणजे आपण त्यास त्या दिशेकडे वारा वाहूं लागला असें म्हणतों.

हवा कांहीं पृथ्वी सोडून कोठें पळून जात नाहीं. मग अशी

हवेची कमताई कां पडावी हा दुसरा प्रश्न होय; व ह्याही प्रश्नाचा उलगडा हल्लींच्या पदार्थवेत्त्यांनीं केला आहे. पृथ्वीच्या सर्व भागावर सूर्याचे किरण कधींही पडत नाहींत. अर्धा भाग नेहमीं अंधारांतच असतो; व ज्या अर्ध्या भागावर प्रकाश असतो, त्यांतही सूर्य डोक्यावर एकेच ठिकाणीं नसतो. यावरून सूर्याची उष्णता चोहोंकडे सारखी नसते; व त्यामुळें एकीकडे हवा जास्त तापेल, दुसरीकडची कमी व तिसऱ्या एकाद्या ठिकाणीं मुळींच तापणार नाहीं. आतां पदार्थशास्त्राचा असा एक नियम आहे कीं, पदार्थ तापविल्यानें हलके होतात. पाणी इतकें जड आहे कीं, तें नुसत्या हवेंत कधींही रहात नाहीं. पण त्याचीच उष्णतेनें वाफ झाली कीं तें लगेच वर चढतें. तसेंच एकादे ठिकाणची हवा जास्त तापली म्हणजे ती सभोंवारच्या हवेनेशां हलकी होऊन वर जाऊं लागते. जसजशी एके ठिकाणची हवा अधिक किंवा कमी तापून वर जाऊं लागते, त्याचप्रमाणें बाहेरची हवा अधिक किंवा कमी जोरानें तेथें येऊन भरते व लहानमोठे वारे सुटतात. पृथ्वीवर अतिशय उष्णता होण्याचीं ठिकाणें म्हणजे रेताड प्रदेश होत. या ठिकाणीं जेव्हां सूर्य असतो तेव्हां तेथील हवा अतिशय तापते. व त्यामुळें फारच मोठे वारे सुटतात. ते इतके कीं, ८००–९०० कोसांवरील सुद्धां हवा तेथें येते! मग तिच्या बरोबर सहजच समुद्रावरील वाफ जमिनीवर येते, व जमीन इतर प्रदेशापेक्षां गार असल्यानें तेथें तिचें पाणी होतें. रेताड प्रदेशांचा आपणांस एवढा मोठा उपयोग होतो, हें सकृद्दर्शनीं असंभाव्यसें वाटेल. पण थोडा विचार केला असतां

ही शंका दूर होणारी आहे. वरील विवेचनावरून इतकें ध्यानांत येणार आहे कीं, सूर्याचे किरण केवळ पाण्याची वाफ करून राहत नाहींत, तर दुसरे एके ठिकाणची हवा हलकी करून वारा उत्पन्न करितात; व त्यानेंच समुद्रावरील वाफ पृथ्वीवर येऊन पाऊस पडतो.

केसरींतील निवडक निबंध-पुस्तक दुसरें.

---

३९. जानोजीचें आपल्या बायकोस पत्र.

" माझे परमप्रिये स्त्रिये, "

" माझे विरहेंकरून तूं फार दुःख करीत असशील हें मनांत येऊन मला फार व्यथा होते. आतां माझें वर्तमान ऐक. मी रामचंद्र शेट ह्यांजकडे जावयास निघालों; तों वाटेंत ह्या गोष्टी माझे मनांत आल्या; 'मी असा पैसा मागावयास जाऊन काय फळ ? त्यांत इतकें मात्र होईल कीं, एक कर्जकरी वारून दुसरा केला; तरी कर्जाची चिंता आहे ती आहेच. जो मी आज तरणा आणि काम करावयास बळकट आहें त्या म्यां जाऊन इतके पैसे दीनवाणेपणानें मागावे यांत काय शोभा आहे ? मला ते आळश्यांत किंवा व्यसन्यांत नाहीं गणणार ? रामचंद्रशेट यांनीं आमचें लग्न केलें खरें; आणि ते मला पुत्राप्रमाणें चाहतात हेंही खरें; पण जर त्यांचे मनांत वांकडें आलें आणि त्यांनीं मला नाहीं म्हटलें, किंवा आमचें संकट परिहारायास त्यांस सामर्थ्य नसलें तर ?' बरें; कधीं त्यांपासून वर्षाचे बोलीनें मला पैसे मिळाले तर ते मी वर्षाच्या आंत फेडीनच अशी तरी मला खात्री आहे ? आणि जर मीं फेडले

नाहींत, तर चोरामध्यें आणि मजमध्यें हरण करण्याविषयीं अंतर काय ? असा मीं विचार केला आणि योजूं लागलों कीं, चांगले मार्गानें मी या संकटांतून मोकळा होईन असा उपाय कोणता करावा ? ते समयीं माझे डोळ्यांत वारंवार पाणी आलें, आणि मीं वर भगवंताकडे दृष्टि केली. तों अकस्मात् माझे मनांत आलें आणि मी आपल्याशीं बोलूं लागलों; 'अरे' तूं अजून तरुण आहेस, आणि शरीरानें दृढ आहेस. थोडीं वर्षें देशांतरीं गेलास तर काय चिंता आहे ? तुला लिहितां वाचतां येतें, व हिशेब चांगला ठेवितां येतो. दैववशात् कोठें चांगला रोजगार लागला तर तूं आपल्या बायकोमुलांस सुखी करूं शकशील. बरें, हें नाहीं झालें तर आपलें कर्ज तरी वारशील. विचार कर कीं, तेथें तुझें दैव उघडलें, तर एकादा मोठा लाभ होऊ शकेल.' असा एक घटकापर्यंत विचार करीत होतों, इतक्यांत कोणी लोक माझे मागून येताहेत असें मीं पाहिलें. ते मजजवळ आले, तेव्हां त्यांनीं मला पुसलें, 'तूं कोण आहेस ? कोठें काय उद्देशानें चालला आहेस? आम्हांबरोबर लष्करांत येशील ?' मीं प्रथम अनाकानी केली. तेव्हां त्यांनीं पुनः मला पन्नास रुपये इनाम देऊं करून बोलाविलें. मीं त्यांस सांगितलें, कीं 'इतक्यांवर तर मी लढाई संपेपर्यंत चाकरी करीन. ते म्हणाले, 'बरें तर, तुझें आमचें ठरलें. आतां तूं चल आम्हांबरोबर. पुढचें आम्ही तुझें सगळें नीट करूं' मग त्यांनीं मला आपले सरदारापाशीं नेलें. त्यांनीं मला कांहीं प्रश्न केले. त्यांचीं उत्तरें देऊन मी त्यांचे खातरेस उतरलों, तेव्हां त्यांनीं मला तत्काळ

५० रुपये दिले. माझे प्रिये, ह्यां कर्जागळें व्हावें म्हणून असा मी चाकरींत गुंतलों गेलों. मी त्या ५० रुपयांची हुंडी तुजकडे पाठविली आहे. त्यांतील एक दमडी ठेविली नाहीं. तर हे घेऊन वीस रुपये कर्ज आहे तें पहिल्यानें फेड. बाकीच्यांचें तुझे मनास येईल तें कर. तूं नीटपणें रहा, आपली शरीरप्रकृति सांभाळ, मुलांस चिरगुटें कर, त्यांस शाळेंत पाठवीत जा. त्वां जपून खर्च केला तरी इतके पैसे फार दिवस पुरणार नाहींत हें मी जाणतों. पण धीर धर. माझी तैनात महिना पांच रुपये आहे, त्यांतलें कांहीं मागें पाडून कांहींका महिन्यांनीं तुला आणखी मी पाठवीन. लष्कराबरोबर परत येईन तेव्हां धावत आधीं मी तुझे भेटीस येईन. माझे साध्वी स्त्रिये, तूं दुःख करूं नको. भगवंतावर विश्वास ठेव. तो लवकरच आपणांस सुखी करील. मुलांस चांगला मार्ग लाव. त्यांना बाहेर उनाड मुलांकडे जाऊं देऊं नको. तूं स्वतः उद्योग करीत ऐस. मुलांसहवर्तमान देवास भजत जा. त्यांस सुमार्ग शिकीव, कीं जेणेंकरून तीं भलीं होतील. तूं हें सर्व करावयास योग्य आहेस, ह्याविषयीं मला संदेह नाहीं. ईश्वरास भीत जा; त्याजकडें तूं मजविषयीं प्रार्थना कर, आणि मी तुजविषयीं करीन. पत्राचें उत्तर लौकर पाठीव. तूं रामचंद्रशेट ह्यांजकडे पत्र आणून दे. ते मी असेन तेथें पाठवितील. दोघां मुलांस माझा आशीर्वाद सांग. जगूस सांग कीं, तूं चांगला चालशील तर मी येतेसमयीं कांहीं तुजकरितां आणीन. ईश्वर तुझें कल्याण करो. मजवर तुझी आहे तशी प्रीति असो."

सदाशिव काशिनाथ छत्रे.

४० कां न सदन बांधावें कीं त्यांत पुढें बिळें करिल घूस ?
मोरोपंत.

आपण घर बांधलें म्हणजे त्यांत पुढें घूस बिळें करील, या भयानें कोणी मनुष्य घर बांधीत नाहीं असें होत नाहीं; त्याप्रमाणें आपण कांहीं काम केलें तर नीच माणसें त्याला नांवें ठेवतील, असें भय न बाळगितां जें कांहीं काम आपणांस करावयाचें असेल तें बेलाशक करावें.

कारण जगांत नीच लोक पुष्कळ आहेत, आणि कोणीं कांहींही काम केलें, तरी ते नीच लोक त्या कामाला नांवें ठेवीतच असतात. यासाठीं अशा माणसांची जर लोकांनीं भीति बाळगिली तर त्यांच्या हातून कोणतेंही काम होणार नाहीं, आणि जगामध्यें ज्ञानवृद्धि आणि सुखवृद्धि होणार नाहीं. आपणांस जी गोष्ट आवश्यक किंवा सुखावह आहे ती केल्यानें आपली नड भागते किंवा आपणास सुख होतें, इतकेंच नव्हे तर त्यापासून परंपरेनें जगालाही उपयोग होतो, परंतु आपण नीच लोकांना भिऊन जर ती गोष्ट केली नाहीं, तर आपण जगांतील सुखाचें परिमाण कमी केलें असें होऊन आपणही त्या नीच लोकांच्या वर्गांत जाऊं. ल्यूथरनें धर्मामध्यें सुधारणा करण्याचें काम अंगीकारिलें, तेव्हां सर्व युरोपखंडांतील लोकांनीं त्याच्याविरुद्ध मोठें काहूर माजविलें; परंतु त्याला न जुमानतां ल्यूथरनें धर्मसुधारणेचें काम नेटानें चालविलें. तेणेंकरून यूरोपखंडांतील लोकांना ख्रिस्ती धर्माचें शुद्ध स्वरूप समजून आलें, व त्यांच्या सुखाची वृद्धि झाली. दुसरें एक उदाहरण ग्यालिलिओचें देतां येईल. ज्योतिषशास्त्राचे खरे सिद्धांत शोधून काढून

ते त्यानें लोकांस सांगितले. तेव्हां नीच लोकांनीं त्याच्याविरुद्ध मोठा गहजब करून त्याचा अतोनात छळ केला; परंतु ग्यालिलिओनें न डगमगतां आपलें काम तसेंच नेटानें चालविलें; त्यामुळें आकाशांतील नक्षत्रादिकांसंबंधाचें खरें ज्ञान प्राप्त झालें. जर ग्यालिलिओ नीच लोकांस भ्याला असता तर जगाचा हा जो फायदा झाला, तो झाला नसता.

दुसरें कारण असें आहे कीं, आपण नीचांस भिऊन एकादें काम करण्यापासून पराङ्मुख झालों, तर आपण भितरेपणाच्या दोषास पात्र होतों. भीतीला योग्य कारण असतां भीति बाळगिली तर तें क्षम्य होतें, इतकेंच नव्हे, तर सुज्ञ लोक त्याबद्दल आपली तारीफच करतात. परंतु नीचांच्या निष्कारण निंदेला आपण भ्यालों तर सुज्ञ लोक आपणांस मूर्ख म्हणतात.

आणखी असें कीं, आपण कांहीं काम करावयास निघालों असतां नीच लोक आपली निंदा करावयास सदा तत्पर असतात. तथापि कर्मधर्मसंयोगानें ही निंदा कधीं कधीं सकारण ठरते. असल्या प्रकारच्या निंदेच्या योगानें आपल्या कामांतील दोष आपणांस कळून येऊन आपली सुधारणा होते. नीचांस भिऊन जर आपण कोणतेंच काम करावयास हातीं घेतलें नाहीं, तर अशा प्रकारें, आपल्यामध्यें सुधारणा होण्याचा मार्गच खुंटतो. नीचांनीं केलेली निंदा कधीं कधीं हितपरिणामी होते, म्हणूनच एका साधुपुरुषानें म्हटलें आहे, “ निंदकाचें घर असावें शेजारीं ! ”

पुष्कळ लोकांचे ठायीं मत्सरादि दुष्ट मनोविकार असतात.

कित्येक नीच लोकांना हे दुष्ट मनोविकार लपवितां येत नाहींत आणि त्यांनीं निंदा केली असतां तींत मत्सर स्पष्ट दिसत असतो, आणि तेणेंकरून तेच लोक उपहासास पात्र होतात. परंतु कित्येक नीच लोक इतके पटाईत असतात कीं, ते आपला मत्सर पूर्णपणें झांकून ठेवतात, आणि साधुपुरुषांच्या सत्कृत्याला विनाकारण नांवें ठेवीत असतात. पहिल्या प्रकारच्या नीच लोकांपेक्षां हे दुसऱ्या प्रकारचे नीच लोक अर्थात् जास्ती भयंकर असतात. कारण, हे दुसऱ्या प्रकारचे नीच लोक संभावितपणाचें पांघरूण घेऊन निंदा करीत असतात. ज्याला असले संभावित नीच लोक ओळखितां येणार नाहींत तो अर्थात् खचून जाईल, आणि हातीं घेतलेलें सत्कृत्य अर्धेंच सोडून देईल. असें करणें बरें नाहीं.

वर केलेल्या निरूपणावरून वाचकांस कळून येईल कीं, सद्धेतूनें प्रेरित होऊन जे लोक आपले दोष दाखवितील त्यांच्या म्हणण्याचा आपण विचार करावा. परंतु जे लोक हाडाचे नीच असतात त्यांना ओळखून त्यांच्या निंदेकडे आपण लक्ष देऊं नये, आणि जें कांहीं करावयाचें आपण योजिलेलें असेल तें नेटानें, उत्साहानें आणि शांत मनानें पुरें करण्याच्या मार्गास आपण लागावें.

विद्याधर वामन भिडे.

---

४१. पेशवाईंतील शिक्षणाची स्थिति.

पेशवाईंतील महाराष्ट्रांत विद्येची स्थिति कशी होती याचा विचार

करूं या. त्या वेळच्या विद्येचे स्थूल मानानें तीन भाग करितां येतील. (१) वैदिक, (२) शास्त्रीय, व (३) व्यावहारिक. वैदिक ब्राह्मण दशग्रंथांचें पठण करीत; षट्शास्त्रांचा जिम्मा शास्त्रीपंडितांनीं घेतला होता; व ब्राह्मणवैश्यादि इतर जन व्यवहाराला उपयोगी जें ज्ञान तें संपादन करीत. वैदिक व शास्त्रीपंडित ह्यांना राजाश्रय असे व व्यवहारिक शिक्षणाच्या शाळेंतील पंतोजींना लोकाश्रय असे. व्यावहारशिक्षणांत अक्षरांचे किते, संसारचोपडी, बरावर्दीगणित, मराठ्यांच्या व मुसलमानांच्या बखरी व तवारिखा, विक्रमबत्तिशी, वेताळपंचविशी, शुकबहात्तरी, लटकचाळिशी, भारत, भागवत व रामायण ह्या " इतिहासग्रंथांतील " आख्यानांच्या मराठी बखरी, रामरक्षादि स्तोत्रें, जमाखर्चाच्या पद्धति, भूमापन, पत्रें लिहिण्याचे मायने, मराठी कविता, वगैरेंचा समावेश होत असे. पुरुषांप्रमाणें अत्यंत कुलीन स्त्रियांनाही लिहितां वाचतां येत असे. व्यवहार–शिक्षण बहुतेक सर्व ब्राह्मणांना, वैश्यांना व उच्चप्रतीच्या मराठ्यांना मिळत असे. गृहस्थ, ब्राह्मण व मराठे ह्यांचे धंद्याच्या मानानें तीन वर्ग करितां येतील:—(१) स्वतःची शेतीवाडी पहाणारे, (२) कारकुनीचा धंदा करणारे, व (३) शिपाईगिरीचा पेशा स्वीकारणारे. ह्या तिन्ही धंद्यांतील लोकांना वर सांगितलेल्या व्यवहारशिक्षणाच्या पलीकडे माहिती म्हटली म्हणजे वयपरत्वें येणाऱ्या अनुभवाखेरीज जास्त कांहीं एक नसे. कारकुनांना व शिपायांना हिंदुस्तानचें भूज्ञान स्वतः हिंडून जें कांहीं मिळेल त्यापलीकडे बिलकूल नसे. हिंदुस्तानव्यातिरिक्त इतर देशांचें भूज्ञान

या लोकांना कांहींच नसे. निपाणीजवळ जोज येथील कुलकर्ण्यांच्या येथें मला एक अठराव्या शतकांतील पृथ्वीचा नकाशा सांपडला. त्यांत सप्तसमुद्रात्मक पृथ्वी शेषाच्या मस्तकावर दिली असून चीन, इंग्लंड, रावणाची लंका वगैरे देशांच्या दिशा स्थूलमानानें बरोबर दाखविल्या आहेत, व हिंदुस्तान चतुष्कोणाकृति काढिला असून तासगांव हिंदुस्तानचा मध्य धरिला आहे. परंतु हें भूगोलज्ञान सभाजनांचें झालें. स्वतः पेशवे व त्यांचे सरदार ह्यांचें भूगोलज्ञान ह्या लोकांच्यापेक्षां अर्थात् जास्त विस्तृत व व्यवस्थित असे. फिरंगी, फराशिस, वलंदेज, डिंगमार, आफ्रंदोर, दुराणी, तुराणी, अरब, गिलचे, हबशी, शामळ, तुर्क, यवन, इराणी, शिद्दी, इंग्रज, मोरस, अफरीदी वगैरे टोपीवाल्यांचे देश व हिंदुस्तानांतील राजांचे छपन्न देश पेशव्यांना व त्यांच्या मुत्सद्यांना कित्येक नांवानें व कित्येक स्वदृष्टीनें माहीत होते. देशोदेशींचे वकील पेशव्यांच्या दरबारीं मोठ्या इतमामानें रहात असत. त्यांजपासूनही त्यांच्या देशांची माहिती पेशव्यांना मिळत असण्याचा अवश्य संभव आहे. हिंदुस्तानांतील निरनिराळ्या प्रांतांचे नकाशे पेशव्यांजवळ असत. लढाया झाल्या म्हणजे तह ज्याअर्थी होत त्या अर्थी पेशव्यांजवळ नकाशे असत हें मुद्दाम सांगण्यांत विशेष मुद्दा आहे असें नाहीं. महाराष्ट्रांत बखरी वाचण्याचा व लिहिण्याचा प्रघात फार असे. तेव्हां मराठ्यांच्या व यवनांच्या इतिहासाचें ज्ञान महाराष्ट्रांत बहुशः सार्वत्रिक होतें असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. पानिपतच्या बखरीचा कर्ता रघुनाथ यादव यानें त्या बखरीच्या १९ व्या पृष्ठावर मराठ्यांच्या सर्वव्यापी

सत्तेचा प्रसार कसाकसा होत गेला व सर्व हिंदुस्थान हिंदूमय करून टाकण्याचा मराठ्यांचा मनोदय होता वगैरे गोष्टी अबदालीच्या तोंडून वदविल्या आहेत. त्यावरून इतिहास व भूगोल ह्यांचें ज्ञान रघुनाथ यादवाला थोडें थोडकें नव्हतें असें दिसून येतें. रूमशाम म्हणजे कुस्तुंतुनिया येथें इ० स० १७३० पासून १७५४ पर्यंत राज्य करणाऱ्या सुलतान महमदाचेंही नांव रघुनाथ यादवाला माहीत होतें असें यावरून ठरतें. भूगोल व इतिहास यांची माहिती बाळाजी बाजीरावाला व सदाशिव चिमणाजीला आपल्या कामापुरती यथास्थित होती यांत संशय नाहीं; परंतु युरोपांत तत्कालिन दरबारांतून म्हणजे पंधरावा लुई, बडा फ्रेडरिक, दुसरा जार्ज यांच्या दरबारांतून व राज्यांतून भूगोलाचें व इतिहासाचें जें ज्ञान त्यावेळीं होतें त्याच्या मानानें पेशव्यांच्या दरबारचें इतिहासाचें व भूगोलाचें ज्ञान अगदींच क्षुद्र होतें हें कबूल करणें योग्य आहे. कपिल, कणाद वगैरे पुराणमुनींनीं प्रणीत शास्त्रांच्या व्यतिरिक्त युरोपांत ठाऊक असलेल्या शास्त्रांचा गंधही पेशव्यांच्या राज्यांत कोणाला नव्हता. पाठशाळा, विद्यापीठें, विद्वत्सभा, अजबखाने, वादसभा, शोधसभा, पृथ्वीपर्यटनें, वगैरे युरोपियन संस्था पेशव्यांच्या राज्यांत नव्हत्या, इतकेंच नव्हे, तर त्या दुसरीकडे कोठें आहेत किंवा काय ह्याचाही महाराष्ट्रांत पत्ता कोणाला नव्हता. या नकारात्मक वाक्याचा इत्यर्थ एवढाच कीं, १८ व्या शतकांतील पूर्वार्धांत व उत्तरार्धांत मराठ्यांची संस्कृति युरोपांतील प्रगत राष्ट्रांच्या संस्कृती-

हून कमी दर्जाची होती. ती कोणत्या गोष्टींत तशी होती त्याचा अंशतः निर्देश वर झालाच आहे.

विश्वनाथ काशिनाथ राजवाडे.

---

४२. भीमसिंग आणि पद्मिनी.

भीमसिंग यानें सिंहलद्वीपाचा चव्हाण राजा हमीरसिंग याचे पद्मिनीनामक कन्येशीं लग्न लाविलें होतें. या पद्मिनीसारखी सुंदर व गुणी स्त्री सर्व राजस्थानांत नव्हती, अशी तिची सर्वत्र प्रख्याति होती. परंतु हें तिचें अपूर्व व अद्वितीय सौंदर्य आणि तिची गुणवत्ता हींच चितोडच्या सिसोदिया वंशावर अनेक संकटें येण्यास कारण झालीं. अल्लाउद्दिनाला चितोडावर स्वारी करण्याचें मुख्य कारण हेंच असून त्यानें चितोडास वेढा दिला; आणि असें बोलणें लाविलें कीं, 'पद्मिनीला माझे स्वाधीन करा, म्हणजे मी चितोडचा वेढा उठवीन. माझें दुसरें कांहीं मागणें नाहीं.' परंतु रजपूत लोकांस आपल्या स्त्रियांची अब्रू आणि पावित्र्य रक्षण करण्यापेक्षां अधिक योग्यतेचें व अभिमानाचें कांहींच नसल्यामुळें अल्लाउद्दिनाचें हें बोलणें त्यांस मान्य होण्याचा कालत्रयींही संभव नव्हता व तसेंच शेवटीं अल्लाउद्दिनाच्या अनुभवास आलें. चितोडचा वेढा घालूनही तेथील राजे ऐकत नाहींत हें पाहून नंतर त्यानें असें बोलणें लाविलें कीं, 'पद्मिनीचें मला दर्शन तरी करवावें मी तिच्या दृष्टिभेटीखेरीज दुसरें कांहीं इच्छित नाहीं.' तेव्हां 'तिचें प्रत्यक्ष दर्शन तर होणार नाहींच, परंतु आरशांतून तिचें दर्शन घडेल.' असें भीमसिंगाकडून त्याला कळविण्यांत आलें, व तें म्हणणें त्यानेंही

कबूल केलें. नंतर अल्लाउद्दीन चितोडास पद्मिनीच्या दर्शनाकरितां आला व आपला हेतु पूर्ण करून म्हणजे आरशांतूनच पद्मिनीचें रूपसौंदर्य निरीक्षून परत निघाला. त्या वेळीं भीमसिंह हा आपल्या थोरेपणाप्रमाणें अल्लाउद्दिनास आपल्या किल्ल्यावरून चितोडा-बाहेर त्याच्या तळापर्यंत पोंचविण्यास त्याजबरोबर गेला होता. परंतु अल्लाउद्दिनानें पूर्वींच व्यवस्था करून ठेविल्याप्रमाणें भीमसिंह आपल्या तळांत आल्याबरोबर त्याच्या लोकांनीं दंगा केला आणि भीमसिंगाचे अंगावर जाऊन तो एकटा पाहून त्यास पकडून कैद केलें. अल्लाउद्दिनानें त्यास असें सांगितलें कीं, ‘ जर तूं पद्मिनी माझे स्वाधीन करशील तर तुझी सुटका होईल. ’ ही बातमी चितोडास किल्ल्यावर पोहोंचतांच मोठा आकांत झाला. पद्मिनीला याविषयीं विचारलें कीं, तूं मुसलमानांकडे जाऊन त्यांच्या स्वाधीन होण्यास खुषी आहेस काय ? तेव्हां त्या साध्वीनें सांगितलें कीं, पतीच्या बंधमुक्तीकरितां मी तसें करण्यास खुषी आहें. मग तिच्या माहेरचे गोरा व बादल या नांवाचे सिंहलद्वीपचे दोघे चव्हाण होते त्यांनीं अशी मसलत केली कीं, पद्मिनीनें स्वतः अल्लाउद्दिनाकडे जाणें तर बिलकुल प्रशस्त नाहीं, व आपणही तिला शत्रूच्या स्वाधीन होऊं देणें बरोबर नाहीं. परंतु अल्लाउद्दिनास असें कळवावें कीं, ‘ तुझा चितोडाभोंवतालचा वेढा उठवून फौज चालती झाली म्हणजे पद्मिनी व तिचे बरोबर, तिच्या दासी व तिची आप्तमंडळी वगैरे येतील व त्यांस तुमचेकडून कोणत्याही प्रकारची तसदी होऊं नये. ’ येणें-प्रमाणें अल्लाउद्दिनास निरोप गेल्यावर तें सर्व म्हणणें त्या कामुकानें

अक्षरशः मान्य करून चितोडचा वेढा उठविला. तेव्हां सातशें पालख्या किल्ल्यावरून पद्मिनीला घेतल्याचें मिष करून निघाल्या. या पालख्यांचे पडदे सोडिले असून आंत एकेक शूर व हत्यारबंद शिपाई मात्र बसविला होता. ह्याप्रमाणें मोठ्या पडदपोशीनें पद्मिनीच्या व तिच्या जनानखान्याच्या सातशें पालख्या अल्लाउद्दिनाच्या गोटानजीक येऊन उतरल्या. आतां पद्मिनी आपल्या हातांत आली, तेव्हां भीमसिंगास घटकाभर त्याचे बायकोबरोबर बोलण्यास व भेटण्यास परवानगी द्यावी, असें पद्मिनीबरोबर आलेल्या मंडळींनें अल्लाउद्दिनाशीं बोलणें लाविलें व त्याप्रमाणें त्यानेंही तें कबूल करण्यास कांकूं केलें नाहीं. भीमसिंगास आपल्या बायकोला भेटण्याची पठाणानें परवानगी दिल्यावर भीमसिंग पद्मिनीच्या जनानखान्याचे गोटांत आला आणि पद्मिनीला पोंचवून कांहीं पालख्या चितोडास परत जावयास निघाल्या होत्या, त्यांतील एका पालखींत बसून तो अल्लाउद्दिनाच्या सैन्यापासून दूर निघून गेला; तों तेथें त्याच्याकरितां एक घोडा तयार करून ठेविलाच होता. त्याचेवर बसून तो चितोडास सुखरूपपणें दाखल झाला. पद्मिनी हातांत आली तथापि भीमसिंगाला सोडूं नये असा अल्लाउद्दिनाचा बेत होता. कांहीं पालख्या अल्लाउद्दिनाबरोबरच पद्मिनीसहवर्तमान दिल्लीपर्यंत जाण्याचें ठरलें होतें, त्याप्रमाणें त्या राहिल्या. इतक्यांत अल्लाउद्दिनानें भीमसिंगास पद्मिनीला भेटून येण्यास इतका उशीर कां लागला, म्हणून भीमसिंगाला बोलावणें पाठविलें. तों कशाचा भीमसिंग! आणि कशाची पद्मिनी! सातशें हत्यारबंद रजपूत वीर

एकदम पालख्यांचे पडदे एकीकडे करून बाहेर पडले, आणि त्यांनीं एकसारखी कत्तल चालविली. तेव्हां रजपुतांचें आणि मुसलमानांचें घोर रण माजलें. नंतर मुसलमान रजपुतांच्या पाठीस लागून चितोडच्या पायथ्याशीं गेले, व तेथेंही मोठी कत्तल उडाली. तींत भीमसिंग आणि पद्मिनी यांची अब्रू रक्षिण्याकरितां बहुतेक प्रसिद्ध शूर लोक पतन पावले.

गोपाळराव हरि देशमूख.

---

४३. विपत्ति.

एकाद्या कामीं यश प्राप्त न झाल्याकारणानें, किंवा अत्यंत आतुरतेनें इच्छिलेली वस्तु न मिळाल्याकारणानें किंवा सुखाचीं साधनें गमावल्यामुळें आलेली जी खिन्नतेची स्थिति तिला "विपत्ति" असें म्हणतात. ह्या स्थितींत मनुष्य असला, म्हणजे त्याच्या मनाला यत्किंचित् उत्साह नसतो, आणि तो निराशेनें अगदीं दडपून गेलेला असतो. अर्थात् अशा स्थितींत आपण असावें अशी इच्छा करणारा मनुष्य जगांत कोणी सांपडणार नाहीं. प्रत्येक मनुष्य सुखस्थितीचीच इच्छा करणार, आणि हें साहजिकच आहे. तथापि विपत्तीचा कांहींच उपयोग नाहीं असें मात्र नव्हे.

विपत्ति जरी भोगकाळीं दुःख देते, तरी शेवटीं ती आपणास हितकारकच होते. डांस वगैरे प्राणी आपणांस अतिशय दुःख देतात, तरी ते आपणांस स्वच्छता राखण्यास भाग पाडतात; त्यामुळें घरांत तसल्या प्राण्यांचा प्रादुर्भाव परिणामीं हितकारक होतो. त्याप्रमाणें विपत्ति ही जरी सर्वांना अप्रिय अशी वाटते, तरी

परिणामीं ती सर्वथैव अहितकारकच असते असें नव्हे. तिच्यापासून आपणांस पुष्कळ लाभ होतात, व त्यांपैकीं कांहीं प्रत्यक्ष भोगकालींच होत असतात.

मनुष्यास विपन्न दशा प्राप्त झाली असतां त्याला पाहिला लाभ हा होतो कीं, त्याचें मन घट्ट होतें, म्हणजे सुखस्थितीचा एकसारखा अनुभव घेत असल्याकारणानें मनाला जो नाजूकपणा आलेला असतो, तो नाहींसा होतो. मन नाजूक असल्यानें मनुष्यास अनेक प्रसंगीं त्रास होतो, तो त्रास मन घट्ट असल्यास टळतो. जगांत भिन्न भिन्न स्वभावांच्या माणसांशीं आपला संबंध येत असतो. आणि आपलें मन नाजूक असल्यास व्यवहार सुरळीतपणें चालणें कठीण असतें. ज्याचें मन नाजूक आहे त्याला भलत्याच कामीं भीड पडते; लबाड मनुष्याशीं सौम्यपणानें वागण्याकडे त्याचा कल असतो, व नालायक माणसांवर विश्वास टाकण्याला तो कचरत नाहीं. परंतु ज्याचें मन जात्या घट्ट आहे, त्याला वरील प्रकारच्या अडचणी व्यवहारांत सहसा येत नाहींत. विपत्तीच्या योगानें मनुष्याचें मन घट्ट होतें, हा कांहीं लहान लाभ नव्हे.

विपत्तीच्या योगानें मनुष्यांच्या मनांत भूतदया उत्पन्न होते. आपलें आयुष्य सुखविलासांत जात असतां सहसा आपणास हीन, दीन, विपन्न मनुष्यांस पाहून कळवळा येत नाहीं, व त्याच्या दुःखाचें शक्य तितकें निरसन करण्याकडे आपली प्रवृत्ति होत नाहीं. परंतु आपण स्वतः विपन्न स्थितींत असल्यास, किंवा आपण पूर्वीं कधीं विपन्न स्थितीचा अनुभव घेतलेला असल्यास, दुसऱ्याचें दुःख पाहून

आपल्या मनांत त्याच्याविषयीं अनुकंपा उत्पन्न होते; कारण, त्याच्या स्थितीशीं आपलें तादात्म्य होतें. त्याच्या स्थितीशीं आपण आपली स्थिति लावून पाहतों, आणि आपल्या स्थितीवरून त्या मनुष्याच्या स्थितीची आपणांस बरोबर कल्पना होते, आणि त्याला यथाशक्ति मदत करण्यास आपण मनापासून झटतों. सुखी मनुष्यास परदुःख शीतळ वाटतें, तसें विपन्न स्थितीचा अनुभव घेतलेल्या मनुष्यास वाटत नाहीं. सारांश, विपत्तीच्या योगानें मनाचा आकुंचित-पणा नाहींसा होतो, आणि त्याला "वसुधैव कुटुंबकम्" असें वाटूं लागतें.

विपत्तीच्या अनुभवानें आपणांस आणखी एक फायदा होतो. तो हा कीं, आपणांस सुखाची खरी योग्यता कळूं लागते. आपल्या सुदैवानें आपणांस एकसारखें सुखच अनुभवावयास मिळत असलें म्हणजे त्याची किंमत आपणांस कळेनाशी होऊन आपला जन्म सुखासाठींच होय, अशी मूर्खपणाची आपली कल्पना होते, आणि पुढें पुढें तर तें सुखच आपणांस कंटाळवाणें वाटूं लागतें. परंतु आपणास मधून विपत्तीचा अनुभव आलेला असल्यास आपल्या सुखाची चव वाढते. रात्रीं दिव्याचा प्रकाश आपणांस उज्ज्वल दिसतो आणि दिवसास फिका दिसतो; त्याचप्रमाणें विपत्तीच्या नंतरचें किंवा अगोदरचें सुख आपल्या मनास मोठ्या किंमतीचें वाटतें, व त्या सुखाबद्दल आपण ईश्वराचे उपकार मानतों. सुखी मनुष्यास ईश्वराचें स्मरण होत नाहीं. विपन्न मनुष्याला ईश्वराचा कधींही विसर पडत नाहीं.

विपत्तीविषयीं विचार केला असतां आपणांस हें कबूल करावें लागेल कीं, विपत्ति ही सर्वथैव वाईट आहे असें नव्हे; मात्र ती प्रसंगविशेषापुरतीच असावी.

विद्याधर वामन भिडे.

---

४४. तुकारामबोवांची गोष्ट.

कुटुंबपोषणासाठीं लहर आल्यास एकादा उद्योग किंवा धंदा-उदीम करावयाचा असा बोवांचा या संक्रमणस्थितींत क्रम होता. परंतु 'भिक्षांदेही'चा अवलंब करावयाचा नाहीं-आपला भार दुसऱ्यावर टाकून त्यास कष्टवावयाचें नाहीं—असा त्यांचा बाणा होता. बायकोनें किंवा भावानें 'कुटुंबाची कांहीं सोय लावा,' म्हणून तगादा लाविला म्हणजे स्वारी एकादा धंदाबिंदा पत्करण्याच्या भरीस पडे.

एकादां अशा स्थितींत तुकारामबोवा इंद्रायणीच्या तीरीं विठोबाच्या देवळांत भजन करीत असतांना एक शेतकरी आला व त्यानें बोवांस सांगितलें कीं, "बोवा ! मला मालाची खेप आणण्याकरितां बाहेरगांवीं जावयाचें आहे. येथें माझा महिना मोडेल; पण इकडे माझें शेत पिकाला आलें आहे; त्याची राखण करण्याला कोणी नाहीं, त्यामुळें जरा पेंचांत आहें. तुम्ही शेताची राखण करीत असलां, तर माझें काम होईल व तुम्हांलाही अर्धा मण धान्य मिळेल." बोवांना वाटलें कीं, आपण शेतावर बसूनच एकीकडे राखण करूं व एकीकडे भजन करूं; म्हणजे थोडेंसें धान्य मिळालें तर बायकोचें मन जरा गार होईल. असा विचार

करून बोवांनीं शेतकऱ्याची कामगिरी पतकरली. बोवा माळ्यावर राखण करायला बसले; पण भगवद्भजनांत त्यांची ब्रह्मानंदीं इतकी टाळी लागूं लागली कीं, पांखरांचे थवेच्या थवे शेतावर येऊन पडूं लागले, तरी तें बोवांच्या गांवींही नाहीं ! पुढें महिन्याभरानें शेतकरी बाहेरगांवाहून आला व पाहतो तों, शेत पांखरांनीं फुललें आहे ! मग अधिक पाहणी न करतां, त्यानें बोवांना धक्काबुक्की व शिवीगाळ करीत खेंचीत गांवांत आणिलें व पंचाईत करून नुकसानीच्या भरपाईसाठीं कसा तरी दोन खंडी दाण्यांचा रोखा त्यानें बोवांजवळून करून घेतला व शेतांतील उभें पीक त्यांच्या स्वाधीन केलें. शेतामध्यें पांखरांची पखरण पाहिल्यामुळें त्या शेतांत पिकाचा दाणाही शपथ वाहयला हातास लागावयाचा नाहीं अशी त्या शेतकऱ्याची पक्की भावना झाली होती. परंतु देवाची योजना कांहीं निराळीच होती ! त्या सालीं शेतांतील तणाची मळणी काढल्यावर गल्ल्याची उभी रास दरवर्षापेक्षां अतिशयच मोठी झाली.. एकंदर पीक १७ खंडी उतरलें ! मग मात्र त्या शेतकऱ्याच्या तोंडाला पाणी सुटलें, परंतु गांवकऱ्यांनीं त्याची मात्रा चालूं दिली नाहीं, व दोन खंडींच्यावर एक दाणाही त्याला कपाळीं लावावयास मिळाला नाहीं. पंधरा खंडी गल्ला घरीं आला, तेव्हां अदलाईस फार समाधान व कौतुक वाटलें व तिनें समाधानाचे उद्गार काढले.

बाळकृष्ण अनंत भिडे.

---

४५. देवमासा.

देवमासा हा जगांतील अत्यंत मोठा प्राणी आहे. त्याची लांबी ७० फूट असून शरीराचा घेर ४० फूट असतो. सर्व शरिराच्या तिसऱ्या हिश्शाएवढें त्याचें डोकें असतें. शेंपूट ६ फूट लांब व पूर्ण पसरलें असतां २० फूट लांब असतें. जबडा पूर्ण उघडा असतां तो १६ फूट लांब, ७ फूट रुंद आणि १२ फूट उंच असतो. जबड्यांतील हाडें, (जनावरांच्या दातांच्या जागचीं) सुमारें ७०० किंवा ८०० असून सुमारें १२ फूट लांब असतात. त्या हाडांचा घेर बुडाशीं एक फूट असून अग्रांशीं त्यांना फणीप्रमाणें दाते असतात. देवमाशाच्या अंगावरचें कातडें फारच जाड असतें. त्याला तीन पदर असून आंतला पदर बाहेरच्या दोन पदरांपेक्षां फारच जाड असतो. त्यांत तेल खूप सांठलेलें असतें.

देवमासा हा जरी पाण्यांत राहणारा प्राणी आहे, तरी त्याच्या शरिराची रचना आणि जीवनव्यापार, हीं साधारण माशांच्याहून वेगळ्या तऱ्हेचीं असतात. कारण, देवमाशाची उत्पत्ति घोडा, मनुष्य, हत्ती, वगैरेंच्याप्रमाणें*जरायूपासून होते. साधारण माशांची उत्पत्ति कावळा, चिमणी, साप वगैरेंच्याप्रमाणें अंड्यापासून होते. देवमाशाची श्वसनाक्रिया फुफ्फुसांच्या द्वारें चालते, साधारण माशांची कल्ल्यांच्या द्वारें चालते. म्हणून देवमाशाला वारंवार उघड्या हवेंत नाक काढावें लागतें. साधारण माशाला पाण्यांत राहूनच श्वासोच्छ्वास करतां येतो. देवमाशाचें रक्त उष्ण असतें; साधारण

* जरायू—वार.

माशाचें थंड असतें. देवमासा आणि साधारण मासा ह्यांच्यांतील हे मुख्य भेद झाले; बारीकसारीक भेद दुसरे पुष्कळ आहेत.

देवमाशाचें शरीर फारच जाड असतें, ह्यामुळें त्याला तें हवें तसें वळवितां किंवा मुरडतां येत नाहीं. त्याचें नाक त्याच्या डोक्यावर असतें, आणि तो पाण्यांतून उसळत बाहेर पडत असतां ह्या नाकांतून पाणी अत्यंत जोरानें उंच उडतें, आणि त्याला प्रचंड कारंज्याचें स्वरूप येतें. त्याचा घसा त्याच्या अवाढव्य शरीराच्या मानानें फारच लहान असतो. म्हणून त्याची उपजीविका अगदीं लहान लहान माशांवर चालते. त्याला खाण्याची अवश्यकता वाटली, म्हणजे तो आपला जबडा पूण उघडून पाण्यांतून जोरानें पुढें सरकत जातो, तेणेंकरून पाण्याबरोबर बारीक बारीक मासे त्याच्या तोंडांत येतात. मग जबडा मिटून तो दांतांच्या फटींतून पाणी बाहेर सोडून देतो; तेव्हां अर्थात् पाण्याबरोबर आलेले मासे मागें अडकून राहतात; व ते तो हळू हळू एकामागून एक गिळून टाकतो.

देवमासा पकडण्याचा प्रकार पुढें दिल्याप्रमाणें असतो. उत्तर ध्रुवाकडील समुद्रांमधील देवमाशांना पकडण्याच्या कामाला मे महिन्यांत सुरवात होऊन तें काम आगष्ट महिना सरेतोंपर्यंत चालत असतें. देवमासे पकडणाऱ्या प्रत्येक होडीवर एक एक भालेवाला असतो. देवमासा दिसल्याबरोबर होडीवरचा भालेवाला त्याच्या अंगांत आपला भाला खुपसतो. हें काम मोठ्या धोक्याचें

असून तें फार कौशल्यानें करावें लागतें, आणि तेंही तो देवमासा आपल्या शेपटीचा तडाखा पाण्यावर मारावयाच्या अगोदर करावें लागतें. भाला त्याच्या अंगांत खुपसल्याबरोबर तो वेदनेनें समुद्रांत बुडी मारतो. अर्थात् त्याच्या अंगांत खुपसलेला भालाही त्याच्या बरोबर जातो. ह्या भाल्याच्या दुसऱ्या टोंकाला दोर बांधलेला असतो. हा दोर एका रहाटाभोंवतीं गुंडाळलेला असल्यामुळें देवमासा जितका लांब जाईल, तितक्या लांबीचा दोर रहाटावरून भरभरा उलगडत जातो. हें होत असतां बाकीच्या पांच होड्या (ज्या समुद्रांत इकडे तिकडे पसरलेल्या असतात त्या) ह्या होडीच्या मदतीला येतात. कांहीं वेळानें देवमासा श्वासोच्छ्वास करण्यासाठीं समुद्राच्या पृष्ठभागाला येतो, आणि तो आल्याबरोबर पुनः आणखी एक भाला त्याच्या अंगांत खुपसतात; नंतर पुन्हां देवमासा वेदनेनें पाण्यांत बुडी मारतो. परंतु ही बुडी पहिल्या बुडीइतकी खोल व लांब नसते. अशा रीतीनें त्याला चार पांच जखमा झाल्या, म्हणजे तो मरतो आणि त्याचें मृत शरीर खालीं पाठ आणि वर पोट होऊन पाण्यांत तरंगूं लागतें. मग त्याला ओढून गलबतावर घेतात, आणि त्याचें शरीर फाडून त्याच्या जबड्यांतील हाडें आणि अंगांतील चरबी काढून घेतात.

देवमाशाच्या शरीराच्या प्रत्येक भागाचा मनुष्याला कांहीं ना कांहींतरी उपयोग होतो. थंड देशांतील लोक त्याची चरबी पितात आणि त्याचें मांस व कातडेंही शिजवून खातात. शिवाय त्याच्या

जबड्यांतील हाडांचा उपयोग हातांत धरावयाच्या छड्या, फण्या, चाकूच्या मुठी, वगैरे पदार्थ करण्याकडे होतो.

विद्याधर वामन भिडे.

---

४६. चित्रकूट.

आग्रा आणि अयोध्या या संयुक्त इलाख्यांत बांडा या जिल्ह्यांत चित्रकूट हा पर्वत आहे, तसेंच त्या नांवाचें एक गांवही त्याच्याजवळ आहे. हें अलाहाबादेजवळ नैर्ऋत्येस वीस कोसांवर आहे. तेथें जाण्यास कर्व्हीं ह्या स्टेशनावर उतरावें लागतें. त्या स्टेशनापासून थोड्या अंतरावर एक मोठा तलाव लागतो. तो श्रीमंत बाजीराव पेशव्यांनीं बांधला आहे, आणि त्याच्या नजीक एक मोठें किल्ल्यासारखें त्यांचें घरही आहे. त्यांत आतां त्या तालुक्याचे तहशीलदार राहतात.

तेथें जंगल पुष्कळ आहे. त्यांत श्वापदें फिरत असतात. त्यांच्या शिकारीस लोक तिकडे जातात. हें स्थळ अगदीं निवांत आहे, म्हणूनच दाशरथी राम तेथें जाऊन बारा वर्षें राहिले होते. या जंगलामध्यें आतां हत्ती आढळत नाहींत. तेथें प्राचीनकाळीं पुष्कळ ऋषि रहात असत; आणि सध्यांहि कितीएक तपस्वी त्या ठिकाणीं आहेत.

त्या प्रांतांतले लोक मोठे शूर आहेत ही आख्या फार जुनी आहे. तो प्रदेश डोंगराळ आहे. पर्जन्यकाळीं पुष्कळ नद्या आणि ओहोळ घो घो घो त्याच्यामधून वाहात असतात. तेथलीं खोरींही

फार खोल आणि भयंकर दिसतात. ते डोंगर आणि तीं खोरीं तेथल्या मूळच्या शूर लोकांचीं आश्रयस्थानें आहेत. त्यांच्या योगानें कितीएक वेळां परचक्रापासून त्यांचें संरक्षण झालेलें आहे.

कलिंजर हें गांव त्यापासून जवळच आहे. तें इतिहासप्रसिद्धच आहे. त्यास गिझनीच्या महमुदानें वेढा घातला होता; पण तें त्याला घेतां आलें नाहीं. तें महंमद घोरी याचा सरदार कुतुबुद्दीन ह्यानें घेतलें होतें. ह्यालाच वेढा घालून शीरशहा बसला असतां, तोफेचा गोळा लागून मरण पावला. हा प्रांत इ० स० १७३५ मध्यें बाजीराव पेशव्यांस मिळाला होता, आणि नंतर मग तो इंग्रज सरकारच्या ताब्यांत आला. ह्यांत भील आणि कोल या लोकांची वस्ती पुष्कळ आहे. हे लोक रामायणांत वर्णन केल्याप्रमाणें मोठे बळकट, कंटक आणि शूर आहेत. ते आपलीं कामें मनापासून करितात. ते कधीं रिकामे बसत नाहींत.

खरें खरें चित्रकूट हें ठिकाण लहानसें गांव आहे. त्यांतील लोकांस पांडे म्हणतात. तेथें थोडींशीं लहान लहान वाण्यांचीं दुकानें आहेत. तेथें यात्रेकरूंस खाण्यापिण्याचे पदार्थ मिळतात. जवळच मंदाकिनी नदी आहे. तिचें पाणी फार स्वच्छ आणि गोड आहे. तें एक तीर्थ समजतात. त्या गांवांत माकडें मनस्वी आहेत. तीं लोकांना फार त्रास देतात.

चित्रकूट हें वैष्णवांचें मोठें पवित्र स्थान आहे. ते येथें यात्रेस फार येतात. त्यांस रामनवमी आणि भ्रातृद्वितीया हीं दोन पर्वें फार मोठीं वाटतात. येथें लहानमोठीं देवळें पुष्कळ आहेत.

त्यांतल्या बहुतेकांस इनामें आहेत. त्यांतलीं कांहीं इंग्रजी अमलांत आहेत; आणि कांहीं एतद्देशीय संस्थानांत आहेत. त्यांचें सर्वांचें मिळून उत्पन्न दरसाल सवा लाखाचें आहे. ह्यांतल्या पुष्कळ देणग्या पन्ना येथील राणीच्या आहेत. येथें पूर्वीं पुष्कळ महात्मे राहात असत आणि ते फार कर्मठ असत. तें मान आतां कांहीं राहिलें नाहीं. हा कालमहिमा !

पांडे लोक हे पिढीजाद क्षेत्रोपाध्ये आहेत. ते प्रथमतः यात्रेकरूला मंदाकिनी नदीवर घेऊन जातात. हिला ते सुरसरित् म्हणजे देवनदी म्हणतात. हिचा जाण्याचा मार्ग फार खडकाळ असल्यामुळें स्नानसंध्यादिकर्मांस तीवर जाण्यास ऋषिजनांस फार त्रास पडत असे, तो न पडावा म्हणून, अत्रिऋषींची भार्या अनसूया हिनें आपल्या तपश्चर्येच्या बळानें तेथें जवळच त्या पर्वतांत दुसरी एक नदी निर्माण केली अशी दंतकथा आहे. अत्रिऋषींचा आश्रम कोठें होता, तें स्थळही ते मोठ्या भक्तिभावानें दाखवितात. मंदाकिनीचा एक मोठा फाटा एका डोंगरांतून वाहातो; त्यास अद्यापही अनुसयापर्वत हें नांव चाललें आहे. हा पर्वत त्या गांवच्या आग्नेयीस चार पांच कोसांवर आहे. श्रीरामचंद्रांनीं आपल्या वडिलांचें पिंडप्रदान राजघांटानजीक ह्याच नदीवर केलं म्हणतात, आणि पांडे लोकांचा नेहमीं यात्रेकरूंस असा आग्रह असतो कीं, त्या ठिकाणीं आपल्या वडिलांस पिंड देणें हें महत्पुण्य अवश्य जोडावें. ही नदी इंग्लिशांचा खास मुलूख आणि अजयगड संस्थान ह्यांचेमध्यें मर्यादेसारखी आहे. ह्या घांटाच्या वरच्या बाजूस

दोन झोंपड्यांची जागा आहे, तेथल्या झोंपड्यांत श्रीरामचंद्रांनी पुष्कळ दिवस वास केला होता म्हणतात. त्या झोंपड्यांच्या जागीं आतां दोन लहान देवळें आहेत. त्यांनीं त्या स्थळाची शोभा गेली आहे. त्या देवळांजवळ दुसरें एक मोठें देऊळ आहे. त्यांत श्रीरामचंद्रांनीं यज्ञ केला होता म्हणून सांगतात.

रामचंद्रांच्या वेळेपासून तर चित्रकूट हें मोठें पुण्यक्षेत्र म्हणून पुराणादिकांत प्रसिद्धच आहे. पण तेथें त्याच्या आधीं देखील त्याची अशीच प्रसिद्धि होती, आणि तेथें पुष्कळ ऋषि राहात असत असें दिसतें. येथें कामथनाथ म्हणून एक डोंगर आहे, तेथें पुष्कळ यात्रेकरू जातात. कां कीं, त्यावर रामचंद्रांनी बारा वर्षें तपश्चर्या केली अशी आख्यायिका आहे. हा पर्वत बराच उंच आहे; आणि ह्याच्या पायथ्याच्या आसपास सुमारें तीनशें लहान मोठीं देवळें आहेत. तीं अजयगड आणि पन्ना येथील राजांनीं बांधलेलीं आहेत. ह्या पर्वताच्या जवळच एक टेंकडी आहे. तिजवर लक्ष्मण राहून सीताबाईस सोबत करीत असे. ह्यापासून दोन तीन कोसांवर रामघांटाच्या पूर्वेस एका टेंकडीच्या २९२ पायऱ्या चढून गेल्यावर एक झरा लागतो. त्याला कोटितीर्थ म्हणतात. त्याचें पाणी फार गार आणि निर्मळ असतें. त्यांत स्नान केल्यानें दमून भागून आलेल्या यात्रेकरूंचा सगळा शीण हरून जातो. तें पाणी फार गोड आहे. तें पिऊन फार आनंद होतो. त्याच्यापुढें थोडें गेलें नाहीं तोंच सरस्वतीकुंड लागतें. तो एक झराच आहे. त्याच्याजवळ एक देऊळ आहे, त्याला देवकन्यकास्थान म्हणतात. तेथून कोस दीड

कोस उतरून खोऱ्यांत जावें. तेथें एक झरा दृष्टीस पडतो. त्याला हनुमानधार असें म्हणतात. हें ठिकाण लंकेहून परत अयोध्येस येत असतां, रामचंद्रांनीं हनुमंतास दाखवून तेथें तपश्चर्या करावी म्हणून सांगितलें होतें म्हणतात. त्या झऱ्याच्या खालीं मारुतीची एक भली मोठीं मूर्ति खोदली आहे.

त्यापासून कांहीं अंतरावर भरतकूप म्हणून एक मोठी विहीर दाखवितात. तिजविषयीं अशी कथा आहे कीं, रामचंद्रांस राज्याभिषेक करण्याकरितां अनेक तीर्थांचें जें पाणी आणिलें होतें, तें भरतानें त्या विहिरींत टाकिलें.

विनायक कोंडदेव ओक.

---

४७. गृहशिक्षा.

सद्वर्तन अंगीं बिंबण्यास घर ही मुख्य शाळा होय. प्रत्येक मनुष्यास नीतीचें किंवा अनीतीचें वळण लागतें तें प्रथमतः घरीं लागतें. हें घरीं लागलेलें वळण जन्मभर त्याच्या अंगीं लागलेलें रहातें. मनुष्यास जशी घरची शिक्षा चांगली किंवा वाईट असेल, तसा तो होतो. गृहशिक्षा हाच सद्वर्तनाचा पाया होय. सद्गुणाची आवड व दुर्गुणाची नावड, सभ्यपणाची गोडी, छिचोरपणाचा तिटकारा, विद्येची अभिरुचि व आळसाचा कंटाळा, या सर्व गोष्टी घरीं अंगीं बिंबतील त्याप्रमाणें मनुष्य पुढें चांगला किंवा वाईट निपजेल.

देशांतील लोकांत ज्या चांगल्या किंवा वाईट चाली आहेत.

त्यांस सुद्धां गृहशिक्षाच कारण आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. किंबहुना कायदेकानू चांगले किंवा वाईट होण्यास देखील गृहशिक्षाच कारण आहे म्हटलें तरी चालेल. कारण देशांत कोणतीही चाल पाडणें किंवा कायदेकानू करणें हें पुढारी लोकच करतात. तेव्हां अर्थात् त्यांस जशी गृहशिक्षा मिळाली असेल, त्याप्रमाणें त्यांच्या हातून या गोष्टी होतात. याकरितां राज्यकारभार करणाऱ्यांपेक्षांही मुलांस शिकविणारे फार चांगले असले पाहिजेत.

मनुष्यास इतर लोकांशीं वागण्यापूर्वी घरच्या माणसांशीं वागण्याचा प्रसंग येतो. हा सृष्टिक्रमच आहे. यासाठीं त्याचें वर्तन घरींच चांगलें झालें पाहिजे, म्हणजे सहजच तो लोकांत चांगला वागेल. घरच्या मनुष्यांशीं जितके वेगळाले प्रसंग मनुष्यास आहेत तितके लोकांशीं नाहींत. याकरितां घरांत जो चांगला असतो, तो लोकांतही चांगला होतो. यामुळें गृहशिक्षा ही देशाच्या सुधारणेचा पाया आहे असें म्हटलें तरी चालेल. कारण ज्या देशांत चांगले लोक आहेत, त्यास सुधारलेला देश असें म्हणतात. चांगले लोक निपजण्यास गृहशिक्षा कारण आहे; तेव्हां अर्थात् गृहशिक्षाच सुधारणेचा पाया होय. आपल्या सद्वर्तनानें घरांतील बायका, मुलांस सन्मार्ग न दाखवितां घरीं यथेच्छ आचरण करून विद्याप्रसार झाला पाहिजे, स्त्रीशिक्षण वाढलें पाहिजे, असा वर्तमानपत्रांत गोंगाट करून उपयोगी नाहीं. ठरींव नियमांप्रमाणें परीक्षेंत उतरल्यानें कृतकृत्यता न मानतां, ग्रंथसंपादित ज्ञानाचा उपयोग उदाहरणरूपानें आधुनिक विद्वान् करून दाखवूं लागले तर सुधारणा शीघ्र गतीनें चालूं लागेल.

मनुष्य कितीही बुद्धिमान् असला तरी लहानपणीं तो ज्या लोकांत वागलेला असेल त्यांचे कांहीं तरी गुण त्यामध्यें आल्याशिवाय राहणार नाहींत. मनुष्य जन्मास येतो तेव्हां तो चांगला किंवा वाईट नसतो. त्याचा चांगुलपणा किंवा वाईटपणा जे त्याचें पालन-पोषण करितात किंवा त्यास शिक्षण देतात, त्यांच्या आचरणावर अवलंबून आहे. जन्मास आल्यापासून मनुष्याचें शिक्षण सुरू होतें. एका आईचा चार वर्षांचा मुलगा होता. तिनें एका विद्वानास विचारलें कीं, "महाराज, मुलाच्या शिक्षणास आरंभ केव्हां करावा ?' विद्वानानें उत्तर केलें. "बाई, अजून त्वां आरंभ केला नाहीं का ? तर मग हीं चार वर्षे फुटक गेलीं. मुलाचा जन्मकाळ हाच त्याच्या शिक्षणाचा प्रारंभकाळ होय."

मुलें ज्या गोष्टी पाहतात किंवा ऐकतात, त्यांचें तीं अनुकरण करतात. अनुकरण हेंच त्यांचें प्रथम शिक्षण होय. उदाहरण हाच त्यांचा मोठा गुरु होय. लोकांस या अनुकरणाचें माहात्म्य विशेष वाटत नाहीं. पण त्याचा अंमल जन्मभर राहतो. लहानपणीं मुलांचा स्वभाव बनतो तसाच पुढें राहतो. प्रौढपणींच्या शिक्षणानें मनुष्यास कितीही सद्गुण प्राप्त झाले तरी बाळपणाचा स्वभाव पालटत नाहीं. म्हणूनच 'जो गुण बाळा तो जन्मकाळा' अशी म्हण पडली आहे. लहानपणीं मुलांस ज्या गोष्टी शिकवाव्या, त्या त्यांच्या मनांत चांगल्या दृढ बिंबून शेवटपर्यंत तशाच राहतात. सद्गुण किंवा दुर्गुण यांचें बीजारोपण याच वेळेस होतें. यासाठीं सद्वर्तनाचा पाया घालण्याचा मुख्य काळ बाळपण होय.

विष्णु मोरेश्वर महाजनी.

४८. अबदुल रहिमान.

अमीरसाहेबांस करमणूक हवीशी वाटत असे. पण त्यांस मुळीं बनतच नसे. तरी मधून मधून ते वाद्य, गान, बुद्धिबळें खेळणें, गोष्टी सांगणें इत्यादिकांकडे थोडें थोडें लक्ष देत. गायनवादन चालत असे, त्यानें भोंवतालच्या मंडळींस मात्र पुष्कळ करमणूक होत असे. स्वतः अमीरसाहेबांस गायनवादनांत बरेंच गम्य होतें. जे कोणी प्रामाणिक आणि मनापासून काम करणारे सेवक अमीरांस वाटत, त्यांशीं ते अगदीं उघड्या मनानें, मित्राच्या नात्यानें, प्रसंगोपात्त थोडाबहुत विनोद करून, प्रेमानें वागत. परंतु जे विश्वासघातकी व तोंडपुजे असत त्यांस अमीरसाहेब केवळ काळ होते. त्यासंबंधानें त्यांच्या बोलण्यांत सादी कवीचें एकवचन नेहमीं येत असे. त्याचा आशय असा आहे कीं, " जे कोणी शांततेस विघ्नें आणितात, त्यांस ममताळूपणानें वागविणें हें जे कोणी शांत वृत्तीनें राहावयास इच्छितात, त्यांचें शत्रु होणें आहे. " खरें आहे.

अमीरसाहेबांना बिछान्यावर पडल्याबरोबर झोंप लागत नसे, म्हणून जो एक वाचक नेमलेला असे, तो इतिहास, भूगोलविद्या, चरित्रें, राजकारणें इत्यादि विषयांवरचे ग्रंथ वाचीत जवळ बसे. तें अमीरसाहेब लक्षपूर्वक ऐकत असत. ह्याविषयीं अमीरसाहेबांनीं म्हटलें आहे:-हें ग्रंथश्रवण फार लाभदायक आहे. त्यानें ज्ञानवृद्धि होते. शिवाय, प्राचीन काळच्या लोकांचे विचार कसे होते, आणि ते बदलत बदलत आतां कसे झाले आहेत, हें समजतें. आणखी

गडबडींत झोंप लागण्याची संवय लागते, हा एक मोठा फायदा आहे. लढायांत तोफांचे गडगडाट चालले असतांही मला गाढ झोंप येते. झोंप अगदीं जवळ घजलीशी वाटली म्हणजे हें वाचणें बंद होऊन कोणी नेमलेला माणूस कांहीं चमत्कारिक गोष्टी सांगूं लागे. त्या गोष्टींच्या नादानें अमीरसाहेबांस गाढमूढ झोंप लागे, आणि मग बरें वाटे. म्हणून त्या गोष्टी तो सकाळीं अमीरसाहेब जागे होतपर्यंत सांगत बसे.

अमीरसाहेब फावल्या वेळांत लिहीत असत. त्यांचे कितीएक ग्रंथ काबूलच्या छापखान्यांत छापून प्रसिद्ध झाले आहेत. त्यांस पुष्टू म्हणजे अफगाण लोकांची मूळ भाषा, फारशी, तुर्की, रशियन, अरबी आणि हिंदुस्थानी, अशा भाषा येत. त्यांस सगळे विषय आवडत; आणि सर्व प्रकारचें ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न ते करीत. त्यांना कोणी माणूस भेटो—मग तो त्यांच्या देशांतला असो कीं परदेशांतील असो—त्यास उलट सुलट नानाप्रकारचे प्रश्न करून त्यास येत असत त्या विषयांची माहिती ते मोठ्या आगत्यानें मिळवीत. ते म्हणत, "प्रत्येक माणसापासून मी कांहींना कांहीं तरी नवें शिकतों."

ह्यावरून हें सहज दिसून येईल कीं, अमीर अबदुल रहिमान हे आपल्या राज्याच्या कामास जगदीं वाहिलेले होते, आणि त्याशिवाय त्यांना दुसरें कांहींएक त्यांच्या डोळ्यांसमोर दिसत नसे. फार काय सांगावें, ते आपल्या सुखाकडे पाहात नसत. आपल्या जिवाची परवा करीत नसत. आणखी दुसरी मोठी लक्षांत ठेवण्या-

सारखी जी गोष्ट ह्या भागावरून दिसते, ती ही कीं, शिक्षण म्हणजे काय आणि तें माणसाच्या स्थितीच्या अनुरोधानें कसें वेगवेगळ्या प्रकारचें पाहिजे, हें त्यांस उत्तम प्रकारें कळत होतें. आपल्या चिरंजीवांस आपल्या पश्चात् अफगाणिस्तानचें राज्य चालवावयाचें आहे, ह्यास्तव तें काम त्यांना करितां येईल असें शिक्षण त्यांस देणें आवश्यक आहे, आणि पुस्तकी शिक्षण कांहीं कामाचें नाहीं, तर प्रत्यक्ष अनुभवानें मिळालेलें शिक्षण पाहिजे, असें मनांत आणून राज्यांतील बरींच मोठमोठीं खातीं हबिबुल्लाखान आणि नासरुल्लाखान ह्यांच्या स्वाधीन त्यांनीं केलीं होतीं व त्यांच्या कामावर ते फार बारीक नजर ठेवीत असत; ही गोष्ट सामान्य नव्हे.

विनायक कोंडदेव ओक.

---

४९. जत्रा.

वर्षाच्या कांहीं ठराविक दिवशीं आणि कांहीं ठराविक ठिकाणीं जत्रा भरविण्याचा परिपाठ आपल्या देशांत आज हजारों वर्षांपासून चालत आलेला आहे, आणि आजमितीसही हिंदुस्थानांत हजारों ठिकाणीं जत्रा भरत असतात. मौर्यवंशीय चक्रवर्ती अशोक —ज्याला कमींत कमी दोन हजार वर्षें झालीं—त्यानें खोदविलेल्या शिलालेखांत जत्रांचा उल्लेख आहे. यावरून त्याच्याही पूर्वीं हजारों वर्षांपासून आपल्या देशांत जत्रा भरविण्याची, चाल असली पाहिजे हें स्पष्ट आहे. आपल्या पूर्वजांनीं सुधारणेचीं, शिक्षणाचीं, व्यापारवृद्धीचीं व ज्ञानप्रसाराचीं, जीं स्वयंप्रेरणेनें चालणारीं यंत्रें उत्पन्न केलीं, त्यांपैकीं जत्रा हें एक होय.

एकाद्या सणाच्या किंवा देवाच्या निमित्तानें, किंवा एकाद्या साधुपुरुषाच्या पुण्यतिथीसंबंधानें, आपल्या देशांत जत्रा भरत असतात.

जत्रांचे अनेक उपयोग आहेत, त्यांपैकीं कांहीं खालीं नमूद करतों.

१. जत्रांचा पहिला उपयोग हा आहे कीं, एकादा सण म्हणून पाळावयाच्या दिवशीं पूर्वीं कोणत्या देवानें किंवा महात्म्यानें कोणकोणते पराक्रम केले किंवा लोककल्याणाचीं कामें केलीं, कोणत्या साधुपुरुषानें आपली आध्यात्मिक उन्नति करून लोकांस सद्वर्तनक्रम कसा उपदेशिला, वगैरेसंबंधानें आपले विचार जागृत होतात, आणि आपणांस तसें करण्याची प्रेरणा होते.

२. अशा जत्रांच्या प्रसंगीं घरांतील वडील माणसें लहान मुलांस त्या त्या विशिष्ट दिवसासंबंधाचे इतिहास किंवा दंतकथा किंवा काहाण्या सांगतात; ह्यामुळें गतगोष्टींची परंपरा वर्षानुवर्षें, पिढ्यानुपिढ्या, शतकानुशतकें अबाधित अशी चालू राहते आणि तेणेंकरून लहान मुलांस एक प्रकारचें शिक्षणच प्राप्त होतें.

३. अशा जत्रांचे प्रसंगीं हरतऱ्हेचे विकावयाचे जिन्नस, नानाप्रकारच्या कलाकौशल्याच्या चिजा, धान्यें, जनावरें, वगैरे पहावयास मिळून आपल्यास हवे ते जिन्नस एकदम आणि एके ठिकाणीं विकत घ्यावयास सांपडतात, आणि आपली दहा ठिकाणीं हिंडावयाची दगदग वांचते. प्राचीनकाळीं जेव्हां प्रवासाचीं साधनें हल्लींच्या इतकीं विपुल नव्हतीं, तेव्हां अशा जत्रांचा फार उपयोग

होत असे. व्यापारी लोकांना आपल्या जिनसांची अदलाबदल करण्यास संधि सांपडत असे.

४. इतर कामगारांनीं तयार करून जत्रांचे प्रसंगीं विकावयास आणलेले पदार्थ पाहून कल्पक कारागीर लोकांना त्यांतील गुणदोष समजून घेऊन आपली स्वतःचीं कारागिरी सुधारण्याची प्रवृत्ति होते. सारांश, हल्लींच्या काळीं भरणाऱ्या प्रदर्शनांचा जो उपयोग तोच प्राचीन काळच्या जत्रांचा होत असे व अजूनही होत आहे.

५. जत्रेच्या निमित्तानें वेगवेगळया ठिकाणचे लोक एकत्र जमल्यानें परस्परांमध्यें दळणवळण वाढून बंधुप्रीति उत्पन्न होते. संभाषणाच्या योगानें एकमेकांचे विचार, चालीरीति, वगैरे एकमेकांस कळून मनाचा आकुंचितपणा कमी होतो. बौद्ध भिक्षूंनीं अशा जत्रांच्या प्रसंगीं लोकांचा मोठा जमाव होण्याची संधि साधून आपल्या धर्माच्या तत्त्वांचें विवरण करून त्याचा फैलाव केला.

वर निर्दिष्ट केलेल्या फायद्यांशिवाय आणखीही जत्रांपासून होणारे फायदे आहेत. यावरून जत्रा प्रचलित करण्याच्या बाबतींत आपल्या पूर्वजांनीं आपणावर किती उपकार करून ठेविले आहेत, हें स्पष्ट कळण्याजोगें आहे.

पूर्वींच्या काळीं जत्रांच्या योगानें जें काम होत असे, तें हल्लीं पुस्तकें, वर्तमानपत्रें, प्रदर्शनें, प्रवासाचीं सुलभ साधनें, यांच्या योगानें अंशतः घडून येतें; तथापि जत्रांचें महत्त्व अद्यापि बरेंच आहे.

विद्याधर वामन भिडे.

———

लक्ष्मणशास्त्री लेले यांचीं इतर पुस्तकें.

---

१. अलंकार प्रकाश:—अलंकारशास्त्रावरील मराठी विस्तृत ग्रंथ. कि. १ रुपया.

२. पद्यमंजरी:—प्रौढ, सरस व चटकदार अशा मराठी पद्यांचा विविधविषयपर संग्रह. कि. ८ आणे.

३. **महाराष्ट्रभामिनी विलास**:—पंडित जगन्नाथराय यांच्या रसिकवंद्य भामिनीविलासाचें समूळ व समश्लोकी मराठी पद्यात्मक भाषांतर. कि. १२ आणे.

४. **मेघदूत काव्याचें समवृत्त मराठी भाषांतर**:—

५. **पद्यरत्नसमुच्चय**:—मराठी काव्यांतील सुंदर उतारे भाग १ ला व २ रा. कि. प्रत्येकीं ०८ व ०१२

६. **काव्यसौंदर्य**:—प्राचीन व अर्वाचीन मराठी काव्यांतील सरस वेंचे. कि. १० आणे.

७. **महाराष्ट्र सौंदर्यलहरी**:—श्रीमंत शंकराचार्यकृत सौंदर्यलहरीचें मराठी पद्यात्मक समश्लोकी भाषांतर. कि. २ आणे.

८ **थोर पुरुषांचीं चरित्रें**:—लहानसा उपदेशपर गद्यलेख. कि. १ आणा.

९. **सन्मार्गप्रदीप**:—उत्तम उपदेशपर लहान लहान निबंध. कि. ४ आणे.

१० **महाभारताची थोरवी**:—गद्यलेख. कि. २ आणे.

११. **रामकथेचें रहस्य**:—गद्यलेख. कि. २ आणे.

१२. **श्रीमद्भगवद्गीतेचें स्वरूप**:—गद्यलेख. कि. २ आणे.

१३ **संस्कृतवाचनपाठमाला**:—भाग पहिला कि. १२ आणे.

१४. " " " " दुसरा कि. १०२.

मिळण्याचें ठिकाण

नवीन किताबखाना, बुधवार पेठ, पुणें शहर.